शब्द

# रुची

एप्रिल २०१४ ● मूल्य १० रुपये

**स्त्रीविशेषांक**

होते आहे मी आता मुक्त

सळसळती पालवी

हिरवीगार कोवळी



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**एप्रिल २०१४, वर्ष १**
**अंक अकरावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व आतील मांडणी : **निलेश जाधव**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

## संपादकीय...

महिलादिन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी साजरा झाला. वेगवेगळे कार्यक्रम आयोजित झाले. स्त्रीला गौरवलं गेलं आणि पुन्हा नेहमीच्या रामरगाड्याला जुंपलंही गेलं. आपलाही एक दिवस असतो या आनंदात बाईही होतीच. या एका दिवसासाठी का होईना कोणीतरी विशेषतः विचार करणारे काही पुरुष आपली आठवण ठेवतात याचा आनंद असतोच बाईला. मग काय, एक दिवस मिळालेल्या या आनंदाच्या बळावर पुन्हा एकदा आपल्या पारंपरिक भूमिकेत जाऊन पुरुषाचं मन सांभाळायला तयार होते बाई. आपल्यावर असलेल्या साऱ्या भूमिकांचं ओझं सहज पेलत वाट पाहत रहाते पुढच्या आठ मार्चची. तिला अनेकदा वाटत असतं, की असा एक दिवस साजरा होण्यापेक्षा प्रत्येक दिवस आपला का असू नये? प्रत्येक दिवस आपल्या सन्मानाचा, आपल्या अधिकाराचा, आपलं सत्त्व जपण्याचा असला तर किती मज्जा! बाई स्वप्न पाहत राहते आणि स्वप्नातच खुशालून जाते.

स्त्री पाहात असलेलं हे स्वप्न वास्तवात यायला खूप काळ जावा लागेल. कदाचित पन्नास, शंभर, दोनशे वर्षही. त्यानंतरही सारं काही सुरळीत होईल असं नाही. पण आज विचार करणारी काही तरूण मुलं पाहिली की वाटतं; खरंच होईल हे. मध्यंतरी आयबीएन लोकमतनं मुक्ता आवार्डस् दिली. ती देताना सुप्रसिद्ध अभिनेता अतुल कुलकर्णी म्हणाला होता, ''आमच्या आईनं आम्हाला पुरुष म्हणून वाढवलं. सुदैवानं आमच्या बायकांनी आम्हाला कशा पद्धतीनं वाढू नये हे शिकवलं आणि जमिनीवर उतरवलं.'' पूर्वीच्या बायकांनी आपल्या मुलांना वाढवताना कायम तो मुलगा असल्याचं लक्षात ठेवलं. जाणतेअजाणतेपणी का होईना पण परंपरेनं तयार केलेल्या मानसिकतेच्या मुशीतच आपल्याकडची मुलं आणि मुलीही वाढत राहिली. त्यांच्या हातात खेळ देतानाही हा दुजाभाव आपण मनात ठेवलाच. मुलांच्या हातात भातुकलीचा सेट दिला जन्मताच तर कदाचित कामाची विभागणीही पुढे योग्य रीतीनं केली जाईल. मध्यमवर्गात किंवा बऱ्यापैकी जाण असलेल्या वर्गात

कमीतकमी महिलादिन असतो याची जाणीव तरी असते, बाईला थोडाफार मानही दिला जातो, काही कुटुंबांत नवरा बरोबरीनं तिला वागणूक देतो; पण कनिष्ठ वर्गातील पुरुषांची मानसिकता अगदी अपवादात्मक उदाहरणातच बदललेली दिसते. तिथं आजही बाईला बाई म्हणूनच वागवलं जातं. अर्थात या वर्गातील बायका जमेल तसा विरोध करत राहतात. मध्यमवर्गातील बाईला मात्र अनेकदा आपली वेदना मोकळी करता येत नाही. तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागतो. आर्थिक, वैचारिक आणि सामाजिक दृष्ट्याही मागासलेल्या (मग ते उच्चवर्णीय असले तरी वैचारिक मागासलेपण त्यांच्यातही असतंच. कधी कधी तर जास्तच असतं) वर्गात आज बाईच्या बाबतीत आनंदीआनंदच आहे.

अशा परिस्थितीत सतत स्त्री प्रश्नाविषयी बोलत राहणं आणि झोपी गेलेल्यांना जागं करणं एवढंच आपण करू शकतो. 'ग्रंथाली' गेली अनेक वर्षं वाचकांना पुस्तकांपर्यंत घेऊन जाण्याचं आणि त्या पुस्तकांसोबत विचार करायला लावण्याचं काम करते आहे. ही चळवळ या वर्षी चाळिसाव्या वर्षात पदार्पण करत आहे आणि या वाचक चळवळीचं मुखपत्र असलेलं शब्द रुची मासिकही. त्या निमित्तानं आम्ही या वर्षात पाच विशेषांक काढणार आहोत. हा पहिला विशेषांक स्त्रीविशेषांक आहे. या विशेषांकात स्त्री चळवळीचं काम करणाऱ्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांची मुलाखत आम्ही दिली आहे आणि ही मुलाखत घेतली आहे स्त्री प्रश्नांवर काम करणाऱ्या संशोधिका आणि लेखिका डॉ. मंगला आठलेकर यांनी. या बरोबरच आर्थिक, राजकीय आणि साहित्यिक क्षेत्रांत महिलांसाठी असलेली उपलब्धी, त्यांची कामगिरी, त्यांची मानसिकता आणि त्यांच्या मर्यादा याविषयी चर्चा करणारे माहितीपूर्ण लेखही आहेत. आजच्या राजकारणातील स्त्रियांच्या सहभागावर आमदार नीलम गोऱ्हे मोकळेपणाने व्यक्त झाल्या आहेत आणि त्यांना बोलतं केलं आहे अनुभवचे संपादक आनंद अवधानी यांनी. आजचे काही महत्त्वाचे कवी सातत्यानं स्त्रीकेंद्री कविता लिहिताहेत. अशा काही कवींच्या कविता मुद्दामहून देत आहोत. आजच्या या संवेदनशील लेखक आणि कवींना स्त्री म्हणजे वर्णन करण्याची वस्तू नाही तर जिला जाणून घ्यायला हवं असं जितंजागतं माणूस आहे याची जाणीव आहे म्हणूनच हे कवी मला महत्त्वाचे वाटतात.

स्त्री प्रश्नांवर सतत लिहिणं–बोलणं ही काळाची गरज आहे. सतत चर्चेत राहिल्यानं कदाचित या समाजाची स्त्रीकडे पाहण्याची मानसिकता हळूहळू बदलत चालली आहे. कमीतकमी स्त्री आणि पुरुष दोघांनाही भान यायला लागलं आहे. आणखी शंभर दोनशे वर्षांनी या प्रश्नांबद्दल बोलायलाच लागू नये असा समृद्ध विचारांचा समाज घडवण्याची सुरुवात तर करायला हवीच. त्यासाठी ग्रंथालीचा हा छोटासा प्रयत्न.

**– नीरजा**
अतिथी संपादक

ग्रंथाली


**हुमान**
संगीता उत्तम धायगुडे




नियतीनं घातलेली हुमानं सोडवत स्वत:ला सिद्ध करणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन

**मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**

**जगायचंय प्रत्येक सेकंद!**
मंगला केवळे




चर्मकार समाजातल्या तरुणाची त्यांच्या पत्नी मंगला केवळे यांनी सांगितलेली खडतर जीवनाची कहाणी

**मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

**मे आय कम इन?**
कु. तन्वी डोके




व्याधीवर मात करत जीवन कसे जगावे याचे अनुभवकथन

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**



# विद्या बाळ यांची मुलाखत

। डॉ. मंगला आठलेकर

मंगला – विद्याताई, तुमचं काम हीच तुमची खरी ओळख आहे. तुमच्या कामातून, अनेक मुलाखतींतून आणि भाषणांतून तुम्ही सर्वदूर पोचला आहात. स्वत:च्या कामाविषयी मुलाखतींच्या निमित्तानं परत परत बोलायचंही आता तुम्हाला ओझं वाटतंय हे मला कळतंय. आणि म्हणूनच आज आपण थोड्या वेगळ्या गप्पा मारू या. तुम्ही आज ज्या टप्प्यावर उभ्या आहात आणि स्त्रियांचं आत्मभान जागवण्यासाठी जे काम करत आहात त्यासाठी आतून रेटा मिळणारे प्रसंग घडलेच असणार. तुमचं स्वत:चं आयुष्य काही साधं, सरळ रेषेत संथपणे नक्कीच गेलं नसणार, आघातांशिवाय, जखमांशिवाय इथपर्यंतचा मुक्काम कठीण. तुमचा हा प्रवास आज समजून घेऊ. तुमचं बालपण, तुमच्या आयुष्यात तुम्हाला भेटलेली माणसं, आलेले प्रसंग, आवडलेल्या कविता त्यातून तुमचं घडलेलं आयुष्य, तुमचं भावजीवन.....याबद्दल आपण बोलू.

विद्याताई, आपण कितीही कामात गढले गेलो असलो तरी आपल्या बालपणानं आपलं बोट घट्ट धरून ठेवलेलं असतं. बालपणीच्या गप्पांचे विषय निघाले की त्या वयातली एक न् एक आठवण ताजी होते. जोरजोरात म्हटलेली गाणी, आंबटगोड चिंचा-कैऱ्यांची केलेली देवाणघेवाण, खेळ आणि मारामाऱ्या, गळ्यात गळे घालून केलेल्या गप्पा आणि आपलं भावजीवन घडवणारा त्या सवगंड्यातला एक अविभाज्य घटक म्हणजे आपली आई. आपल्या साऱ्याच व्यक्तिमत्त्वात आईचा प्रभाव मोठा असतो. बालपणाच्या, त्याही आईच्या आणि तिच्याभोवती गुंफलेल्या बालपणाच्या कशा आठवणी आहेत तुमच्याजवळ?

विद्याताई – मला मंगला एका गोष्टीचा खुलासा प्रथम करावासा वाटतो, की आता वय झालं म्हणून नाही, पण एकूणच जुन्या काळातल्या गोष्टी मला कमी आठवतात. त्यामुळे तुमच्या आयुष्यात कोणकोणती माणसं महत्त्वाची आहेत असं विचारलं की मला काही सांगता येत नाही. त्यामुळे कधीकधी कृतघ्नतेची भावनाही स्वत:बद्दल माझ्या मनात येते की आपण काही असे स्वयंभू नाही आहोत की माणसांविना घडलो. माझ्या आणि माझ्या आईच्या नात्याचा हा जो काही बरोबरीनं भाग तू गुंफतेयस तसं माझं आणि माझ्या आईचं नातं असं गळ्यात गळे घालणारं कधीच नव्हतं. म्हणजे माझं आणि माझ्या आईचं नातं चांगलं होतं पण माझ्या आईचा किंवा माझाही स्वभाव असा होता की आईच्या गळ्यात पडणं, आईच्या कुशीत झोपणं किंवा तिच्या कानात काही सांगणं इतक्या जवळिकीचे अनुभवच मला नाहीत. आणि आयुष्यभर,

म्हणजे मला मुलगी होईस्तोवर, याच गोष्टी माझ्या जगण्यामध्येही आपोआप येत गेल्या. खरं सांगायचं तर चळवळीत पडल्यानंतरच मी माझ्या मुलीला घट्ट मिठी मारायला लागले. त्यामुळे आईबरोबरच्या जवळिकीचा भाग माझ्या लहानपणच्या आयुष्यात नाही.

एक तर सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मला तीन मोठे भाऊ आणि मी सगळ्यात धाकटी, म्हणजे आमच्या आईला चिक्कार काम असणार. तात्यासाहेब केळकरांची मी नात असले तरी माझे वडील खूप सामान्य कुवतीचे होते. मॅट्रिक झाल्यावर राजकारणाच्या चळवळीच्या निमित्तानं शाळा-कॉलेज सोडलेलं, त्यामुळे डिग्री हातात नाही. त्यामुळे क्लेरिकल जॉब केलेला. त्यात तीन-चार नोकऱ्या बदलल्या. त्यामुळे घर आजोबांनी बांधून दिलं तरी घर जे आपल्या कष्टांनी भरावं लागतं तसं काही त्यांच्या हातून झालं नाही. त्यामुळे मोठ्या नावाचं सामान्य, पण खाऊनपिऊन सुखी असं आमचं घर होतं. घरात धुण्याभांड्याला बाई होती पण आईला हाताखाली मदतीला असं कोणी नव्हतं. अशावेळी तीन तगडे मुलगे, मी आणि वडील असा सहा माणसांचा व्याप आई सांभाळायची. सकाळचं, मधल्या वेळचं खाणं, दोन्ही वेळची जेवणं हे सगळं वेळच्या वेळी व्हायचं पण याकडे मागे वळून बघताना एक गोष्ट माझ्या लक्षात येतेय ती अशी की आईनं मला कधीच स्वयंपाकघरात स्वत:च्या मदतीला म्हणून बोलावलं नाही. कधीतरी पाटपाणी घे, कधी गूळाची ढेप आणली तर ती फोडून दे, नाहीतर दाण्याची चटणी कुटून दे, अशा अत्यंत फालतू आणि क्वचित लागणाऱ्या गोष्टीव्यतिरिक्त आईनं मला कधी स्वयंपाकघरात बोलावलं नाही आणि हे मला तिचं मोठेपण वाटतं की, 'मला किती काम



पडतं, तुला काही करायला नको' असं कधी म्हणाली नाही. पण त्यामुळे प्राथमिक शाळेपासून मॅट्रिकला, लग्न होईपर्यंत मला काहीही स्वयंपाक येत नव्हता. त्याचा एक फायदा असा झाला की आपण म्हणतो ना, ' मूल शाळेला सोडून दिलं', तसं आईनं मला शाळेसाठी सोडून दिलं होतं. माझ्या शाळेच्या ॲक्टिव्हिटीजमध्ये तिनं मला कधीच अडवलं नाही. सगळ्या पातळीवर मला मुभा होती. एक तर शाळा जवळ होती. पण तरी आईच्या मनात काही गोष्टी अशा होत्या, जशा, दुसऱ्याच्या घरी राहायला न जाणं. आणि मला तर वेडच होतं दुसऱ्यांकडे राहायला जाण्याचं. म्हणजे खालीच आजी, काकू राहायच्या. गावात मामी, मावशी सगळ्यांकडे मी राहायला जायचे. पण मैत्रिणींच्याकडे अजिबात नाही. असा दंडक का होता, तिच्या मनात कसली भीती होती ते आज मला कळतं पण त्यावेळेला मला कळायचं नाही. सगळ्या मैत्रिणी एकमेकींकडे राहायला जायच्या. पण मला काही आई कधी पाठवायची नाही. दुसरी एक गोष्ट मला आठवते ती अशी की मला शाळेत असताना चौथीची स्कॉलरशिप मिळाली होती. त्यावेळेस मोठी पार्टी ठेवली होती. म्हणजे घरातलेच सगळे, खाली चुलत भाऊ राहत होता ते सगळे.... अशा गोष्टी आई खूप उत्साहानं कारायची. यानिमित्तानं मला आणखी एक गोष्ट आठवते. आमची परिस्थिती बेताचीच होती. माझी आई अर्थातच त्यावेळेस नऊवारी साडी नेसत असे. आईची एक साडी होती. तिचा रंग गेला होता; तिला काळा रंग दिला होता. ती फाडून तिनं माझ्यासाठी परकर-पोलकं शिवलं आणि त्यावर छान बादल्यानं (कलाबुतीनं) भरलं होतं. त्या परकर-पोलक्यातला फोटो अजून माझ्याजवळ आहे. मला खूप कौतुक वाटतं की माझे सगळे कपडे आई शिवायची, खूप वर्षं! मॅट्रिकनंतर मीच कपडे शिवायला शिकले.

आणखी एक छोटा प्रसंग आठवतो. देण्याघेण्याबाबतचा, म्हणजे मैत्रिणींतलं देणं-घेणं. माझी एक प्रभा मराठे म्हणून मैत्रीण होती. खूप सधन घरातली. तिची माझी फार मैत्री होती. अजूनही आहे. तिनं त्या काळात मला माझ्या वाढदिवसाला सिल्कची साडी भेट दिली होती. मला तर अप्रूपच वाटलं. आईनं नाही कधी घेतली पण तिनं घेतली, महाग होती. मला ओझंही वाटलं होतं. आईलाही. पण तिची या प्रकारची देण्याची वृत्ती असल्यानं ती माझे डूलही घालायची. असं चालायचं आमच्यात. माझा एक डूल तिच्याकडून हरवला तर आईला एवढा राग आला. मला वाटलं तिनं एवढी साडी दिली तर तुला काही नाही वाटलं आणि डूल हरवला तर किती बाई बोलतेयस. हा मध्यमवर्गीय, सुरक्षिततेच्या पोटी असलेला आणि आपल्याकडे पैसे कमी आहेत यामुळे तयार झालेला एक दृष्टिकोन असतो, तसा तिचा होता.

आईच्या बाबतीत आता विषयच निघालाय म्हणून पुढची एक गोष्ट सांगते. माझी आई वडिलांपेक्षा खूप हुषार होती. शिकली ती मराठी पाचवी-सहावीपर्यंतच. माझ्या आत्याबाई म्हणजे

कमलाबाई देशपांडे. त्या विधवा होऊन घरी आल्यानंतर त्यांचं शिक्षण चालू होतं. त्यांना वाटायचं आपल्या वहिन्यांनीही शिकावं. पण आई सांगते, आईला आणि तिच्या जाऊबाईना इंग्रजीच्या क्लासला घातलं होतं. पण एवढं मोठं एकत्र कुटुंब. घरचं सगळ्यांचं जेवणखाण आटपून क्लासला वेळेवर पोहोचणं शक्य नसायचं. त्यामुळे क्लासला तर घातलंय, पण पुढे त्याचं काय झालं याकडे कुणाचं लक्ष नसायचं. आईला वाटायचं तेव्हा आपल्याला कदाचित शिकता आलं असतं पण ते राहून गेलं. आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे आई वडिलांपेक्षा हुषार आहे हे लहानपणी काही आमच्या लक्षात आलं नाही. नंतर मोठेपणी आईवडिलांचं जे बोलणं चालायचं, जे व्यवहार चालायचे त्यात लक्षात यायचं की खरं म्हणजे आईच कितीतरी वेळा वडिलांपेक्षा बाजी मारून निर्णय घेते. पण आपण जो पुरुषसत्ताक व्यवस्थेचा भाग म्हणतो तसं, आमच्याकडे वडीलच नेहमी आईला डॉमिनेट करायचे. मला एक छोटीशी गोष्ट आठवते. आमच्याकडे नारळाची काही झाडं होती. तेव्हा जास्तीचे नारळ विकणं हा व्यवहार आईच बघायची. आई एखादा चांगला सौदा ठरवायची आणि वडील नंतर येऊन त्याहीपेक्षा कमी दरात ते नारळ त्या माणसाला देऊन टाकायचे! असं दोन-चारदा झाल्यावर आम्ही सगळी भावंडं म्हणालो एकदा वडिलांना की, आई हुषार आहे आणि आई बघते काही गोष्टी व्यवहाराच्या तर तुम्ही कशाला त्यात लक्ष घालता? करू दे की तिला. तेव्हा आपण या व्यवहारात नाही याचा त्यांना राग यायचा. आईच्या हुषारीच्या अशा बऱ्याच गोष्टी मला आठवतात.

मंगला - तुमची आई खूप हुषार होती. तिच्या मनात अशी कधी खंत होती का, की आपल्याला शिकता आलं नाही. आपल्या कुवतीप्रमाणे आपल्याला काही मिळालं नाही. काळ जुना असला तरी बुद्धिमान बाईला आपल्या कुवतीची जाणीव असेल तर पात्रतेप्रमाणे काही न मिळाल्याची खंत तिच्या मनात राहते. तुमच्या आईनं बोलून दाखवलं कधी असं? किंवा दुसरा प्रश्न असा, की आई इतकी हुषार होती, बाईला तिच्या कुवतीप्रमाणे पुरुषप्रधान समाजात काही मिळत नाही हे अनुभवत होती. तुम्ही हे पाहत होता. आईच्या आणि तुमच्या जरी फार जवळिकीच्या गप्पा झाल्या नाहीत तरी तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात कधी असे प्रश्न तुमच्या मनात आले? म्हणजे उदा. मुलगी म्हणून हे करू नको, मैत्रिणीकडे जाऊ नको अशा सूचना आई कशा करते? आई हुषार आहे तरी आई अशी बंधनं कशी घालते? असे प्रश्न तुमच्या मनात कधी आले का? त्या काळात आईच्या संदर्भात तुमच्या मनात असा काही संघर्ष झाला का?

विद्याताई - मला हे सांगायला प्रामाणिकपणे आवडेल की मी शाळेत खूप हुषार होते. म्हणजे कायम माझा पहिला नंबर असायचा. पण मंगला, या बाबतीत मी अगदी मठ्ठ होते. माझ्या



अंगात अगदी वेड्यासारखा आज्ञाधारकपणा होता बघ. कधी आईला मी याप्रकारे प्रश्न विचारले नाहीत. कधी आईशी भांडले नाही. आई सांगेल ते ऐकायचं, आजी सांगेल तसं करायचं, असा एक वेडा आज्ञाधारकपणा माझ्या अंगात होता. माझ्या मैत्रिणी त्या काळात 'पूजा कशाला करायची' यासारखे बंडखोर प्रश्न आईवडिलांना करायच्या. पण त्या मैत्रिणींनी पुढे आयुष्यात हा बंडखोरपणा कधी दाखवला नाही. माझ्या बाबतीत सगळा उल्हासच होता. दुष्काळ होता खरं म्हणजे. माझ्या मनात तेव्हा असे प्रश्न कधी आलेच नाहीत. माझ्या आईशी, वडिलांशी माझा असा डॉयलॉग कधी झाला नाही. कारण कुणाशी कधी कुठल्या गोष्टीवरून भांडणच नाही. सगळ्यांचं ऐकायचं असा स्वभाव होता. आज जेव्हा मी तरुण पिढीशी बोलते तेव्हा वडीलमाणसांना, मोठ्या माणसांना आवडणार नाही अशी एक गोष्ट मी त्यांना सांगते की, आज्ञाधारकपणा हा गुण असला तरी त्याचा अतिरेक हा दोष आहे आणि हा माझा अनुभव आहे. मला माझ्या वयाच्या पस्तिशीपर्यंत असे प्रश्न पडलेच नाहीत.

मंगला - आजही तुमचं बंड टोकाचं स्वरूप घेत नाही. न आवडणाऱ्या गोष्टींचा निषेध असतो. ज्याला जहाल बंडखोरी म्हणू ती तुमच्यात नसेल, पण तत्त्वाला न मानवणारं तुम्ही नाकारता. तुम्ही आज्ञाधारक होता, तुमच्या मनात त्या काळात असे प्रश्न कधी आले नाहीत, याचं कारण तुमच्या आयुष्यात तशा कठोर संघर्षाची तेव्हा वेळच आली नाही हे असेल? आज जाचक व्यवस्थेविषयी जो एक शांत ठाम निषेध तुमच्या कृतीत दिसतो तो विचाराचा भाग तेव्हाही असणारच. तुम्ही खरं तर एवढ्या बुद्धिमान होता, लहानपणी घरात तुमची बुद्धीमत्ता कळलीही होती. असं असताना 'आणखी पुढे शिक' असं आईनं कसं सांगितलं नाही.

वयाच्या अठराव्या वर्षीच तुमचं लग्न कसं झालं? इतक्या लहान वयात लग्न होऊन सासरी जाताना 'तुझं स्वातंत्र्य जप ' असं सांगणारी आई लाभली की 'सासरच्यांचं मन सांभाळ, नवऱ्याची सेवा कर' .....ह्यासारख्या हातापायातल्या परंपरेच्या बेड्या घट्ट करणाऱ्या सूचना आईनं केल्या?

विद्याताई – असं काहीच झालं नाही. आई स्वत:चं मत कधी जाहीरपणे मांडणारी नव्हती. आईची सगळी हुषारी आम्हाला तिच्या व्यवहारामध्ये आणि घरात कमी पैसा असतानाही सगळं उत्तम तऱ्हेनं मॅनेज करण्यामध्ये दिसली. वैचारिक म्हणतो ना तसं काही नाही. तिचं वाचन वगैरे काही नव्हतं. पेपर सुद्धा ती वाचत नव्हती. त्यामुळे ती आपली तात्या, ताई, आक्का यांच्या गोष्टी बोलायची. स्वत:च्या वाचनातून येणारा किंवा स्वतंत्रपणे असणारा कुठलाच विचार तिच्या डोक्यात नव्हता. आईनं लग्न एवढ्या लहान वयात कसं करून दिलं, तर तो माझाच वेडा हट्ट होता. आणि माझ्या वडिलांना एवढंच कळलं होतं की आपली मुलगी हुषार आहे आणि तिचं शिक्षण पुरं झालं पाहिजे.

तुला एक गमतीची गोष्ट सांगते, ज्याला शाळेची हुषारी म्हणतात ती आम्हा सर्व भावंडामध्ये माझ्याकडेच होती. अर्थात आज मागे वळून बघताना शाळेची हुषारी ही खरी हुषारी असं मला अजिबात वाटत नाही. पण खेळ, व्यायाम, गाणी, गॅदरिंग सगळ्यात मी वेड्यासारखा भाग घेत असे आणि सगळीकडे बक्षिसंही मिळवत असे, या बॅकग्राऊंडवर वडिलांना माझ्याबद्दल वाटायचं. म्हणूनच लग्नाला जो थोडासा विरोध होता त्याला हे तर कारण होतंच, पण आणखीही बरीच कारणं होती. त्यातलं एक महत्त्वाचं म्हणजे माझा नवरा म्हणजे माझे शिक्षकच होते. प्रेमविवाहच होता आमचा. शाळेत असतानाच प्रेमात पडले. माझं लग्न अठराव्या वर्षी झालं. त्याआधीच मी प्रेमात पडले होते. म्हणजे काय वेडेपणा होता त्याची तू कल्पना कर. म्हणून मी सगळ्यांना सांगते, सोळा–अठरा हे प्रेमात पडण्याचं वय असलं तरी लग्न करण्याचं वय अजिबात नाही. अनुभवावरून सांगते. त्या रोमँटिक वयात प्रेम करावंसं वाटतं हे खरं पण लग्न नये करता कामा असं आता सांगावंसं वाटतं कारण त्यावेळंचं प्रेम हे 'प्रेम' या कल्पनेवर केलेलं प्रेम असतं.

आमच्या लग्नातलं शिक्षक विद्यार्थ्याचं नातं, त्यात त्यांची परिस्थिती काही खास नव्हती, वडिलांना वाटे, हिला चांगलं स्थळ मिळेल, पण मला आता प्रश्न पडतो, वडिलांना कशाच्या जीवावर वाटे की मला चांगलं स्थळ मिळेल असं, म्हणजे केळकरांच्या घराण्याशिवाय आमच्याकडे काहीच नव्हतं. जर बुद्धीची आणि हुषारीची ओळख पटायची असेल तर ते प्रेमविवाहातच शक्य असतं. मी दिसायलाही सामान्य. ठरवलेल्या लग्नात काही असं होत नाही. मला नाही वाटायचं की मला श्रीमंत आणि सुंदर नवरा मिळेल पण आईवडिलांना वाटायचं. नवऱ्याची बेताच्या पगाराची नोकरी, आई नाही, एकूण परिस्थिती जेमतेम..... अशा आपल्याहून बेताच्या घरात मुलगी द्यावी की नाही असं वडिलांच्या मनात येई, त्यातूनच त्यांचा या लग्नाला विरोध होता. शिवाय आमच्यात दहा वर्षांचं अंतर होतं. शेवटी वडिलांनी अट घातली त्यांना, ' हिचं शिक्षण तुम्ही पुरं केलं पाहिजे, तर मग तिचं फर्स्ट इयर झाल्यावर लग्न करून देतो.' असं ठरल्यावर ते लग्न झालं.

माझ्या आईनं लग्नाच्या वेळेस मला काहीच मेसेज दिल्याचं मला आठवत नाही. तसा हा देखील मी मघाशी म्हटल्याप्रमाणे माझ्या कृतघ्नपणाचाही भाग असू शकतो. 'सांभाळून वाग, मनासारखी जग' असं काहीच आईनं म्हटल्याचं मला आठवत नाही. त्यामुळे मी त्या प्रेमाच्या कैफात लग्न केलं. नवऱ्यानंही 'घरात बारा वर्षं आई नाही, बाई नाही, तेव्हा माझ्या घराला घरपण दे.' म्हणून मला सांगितलं आणि मीही एकदम उडी मारून त्या संसारात पडले.

लग्नानंतर कॉलेज सुरू झालं. पण पहिल्याच वर्षी ड्राय प्लुरसीनं आजारी पडले. त्यात एक वर्ष बुडलं. नंतर ज्युनियर बी.ए.ला असताना गरोदर राहिले. शिक्षण थांबलं नाही. पण सलग झालं नाही. मला तीन दीर होते. सासरे चांगले होते. पण कधीच स्वयंपाक घरात न केलेल्या मला इतक्या जणांचा स्वयंपाक, मूल सांभाळत शिक्षण पूर्ण करता येणं शक्य नव्हतं. सुरुवातीपासूनच त्यांनी बेताची परिस्थिती असूनही घरात दोन्ही वेळेच्या स्वयंपाकासाठी बाई ठेवली हे मात्र आवर्जून नोंदवायला हवं. तरीपण अडथळे येत शिकले.

मंगला – तुम्ही तुमच्या आयुष्यात मुलगी, बायको, सून, आई, सासू या साऱ्या अवस्थांतून गेलात. काय होते त्या त्या वेळचे अनुभव? मोडून टाकणारे?...नव्यानं तुम्हाला घडवणारे?.....की तुम्हाला ज्याची कधी जाणीव झाली नाही अशी तुमच्यात मूलत:च असलेली बंडखोरी जागी करणारे?

विद्याताई – शेवटचाच भाग सगळ्यात बरोबर आहे, मला नेहमीच असं वाटतं की, माझ्यात काही एक बीज होतं ते नंतर वर आलं. मला नेहमीच माझ्या अनुभवावरून बायांना सांगावंसं वाटतं की, मी पण नाही का अगदी वयाच्या पस्तिसाव्या वर्षापर्यंत ज्याला पारंपरिकच म्हणता येईल असं जीवन जगले? जेव्हा चळवळीचं किंवा अन्य काही एक्स्पोजर मला मिळालं तेव्हा आत होतं ते काहीतरी वर यायला लागलं, रुजलं, वाढलं. मग हे जुने विचार कसे चुकीचे आहेत हे लक्षात यायला लागलं. उदा. लग्नानंतरची जवळ जवळ अठरा ते वीस वर्ष मी अगदी आनंदानं संसार केला. 'मध्यमवर्गीयाची जगण्याची चौकट' असं मी आज ज्याला म्हणते त्यात अगदी छान डुंबत मी संसार केला. लग्नं, मुंजी, हळदीकुंकू सगळ्या गोष्टी मी केल्या. नोकरीलाही लागले. तिथंही कसं झालं बघ; मराठी हा माझा आवडता विषय होता, पण हा विषय घेऊन नोकरी मिळणार कशी, म्हणून मला न आवडणारा इकॉनॉमिक्स हा विषय घेतला. पण मला ना त्या

विषयाची ट्युटरशिप मिळाली, ना बँकेत नोकरी मिळाली. मग नवरा म्हणाला, 'ज्युनियर एम्. ए. कर. एम्. ए. होऊन काही होतं का ते बघू,' मग मी ज्यु. एम्. ए. ला नाव घातलं. मला त्यादरम्यान आकाशवाणीवर नोकरी मिळाली.

नोकरी माणसाला खूप काय काय देते. मला नोकरी मिळाली ५८ साली, म्हणजे एकवीस वर्षांची होते मी. तिथं सोळा महिने नोकरी केली मी. त्या वेळेस दुसऱ्या मुलाच्या वेळी मी गरोदर होते. मला प्रोड्युसरशिप मिळाली नाही म्हणून राजीनामा देऊन मी तिथून बाहेर पडले. दरम्यान माझा मुलगाही जरा मोठा झाला आणि मला 'स्त्री'मध्ये नोकरी मिळाली. तू जी काही बंडखोरी म्हणतेस त्याला खरं म्हणजे इथून सुरुवात झाली. ती सुद्धा लगेच नाहीच, पहिली पाच सहा वर्षं काम समजून घेण्यात, रुळण्यात गेली. मी ६४ साली 'स्त्री'मध्ये लागले आणि ७२ च्या नंतर या गोष्टीला हळूहळू सुरुवात झाली. मी साल अशासाठी सांगते की माझी एक मैत्रीण इंग्लंडमध्ये होती. ती त्यावेळेला परत आली. माझं 'कमलाकी' प्रसिद्ध झालं होतं. ते तिनं वाचलं आणि तिला असं वाटलं की हिच्यात खूप पोटेन्शिअल आहे आणि ही काय करत बसलीय. म्हणजे माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असलेल्या माझ्या मैत्रीणीला कळलं. ती खूप हुषार होती. मी 'स्त्री'मध्ये लागले होते. त्या मासिकातून दरवेळेस लोकांना काही नवीन द्यायचं



COVER STORY — VINITA DESHMUKH

**Is Marriage Obsolete ?**

Is the nuptial knot an eternal bondage that subjects a woman to lifelong servitude? Does it deprive her of her freedom to retain her identity? Should this sanctified institution be dissolved in order to give a rightful place to a woman in the society? Eminent personalities from various fields in Pune spoke vociferously on this subject.

MARRIAGES, they say, are made in heaven, but it is one big roller coaster ride once they take shape on earth. It is no more an easy gamble for the stronger sex' who checkmated their spouses into eternal survellience and domesticity. Today, the woman is breaking out of the coccoon of her home and hearth to play a dual role of a breadwinner and housekeeper without shirking or compromising on the domestic front.

The sea change in the female psyche has led to a unique social upheaval where the woman has found her avenues of personal growth and is able to fend for herself without her husband's umbrella. But the restraint from a large part of the male fraternity to accept and adjust to this one-to-one situation has led to a tight rope walk in matrimonial alliances. While many men would outwardly wax eloquent about equal rights and opportunities for their fair counterparts, they consider it a privilege to be the undisputed rulers in their bedrooms where they would expect their wives to be doormats to pamper their egos.

As a result, marital discords have become more evident than before.

Vidya Bal : centre of the storm

The rule of the thumb seems to be to break but not to bend. Supressing injustices and humiliation has reached a dead end. No wonder then, the traditional city of Pune is witnessing this changing trend, with the courts receiving an increasing number of divorce petitions with every passing year.

Is the institution of marriage becoming irrelevant to the changing socio-economic conditions?

Is the institution of marriage becoming irrelevant to the changing socio-economic conditions? Should the very perception of marriage change to suit the present needs?

If marriage was looked upon with skepticism by a bubbling teenager, the effect would have been only a ripple. But more and more people from conventional and orthodox families are questioning the relevance of this institution which has ceased to function as a platform for healthy growth. Others recommend a refurbishing of the existing pattern.

Vidya Bal, the noted women's activist and Editor of Milun sarya jani created a stir recently, when she was asked to talk on extra-marital affairs at a public function. Quoting a friend, she stated that she agreed with her that marriage is an unnatural institution. Giving several references, she elaborated on how it was a code developed by man. Publishing excerpts of her speech with sensational headlines by a couple of leading local dailies, made the readers sit up. Specially, because it came from a middle class, orthodox Maharashtrian Brahmin woman. Accusing the press of misquoting her statement and putting it out of context, she says she never meant to vulgarise the institution of marriage which was a glorious tradition that we have preserved. Only she felt, we must be open about it and try to bridge the lacunae that are in it. She opened the debate for us.

8 — INDIAN EXPRESS CITIZEN

त्यासाठी माझ्या या मैत्रिणीबरोबरच्या गप्पा उपयोगी पडल्या.

कॉलेजमध्ये माझं तरुणपण हरवूनच गेलं होतं. कारण लग्न झालेली बाई जरा वेगळीच पडते तिथं. म्हणजे मी बाकी सगळ्यात होते बरं का, म्हणजे उदा. वक्त्वृत्वस्पर्धा. मी त्यात बक्षिसं घेत होते. त्यावर्षी इतक्या वर्षांनंतर सरस्वतीची ट्रॉफी फर्ग्युसन कॉलेजला मिळाली. असलं बारीकसारीक करत होते. पण कॉलेज संपलं की लगेच घरी जायचं. घरची माणसं चांगली होती. मला कसले काच नव्हते. तरी मला नेहमी असं वाटतं, की कितीही वर्षांची मुलगी असो, लग्न झालं की लगेच बाई बनते! तशी मी बाई बनले. त्यानंतर इतक्या वर्षांनंतर ही मैत्रीण माझ्या आयुष्यात आली. तेव्हा मी स्कूटर घेतली होती. प्रेसमध्ये नोकरी करत होते. त्या टप्प्यावर तिच्याबरोबरच्या गप्पांनी आयुष्यात खूप वेगळं वळण आलं. तिनं इंग्रजी खूप वाचलेलं होतं. काफ्का, काम्यू ही नावं सुद्धा मी तेव्हा ऐकलेली नव्हती. मराठीतलंही खूप वाचलेलं ती माझ्याशी बोलायची. ह्या गप्पांमध्ये माझा जीव खूप रमायला लागला. मला तीन मुलं झालेली होती त्यावेळेस. आम्ही स्कूटरवरनं लांब फिरायला जायचो. मी असं म्हणते नेहमी की तिच्यामुळे मला माझं हरवलेलं तारुण्य सापडलं. पुन्हा एकदा वाढायला लागले मी.

ह्या तिच्याबरोबरच्या गप्पांमधून मला जाणीव व्हायला लागली, की संसारात आपण आपल्याला हवं ते काहीच करत नाही आहोत. म्हणजे संसाराचा वीट वगैरे आला नव्हता. पण तिच्या माझ्या गप्पातून खूप काही वेगळं जाणवत गेलं. एक प्रसंग सांगते, ती माझ्या घरी आली होती आणि आम्ही गप्पा मारत बसलो होतो. दोन-अडीच खोल्यांचं घर. आत आम्ही गप्पा मारत होतो. बाहेर कुणीतरी आलं होतं. तेव्हा माझे सासरे वारलेले होते. तेव्हा आल्यागेल्याशी बोलणारी अशी मीच होते. मग मी चहापाणी केलं तरी ते गृहस्थ बोलतच बसले. मलाही त्यांना कटवता येईना. मग माझी मैत्रीण खूप चिडली. म्हणाली, 'मी जाते.' आणि ती गेली. जरा वेळानं तिचा फोन आला. माझ्या नवऱ्याला वाटलं, इतका वेळ बोलतच होता की, आता काय आणखी फोनवर? फोनवर बोलत बसण्याचा त्याला खूप राग यायचा.

तिचं आणि माझं जे बोलणं झालं त्यात तिनं मला विचारलं की, तू संसार करतेस पण तुझा रोल काय फक्त एन्टरटेनरचा आहे का? या प्रश्नानं खरं म्हणजे मला राग आला. मी तिला म्हटलं, 'कुणी आलं तर चहापाणी पण नाही का करायचं?' ती म्हणाली, 'मी कुठे नाही म्हणते. पण कोण कुठलं माणूस, मला अंदाज आला की ते काही तुझ्याकडे खास म्हणून आलेलं नाहीय. आणि आपल्या चांगल्या गप्पा चाललेल्या सोडून तू त्यात रमलीस.' म्हणजे तिला माझ्या वागण्याचा राग तर आलाच. पण तिला माझ्याविषयी एक कळकळ होती की हे काय, ह्याच्यात कशाला हिनं वेळ घालवायचा?

असे अनेक प्रश्न आले आयुष्यात की जे तिनं पहिल्यांदा

विचारल्यावर मला राग आला. कारण पारंपरिक 'मी' आणि प्रश्न विचारल्यावर जागी होऊ बघणारी 'मी' ह्यांच्यात भांडण व्हायचं. पण नंतर विचार करायला लागल्यावर मला वाटलं की ती म्हणतेय ते बरोबर आहे. आपल्याला वाचायचं असतं, आपल्याला गप्पा मारायच्या असतात, फिरायला जायचं असतं आणि ह्यात काय अडकतोय आपण? 'काय अडकतोय' ह्याचा अर्थ एवढाच की घरात सगळं करून किंवा दोन गोष्टी न करून वेळ काढला पाहिजे हे मला जेव्हापासून कळायला लागलं तेव्हा मनात प्रश्न उगवायला सुरुवात झाली. आपण पूजा कशासाठी करतो, न करणाऱ्या बायकांचं काय होतं, असे प्रश्न पडायला लागले. पाळीभोवतीचे प्रश्न पडायला लागले. आणि असे अनेक प्रश्न पडायला लागले आणि ह्याला जशी ही मैत्रीण कारणीभूत झाली तसेच 'स्त्री'मधले अनेक उपक्रमही कारणीभूत ठरले. 'मी सुगृहिणी' ह्या एका उपक्रमात घर सांभाळणं, बजेट, घरातल्यांचं आरोग्य यांसारखे विषय हाताळताना मला पाळीविषयी कितीतरी माहिती कळली. जी मला एक मुलगी होऊनही माहिती नव्हती. त्याचा अतिशय चांगला उपयोग मला माझ्या मुलीच्या वाढीच्या संदर्भात करता आला. 'स्त्री'मधल्या नोकरीतल्या अशा अनेक उपक्रमांची मदत माझ्या वाढण्यातही झाली. धक्का, एम्बॅरसमेंट हे जे आम्ही आमच्या पाळीच्या वेळी अनुभवलं तसं काही माझ्या मुलीच्या बाबतीत झालं नाही. ती एकदम कॉन्फिडन्ट होती. या सगळ्यातून माझी प्रश्न करण्याची वृत्ती वाढत गेली. त्याच्यातूनच आज माझ्या स्वभावात जी काही बंडखोरी दिसते ती निर्माण झाली. ही दिसते बंडखोरी, पण मला वाटतं हे फक्त बदलानं आलेलं वेगळेपण आहे.

मंगला – मग यामुळे घरातले नातेसंबंध कुठे बदलले?

विद्याताई – म्हणजे एकदम भूकंप वगैरे नाही. कारण तू म्हणतेस तशी माझी खूप बदललेली चाल हळूहळूच चाललेली होती. पण कॉन्फ्लिक्ट्सना सुरुवात झाली. कालपर्यंत आपली बायको घर, मुलंबाळं, घरातल्यांबरोबरच कुठेतरी जाणं ह्या गोष्टी करत होती, ती आता काहीतरी वेगळं करतेय. म्हणजे मित्र आयुष्यात आला तर नवऱ्याला जसा राग येतो तसंच मैत्रीण आयुष्यात आली तरी ते नवऱ्याला आवडत नाही हे मी अनुभवत होते. हा पझेसिव्हनेसचा भाग आहे. मैत्रीण आली की बायकोला आपल्यापेक्षा तिच्याबरोबर गप्पा करण्यात जास्त इन्टरेस्ट वाटतो हे त्याच्या लक्षात आल्याबरोबर मग 'तुझं मुलांकडे लक्ष नाही, तू घरात बघत नाहीस.' अशा गोष्टी सुरू झाल्या. मी मुलांना कमी वेळ दिला ही गोष्ट खरी, पण मी मुलांना एवढी हवी होते का, हा ही खरा प्रश्न आहे. आणि तुलनेनं नवऱ्यापेक्षा मीच मुलांना जास्त वेळ देत होते. मी काही फार सजग पालक होते असं मी म्हणणार नाही. पण मुलांना सुट्टी लागली की 'काय करू, काय करू' म्हणून मुलं सतावत तेव्हा मुलांचं सोशलायझेशन व्हावं असे काही उपक्रम मी त्यांना सुचवत असे. पण त्यांना काही ते आवडत नसत ही गोष्ट वेगळी.

मंगला – तुमच्या पंधरा-सोळाच्या वयातला भोवताल म्हणजे र.धों.च्या कार्यानं, विभावरी शिरुरकरांच्या लेखनानं संतप्त झालेला आणि उघडा पडलेला दुटप्पी पुरुषप्रधान व्यवस्थेचा काळ! कुठल्याही नवविचारानं भारून जायच्या त्या वयात तुम्हाला काय वाटायचं र.धों.च्या कामाबद्दल, विभावरीबाईंच्या साहित्याबद्दल?

विद्याताई – पुन्हा एकदा लाज वाटणारी एक गोष्ट मी प्रामाणिकपणे कबूल करते की तात्यासाहेब केळकरांचं घर म्हणून मोठ्या तोंडानं आम्ही जरी सांगत असलो आणि माझ्या वडिलांना जरी वाचनाची आवड असली तरी वाचनाला एक जो रंग-रूप-आकार असावा लागतो तसा काही आकार, दिशा आमच्या वाचनाला नव्हती. घरात आईवडील सांगतात 'हे वाच, ते वाच,' तसंही काही नव्हतं. मी शाळेत काही वाचत असे. पण आज मला त्यातलं एकही नाव तुला सांगता येणार नाही. त्यामुळे मला र.धों, विभावरीबाई वगैरे काहीही माहीत नव्हतं. महाराष्ट्रातली अगदी महात्मा फुल्यांपासूनची सगळी थोर मंडळी मला चळवळीत आल्यानंतर ठाऊक झाली. मालतीबाई तर आमच्या समोरच्या गल्लीत राहत होत्या. इरावतीबाई आमच्या कमलाबाईंकडे येत होत्या. पण मला यातलं काही ठाऊक नव्हतं हे सांगताना मला अतिशय लाज वाटते.

मंगला – वैचारिक, जगण्याला दिशा देणारं, समाजप्रबोधन करणारं असं वाचन बाजूला राहू दे पण तुमच्या काळात चांगली कविता लिहिली जात होती. विशीच्या आसपास आवडणाऱ्या कविता आपला पिंड निश्चित करत असतात. आपल्याला आवडणारं साहित्य आपल्या जीवनाच्या प्रवासाचंही सूचक असतं. आजच्या तुमच्या घडणीत अशा कोणत्या लेखकांचा वाटा आहे?

विद्याताई – नाही. काही नाही. म्हणजे तू असं विचारल्यावर मला फक्त 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्यांचे हात' ही कुसुमाग्रजांची कविता आठवते. त्या काळात नाही, पण थोड्या नंतरच्या काळात मी स्वत:ही काही कविता केल्या. पण त्या माझ्या आयुष्यात संघर्ष सुरू झाल्यावरच्या माझ्या फ्रस्ट्रेशनच्या कविता होत्या. पण आजूबाजूला जे चांगलं साहित्य, चांगली कविता होती त्याचा मला स्पर्शही झालेला नव्हता. माझं सगळं घडणं अनुभवातूनच झालं. माझ्या आजारपणाच्या काळात मी रमाबाई रानड्यांचं किंवा लक्ष्मीबाई टिळकांचं पुस्तक वाचलं होतं, पण त्याचा काही माझ्या आयुष्याशी संबंध नाही बुवा लागला. म्हणजे जमीन अजून नापीकच होती. काही प्रश्न वगैरे उगवत नव्हते. काहीच नव्हतं त्या काळात!

मंगला – आश्चर्य आहे! तुमची सेन्सेटिव्हिटी इतकी तीव्र आहे, तुम्हाला कसं हलवलं नाही कुठल्या पुस्तकानं?

विद्याताई – हलवण्याबाबत म्हणशील तर सांगते. माझा एक भाऊ संघात होता, माझा नवराही संघातलाच. मी लहान असताना सत्याग्रहही झाला होता सत्तेचाळीसचा. त्या काळात संघाच्या गाण्यांचा माझ्यावर खूप प्रभाव होता. 'बलसागर भारत होवो', 'देशभक्ती प्रारंभ जीवनाचा' असलं जे काही होतं त्याचा माझ्यावर प्रभाव होता. वडील मुंबईला होते. त्यांनी मला सावरकरांचं एक पुस्तक आणून दिलं होतं. पण त्या काळात अशी जरी मी प्रभावीत झाले तरी घेतलं काहीच नाही त्यातलं.



मंगला – व्यक्तिस्वातंत्र्य, निर्णयस्वातंत्र्य ह्याची आस तुम्हाला कळायला लागल्यापासून होती? की हे खूप उशिरा उलगडलं आयुष्यात? सामाजिक व्यवस्थेला प्रश्न करत ती नव्यानं उभारू पाहणारी सुधारक मंडळी ही बालपणापासूनच सामान्याहून वेगळी असतात. त्यांची चरित्र तशी साक्षही देतात. पण महर्षी कर्व्यांना वयाची तिशी उलटेपर्यंत आपण स्त्रीशिक्षणाच्या संदर्भात क्रांतिकारी काम करणार आहोत असं कधी स्पर्शूनही गेलं नाही. तुमचा तुमच्यातल्या बंडखोर अंशाशी बालपणापासून परिचय होता की परिस्थितीनं तुम्हाला घडवलं? परिस्थितीनं घडवलं असेल तर त्याचे टप्पे सांगता येतील? किंवा तुम्ही मुलगी, सून, आई, सासू अशा सर्व अवस्थांतून गेलात तेव्हा सासू म्हणून पारंपरिक पद्धतीनं वागायचं नाही, असं काही जाणीवपूर्वक घडवलंत स्वत:ला? स्वत:ला संस्कारित करत गेलात?

विद्याताई – मला असं वाटतं, की जी काही मी आहे त्यामध्ये खूपसा भाग जन्मजात गोष्टींचा आहे. ह्या गोष्टी मी काही फार प्रयत्नपूर्वक वाढवल्या आहेत असं म्हणण्यापेक्षा पटकन कुणाशी न भांडणं, आवाज न चढवणं, फटकारून कुणाला न बोलणं, बराचसा प्रेमळ असा माझा स्वभाव आहे. आणि एका बाबतीत तर मी कर्व्यांच्याही पुढे आहे. पस्तिशीनंतर मला किंचित जाग यायला सुरुवात झाली.

आता तू म्हणालीस त्या संदर्भात काही भाग मला सुनेच्या बाबतीतला सांगावासा वाटतो. माझ्या मुलाचं आणि सुनेचं जेव्हा पटेना त्यावेळेस मी घरातून बाहेर पडायच्या मार्गावर होते. तेव्हा मी तळघरात राहत होते. आमच्याच घरात मी एकटी राहत होते. तेव्हा माझी सून यायची माझ्याकडे, तर माझ्या मुलाला काही ते आवडायचं नाही. त्याला वाटायचं आई काहीतरी भरवेल हिच्या डोक्यात. तेव्हा मी तिला सांगितलं होतं की, 'हे बघ, तुमचं दोघांचं आयुष्य महत्त्वाचं आहे, त्याला आवडत नसेल तर तू येऊ नकोस माझ्याकडे. माझा काही गैरसमज होणार नाही.' माझा मुलगा रागीट आहे. तेव्हा सुनेचं आयुष्य सुकर होण्याच्या दृष्टीनं मी असा प्रयत्न केला. पुढेही आयुष्यात असं झालं की मुलाला डिव्होर्स हवा होता आणि सुनेला नको होता तेव्हा मी तिला सांगितलं की, एखाद्याला आपण नको असतो तेव्हा तिथं राहण्यात आपला कोणताही सन्मान नाही. तेव्हा तिला असं वाटलं की हो, ही ह्या मुलाची आई आहे तेव्हा ती असंच सांगणार. नंतर दोनेक वर्षं गेली आणि तिला पटलं की डिव्होर्स घ्यायला हवा. पण माझा मुलगा तिला डिव्होर्सच्या बदल्यात काही व्यवस्थित देईना. त्यावेळेस मी तिच्या बाजूनं उभी राहिले. तेव्हा त्याला वाटलं, आई स्त्रीमुक्तीवालीच आहे!

शेवटी मला असं वाटतं की माणूस आणि त्याचं चांगलं असणं हे महत्त्वाचं. मग तो आपला मुलगा आहे की सून आहे, मुलगी आहे की जावई आहे हे महत्त्वाचं नाही. असा भेदाभेद मी कधी केला नाही. पण त्यासाठी मी काही खूप प्रयत्न वगैरेही केले नाहीत. आता हे इनहेरन्ट असतं का मला माहीत नाही. पण माझ्या आजोबांचा स्वभाव असाच होता. मी कमलाबाई देशपांडेंचं चरित्र लिहिलं तेव्हा माझ्या हे लक्षात आलं. आजोबांना मरण्यापूर्वी 'द थिअरी ऑफ गोल्डन मीन' हे पुस्तक लिहायचं होतं. त्याच्या आधीच ते गेले. पण हा जो त्यांचा स्वभाव होता त्यामुळे त्यांची खूप टिंगलही झाली. की ' म्हटलं तर आहे म्हटलं तर नाही,' असं केळकर म्हणणार! मला नेहमी दुसऱ्यानं काही म्हटलं की त्यातही काही तथ्य असू शकेल हं, असं म्हणून विचार करायची सवय लागली. ते मी काही मुद्दाम वाढवलं असं नाही.

मंगला – पण त्यासाठी न्यायावर प्रेम असावं लागतं ना.

विद्याताई – हो. पण त्यातही मला असं नाही वाटत की मी खूप काही प्रयत्न केलेत, जे माझ्यात होतं ते अधिक वर यायला लागलं इतकंच.

मंगला – न्यायावर प्रेम असणं, बंडखोरी ही जे स्वभावविशेष असतात त्यांची बालपणात कुठेतरी खूण उमटतच असते. आता तुमच्यात जे जे आहे ते सगळं तुमच्या लहानपणात कसं दिसत नाही याचं मला म्हणूनच कोडं वाटतं.

मंगला – याचं कारण असं आहे की माझं शाळेतलं आयुष्य यशस्वी होतं. फार यशस्वी. म्हणजे कुठे काही कमी पडलं नाही, कोणी कसला अन्याय कधी केला नाही, अपमान वाट्याला आला नाही. कुणी कधी बोललं नाही. वरवरच चढत गेले. स्पर्धांत भाग घेतला तर त्यात बक्षिसं, शाळेत आदर्श विद्यार्थिनी, परीक्षा दिल्या त्यात सहज पास......त्यामुळे आपल्यावर अन्याय होतोय अशी कुठं तडफड झालीच नाही. शिवाय माझा स्वभावही काही फार महत्त्वाकांक्षी नव्हता. म्हणजे मला चौथीची स्कॉलरशिप मिळाली आणि सातवीची नाही मिळाली तर काही फार भयंकर झालं असं नाही वाटलं. एक फक्त आठवतं, त्यावेळेस ब्राह्मणांसाठी दोन स्कॉलरशिप्स असायच्या आणि बाकीच्यांना कमी मार्क्स मिळूनही जनरल स्कॉलरशिप असायची. माझ्याबरोबरच्या एका माझ्याहून कमी मार्क्स मिळवणाऱ्या मुलीला ती स्कॉलरशिप मिळाली आणि मला ब्राह्मण असल्यामुळे मिळाली नाही तेव्हा एकदा राग आला होता. 'ह्यांचं आपलं बरं आहे, कमी मार्क्स मिळूनही ह्यांना मिळते स्कॉलरशिप.' असं वाटून गेलं. पण ह्याच्या पलिकडे अक्कलही नव्हती आणि विचारही नव्हता. पण एक खरं, की यशानं मला खूप खुरटवलं. अपयश आपल्याला खूप काही शिकवतं. कुठलीही सामाजिक जाणीव मला नसणं याचं कारण हेच होतं की मला मिळणाऱ्या यशात आणि मस्तीत मी इतकी तृप्त होते की माझं लक्ष सामाजिक प्रश्नांकडे गेलंच नाही त्या काळात. सामाजिक प्रश्नांकडे नाही, सामाजिक लेखनाकडेही नाही.

पण मी म्हटलं तसं चळवळीचा हाच उपयोग असतो. प्रत्येक माणसात काहीतरी असतंच, त्याची त्याला जाणीव होऊन काही जण ते वाढवतात. काहीजणांचं ते डॉर्मंट राहतं तसं माझं डॉर्मंट राहिलं. आणि चळवळीच्या अंगानं जे वाढत गेलं ते सरसर वाढत गेलं. अर्थात जेवढं माझ्यात होतं तेवढीच मी वाढले. याहून मी काही इरावतीबाई कर्वे, दुर्गाबाई भागवत होण्याची शक्यता नव्हती. कारण ते माझ्यात नव्हतंच. आपल्यात जे सुप्त स्वरूपात असतं ते वर यायला चळवळ, वाचन, एक्स्पोजर उपयोगी पडतं. 'स्त्री' मासिकातलं काम, ७५ सालानंतरचं माझ्या आयुष्यानं घेतलेलं वेगळं वळण, माझ्याहून दहा वर्षांनी लहान असलेल्या मैत्रीणीशी होणाऱ्या गप्पा आणि अरुण लिमयेंशी ७८ साली झालेली ओळख यांनी माझ्यात खूप बदल घडवले.



अरुण कॅन्सर झाल्यामुळे तुरुंगातून बाहेर आला होता. तेव्हा आमची नव्यानं ओळख झाली. आणीबाणीच्या काळातल्या पत्रव्यवहारावर पुस्तक करणारा अरुण खरं तर माझाच बॅचमेट, पण पुढे तो सायन्सला गेला आणि मी आर्ट्सला गेले. त्यानं ते पुस्तक करताना मला 'मदत करशील का,' असं विचारलं. मी 'हो' म्हणाले आणि मग आमची मैत्री वाढत गेली. माझी मैत्रीण ॲनॅलिटिकल होती, विचार करणारी होती. तिच्यामुळे मी विचार करायला शिकले आणि अरुण कार्यकर्ता होता. त्याच्यामुळे मी कृतिशील झाले. त्याच्याकडे युक्रांदची अनेक मुलं भेटली. तळागाळाच्या जातीतली, कनिष्ठ आर्थिक स्तरातली, गरीब घरातली, खायला-प्यायला पुरेसं नसलेली आणि तरीही भरपूर काम करणारी, अगदी झोकूनच दिलेली स्वत:ला. माझं खरं वाढणं हे तेव्हा झालं.

ही ७८ सालची गोष्ट. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष, आणीबाणीचा काळ.... पण मंगला, आणीबाणी संपल्यानंतर त्या पत्रव्यवहाराच्या कामात भाग घेईपर्यंत मला आणीबाणीनं काही स्पर्शही केलेला नव्हता! आणीबाणीनं मी अस्वस्थ झाले नव्हते! मला काही कळलेलं नव्हतं. इतकी काही मी लहान नव्हते, पण जागीच झाले नव्हते. आणीबाणीत माझ्याहून किती लहान मुलांनी कामं केली, पण मला नाही त्याचा काही वारा लागला. खूपच लाजीरवाणी गोष्ट आहे, पण असं घडलं ही वस्तुस्थिती आहे. त्याच्यानंतरच जाग आली. काही गोष्टी आपल्या झोपेत गेल्या म्हणायचं!

या अर्थानं आयुष्यातली पहिली पस्तीस वर्षं वाया गेली असं वाटतं कधीकधी. पण पूर्ण वाया गेली असंही वाटत नाही. मी समर्थन नाही करत वाया गेलेल्या वर्षांचं, पण आता मी ज्या मध्यमवर्गाविषयी बोलतेय ना, ते सगळं मी जगलं आहे. अगं, मध्यमवर्गातली बाई बंड करायला, विचार करायला, जुनं बदलायला किती वेळ घेते याचं मीच एक उदाहरण आहे ना, आणि बुद्धी असताना, मला सगळी परिस्थिती अनुकूल असताना मी जर इतका वेळ घेतला बदलायला तर ज्या घरातच आहेत, ज्यांना परिस्थितीचीही साथ नाही त्यांनी कसं बदलावं गं?

आपल्याला हे सगळं समजायला वेळ लागतो. ७३-७४

सालापासून घराबाबत मला अस्वस्थता वाटायला लागली आणि त्यांनतर मी दहा–बारा वर्षांनी घराबाहेर पडण्याचा आयुष्यातला मोठा निर्णय घेतला. मग आता मला असं वाटतं मीच जर एवढा वेळ घेतला तर बाकीच्यांचं काय, ज्या अगदी गृहिणी आहेत. ज्या नोकरी नाही करत, ज्यांनी 'स्त्री'सारख्या मासिकातून काम नाही केलं, वाचलं नाही त्यांना कुठून ही बुद्धी होणार? आता त्यांना बरोबर घेऊन जाताना 'त्यांनी इतका वेळ का घेतला, त्यांना एवढं कसं समजलं नाही,' असले प्रश्न करायचे नाहीत हे ही पस्तीस वर्षं सांगत राहतात मला. त्यांना समजून घेण्यासाठी माझी वाया गेलेली ही पस्तीस वर्षं मला अशी उपयोगी पडली.

आजही लोक मला विचारतात, कुठून आला एवढा पेशन्स, तर मी हे अनुभवलेलंच आहे ना सगळं. आपण होऊन पाऊल उचलणं, बाहेर येणं यासाठी नवरा चांगला असला, सासूसासरे चांगले असले की तुम्हाला बळ येतं. हे बळ जर घडी घडी भांडण्यात गेलं तर तुमची अर्धी शक्ती तिथंच खलास होते ना. मी घराबाहेर पडण्याचा निर्णय घेतला तो आईवडिलांना आवडला नव्हता, पन्नासाव्या वर्षी मी बाहेर पडले. म्हणजे आता मुलगी 'स्त्री'मध्ये काम करतेय, संपादक व्हायच्या टप्प्यावर आलीय, तरी आईवडिलांना हे पटलं नव्हतं. म्हणजे हे किती कठीण आहे हे त्यामुळे मला कळत गेलं. तुमची स्वत:ची ताकद, तुमच्या भोवतीची माणसं...रानडे आणि फुल्यांच्या जोडप्यावरचा लेख लिहिला होता तेव्हा हेच माझ्या मनात आलं होतं. घरातल्यांशी भांडताना तुमचा खूप वेळ जातो त्यामुळे बाहेरच्यांशी भांडायची एनर्जीच शिल्लक राहत नाही. म्हणून बऱ्याच बायका म्हणतात, 'नवऱ्याचं सहकार्य राहो, त्यानं विरोध नाही केला तरी खूप वाट चालू शकू' आणि हे खूप महत्त्वाचं आहे.

मंगला – स्त्रियांसाठी काम करताना पुरुष तुमच्या कधी द्वेषाचा, मत्सराचा विषय झाला नाही. पण तुमच्या व्यक्तिगत आयुष्यात, इतक्या वर्षांच्या वैवाहिक आणि सामाजिक जीवनात अपमानित करणारे, खच्चीकरण करणारे, गृहीत धरणारे पुरुष कधी भेटले? तसं असेल तर त्या त्या काळात किंवा त्या त्या प्रसंगी तुमच्या प्रतिक्रिया कशा होत्या ते त्या घटनेसकट सांगाल?

विद्याताई – माझ्या आयुष्यात खच्चीकरणाचे फार प्रसंग नाही आले. एकच प्रसंग सांगते, पण तेव्हाही मी त्या खच्चीकरणाच्या पल्याड गेले होते. माझा नवरा माझ्या सामाजिक कामाआड कधी आला नाही. पण माझ्या दुसऱ्या मुलाचं लग्न ठरवताना त्या मुलीला त्यांनी 'काही सामाजिक काम वगैरे नाही ना करायचंय पुढे?' असा प्रश्न विचारला. म्हणजे इथं ती झाकलेली गोष्ट अचानक पुढे आली. म्हणजे खरं तर माझं काम त्याला आवडत नव्हतं. पण सामाजिक कामाला वाईट म्हणणं अवघड असतं. त्यामुळे त्याला असं जाहीरपणे वाईट तरी कसं म्हणणार?




नेहमीच एक कळीचा मुद्दा यात असा असतो की नवरा बायकोला असं सांगतो की 'घर सांभाळून काही कर.' पण 'घर सांभाळणं' ही गोष्ट इतकी अनडिफाइन्ड असते आणि इतकी व्यापक असते की घराची घडी केव्हा आणि कशानं बिघडेल ते काही सांगता येत नाही. त्यामुळे 'घर सांभाळून कर' याचा अर्थ फारच बेताबातानं आणि घराला धक्का लागणार नाही असं कर. म्हणजे 'फारसं करूच नको' हा त्यामध्ये संदेश असतो. तर याप्रकारचं माझ्या नवऱ्याचं बोलणं मला खूप त्रासदायक वाटलं होतं तेव्हा.

किंवा आमचे संबंध फारच फाटत गेले तेव्हा अनेकांनी सद्भावनेपोटी आम्हाला परत एकत्र आणण्याचा प्रयत्न केला तेव्हाही मला खूप त्रास झाला. ' आय हॅव ट्राईड माय बेस्ट. तुम्ही सांगता ते सगळं करून झालंय. काल भांडण झालं आणि आज बाहेर पडले असं झालेलंच नाही. तेव्हा आता बास,' असं म्हणून निकरानं घरातल्यांच्या, मित्रमैत्रिणींच्या कौन्सिलिंगच्या ह्या मॅरेथॉन मीटिंग्ज मला थांबवाव्या लागल्या.

माझं लग्न ठरलं तेव्हा सोबत असलेली माझी एक मैत्रीण, जिचा माझ्या लग्नात मोठा सहभाग होता ती पुढच्या टप्प्यावर माझ्या नवऱ्याला म्हणाली, 'एवढे तिचे गुण आवडून तिच्या प्रेमात पडलास, लग्न केलंस आणि आता त्या गुणांसाठी तिला अडवून कसं चालेल?' म्हणजे कसं असतं, सुखासुखी चाललंय तेवढं चालू

दे, बायको लिहिते, बोलते इथपर्यंत ठीक आहे. पण प्रत्यक्ष काम करणं, ते काम करताना विचारही बदलतात, धसही लागते. पण का लागली धस ते मला काही कळलं नाही. तरीही एकंदरीत माझ्या आयुष्यात पुरुषानं खच्चीकरण केल्याचे अनुभव मला फारसे आले नाहीत.

मंगला – मग तुमचा प्रेमळ, कुणालाही टाकून न बोलण्याचा स्वभाव यामागे होता? कारण आपल्या गप्पांत मागे एकदा ओझरता श्री. बाळ यांचा उल्लेख आला होता. ते खूप आजारी होते, दवाखान्यात ॲडमिट होते आणि त्यांनी तुम्हाला दिलेली सर्व वागणूक पाठीमागे टाकून तुम्ही त्यांची सेवा केलीत.

विद्याताई – नाही. एक तर मी फार सेवा केली नाही. पण दुसरी गोष्ट त्यांचा रागही मी केला नाही. कारण तो माणूस चांगला होता आणि मीही चांगली होते. पण वी वेअर नॉट मेड फॉर इच आदर. ते शिक्षक होते, सर्वांना मदत करणारा, अतिशय निर्व्यसनी, कुठल्याही भानगडीत न पडणारा, अतिशय संतापी पण चांगला माणूस होता. आणि आपल्या पदरच्या पलिकडे जाऊन देणारा म्हणजे वेडाच म्हटलं पाहिजे. मी बऱ्यापैकी शहाणी. मीही देते पण मला स्वत:साठी लोकांकडे मागायला लागेल इतकं नाही देत. म्हणजे माझा स्वाभिमान सांभाळण्यासाठी माझ्याकडे तेवढं राहिलं पाहिजे. हे व्यावहारिक शहाणपण त्यांच्याकडे नव्हतं. अभिमानाच्याही काहीतरी खोट्या कल्पना मनात होत्या, पण माणूस वाईट नव्हता. त्या माणसाचा मला त्रास झाला हे खरं, पण त्याचं माझं जमण्यासारखं नव्हतं त्यातून हे उद्‌भवलं. मी बदलत गेले आणि ते होते तिथंच ठाम राहिले!

त्यांच्या आजारपणात अनेकांनी मला विचारलं की 'आता तुम्ही तिकडे जाऊन राहणार का?' तर मी 'नाही' म्हटलं कारण एक तर माझी मुलं तिकडे राहत होती. सारं काही व्यवस्थित बघत होती. माझी मुलगी दिल्लीहून खूपच करत होती त्यांच्यासाठी. फोन करणं, टेस्टस करून घेणं, पैसे पाठवणं हे सारं ती करत होती. माझी भूमिका सूत्रधाराची होती. म्हणजे पैसे आले की ते पोहोचवणं, औषधं मिळतात की नाही ते पाहणं, ट्रीटमेंट व्यवस्थित होतेय ना याकडे लक्ष देणं, कधी दवाखान्यात कोणी बरोबर नसेल तर जाणं, इतपत मी केलं. मात्र त्यांच्या घरी जाऊन वगैरे काही केलं नाही.

मंगला – मग मुलांना नाही कधी आईचा राग आला, किंवा वडिलांची कणव वाटली?

विद्याताई – जेव्हा मी घराबाहेर पडले तेव्हा मुलांना अजिबातच आवडलं नव्हतं. पण मुलीला नाही चूक वाटलं.

मंगला – म्हणजे मुलगे न घडवताही पारंपरिक, पुरुषप्रधान-व्यवस्थेचे पाईक होतात आणि मुलींना स्वातंत्र्याचं महत्त्व कळतं?



विद्याताई – हो. पण मुलांना वैचारिक बॅकग्राऊंडच काही नव्हती. ती फारशी वाचणारी नाहीत. माझी मुलगी मात्र फारच वेगळी आहे. म्हणजे ती माझ्याहीपुढे दहा पावलं आहे. फार लहान वयापासून तिला सगळ्या गोष्टी कळायच्या. त्यामुळे 'आई, तुला असं वाटत असेल तर तू बाहेर पड.' असं म्हणाली. मुलं 'थांब घरात' असं काहीच नाही म्हणाली. पण मी बाहेर पडल्यानंतर जेव्हा मुलं आणि वडील यांचा डायरेक्ट संपर्क यायला लागला तेव्हा त्यांना काय मिसिंग होतं ते कळायला लागलं. विशेषत: बफर नाहीसा झाल्यावरचं जे काही घर्षण होतं ते त्यांना कळायला लागलं. आणि वडील कसे आहेत याविषयीची त्यांची मतं बदलायला लागली. मुलं जेव्हा स्वतंत्रपणे विचार करायला लागली तेव्हा त्यांना माझे विचार पटायला लागले. पण मी बाहेर पडले तेव्हा नव्हतं पटलं ते त्यांना. म्हटलं ठीक आहे, पटेल तेव्हा पटेल. त्यांच्या त्यांच्या आयुष्याचा त्यांनी विचार करावा. आपण कुठे पुरणार त्यांना आयुष्यभर!

मंगला – मग तेव्हा तुमचं मन शांत होतं की भावनिक उद्रेक चालू होता?

विद्याताई – होता ना उद्रेक मनात. केवढ्या डायऱ्या

लिहिल्यात मी. ती एक थेरपी असते हे लक्षात आलं माझ्या. म्हणजे आज डायरीतल्या कित्येक घटना वाचल्यावर मनात येतं की, 'अरे बापरे, असं का झालं होतं तेव्हा!' इतकं मी विसरून गेले. पण ते लिहिल्यावरच विसरले असं वाटतं मला. तो आऊटबर्स्ट होता ना, आणि मी मंचामध्ये बोलत असे या गोष्टी, मैत्रिणींत बोलत असे. मला आऊटलेट होता. शिवाय माझा विसरण्याचा स्वभावही मदतीला आला. नवरा मला म्हणत असे, तू विसरतेस सगळं. तुझं बरं आहे, मला नाही विसरता येत.

एक खच्चीकरणाचा प्रसंग मात्र मला आठवतो तो असा, की आमचं घर आम्ही बांधलं ते बेताचंच बांधलं. नवऱ्याचे क्लासेस उत्तम चालले होते पण ते कमर्शिअल कधीच नव्हते, त्यामुळे पैसा खूप असा कधीच नव्हता. पण खाऊन-पिऊन बरे होतो. तर त्या बांधलेल्या घराला आम्ही बाहेरून रंग दिला नव्हता. आतलं इंटिरिअर करायलाही आमच्याकडे पैसा राहिला नव्हता. असं ते घर झालं. या बॅकग्राऊंडवर आमच्या एका ओळखीतल्यांनी आमच्या शेजारीच घर बांधलं ते आम्ही बघायला गेलो. त्यांची आर्थिक परिस्थिती आमच्याहून फार काही वेगळी नव्हती, त्यांनी स्वत:चं घर घेतलं, सुंदर सजवलं, पूर्ण घर होतं. बाहेरून रंग, आतली सजावट, पुस्तकांचं शेल्फ, सुंदर घर होतं. त्यांची परिस्थिती काही एवढी चांगली नव्हती, एकत्र कुटुंब होतं, खर्च खूप होते तरीही छान घर झालं त्यांचं. मी आणि माझा नवरा गेलो होतो त्यांच्याकडे. तिथून बाहेर पडताना मी खूप आनंदात नवऱ्याला म्हटलं, 'ह्या प्रामाणिक, सरळमार्गी गरीब माणसाकडे इतकं छान घर बांधायला पैसा कुठून आला?' माझ्या मनात त्यांच्या मिळकतीच्या मार्गांबद्दल जराही किंतू नव्हता. पण एका कुतूहलातून मी नवऱ्याला असा प्रश्न केला. खरं तर तो प्रश्नही नव्हता, आपले आपल्याच मनाशी काढलेले उद्‌गार असावेत तसं बोलणं होतं ते. त्यावर माझा नवरा उत्तरला, 'त्यांनी स्वयंपाकाला बाई नव्हती ठेवली आपल्यासारखी.' म्हणजे माझं एक काम हलकं व्हावं म्हणून ठेवलेल्या स्वयंपाकाला ठेवलेल्या बाईचा आणि तिच्यावर होणाऱ्या खर्चाचा असा लागट उल्लेख त्यांनी केला. माझ्या मनात आलं, बाई असण्याचं सुख मला मिळालं तसं तुम्हालाही किती मिळालं! तुमच्याबरोबर संध्याकाळी फिरायला मी मोकळी होते कारण बाई होती. बाई ठेवल्यामुळे मला मिळणारा वेळ तुम्हालाच तर देत होते मी. बाकी कशासाठीही म्हणजे दागिन्यांसाठी, कपड्यांसाठी मी हट्ट नाही केला. मग माझ्याबाबतीत उगाळायची गोष्ट म्हणजे स्वयंपाकाच्या बाईवर होणारा खर्च. एवढे काय पैसे वाचणार होते त्यानं? अशा बोलण्याचा त्रास मला खूप व्हायचा.

मंगला - मग तुम्ही नाही त्यांना काही पटकन उत्तर दिलं?

विद्याताई - नाही दिलं. मला नाही कुणाला टाकून बोलता येत. पण नात्यातली दरी रुंदावत गेली. मन मरत गेलं. या काही छोट्या दिसणाऱ्या गोष्टी खूप लागत गेल्या मनाला. पण नातं संपायला मदतही होते अशा गोष्टींची. शिवाय मला काहीतरी काम करायचं होतं.

आयुष्य-
निम्मं-अधिक संपलं सुद्धा.
आता कुठे अर्थ उगवतीवर आलाय.
अंधारून यायच्या आत
कशी धावू? किती धावू?

अशी अवस्था होती. पन्नाशीला उभं राहून त्यानंतरच्या हिंडत्या-फिरत्या, निकोप मना-शरीराचा किती वर्षांचा भरवसा धरता येणार? त्यामुळे खच्चीकरणाला उत्तर कृतीनंच द्यायचा निर्धार केला.

मंगला - तुमच्या वयाच्या पस्तिशीत तुम्ही घर सोडलंत, त्यानंतर इतक्या वर्षांत कुणाबद्दल प्रेमभावना जागी झाली मनात?

विद्याताई - माझी सेन्सिटिव्हिटी आणि इमोशनल स्वभाव यामुळे मी आवडलेल्या गोष्टीत, माणसात वाहून जाते. प्रेमात पडणं हा माझा स्वभावच आहे आणि त्यासाठी वयाचीही काही अट असते असं मी मानत नाही. मी तर मरेपर्यंत प्रेमात पडू शकते.

माझ्या आयुष्यात अशी काही माणसं भेटली मला. काहींच्या बरोबर माझ्याकडूनच पुढे जाणं झालं नाही. 'नको बाबा पुढे जायला' असं वाटून गेलं. तर कुठे नातं झालंही तयार. सेक्शुअल अर्ज ही सुंदर जगण्यातली एक महत्त्वाची बाब आहे. मला तसा संबंध कधी गैर नाही वाटला. खूपदा काय होतं, विशेषत: विवाहित पुरुषाशी मैत्री ठेवताना त्यांच्या बायकोला नवऱ्याची मैत्रीण चालत नाही हे लक्षात येतं. नात्यातलं खुलेपण ही सहजीवनाची फार आवश्यक अट आहे. त्यासाठी सहजीवनाचा खरा अर्थ समजून घ्यायला हवा. जगणं लोप होतं त्यामुळे.

मंगला - आणि नात्यात किंवा नोकरीच्या ठिकाणी बायकांचा तुम्हाला आलेला अनुभव कसा होता? मुंबईत नोकरी करताना माझा किंवा माझ्यासारख्या अनेकींचा हा अनुभव होता किंवा आहे की नोकरीच्या ठिकाणी आपल्या सहकारी स्त्रिया आपल्याशी दुष्टाव्यानं वागतात, मत्सर करतात, थोडंही सहकार्य देत नाहीत. अकारण राग करतात. एकटं राहणाऱ्या स्त्रीला तर शांतपणे जगू न देण्यात स्त्रियाच आघाडीवर असतात. घटस्फोटितेबद्दल कुजबुजत राहायचं, विधवेच्या किंवा अविवाहितेच्या चारित्र्याविषयी शंका व्यक्त करायच्या....ह्यासारखे उद्योग बायकाच जास्त करतात. स्त्रियांना मनासारखं आणि आनंदानं जगू देण्यात अशाच स्त्रिया अडसर ठरतात. स्त्रियांच्या सक्षमीकरणाचं काम करताना अशा स्त्रियांबद्दल काय वाटतं तुम्हाला?



विद्याताई – बाई बाईचा शत्रू आहे हे अनेकदा उच्चारलं जातं. तू म्हणतेस ते बरोबर आहे. बायांचा मत्सरी स्वभाव हेच त्यांच्या अशा वागण्यामागचं कारण आहे. लग्न केलेल्या बायांच्या मनात 'आपण अडकलो आणि ही बघा कशी मोकळी आहे.' अशी एक मत्सराची भावना असते. दुसरी गोष्ट अशी की पुरुषसत्ताक व्यवस्थेत सर्व प्रकारच्या मनांची घडण इतकी पुरुषाच्या सोयीनं सोयीनं झालेली आहे की त्याची बायकांच्या मनावरची गुलामी अजिबात उतरलेली नाहीय. त्यामुळे ज्या बायका लग्न करत नाहीत त्यांच्याविषयी यांच्या मनात ' यांनी लग्न केलं नाही ' हा एक नॉर्मच मोडल्याचा राग असतो. आणि त्याला पुरुषांनी आणि स्त्रियांनी मिळूनच मोडता घातला पाहिजे किंवा शस्त्र उगारलं पाहिजे असं वाटून बाया असं वागतात.

दुसरं मला असं वाटतं की बायका असं वागतात याचं कारण म्हणजे त्या विचारच करत नाहीत. आता मी सुद्धा घर सोडलं नसतं तर मीही तशीच वागले असते कदाचित. पण माझा स्वभाव प्रेमळ आणि दुसऱ्यांची निंदा न करणारा असल्यामुळे मी केलं नसतं तसं. तेव्हा मला असं वाटतं की विचार नावाची गोष्टच नाही बायांकडे. आपण लग्न केलंय, पण मग आपल्याला नेमकं काय मिळालं? आपल्याला त्याचे काही त्रास सहन करावे लागतायत का? लग्न केल्यानं होणाऱ्या त्रासातून ह्या मुलींची सुटका झाली आहे ना, असा विचार करत नाहीत त्या. इथं मला देवदत्त दाभोलकरांचं एक वाक्य आठवतं, ते म्हणायचे, 'तुम्हाला पुरोगामीत्व स्वीकारता आलं नाही, अंगिकारता आलं नाही तर निदान पुरोगामी विचार मांडणाऱ्या माणसाला पाठिंबा तरी द्या.' बाया ते पण करीत नाहीत, विचार करणारा माणूसच फक्त हे करू शकतो.

आजच्या बायांच्या अनेक प्रश्नांच्या बाबतीत मला असं वाटतं की त्यांनी स्वत:च्या आयुष्याचा स्वतंत्र विचार केला नाही हे एक आणि तरुण स्त्रियांच्या बाबतीत मला असं वाटतं की त्यांना स्वातंत्र्य आणि संधी आयती मिळाली आहे. सावित्रीबाईनी काय भोगलं हे आजच्या मुलींना माहीत नाही. आणि सावित्रीबाईंच्या नंतर कर्व्यांच्या विद्यार्थिनींनी सुद्धा. त्यांनी लग्नं केली नाहीत, कसं आयुष्य काढलं, काय खस्ता काढल्या हे माहीत नाही. हा इतिहास न कळल्यामुळे आणि कोणताच वैचारिक पाया नसल्यामुळे बाई बाईची शत्रू होते. दिल्लीसारख्या शहरात आज माझी मुलगी एकटी राहते. तीही मला म्हणते की, 'इथं सगळ्या फॅमिली क्वार्टर्स आहेत. मी अविवाहित आणि एकटी असल्यामुळे माझ्याकडे कोण येतं आणि कोण जातं याकडे सगळ्यांचं लक्ष असतं. मी भीक घालत नाही ते सोड.' इतकं ते सगळीकडे मुरलेलं आहे. म्हणजे आपण कळपात आणि त्या कळपाबाहेर, त्यांना टोचाच मारल्या पाहिजेत. हा एक साधारण जो स्वभाव असतो त्याप्रकारानं बाया वागतात. पण फक्त बायाच नाही, खरं तर पुरुषही विचार न करताच जगत असतात.

मंगला – पण मग अशा स्त्रिया स्वतंत्र आयुष्य जगणाऱ्या स्त्रियांसाठी अडसर ठरतात. या पार्श्वभूमीवर जेव्हा आपण स्त्रीला 'माणूस' म्हणून जगण्याचे हक्क मिळावेत म्हणून चळवळ उभारतो, त्यात पुरुषप्रधान व्यवस्थेला लक्ष्य बनवतो ते बदलण्याची आता आवश्यकता आहे का? अजून किती काळ आपण पुरुषांच्या विरोधात तक्रारी करत राहणार आहोत? आता मध्यमवर्गातील पुरुष बऱ्यापैकी स्वत:ला बदलण्याचा प्रयत्न करताना दिसतायत. अशावेळी स्त्रियाच जर अविचारापोटी एकमेकींना जगणं कठीण करून ठेवत असतील तर चळवळीची दिशा बदलायला हवी असं वाटतं का तुम्हाला?

विद्याताई – चळवळीची दिशा म्हणण्यापेक्षा मला असं वाटतं की आता स्त्रियांना असं सांगायला पाहिजे, की हे पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे होतं आहे हे तर खरंच आहे. ती व्यवस्था काही अशी सहजासहजी नाहीशी होणार नाही. कारण पुरुष आपले हक्क अजिबात सोडणार नाहीत. मग त्याला पर्याय म्हणून आपण काय करणार? मला असं वाटतं की सर्वार्थानी बाईनं आत्मनिर्भर होणं हा एकच इलाज यावर आहे. आम्ही भावनिक आहोत त्यामुळे रिलेशनशिपमध्ये किंवा नवऱ्या–मुलाबरोबर तुटलं की आम्ही घायाळ होतो. आपल्या मनाची ग्वाही हवी, 'जग गेलं खड्ड्यात,' म्हणण्याची हिंमत यायला हवी.

मी जेव्हा घर सोडलं तेव्हा माझ्या मनात गिल्ट अजिबात नव्हता. मी खूप वेळ दिला. खूप पर्याय शोधले, खूप समजुती काढल्या. आणि त्यानंतरही जेव्हा काही होत नाही हे पाहिलं तेव्हा वेगळं होण्याचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे माझ्या मनात गिल्ट नाही. यासाठी 'आय हॅव डन माय बेस्ट' असं वाटण्याइतकं आत्मनिर्भर होणं आवश्यक आहे, मग ते आर्थिकदृष्ट्या आहे, भावनिकदृष्ट्या आहे आणि शारीरिकदृष्ट्याही आहे. म्हणजे मी

अगदी ज्युडो-कराटे म्हणत नाही. पण आपल्या तब्येतीमुळे सुद्धा आपलं परावलंबन खूप वाढतं. हे घडता नये. हा आत्मविश्वास हवा की मी पुरुषांच्या जगात राहते, पुरुषाच्या बरोबर माझी नाती असतील, पण आयुष्यात पुरुष नाही म्हणजे मी कोसळले किंवा असलेला पुरुष बाहेर गेला म्हणून कोसळले हे आता इथून पुढे होणार नाही.

बलात्काराच्या बाबतीत सुद्धा मला असं सांगावंसं वाटतं की 'तुम्हाला काय वाटलं, बलात्कार झाला म्हणजे मी संपले? मी मुळीच संपले नाही. मी तशीच ताठ उभी आहे. मी मुळीच भ्रष्ट नाही.' असं समाजाला सुनवायला जेव्हा बलात्कारिता शिकेल तेव्हा पुढे काहीतरी बदल होईल.

मंगला - पण बलात्कारिता असं म्हणायला शिकली तरी आजूबाजूच्या स्त्रिया तिला घायाळ करत राहणारच.

विद्याताई - करणारच.... पण मी उभी राहिले तर पुढचा मार्ग जरा तरी मिळेल. नाहीतर मी दबलेच आहे आणि लोक म्हणतायत म्हणून मी अधिकच दबलेय असं होत राहणार. आणि हे खरंच मी इमॅजिन केलंय. घर सोडलं तेव्हा मी सहजानंद सोसायटीत राहत होते. कमिन्सला वळसा घालून मग ती सोसायटी होती. तेव्हा तर तो भाग खूप एकाकी होता. रस्ते चांगले नव्हते. दिवे नव्हते. बस नव्हती. रुक्ष निर्जन भाग होता तो. मी जिथं राहत होते तिथंही जवळचा प्लॉट मोकळा होता. एक बंगला होता पण तिथं कोणी राहत नव्हतं. मी राहत होते तो बंगला पण संपूर्ण मोकळा आणि त्यातल्या एका खोलीत मी राहत होते. या परिस्थितीत माझी कामं चालू होती. कित्येकदा रात्री अकरा-साडेअकराला किंवा त्याहीपेक्षा उशिरा मी घरी यायचे. माझ्याकडे स्कूटर होती.

त्यावेळी मी विचार केलेला असायचा की कशावरून माझ्यावर बलात्कार होणार नाही? जर माझ्यावर बलात्कार झाला तर मी असं म्हणेन की 'तुम्ही जिच्याबद्दल कुजबुजताय ना, ती बलात्कार झालेली मीच आहे. आणि बलात्काराच्या आदल्या क्षणी जशी होते तशीच आताही आहे.' ही खूप अवघड गोष्ट आहे पण हे ताठ मानेनं सांगता आलं तरच काहीतरी परिस्थिती बदलेल. लोक जेव्हा नावं ठेवतात तेव्हा त्यांचा हेतू काय असतो? तर त्यांना त्यात गंमत येत असते. त्यांचा वेळ छान जात असतो. पण त्यांच्या टीकेकडे दुर्लक्षच केलं तर आपोआप ते ही थांबतील कुजबुजायचे. कारण त्यांच्या दृष्टीनं मजाच जाते आपण चिडलो नाही की!

तसंच बलात्कार करून आम्ही या बायकांना संपवतो असं जर कोणाला वाटत असेल तर आम्ही पुन्हा पहिल्यासारखं चालू लागून त्यांना गप्प केलं पाहिजे. यात गुंता बराच आहे. त्यानं बलात्कारही कमी होणार नाहीत, पण 'मी बलात्कार होऊनही भ्रष्ट नाही, मी पतित नाही.' असं माझ्यापुरतं म्हणण्याचं बळ बाईकडे असणं महत्त्वाचं. झाशीची राणी होऊन मी लढणार, हा पवित्रा महत्त्वाचा. यासाठी स्त्रियांनी सर्वप्रकारे आत्मनिर्भर होणं आवश्यक आहे.

पुरुष आमच्याशी चांगले वागणार असतील तर आम्ही आहोत त्यांच्याबरोबर, नाहीतर एकट्या आहोत हे म्हणण्याचं धाडस बायकांना शिकवणं आणि त्याच बरोबर पुरुषांना हे सांगणं की तुम्ही वागताय ते माणसासारखं तर नाहीच आणि पशूसारखंही नाही. त्याहूनही खूप वाईट वागताहात तुम्ही. पशूंचंही एक बायॉलॉजिकल क्लॉक आहे तेही तुमच्याकडे नाही. आम्ही जे पुरुषसंवाद केंद्र सुरू केलं आहे त्यामागची कल्पना हीच आहे.

मंगला - पुरुषसंवाद केंद्रात जसं आपण त्यांना ' तुम्ही बदललं पाहिजे.' असं सांगतो, तसं बायांनाही सांगतो का की ' तुम्ही चुकता आहात, तुम्हालाही बदलायला पाहिजे.' पुरुषप्रधान संस्कृतीबद्दल बाया सदैव तक्रार करत बसतात. आणि दुसरं असं की शारीरिक बळाचा वापर करत आपल्या अंकित असलेल्या किंवा नसलेल्या स्त्रीवर बलात्कार करणाऱ्या किंवा तिला मारहाण करणाऱ्या पुरुषांचं प्रमाण मोठं आहे हे खरं असलं तरी व्यक्तिस्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पनातून आपल्या नवऱ्याशी सतत वाद करणाऱ्या आणि घरातील सुखशांती नष्ट करणाऱ्या स्त्रियाही आज मध्यमवर्गात दिसू लागल्या आहेत. आज ते प्रमाण कदाचित छोटं असेल पण पुढे हाच कित्ता गिरवणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढू शकते. शिक्षण, अर्थार्जन आणि हक्कभावना या जाणिवा व्यक्तीला उन्मत्तपणाकडे नेतात त्यावेळेला काय घडतं हे अनेक शतकं आपण पुरुषप्रधान व्यवस्थेच्या रूपात पाहिलेलं आहे. स्त्रियाही तेच करणार आहेत का? कोणीच कोणावर कुरघोडी करू नये हा जर मानवतावाद असेल तर इतकी शतकं पुरुषांनी अन्याय केला आता आम्ही थोडं उत्तर दिलं तर काय बिघडलं, असं समर्थन करणाऱ्या स्त्रिया तुम्हाला पटतात का? आणि असं चित्र जर आता दिसत असेल तर या नव्या चित्राचा विचार चळवळ कसा करणार आहे? किंवा करते आहे?

विद्याताई - पुष्कळांचा असा समज असतो की, स्त्री-मुक्तीवाल्या बाया पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या विरोधात बोलतात आणि स्त्रीसत्ताक व्यवस्था आणू पाहतात. पण ही वस्तुस्थिती नाही. स्त्रीमुक्ती चळवळ कधीच पुरुषांच्या विरोधात नव्हती. ती पुरुषशाहीच्या विरोधात होती. एकेका पुरुषाला तो त्या 'शाही'चा प्रॉडक्ट आहे आणि आपण त्याच्या 'बळी' प्रॉडक्ट आहोत हे समजून घेऊन आपण वागू. वैयक्तिक वैर आपल्याला नको आहे. त्या त्या परिस्थितीत बाया उपाय शोधतात. तरीही असं जर कोणाला वाटत असेल की, तुम्ही आमच्या डोक्यावर मिऱ्या वाटल्यात आता आम्ही तुमच्या डोक्यावर वाटू, तर असं चालणार नाही.

मी तर अनेक भाषणांमध्ये नेहमी असं सांगते की, 'बायकी बाईपण आणि पुरुषी पुरुषपण सोडून मी एक माणूस आहे' असं समजून दोघं वागायला लागतील तेव्हा तो स्वास्थ्यपूर्ण समाजाचा

एक नवा पॅटर्न असेल. त्यामुळे लोकांच्या मनातून ही गोष्ट काढून टाकता टाकता आपल्याही मनातून ही गोष्ट काढून टाकली पाहिजे की आपल्याला सूड घ्यायचा नाहीय. पण कसं होतं ना, की ४९८ अ च्या विरोधात पुरुषलोक खूप बोलतात. काही केसेस नक्कीच फसवणुकीच्या आहेत. पण मी अगदी जाहीर सभेत नेहमी सांगते की मी जरी स्त्री चळवळीची कार्यकर्ती असले तरी आम्ही चुकणाऱ्या स्त्रियांचं समर्थन करणाऱ्या बाया नाही आहोत. आणि मग मी एक उदाहरणही सांगते की जुन्या काळात, जेव्हा आम्ही एवढा विचारही केला नव्हता त्या काळात मंचात एका बाईची तक्रार आली होती. आणि का कुणास ठाऊक, आम्हाला ती खोटी वाटत होती. आमच्या मंचाच्या कामाची पद्धत ही आहे की आम्ही दुसरी बाजूही ऐकून घेतो. त्यानुसार आम्ही तिच्याकडून पत्ता घेऊन सांगवीला जाऊन त्या गृहस्थाला भेटलो. त्याच्याशी बोलणं झाल्यावर आम्हा साऱ्यांचं एकमत झालं की पुरुष दोषी नाहीय. त्यानंतर त्या बाईला बोलावून आम्ही सांगितलं की तुमची तक्रार आम्ही घेत नाही. आम्हाला तो पुरुष दोषी वाटत नाही. अशी आमची संघटना नि:पक्षपाती आहे.

यातून आम्ही एवढंच सांगू इच्छितो की, स्त्रिया चुकल्या तर त्याचं समर्थन आम्ही करणार नाहीच, पण म्हणून पुरुष चुकतोय तर त्याच्या विरोधात बोलणं आम्हाला थांबवता येणार नाही. आणि जेव्हा सामाजिक प्रश्नाचा व्हॉल्युम ठरवायचा असतो तेव्हा अन्याय झालेल्या पुरुषांच्या जरी शंभर-दोनशे केसेस झाल्या तरी हजारो स्त्रिया यापूर्वी बळी गेल्या आहेत, आजही जाताहेत. त्यावेळेला पुरुष नाही त्यांच्या बाजूनं उभे राहिले हे आपण लक्षात घ्यायला हवं. थोडे पुरुष राहिले उभे आणि आपण त्यांना मानतोच. पण स्त्रियांवर अत्याचार होत होते तेव्हा 'असा कायदा हवा, तसा कायदा हवा' असं काही पुरुष म्हणाले नाहीत. आणि आता बायकांच्या चुकीनं कधी काही घडत असेल तर मुळात अशा एकूण केसेस थोड्या असतात. त्याच्यावरून तो खूप मोठा सामाजिक प्रश्न झाला आहे असं मानायचं कारण नाही.

दुसरी गोष्ट, जी मला नेहमीच महत्त्वाची वाटते ती अशी की, एरवीच्या साक्षरतेमध्ये बायांची साक्षरता ही पुरुषांच्या साक्षरतेपेक्षा कमी आहे. अशावेळी कायद्याच्या गोष्टीमध्ये बायका जास्त शहाण्या कशा असतील? ४९८ अ चं कलम तरी किती जणी वापरतात? समजा, मी लग्नानंतर सात वर्षांनंतर घर सोडून आलेय, तर परत आलेल्या मन:स्थितीमध्ये 'करते मी आता चांगली केस ह्यांच्यावर.' असं किती बायकांना वाटेल? आणि स्वत:च्या दु:खात मग्न अशा किती बायका असतील? याउलट 'या लग्नात आम्ही एवढा खर्च केला, आता बघू या.' असं म्हणणारे वडील आणि भाऊ जास्त असण्याची शक्यताही मोठी असते. कारण पैसे त्यांनी खर्च केलेले असतात. तेव्हा 'ब्रेन बिहाईंड द केस' कोण आहे हे थोडं तपासून पाहावं लागेल. नेहमीच पुरुष असतील असं नाही, पण हे बघायला हवं.

म्हणून ४९८ अ कलम असायलाच हवं. आणि पुरुषांवर अन्यायही होता नये म्हणून आम्ही पुरुषसंवाद केंद्र चालू केलं. कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण, कौटुंबिक हिंसाचार याला आळा घालणारा कायदा झाल्यामुळे पुष्कळ पुरुष असं म्हणतात, की आता घरात ब्र उच्चारायचीही चोरी.....अशावेळी त्यांना आपल्याला समजावून सांगावं लागेल की, वाईट नवऱ्याबद्दलही बाया अजून तक्रार करत नाहीत. घुसमटताहेत, मरताहेत, आत्महत्या करताहेत; पण तक्रार नाही करत. तर चांगल्या नवऱ्याविरुद्ध कोण तक्रार करेल? तुम्हाला भीती कशाला वाटते? तुम्ही वाईट वागत नाही ना? मग भीती वाटू देऊ नका.

किंवा ऑफिसमध्येही पुरुषांना भीती वाटू शकते हे मी मान्य करते. मनात शंका येऊ शकते की बायका कायद्याचा वापर करू शकतात. पण आम्ही तर म्हणतो, कायद्याचा अजून पुरेसा वापर होतच नाहीय. तर तुम्ही भिऊन त्याच्या एवढं विरोधात का जाताय? हा त्यांच्या मनात निर्माण झालेला गंड आहे. पुरुषाला कधीच अटक होत नव्हती ती व्हायला लागली आहे. ती नॉनबेलेबल व्हायला लागली आहे. याचा तो काहीसा परिणाम आहे.

मी नेहमी म्हणते की, मंजुश्री सारडा, शैला लाटकर यांचे खून झाले. बाया तेव्हा का बोलल्या नाहीत? तर त्यांना बोलायला जागा नव्हती. संघटनाही खूप नव्हत्या. म्हणून स्त्रियांसाठी १९८३ साली 'बोलत्या व्हा' हे केंद्र काढलं. आज आम्ही पुरुषांसाठीही हे केंद्र काढलंय. पण कदाचित त्यांचा अहंकार दुखावेल म्हणून त्याला 'संवादकेंद्र' हे नाव दिलंय. अजूनही तिथं पुरुष येत नाहीत. त्यांना असं वाटतं की आमचं काहीच चुकत नाही..... म्हणून आम्ही आता शाळापातळीवर मुलांसाठी काम सुरू केलंय. कारण ते उद्याचे पुरुष आहेत. त्यांचं मतपरिवर्तन घडवण्याचे प्रयत्न आम्ही करतो आहोत. शरद पाटील यांचं ' संशोधन मानवी इतिहासाचं' या नावाचं एक पुस्तक आहे. त्यात ते असं म्हणतात की, जुन्या काळामध्ये मातृप्रधान किंवा स्त्रीप्रधान व्यवस्था होती. स्त्रीसत्ताक नव्हती. त्यात डिव्हिजन ऑफ लेबर होतं. पण वरिष्ठ-कनिष्ठ अशी श्रेणीबद्ध व्यवस्था त्यात नव्हती. सत्ता ही पुरुषांबरोबर आलेली गोष्ट आहे. सत्ता आपल्याला नकोय. म्हणजे सत्तेबरोबर येणारं जे काही वाईट आहे ते नकोय. त्यामुळे आपण त्यांच्या बरोबरीचे होऊ या आणि समन्वयानं जाऊया हाच मेसेज आहे.

मंगला - या चळवळीचा फायदा होतोय?

विद्याताई - चळवळीनं बाई काही प्रमाणात तरी जागी झाली पण पुरुष मात्र फारसा जागा झाला नाही. चळवळीत एक घोषणा आहे,' सावित्री आहे घरोघरी आणि जोतिबाचा शोध जारी.' खरं तर सगळ्या बाया कुठे सावित्री आहेत? पण तुलनेत बायांत सावित्रींचं प्रमाण मोठं आहे.

आपण भाषणात जेव्हा या पुरोगामी पुरुषांची नावं घेतो तेव्हा लोक म्हणतात, म्हणजे बघा, इथं सगळ्या पुरुषांची नावं घ्यायची आणि पुन्हा पुरुषांनाच नावं ठेवायची. यावर माझं उत्तर हेच आहे की सगळे पुरुष आजवर जोतिबांसारखे वागले असते तर चळवळीची गरजच नव्हती ना आम्हाला. या सावित्री आपोआप तयार झाल्या आहेत का? हा मुद्दा पुरुषांपर्यंत पोहोचला पाहिजे आणि तो भांडणातून नाही तर संवादातून पोहोचला पाहिजे.

मंगला – जीवन सुंदर आहे तसंच मृत्यूही सुंदर असतो. या जगाचा आपण निरोप घेऊ तेव्हा आपल्याप्रमाणेच इतरांनाही मृत्यूच्या सुंदरतेची जाणीव आपल्या मृत्यूत झाली पाहिजे, हा इच्छामरणाचा अर्थ लोकांपर्यंत पोहोचवण्याचं खूप कठीण काम तुम्ही सध्या करता आहात. तुमच्या साऱ्याच कामांचं स्वरूप पाहता हे लक्षात येतं की तुम्ही खूप मोठ्या परिवर्तनाच्या कामाला स्वत:ला वाहून घेतलंय, अगदी स्वत:चं खाजगीपण त्यामध्ये नामशेष होऊन जाण्याइतकं....पण तरीही एकाकी बनवणारी एखादी संध्याकाळ, एखादा क्षण अनुभवाला येतो? अंतिमत: आपण सारेच एकटे असतो. गर्दीत असतानाही असा एकाकीपणाचा कढ दाटून येतो कधी?

विद्याताई – अतिशय उत्कट आनंदाच्या किंवा तीव्र दु:खाच्या प्रसंगी, ते ही सुरुवातीच्या काळात वाटून गेलं कधी कधी असं. पण मी मला शिकवलं, की मी एकटी आहे. पण माझ्याभोवतीची सगळी माणसं एकटी नाहीत. त्यांना त्यांचे कौटुंबिक व्याप आहेत. तेव्हा आता या क्षणी कोणाशी बोलायचं म्हटलं तरी त्या व्यक्तीला वेळ असेलच असं नाही. तेव्हा कोणाशी तरी शेअर करण्याची आपली जी उबळ आहे ती आपल्याला खोकल्यासारखीच दाबायला हवी. मग मी त्यासाठी स्वत:ला ट्रेन केलं.

लग्न करूनही मी एकटीच होते. मी परित्यक्ता नाही, घटस्फोटिता नाही तरीही फेब्रुवारी ८७ पासून मी एकटी राहते आहे. १९७५ नंतर माझ्यात होऊ लागलेले वैचारिक बदल, त्यातून कुटुंबात निर्माण झालेली अस्वस्थता, ती दूर करण्यासाठीचे माझे आणि कुटुंबीयांचे प्रयत्न, परिवारातल्यांची धडपड, त्या प्रयत्नांचं अपुरेपण किंवा अपयश, एकमेकांवर आक्रमण, अतिक्रमण न करता एकत्र राहूनच समजुतीनं वागण्याचे केलेले प्रयोग, घरात पेईंग गेस्टसारखं राहण्याचा केलेला अखेरचा प्रयोग.....पण नाही साध्य झालं काही. एकत्र राहण्यासाठीचा समंजसपणा आणि त्यामुळे एक किमान शांतता, स्वास्थ्य आणि जिवंतपणा जोपासता येण्याच्या शक्यता उभयपक्षी संपल्या असं वाटलं तेव्हा मी घराबाहेर पडण्याचा निर्णय निश्चित केला.

माझं हे सगळं व्यथित, कष्टी मन माझ्या डायरीतच व्यक्त होत होतं. १४ जुलै ७५ रोजी लिहिलेल्या एका कवितेची सुरुवात बघ–

मी काळजीत आहे.
पोटात आग, घशात आवंढा
डोळ्यांच्या कडा ओलसर
तुला हे कळतंय?
नाही कळायचं.
कारण तू तुझ्या काळजीत आहेस.
आणि मी?
काळजीतच, तुझ्या –
अविश्वास अनुभवला, राग सोसला
केल्याचं 'न केलं' झालेलं पाहिलं.
शोधत होते, या नात्यात
कधीतरी दिसेल म्हणून –
........दिसलं.
पण जे शोधलं ते नाही.
वेगळंच, भयानक, बघण्याची अपेक्षाही नसलेलं!

आपल्या समाजात संसारात राहून 'पूर्णवेळ कार्यकर्ता' होणं पुरुषाला शक्य असतं. कित्येकदा त्यासाठी त्याचा गौरव होतो, कौतुक होतं. बाईला मात्र हा गुन्हा माफ नाही. तिनं घरात राहून असं पूर्ण वेळ घराबाहेरच्या कामात स्वत:ला गुंतवणं म्हणजे 'घरच्या जीवावर' बाहेरचे उद्योग करणं असं मानलं जातं. घराचे सारे फायदे घ्यायचे आणि घराबाहेरची कामं करायची यासाठी पुरुषाला जी सवलत आहे, जी मान्यता आहे ती बाईला नाही. तेव्हा विचार केला, एकटेपणाच्या बदल्यात घराचे, कुटुंबाचे फायदे नाकारूया. एकटं राहून आपल्या कामासाठी दिवसाचे चोवीस तास, वर्षाचे बारा महिने शरीर साथ देईल तेवढे दिवस काम करूया. किती काळ हातात सापडतो कोण जाणे..... या कामासाठी एकटेपण स्वीकारलं. आणि त्यापाठोपाठ मनाची शांती, उमेद, बळ सगळं चालत आलं. गतायुष्याबद्दल मनात पश्चात्तापाचा एक क्षणही आता नाही.

याचा अर्थ मला काहीच अडचणी आल्या नाहीत का? एकटेपणात एकाकीपणा कधीच अनुभवाला आला नाही का? तर असं नाही. अडचणी आल्या. एकाकीही वाटलं. पण मग मनात आलं की एकटी नव्हते, कुटुंबातच होते तेव्हा अडचणी आल्या नव्हत्या? आल्याच. अडचणी कुणाला चुकतात? एकटेपण सरळ



# ज्यांना वाचनाची आवड असते ते ललित मासिक आवडीने वाचतात !

## ललित

**साहित्यिक घडामोडींचा बातमीदार**

**आणि ग्रंथखरेदीचा मार्गदर्शक**

**दिवाळी अंकासह वार्षिक वर्गणी २८० रुपये**

**चार वर्षांची सवलतीची वर्गणी फक्त १००० रुपये**

-वाचकप्रिय सदरलेखन-

विनोदी चुरचुरीत सदर
समीक्षा-संज्ञा
पन्नाशीपूर्वीची पुस्तके
ज्ञानपीठ भाषणे
स्वागत
मानाचे पान
लक्षवेधी पुस्तके
दशकातील साहित्यिक
अभिनव प्रश्नमंजूषा
दृष्टिक्षेप
इथे-तिथे
प्रासंगिक लेख / मुलाखती
सप्रेम नमस्कार
साभार पोच
बाजारात आलेली पुस्तके

वर्गणी खालील ठिकाणी स्वीकारली जाईल-
ललित कार्यालय २३८२६२२५. मॅजेस्टिक बुक स्टॉल २३८८२२४४.
मॅजेस्टिक ग्रंथदालन ९८९२२२०२३९. मॅजेस्टिक बुक डेपो २५३७६८६५
मॅजेस्टिक (पुणे) ९९२२३४४०८१.
वर्गणीचा मनिऑर्डर / डीडी 'ललित मासिक' या नावाने
३०८, फिनिक्स, ४५७ एस.व्ही.पी.रोड, गिरगाव, मुंबई ४०००० ४
या पत्त्यावर पाठवावा किंवा 'ललित'च्या बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगाव शाखेच्या
२००५३७०१००६ या क्रमांकाच्या बँक खात्यात रक्कम जमा करून
majesticph@gmail.com या इमेलवर पैसे भरल्याचे तपशील कळवावेत.
शिवाय www.majesticonthenet.com येथेही आपणांस वर्गणी भरता येईल.

**ग्रंथजगताशी परिचित राहण्यासाठी 'ललित मासिका'चे वर्गणीदार व्हा !**

सरळ स्वीकारल्यानंतरही मित्र-मैत्रिणींच्या सोबतीत क्वचित क्षणी एकाकीपणाची भावना भेटत राहिलीच. पण मग मी तिला सामोरी गेले आणि स्वत:ला समजावलं, शहाणं केलं. मला जीव द्यायचा नव्हता, मरायचं नव्हतं. निदान वैफल्यापोटी मरायचं नव्हतं. त्यामुळे डोळे पुसून शहाणं होण्याखेरीज पर्यायच नव्हता. शिवाय या क्षणांबाबत त्यावेळी किंवा त्यानंतर कधीतरी बोलता येण्याजोग्या काही जागा माझ्या मित्र-मैत्रिणींच्या मनात, घरात माझ्यासाठी होत्या आणि आहेत हे नक्की.

ह्या एकटेपणाचा काय काय त्रास वाट्याला आला माझ्या, असाही मी विचार करते. स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीतली एक कार्यकर्ती म्हणून अनेकांनी मी कुटुंबात राहत असतानाही मला 'घरं फोडणारी' म्हटलं. 'मंगळसूत्र काढा, नवरे सोडा आणि घरं मोडा' असं मी कधीच म्हटलं नव्हतं. तरीही माझ्या म्हणण्याचा विपर्यास विरोधकांनी सतत केला. नंतर तर मीच घर सोडलं होतं त्यामुळे 'घरफोडी बाई' ही किताब बहाल करणाऱ्यांच्या टीकेला आणखीच जोर चढला. पण मी स्वत:ला कंट्रोल करायला शिकले.

मंगला - आता मनात कोणतीही अस्वस्थता नाही? शांत झोप लागते?

विद्याताई - मनात अस्वस्थता अजिबात नाही. शांत मन आहे माझं. पण झोप शांत येत नाही. आरोग्याचा काय नियम आहे तो मला समजत नाही. जर तुम्ही निश्चिंत असाल, ताण नसेल तर झोप लागते म्हणतात. पण मला नाही लागत अनेकदा झोप. शरीराचाच मेकॅनिझम असेल काहीतरी, पण मनाचं काही नाही. अगदीच काही नाही. कशाविषयी तक्रार नाही. जे होतंय ते होतंय.

जो चांगलं वागेल तो आपला. मग तो रक्ताचा आहे की नाही याचा संबंध नाही. जो चांगलं वागत नाही तो आपला नसला तरी वैर, शत्रुत्व नाही. समोर आला तर बोलू आपण. आयुष्यात नवरा दुरावला, मुलगा दुरावला. खूप कठीण निर्णय असतात हे. म्हणजे आपली मुलं आपल्या विचारांची न निघणं ह्यातलं दु:ख मी अनुभवलं. पण ती तशी नाहीत हे एका टप्प्यावर स्वीकारता आलं. आपण त्यांना मदतीचा जो हात देतो तो त्यांना आवडला तरच ती घेणार. नाही आवडला तर नाही घेणार. ती त्यांच्या त्यांच्या आयुष्यात सुखी राहोत ....खूप झालं.

मला कटुता ठेवताच येत नाही. म्हणजे एखादा माणूस समोरून येतोय तर फूटपाथ बदलू या, इतकं नकोसेपण माझ्या मनात राहू नये अशी माझी धडपड असते. बहुदा ते जमतंही.

मंगला - माणसाला आयुष्यात पूर्ण समाधान तर कधी मिळत नाहीच, पण झालं बऱ्यापैकी काम हातून, असं वाटतं? थांबावसं वाटतं?

विद्याताई - आजघडीला मी पोटापुरतं मिळवते आहे. मनाजोगं काम करते आहे. माझ्या डायरीच्या संमतीनं तारखा ठरवून भरपूर प्रवास करते आहे. 'मिळून साऱ्याजणी' हे मासिक ऑगस्ट ८९ पासून सुरू केलं आहे. स्त्रियांनी जागं व्हावं, बोलतं व्हावं, लिहितं व्हावं यासाठी या मासिकातून शहर आणि खेडं या दोन्ही पातळ्यांवर काम चालू आहे. इच्छामरणासारखा विचार लोकांना पटावा म्हणून प्रयत्न करते आहे.

हातात असलेल्या पुस्तकाची एखाददोन पानं वाचावीत याच्या पलिकडे वाचन होत नाही आताशा. मी खूप वाचलं असतं तर आणखी आनंद आणि विचार मिळाला असता. मला अधिक चांगलं माणूस व्हायला मदत करणाऱ्या या गोष्टी होत्या. त्या माझ्याकडून खूप कमी झाल्या. मला गाण्याची पण आवड आहे. मध्यंतरी लेक मला सवाई गंधर्वला घेऊन गेली. तिथं गेल्यावर मला खूप छान वाटलं. चळवळीच्या रेट्यात गाणं ऐकणंही तसं राहूनच गेलं.

आता मागं वळून बघताना लक्षात येतं की एकटेपणाची जेवढी भीती लोकांनी घातली होती तेवढं एकटेपणाचं भय मला वाटलं नाही. आजही मी 'मिळून साऱ्याजणी'सह एकटी राहते आहे. माझ्याकडे आयुष्यभरात पैशांची श्रीमंती लौकिक अर्थानं अशी कधी आलीच नाही. पण जे आहे ते मला खूप श्रीमंती देतंय. गरजा एवढ्या कमी आहेत. मी सखी मंडळांना छोटीशी देणगी दिली. तर त्या म्हणाल्या, ' विद्याताई, तुम्ही काय आम्हाला देताय. आता तुमचा रौप्यमहोत्सव आहे तर आम्हीच तुम्हाला काही देणार आहोत.' असे इतके प्रेमाचे शब्द आणि इतकं अपरंपार प्रेम या मैत्रिणी देतात. निमित्तानिमित्तानं लोकांनी मला इतकं दिलंय की मी गमतीनं म्हणते की मला अन्न, वस्त्र, निवारा लोकच देतात.

मी आता आयुष्याच्या सरत्या आणि शेवटच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे अनेक प्रकारची आवराआवर करण्याच्या प्रयत्नात आहे. माझ्या आयुष्याकडे वळून बघताना एवढंच समाधान आहे की अगदीच कावळाचिमणीसारखं नाही जगले. मी खूप मोठी आहे असं लोकांना वाटतं, पण मंगला, विनय म्हणून नाही, खरंच म्हणते की मी 'मोठी' नाही झाले. पण खूप बदलले. अगदी उजवीकडून डावीकडे १८० अंशातून बदलले. मी सतत काम करत राहिले. सातत्य आणि प्रामाणिकपणा यांच्यासह न्यायाचं भान ठेवलं. पण माझ्या कामापेक्षा, योग्यतेपेक्षा मला खूपच अधिक सगळीकडून मिळालं! चांगलं जगलं पाहिजे यासाठी माझी जीवनावश्यक अस्वस्थता माझ्यासोबत आहे.

**- मंगला आठलेकर**
ऋग्वेद, ११/३ वर्धमाननगरी
शाहू कॉलनी, गल्ली क्र. १
कर्वेनगर, पुणे ५२
दूरध्वनी : (०२०) २५४७४०३३
mangalaathlekar@gmail.com

## मी, आई आणि शहर

मी गावाकडून शहराकडे स्थलांतर होताना
आईची पावलं
तिच्या नकळत जड का होत गेली हे कळलं सुद्धा नाही
तिला आवडतोही शेता-भातातला पाऊस,
तिनं सांगितल्याही गोष्टी पावसाच्या,
कष्टाशीच आयुष्य जोडताना
अंगभर ओली झाली 'इरल्याविना'

तरीही मी शहरात जाताना
मुलं शहरात शाळेत जातील,
पावसात भिजून येतील,
आणि शहराच्याही जगण्याचा वेग
कळायलाही उशीर होईल त्यांना
माणसांचेच लोंढे धडकतायत शहरात
आणि भाषेचीही होत जातेय सरमिसळ
शहरातील आपल्याच घराच्या परिसरात
मग मनाची मोकळीक मिळेल का त्यांना?
असं काहीबाही आई वारंवार म्हणायची
पण तिचे हे बोल ऐकताना
तिच्या डोळ्यांआडचा पाऊस कळलाच नाही आम्हाला!

मी आता शहरात राहतो
आणि मी माझ्या जगण्याचा वेग पकडण्याचा प्रयत्नही करतो
मुलांची, जगण्याची गती कळूनही येत नाहीय मला
मुलं गाडून घेतात अभ्यासात,
तरीही मला शंका येत राहते
मुलं काय शिकत असतील पुस्तकातून
ती कोणती मुळं शोधत असतील इतिहास, भूगोलात
ज्यांना शहरात स्थलांतर होऊन काही महिनेच झालेत
तीच मुलं विसरून गेलीत प्रार्थनेची वेळ
आणि प्रार्थनेही शब्दही
'खरा तो एकची धर्म,
जगाला प्रेम अर्पावे'
आणि गावाची आठवण तर येतच नाही
त्यांना लक्षात आणून द्यावं लागतं
शेतावरून सायंकाळी आजी आल्यावर
तहान-भूक विसरून तुम्ही बिलगत होता आजीला,
तिच्या साध्या स्पर्शानं अभ्यासाचाही हुरूप वाढत होता
टीव्ही नाही, कॉम्प्युटर नाही तरीही समाधानानं जगत होता
तरीही कधीतरी मुलांना आठवते आजी शहरात

आईकडून वेळेवर जेवण मिळालं नाही तर
किंवा दप्तराचा पसारा आवरायला वेळ लागला तर!
शहर अंगवळणी पडत नाहीय अजून
तोवर मीही जात राहतोय गावाला
तेव्हा आईचे डोळे थकलेले दिसतात
पण बायका-मुलांची चौकशी करताना
ती होत नाही पूर्वीसारखी हळवी
ती म्हणते आता
सहवास नको कुणाचा, शेजाऱ्यांचा-पाजाऱ्यांचाही

तेव्हा मी विचार करत राहतो
वडील गेल्यानंतरची आई
आणि आता आम्ही तिला सोडून गेल्यानंतरची आई
यात साम्य काय असेल?

डोकं सुन्न होत राहतं
कारण तिच्या-माझ्या जगण्याच्या कुठल्याच काळात
समजूनच घेता आली नाही आई!

**– अजय कांडर**





## त्या दोघी

सायंकाळी ऑफिसमधून येताना
मला त्या दोघी दिसतात
घरापासून दूर निवांत फिरायला जाताना
सुरुवातीला त्या एक एकट्याच फिरताना दिसायच्या
परंतु त्या भेटू लागल्या
तशा त्या खूप जवळ येत गेल्या मनानं

अलिकडे त्यांच्या फिरण्याचंही अंतर वाढलंय
तशी गावात त्यांच्याविषयी कुजबूजही सुरू झालीय
कोण म्हणतं त्यांचं लक्षण धड नाही,
कोण म्हणतं वेळेवर हात पिवळे झाले नाहीत ना,
काय करतील बिच्चाऱ्या!
अशी खोचक मिळवतायतही त्या सहानुभूती
तरी मला हे सारेच प्रश्न
निरर्थक वाटत राहतात त्यांच्याविषयीचे

माझ्या नकळत
मी त्यांच्या फिरण्याच्या हालचालीचा
लावत राहतो अन्वयार्थ
एकाच सोग्याच्या आधारानं
एकाच वऱ्याच्या मार्गावर दोन बैलांनी फिरत राहावं
तशा त्या एकमेकीत मिसळून चालत राहतायत आता पुढचं पुढचं अंतर
खूप बोलताना दिसायत मनमोकळं
मध्येच हास्याच्या लकेरीबरोबर देतायत नकळत एकमेकींना टाळ्या
इतक्या त्या होतायत 'काळीजओल्या' एकमेकींसाठी

आता खूप चौकशीनंतर समजलं
एकीला इच्छा असून शिकता आलं नाही
दुसरी शिकूनही करीअर घडवू शकली नाही
पहिली;
घरचं सर्व काम करून रस्त्यावर पाय मोकळे करू पाहतेय कातरवेळेला
दुसरी;
घरच्या चौकटीतून मोकळी होऊ पाहतेय मैत्रिणीबरोबर
म्हणजे वयात तसं अंतर असलं तरी
तशा त्या समकालीनच
आपल्या आतल्या वेदनेच्या मार्गावर...!

**– अजय कांडर**

## बाई

बाई आयुष्यभरासाठी कसं शोषणाचं सारं धनच घेऊन येते
बाई आयुष्यभरासाठीच सारा शोषणाचा तळ शोषून घेत राहते
बाईच्या शोषणाचा जुना स्तर पुन्हा, पुन्हा उलगडत जाताना
शोषणाची खोल जखम पुसून टाकते ती नव्याने उभं राहताना
बायकोच्याही पल्याड जातच असतं सदैव बाईशी विस्तारत नातं
कधी बहीण, कधी मुलगी, कधी आई होऊन तेच नातं मायाळू होतं
बायको, मुलगी, बहीण, आई याही पलीकडे जगात असतेच एक बाई
जगात सर्वकाळ सर्वाधिक शोषित बनवली जाते देहविक्री करणारी बाई!

**– अजय कांडर**
अभंग, आवानओल सदन
गजानन महाराज मंदिरजवळ
कलमठ-गोसावीवाडी,
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग
भ्रमणध्वनी : ९४२२५८४१३६



## स्त्री : चार कविता

१.
लाख वेळा विचारलं
मी तिला तिचं नाव
प्रत्येकवेळी
ती फक्त हसायची मौनात

मग
मीच तिला साद घालत राहिलो
वेगवेगळ्या नावांनी
: कन्ये, ताई, लाडके, आई
ती प्रत्येकवेळी रूप पालटून समोर आली

फक्त तिचं हसणं
राहिलं कायम तिच्या चेहऱ्यावर

मला हसण्यासाठी बळ देणारं.

२.

ऋतूंच्या आडोशानं
पानांचा पोशाख बदलून
डोलतं नव्यानं रान

शांत मुग्ध नदी
अचानक
होते चंचला

मेघांचं आश्वासन देणारं
आकाशही
होतं निरभ्र काहिलीसारखं

फक्त बदलत नाही पृथ्वी
आतून धरून राहते
गंध आणि पाणी

जशी स्त्री आपल्या आत
प्रेमाचा ओलावा
आणि दुष्काळातही तग धरून राहणारी
जगण्याच्या असोशीची गाणी.



३.

पाखरं उडून गेलीत
सुखाच्या दिवसांसारखी

भात कापणीनंतरच्या
उदास शेतासारखी
ती थकून बसलेली

भाताच्या धाटांसारखं
भय
खुपतंय तिच्या मनाच्या तळव्यात

पाखरं परतण्याआधीच
मोकाट शिरेल
आडदांड ढोरांची दहशत.



**४.**

शरमेनं लज्जित व्हायची वेळ
पुनःपुन्हा आणू नकोस देवा!

प्रार्थना करीत आलोय
: मान झुकू नको देऊस
माथा उंचावण्याची
शक्ती दे!

देणारा तो देव
असं ऐकत आलो;
दानगान गात आला
परमपुरुष
वेदापासून गीतेपर्यंत

दानाचं सारं पुण्य
दात्या पुरुषाला
दानात दिल्या गेलेल्या वस्तूंना
नसतं स्वातंत्र्य
ओंजळ निवडण्याचंही

हे देवा
इथल्या तर सगळ्याच स्त्रिया
दानात दिलेल्या-घेतलेल्या

माझी मान
आणखीनच खाली झुकणारी शरमेनं
परंपरागत देवापुढे.

**– संतोष शेणई**

ए - १/ ३, सुंदररचना, विठ्ठलनगर,
वडगाव बुद्रुक, सिंहगड रस्ता, पुणे, ४११०५१
भ्रमणध्वनी - ९८८१०९९०१६
santshenai@gmail.com

**रद्दी**

बहिणीचे मिस्टर म्हणाले
होम लोन घ्या होम लोन
टॅक्स वाचेल टॅक्स
आई म्हणाली
सोनं घे सोनं
हीच वेळ आहे हीच
बायको म्हणाली
बारा वर्षं झाली बारा
घर रिन्नोव्हेट करा रिन्नोव्हेट
भाऊ म्हणाला
जमीन घे जमीन
चांगली इन्व्हेस्टमेंट आहे चांगली
मी ऐकत वाचत राहिलो
मिळेल ते ते
याही गोष्टीला आता खूप वर्षं झाली, खूप
इतकी की सगळ्यांकडे साचली प्रॉपर्टी प्रॉपर्टी
आणि माझ्याकडे जगणे
आई, बायको कातावत राहिल्या कातावत
हातपाय पसरता येत नाहीत नीट, नीट
जागा नाही म्हणून म्हणून

मग एक दिवस
बहीण म्हणाली
तुझं फ्युचर प्लानिंग काय आहे फ्युचर प्लानिंग
आई म्हणाली
अरे मुलासाठी तरी प्रॉपर्टी कर प्रॉपर्टी
भाऊ म्हणाला
तू काहीच हालचाल का करत नाहीस काहीच..
बायको म्हणाली
सगळे काय म्हणतायत ऐका सगळे

आणि मी वाचता वाचता
जगणं वर काढून डोकं
कान दिले तर गप्प सगळेच गप्प
रद्दीकडे पाहावं तसं रद्दीकडे
पाहत
चोरून चोरून

**– किरण येले**

## झोप येतेय मला


खूप झोप येतेय मला
चोवीस तास
बंद होतायत डोळे गुंगी झाल्यासारखे
आणि ड्राईव्ह करत
आपण पळतोय सुसाट
असे स्वप्न
जागेपणी

थकलोय खूप
की फिरलो पाय दुखेपर्यंत
धूळ घेत अंगावर जगण्याची
जागलो खूप
की पाहिलं डोळे दुखेपर्यंत
रक्ताळलो खूप
की ओरबाडून घेतलं आपल्याच नखांनी
नॉशियाच आला सगळ्याचा
की हे काय करतोय आपण असं
चोरी केल्यासारखं
वाटत राहिलं जगताना
की आपण काहीच करू शकलो नाही
इतरांच्या आणि आपल्याही मनाप्रमाणे
याचंही जळत राहिलं मूळ आत

खूप झोप येतेय मला
चोवीस तास
बंद होतायत डोळे गुंगी आल्यासारखे
पण मी झोपणार नाहीय की
एक साधं तरी घर घ्यायचंय मला
वडिलांना हवं म्हणून
गावी थोडीतरी जमीन घ्यायचीय मला
आई म्हणते म्हणून
मुलाच्या भविष्याची तरतूद करायचीय
बायको म्हणते म्हणून
यासाठी नाही
फक्त यासाठी की झोपण्याआधी
फक्त एक कविता लिहायचीय मला
जी उजळून टाकेल सगळा अंधार
आणि संपवून टाकेल सगळा नॉशिया

खूप झोप येतेय मला
चोवीस तास
बंद होतायत डोळे गुंगी आल्यासारखे
आणि
ड्राईव्ह करत
आपण पळतोय सुसाट
असे स्वप्न
जागेपणी

**– किरण येले**
१६, ओम वृंदावन, शिवगंगा नगर,
शिवमंदिर रोड, अंबरनाथ (पूर्व),
जि. ठाणे ४२१५०१
भ्रमणध्वनी : ९८६९ २६०७८०
kiran.yele@gmail.com





# नीलम गोऱ्हे मुलाखत

। आनंद अवधानी

अवधानी : गेल्या ३०-३५ वर्षांतील राजकीय चळवळ आणि त्यातील स्त्रियांचा सहभाग याविषयी आपण बोलणार आहोत. साधारण महिलांचा राजकीय सहभाग कधी सुरू झाला आणि कशा प्रकारे?

नीलमताई : ८०-९०च्या दशकातील अनेक घडामोडी कारणीभूत आहेत असं मला वाटतं. १९८० नंतर फार मोठ्या प्रमाणामध्ये महिलांची चळवळ सुरू झाली. १९८५ला नैरोबीला तिसरं महिला विश्व संमेलन झालं होतं. त्या काळात महिलांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था भारतभर उदयाला आल्या. त्यामुळे १९८० ते १९९० ह्या दशकामध्ये आम्ही सुरू केलेल्या स्त्री आधार केंद्र आणि क्रांतिकारी महिला संघटना सुद्धा चर्चेत आल्या. आज ही चळवळ तेहतिशी-पस्तिशीची झालेली आहे. आणि साधारणपणे आपल्याला मध्यम वयामध्ये जे कष्ट जाणवतात ते ह्या चळवळीला पण जाणवायला लागलेले आहेत, असं वाटतं. पण आपल्याला असं म्हणता येईल की स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये ज्या स्त्रिया अग्रभागी होत्या त्यांची पण एक सावली या संपूर्ण चळवळीवर होती. त्याचबरोबर सत्त्याहत्तरचा आणीबाणीचा अनुभव, त्याच्यानंतर झालेले सत्तांतर, त्यातून आलेली जागृती, ती सत्ता गेल्यानंतर आलेलं नैराश्य आणि थोडक्यात, नवविचारांची जी रुजवणूक सत्तरीच्या दशकात जगभर झाली होती त्यांचा परिणाम म्हणून त्याच्यामधून नवमार्क्सवादी किंवा नवसमाजवादी, उजव्या विचारसरणीच्या स्वतंत्र स्त्री संस्थाही भारतभर उभ्या राहिल्या होत्या. १९७५ नंतर जे काम झालं होतं त्यामुळे महिलांवर कुटुंबामध्ये आणि कुटुंबाच्या बाहेर होणारा हिंसाचार याकडे बघण्याचा आधी जो दृष्टिकोन होता तो बदलायला लागला. सगळ्या जगातल्या स्त्रियांचे काही प्रश्न जरी सारखे असले तरी काही प्रश्न निराळे असतात. त्यांचं स्वरूप तिथल्या स्थानिक भाषा, स्थानिक वंश, जात, धर्म, प्रांत किंवा देश कोणत्या आर्थिक-राजकीय परिस्थितीतून जातोय त्यानुसार बदलू शकतं हे पहिल्यांदा दक्षिण आफ्रिकेतल्या महिलांबरोबर संवाद झाल्यावर कळलं. त्यामुळे फेमिनीझम म्हणजे स्त्रीवाद या विषयीचे संपूर्ण जगामध्ये जरी काही मुद्दे समान असले तरी त्याचं एक प्रतिबिंब इथल्या व्यवस्थेमध्ये पडलं. कायदेबदलाची चळवळ सुरू झाल्यावर त्यामध्ये १९९०च्या सुरुवातीला राष्ट्रीय महिला आयोग म्हणजेच नॅशनल विमेन्स कौन्सिल असावं. त्या अगोदर १९८८ ला नॅशनल परस्पेक्टिव्ह प्लॅन करताना त्याच्यात कुठले कुठले कायदेबदल पाहिजेत त्याच्याबद्दलची चर्चा सुरू झाली. या पार्श्वभूमीवर भारतामधील असंघटित स्त्रियांची जी स्थिती होती ती अत्यंत काळजी करण्यासारखी होती. त्यांचं आरोग्य, त्यांची परिस्थिती, त्यांची सामाजिक परिस्थिती ही सगळीच अतिशय दुय्यम-तिय्यम स्वरूपाची होती आणि संघटित क्षेत्रातून स्त्रिया असंघटित क्षेत्रात फेकल्या जाऊ लागल्या होत्या. थोडक्यात, उदारीकरणाचे जे वारे वाहत होते ते ऑलरेडी पहिल्यांदाच ह्या

घटकापर्यंत पोचायला लागले होते. दुसरं म्हणजे  नागरीकरण ज्या वेगानं होत आहे त्याचेसुद्धा काही परिणाम होतेच. शहरी आणि गामीण ह्या भागामध्ये फक्त अमूक एकाची बाजू घेता येणार नाही. सर्व स्त्रियांचा विचार करायला लागेल अशा प्रकारची गुंतागुंत दिसून येते. पुण्यामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकारच्या महिला संघटना आणि महिला संस्था उभ्या राहिल्या. त्यांच्या संख्यात्मकतेकडे लक्ष देण्यापेक्षा त्याच्या मागचा जो विचार आहे तो महत्त्वाचा आहे. त्या विचाराचा प्रसार आज १९८०पासून २०१४ पर्यंत होतो आहे असं मला वाटतं. हा विचार समाजाच्या प्रत्येक घटकातल्या काही एका समूहापर्यंत जाऊन पोचलाय.

अवधानी : ७५-८० च्या काळामध्ये राजकारणाकडे ह्या बायका कशा बघत होत्या?
नीलमताई : ७५-८०च्या दरम्यान कम्युनिस्ट विचारसरणीच्या महिलांनी आणि समाजवादी विचारसरणीच्या महिलांनी  स्वत:ला स्वतंत्र विचारांकडे वळवून घेतलं. त्यांच्यात एक विसंगती होतीच. खरं तर जो माणूस राजकीय पक्षाचा आहे तो स्वत:च्या संघटनेचं नाव मात्र स्वतंत्र आहे असंच दाखवतो. खरं सांगायचं तर एका पातळीवर स्त्रियांची ही चळवळ ही पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या महिला पक्षांची आघाडी अशीच होती. अर्थातच त्यांच्या ज्या औपचारिक आघाड्या आहेत, म्हणजे काँग्रेसची महिला आघाडी, भाजपाची महिला आघाडी, यांना त्यात स्थानच नव्हतं. कारण पुरोगामी स्त्रियांनी अतिशय विचार करून महिलांचा फ्रंट तयार केला होता. त्यांच्यात कुठल्या पक्षात नसणाऱ्या पण समाजवादी स्वतंत्र विचारसरणीच्या काही महिलाही सहभागी झाल्या होत्या.

अवधानी : प्रत्यक्ष राजकारणामध्ये  सहभागी झाल्या होत्या का?
नीलमताई : नाही. त्या फक्त महिलांच्या प्रश्नांमध्येच सहभागी होत होत्या. आपण राजकारणाची व्याख्या जी करतो त्या राजकारणाच्या व्याख्येमध्ये राजकारण म्हणजे राजकीय पक्षांचा प्रचार करणं हे जे आपण गृहीत धरतो ते चुकीचं आहे असं मला वाटतं. त्याऐवजी मी असं म्हणेन की स्त्रियांची राजकीय जागृती वाढवणं हे राजकारण. स्त्रियांच्या चळवळीनं कायम त्याला महत्त्व दिलं. त्यामुळे ज्या महिला अशा राजकीय पक्षांच्या नव्हत्या त्या महिलांनी त्याला जास्त विचारात्मक महत्त्व दिलेलं होतं. अर्थात मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी, प्रमिला दंडवते ह्यांच्यासारख्या ज्या नेत्या होत्या, (या सगळ्या स्त्रियांच्या चळवळीचेही प्रतीक होत्या) त्या डाव्या कम्युनिस्ट चळवळीतल्या होत्या.

अवधानी : ८०च्या सुमाराला अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे यांच्यासारख्या ज्या लोकप्रतिनिधी होत्या, त्या त्यावेळी ॲक्टिव्ह पॉलिटिक्समध्ये होत्या. या काळात सक्रिय राजकारणात असणाऱ्या व्यक्ती आणि संसदीय राजकारण चळवळीमध्ये आणायचं नाही असं म्हणणाऱ्या लोकप्रतिनिधी असे दोन स्पष्ट तट होते. आम्ही लोकांमध्ये काम करू असे म्हणणारा वर्ग संसदेचं राजकारण करणाऱ्या लोकांकडे तुच्छतेनं पाहत होता. पण या सगळ्यात जे कोणी संसदीय राजकारणात होते त्यांच्याकडे सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी, सामाजिक प्रश्नांची जाण, विचारसरणीविषयी पक्केपणा हे सगळं होतं. त्यानंतर त्या लोकप्रतिनिधी म्हणून काम करत होत्या.

अवधानी : पण त्यावेळी खासदार-आमदार महिलांमध्ये किती महिला अशा  होत्या?
नीलमताई : फार कमी संख्या होती महिला आमदारांची. महिलाच कमी होत्या. तुरळक, म्हणजे आमदार आणि खासदार मिळून दहाच्या वर सुद्धा नाहीत. फक्त एक होतं की त्या वेळेला ओव्हर ऑल गिरणी कामगारांचा प्रश्न किंवा ओव्हर ऑलच सगळी आंदोलनं जोरात होती. आता तशा प्रकारची आंदोलनं होत नाहीत असं अनेकांना वाटतंय. मुळामध्ये आपण एक लक्षात घेतलं पाहिजे की तेव्हा कामगारांच्या प्रश्नावरही प्रचंड मोठे म्हणजे लाखालाख लोकांचे सर्वपक्षीय मोर्चे दिल्लीमध्ये आणि मुंबईमध्ये निघत होते. त्यानंतर सत्त्याहत्तरच्या चळवळीचा जबरदस्त परिणाम बराच काळ चाललाच होता. त्यानंतर कामगारांमधला मध्यमवर्ग वाढत गेला. मुख्य गोष्ट ही आहे की ज्या क्षणी उदारीकरण आलं त्याक्षणी आंदोलनांचं स्वरूप बदलत गेलं. तोपर्यंत स्त्रियांची चळवळ ही  फक्त मध्यमवर्गीय स्त्रियांची चळवळ होती. त्यात मध्यमवर्गाच्या प्रश्नांचे पडसाद उमटलेले होते. साहित्यामध्ये, कलांमध्ये, नाटकांमध्ये किंवा लिखाणामध्ये मध्यमवर्गीय कुटुंबातील रचनेचं प्रतिबिंब पडायला लागलं होतं. एकट्या स्त्रियांचे प्रश्न, शेतमजूर महिलांचे प्रश्न किंवा संपत्ती दोघांच्या नावानं करण्याचे प्रश्न, हे जगण्याबद्दलच्या संकल्पनांचे जे प्रश्न होते ते ऐंशीनंतर समोर आले.

अवधानी : तिथे काम करणाऱ्या ज्या बायका होत्या त्यांना सार्वजनिक जीवनात काम करतानाच आपण राजकारणात जावं, तिथे प्रश्नांची उत्तरं शोधावीत किंवा तिथे संघर्ष करावा असं किती प्रमाणात वाटत होतं?
नीलमताई : त्या राजकारणात होत्याच. त्यांना असं वाटतच नव्हतं की त्या राजकारणात नाहीत. कारण त्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका, पंचायत समितीच्या निवडणुका, महानगरपालिकेच्या निवडणुका ह्या निवडणुकांपासून अलिप्त नव्हत्या. निवडणुकांमध्ये सहभागी होत होत्या. स्वायत्त स्त्री संघटना ऐंशीच्या नंतर म्हणजे पंच्याऐंशीपासून हळूहळू जास्त उठाव घ्यायला लागल्या. तेव्हा त्याच्या दृष्टीनं स्वायत्तता म्हणजे काय होतं तर पक्षापासून, पुरुषांपासून, परिवारापासून स्वतंत्र असणं किंवा आत्मनिर्भर असणं

असं वाटत होतं. थोडक्यात, त्यांच्याशी कुठल्याही पद्धतीनं समझोता न करणं हे त्यांना कळत होतं. समझोता केला की स्त्रीवादी भूमिका जी आहे तिच्यामध्ये प्रश्न तयार होतात हेही त्यांना माहीत होतं. त्यामुळे पक्षांमध्ये आपण कोणत्याही पद्धतीनं जायचं नाही असं ठरवून त्यांनी स्वायत्त महिला संघटनांचं वेगळं नेटवर्क जन्माला घातलं. पण त्याच्यासमोरही काही प्रश्न आले. विशेषत: समलैंगिकतेचा प्रश्न किंवा राजकीय कार्यप्रणाली काय आहे असे प्रश्न समोर आले. आणि राजकारणात न जाणं हे सुद्धा एक वेगळं राजकारण होतं अशी त्यावेळी भूमिका होती. ८०-९० च्या दशकात शहाबानो केस वगैरे समोर आली. त्या काळामध्ये तेव्हा मुस्लिम महिलांच्या प्रश्नावरच्या अनेक शेड्स आणि रंग समोर आले. मग मुस्लिम पर्सनल लॉमध्ये हस्तक्षेप नको असं वाटणारा एक गट निर्माण झाला. समान कौटुंबिक कायदा असला पाहिजे असं म्हणणारा गट तयार झाला. समान नागरी कायदा असा शब्द वापरला तर मग त्याचा फायदा काही वेळेला उजव्या शक्तींना मिळेल म्हणून तो नको म्हणणारा एक गट होता. तर काही लोक असं म्हणत होते की आम्हाला दोन्ही समजून घेता येतंय. पण दोन्ही समजून घेता येतंय म्हणजे नेमकं काय? तुम्ही लोकांमध्ये जाऊन काय सांगणार आहात? हे असे सगळे प्रश्न उपस्थित झाले. मंडल आयोगाचा प्रश्न ९९ साली आला. या प्रश्नावर स्त्रियांच्या चळवळीमध्ये मोठी फूट पडली. त्यात अनेक लोकांनी पक्षाच्या भूमिकेनुसार भूमिका घेतल्या तर काही लोकांनी असं म्हटलं की आम्हाला ओबीसी महिलांचंच काम करायचंय. अगदी एस.सी. महिलांच्या संघटना वेगळ्या झाल्या. ओबीसी महिलांच्या संघटना वेगळं बोलायला लागल्या आणि ह्या सगळ्यामुळे मला थोडंसं असं वाटतं की स्त्रियांच्या दुसऱ्या-तिसऱ्या शक्तीचा पाया संकुचित होत गेला. विद्रोहीकरण जसं वाढलं तसं महिला चळवळीवरसुद्धा विद्रोहीकरणाचा परिणाम झाला. जनतेच्या सहभागावरही थोडा परिणाम झाला.

अर्थात सरकारी स्तरावर जे बदल अपेक्षित होते, ते व्हायला लागले. म्हणजे ४९८-अचा कायदेबदल ९०च्या सुमाराला झाला. याच काळात महिला आयोगासाठी चळवळ सुरू झाली. त्याच वेळेला आंतरराष्ट्रीय महिला संमेलनाची तयारी सुरू झाली. त्याच्यामध्ये म्हणजे सेवन सिस्टर्स म्हणून दिल्लीमध्ये ज्या संघटना ओळखल्या जातात त्या होत्या. ज्यात कम्युनिस्ट ऑल इंडिया वुमन्स कॉन्फरन्सही होती. ऑल इंडिया वुमन्स कॉन्फरन्स ही कुठल्या पक्षाची नव्हती, पण त्याच्यावर गांधीवादी विचारसरणीचा किंवा स्वातंत्र्य चळवळीतून आलेल्या कामाचा म्हणजे पांढरपेश्या महिला चळवळीचा प्रभाव होता. याचबरोबर सेंटर फॉर वुमन्स स्टडीज होतं. त्याच्यामध्ये विद्वत्तापूर्ण विचार मांडणाऱ्या पण पुरोगामी विचारसरणीच्या स्त्रिया होत्या. पण जेव्हा ह्या सगळ्या संस्था भारतभर उभ्या राहायला लागल्या त्या वेळेला त्या भारतातल्या समूहाला प्रातिनिधिक स्वरूपात नेतृत्व देईल असं स्त्रियांच्या चळवळीत नेतृत्व नव्हतं. काही प्रमाणात हे नेतृत्व देण्याचा दिल्लीमध्ये प्रयत्न झाला. सुमन कृष्णकांत, प्रमिला दंडवते, मृणालताई, अहिल्याताई ह्यांचं नेतृत्व जरी राष्ट्रीय असलं तरी त्या त्या राज्यात त्यांचा जास्त वावर होता. प्रमिला दंडवते, सुमन कृष्णकांत आणि कम्युनिस्ट पक्षांच्या महिलांनी विशेषत: गीता मुखर्जी वगैरेंनी भरपूर प्रयत्न केले. राष्ट्रीय स्तरावरदेखील महिला आरक्षणात जातिनिहाय व धर्मनिहाय महिलांच्या आरक्षणाची मागणी आल्यावर चळवळीचा जोर थोडा विभागला गेला.

अवधानी : ९० मध्ये मंडलनं जे प्रश्न उभे केले त्याच्यातून एक पेच उभा राहिला...

नीलमताई : पेच उभा राहिला म्हणण्यापेक्षा आरक्षणाचं जे विधायक आलं त्यात ओबीसी महिलांसाठी, एस.सी. महिलांसाठी आणि मुस्लिम महिलांसाठी कोटा असावा की नसावा ह्या स्वरूपात ते समोर आलं. त्यावेळी आम्ही भूमिका घेतली. ओबीसींसाठी जर कोटा आला तर ओबीसीच्या कोट्यामध्ये महिलांसाठी कोटा असेल ना? त्यामुळे कोट्यामध्ये कोटा हा आमचा प्रश्न काही चुकीचा नव्हता. मुळात अशी भूमिका अनेकांनी त्या वेळेला घेतली. परंतु बाकीचे जे राजकीय पक्ष होते- समाजवादी वगैरे - त्यांनी सरळ म्हटलं की ह्या 'बालकटी' बायकांचं हे सगळं आंदोलन आहे. थोडंसं काय झालं, राजकीय आरक्षणाचं आंदोलन आणि त्याच वेळेला महिला अत्याचाराचं आंदोलन सुरू होतं. हे दोन्ही प्रश्न जरी गंभीर असले तरी त्या दोन्ही प्रश्नांची नाळ कशी जोडली गेली पाहिजे ह्याबद्दल अशी काही ठरवून रणनीती आखलेली नव्हती. आमचं म्हणणं होतं हजारो फुलं फुलू द्यात. अनेक मागण्या वेगळ्या प्रकारानं येत होत्या. जसं महाराष्ट्रामध्ये भूकंपानंतर घर आणि जमीन आणि पशुधन हे पतीपत्नी दोघांच्या नावानं द्यायचा निर्णय झाला किंवा महिलांना आरक्षण आल्यानंतर महिला सरपंचावर अविश्वाचा ठराव आणता कामा नये हा निर्णय ९८ला झाला. पण आता नवीन चळवळीतले लोक मी बघते. 'महिला राजसत्ता आंदोलनाची' मी एक मुलाखत पाहिली तर त्यामध्ये त्या महिला म्हणत होत्या की आमच्या प्रयत्नांनी हे झालं. कोणाच्या प्रयत्नांनी झालं हा प्रश्न नाही. प्रश्न असा की सरकारला आपण एखादा निर्णय घेण्यासाठी भाग पाडू शकतो ही भावना स्त्री समूहांमध्ये तयार होणं हा आत्मविश्वास त्या काळामध्ये रुजला हे महत्त्वाचं आहे.

अवधानी : थोडं मागे जर गेलं तर लक्षात येतं की ८०-९०च्या काळात विधानसभा, लोकसभेमध्ये महिलांचं प्रमाण खूप कमी होतं. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये म्हणजे महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा किंवा पंचायत समित्यांमध्ये काय

परिस्थिती होती?

नीलमताई : त्यावेळेला प्रत्येक ग्रामपंचायतीवर दोन दोन महिला स्वीकृत केल्या जात होत्या. आणि हे ग्रामपंचायतींनी मिळवून ठरवायचं की आमच्याकडून ह्या दोन महिला स्वीकृत आहेत. त्यामुळे निवडणूकच नव्हती.

अवधानी : प्रत्यक्ष निवडणुकीला बायका उभ्याच नव्हत्या राहत?

नीलमताई : नव्हत्या राहत आणि त्या नियुक्त महिलांना बैठकीला तर क्वचित बोलवलं जायचं. मला आठवतंय आम्ही ८४ साली क्रांतिकारी महिला संघटनेने अशा नियुक्त झालेल्या ग्रामपंचायत सदस्यांचं पहिलं शिबीर पुण्यात घेतलं. महाराष्ट्रात असं ग्रामपंचायतीतल्या सदस्यांना तोपर्यंत कोणी बोलावलंच नव्हतं. त्यावेळेला पुण्याचे कलेक्टर नि.पा. राणे होते. ते आले होते कार्यक्रमाला. ह्या नियुक्त झालेल्या सदस्यांशी जेव्हा आम्ही बोललो तेव्हा त्यांनी सांगितलं की आमच्याकडे घरीच रजिस्टर पाठवतात सहीला आणि आम्ही सही करून देतो. त्यांनी सांगितलं, ''आम्हाला काही त्रास नाही.'' आम्हाला वाटलं सदस्य म्हणजे काही त्रास असेल, मीटिंगला वगैरे जावं लागेल तसं काही नाही. पण काही महिला म्हणत होत्या, पुरुष सरपंच जातात बैठकांना मग आम्हाला पण बैठकांना जायचंय. आम्हाला निदान तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या बैठकांना बोलावलं पाहिजे. तर आम्हाला कामकाज काय ते कळेल. त्याच्यानंतर अर्थविज्ञानवर्धिनीबरोबर आम्ही काही शिबिरं घेतली होती. त्या शिबिरांमध्ये अनेक बायका भेटल्या. आम्हाला त्यात ग्रामपंचायत सदस्य भेटल्या, त्यातल्या काही बायका सांगत होत्या की मी काम चांगलं केलं, पण काय केलं चांगलं काम ते सांगता येत नव्हतं.

या काळात आणखी एक गोष्ट झाली. स्त्रीचा जगण्याचा अधिकार याविषयी बोललं जायला लागलं. तो अधिकार देण्यासाठी समाजातील लोकांनी मदत करायला हवी ही मूलभूत भावना ९०च्या सुमाराला रुजायला सुरुवात झाली. म्हणून कायदेबदलाला सुरुवात झाली. त्याचबरोबर कोटा मागण्याच्या अगोदर राज्यकर्त्यांमध्येही आपण महिलांसाठी काही केलं पाहिजे ही जाणीव पंच्याहत्तर सालापासूनच निर्माण झाली होती. पंच्याहत्तर किंवा सत्तर-बहात्तरच्या नंतर सातत्यानं त्याचं प्रतिबिंब धोरणांमध्ये पडायला लागलं. त्यावेळच्या म्हणजे ७० ते ८०च्या दशकातल्या बऱ्याचशा महिला प्रतिनिधी सुद्धा ह्या कल्याणाच्या भूमिकेतूनच स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघत होत्या. म्हणजे मला आठवतंय की आम्ही ज्या वेळेला क्रांतिकारी महिला संघटना वेगळी काढायचा विचार केला आणि युवक क्रांती दलाच्या बैठकीमध्ये जेव्हा आम्ही चर्चा केली त्यावेळेला चर्चासत्रातल्या पहिल्या सेशनमध्ये स्त्रियांचे विशेष प्रश्न काय असतात ह्यावर चर्चा झाली होती.

मला इथं नम्रतेनं सांगायला पाहिजे की रिपब्लिकन पक्षाचीदेखील महिला आघाडीची पहिली बैठक घेण्यामध्ये सुद्धा तेव्हा माझा पुढाकार होता. कार्यकारिणीतील बरेचसे लोक विरोध करत होते की वेगळी महिला आघाडी नको. वेगळ्या महिला आघाडीची गरज काय? पण मग त्यावेळेचा शेड्युल कास्ट फेडरेशनला पण महिला आघाडी होती म्हणून आपण करुया ह्या आर्ग्युमेंटवर शेवटी ती रिपब्लिकन महिला आघाडी मान्य करून घेतली होती. महिला आघाडी आली म्हणजे पक्षांमध्ये सत्तेला पर्यायी समांतर केंद्रं आलं अशा पद्धतीची भीती बऱ्याचशा पुरुष कार्यकर्त्यांना वाटत होती. अगदी ज्या संघटना बिगर राजकीय किंवा व्यापक राजकारण करणाऱ्या होत्या त्या संघटनांनासुद्धा अशा पद्धतीनं स्त्रियांचे वेगळे काही प्रश्न असतात आणि म्हणून स्त्रियांसाठी वेगळ्या प्रकारचं संघटन असायला पाहिजे याची जाणीव तेवढ्या प्रमाणामध्ये नव्हती.

दुसरी गोष्ट म्हणजे सत्तर-ऐंशीच्या दशकामध्ये आणीबाणी आली. त्याच्या आधी फार मोठ्या प्रमाणात म्हणजे आज जसं दिसतंय तसं दमन होत होतं म्हणजे कधी गोळीबार तर कधी ठिकठिकाणी उद्रेक होत होते. त्याच्यामध्ये महिला या रणरागिणीच्या भूमिकेत होत्या. म्हणजे कुठे गाड्यांपुढे आडव्या पडताहेत, कुठे लाटणी घेऊन धावताहेत. स्त्रीचं जे एक रौद्ररूप आवडतं समाजाला ते रूप स्त्रीनं तेव्हा घेतलं होतं. अशा वेळी जनाधारपण मिळतो कारण लोकांना अशी दृश्यं माध्यमांमधून स्वत:शी जोडून घेता येतात. हा पण एक अनुभव होता. त्याकाळी महागाईचा मोठा प्रश्न होता. मात्र महिला अत्याचाराच्या प्रश्नावर वैयक्तिक स्वरूपात जागृती नव्हती.

एखादा माणूस बायकोला मारत असेल किंवा आता जसे व्यक्तिगत संबंधातील तणाव या विषयावरून प्रश्न तयार होतात. तसा प्रकार घडत असला तरी त्याची ओळख स्पष्ट नव्हती व तशी जाणीवदेखील ठळकपणे समोर आली नव्हती. आणि त्यामुळे बऱ्याचशा आहेत तशा गोष्टी स्वीकारणं किंवा ज्याला आपण म्हणतो, लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणी वगैरे चालूच होतं. त्याबद्दल काही प्रश्न विचारणं वगैरे नव्हतं. त्या विषयाला सर्वमान्यता नव्हती. हे प्रश्न वगैरे विचारणं हे सगळं ८० नंतर जास्त प्रमाणामध्ये सुरू झालं असं मला वाटतं.

अवधानी : मुख्य टप्पा जो आता आहे तो म्हणजे पंचायतराजचं आरक्षण, महिला आणि राजकारण हे कधी सुरू झालं?

नीलमताई : ९३पासून.

अवधानी : बायकांचा राजकीय सहभाग थेट कधी सुरू झाला? ३३ टक्के आरक्षण करून दिल्यावर की त्याच्या आधीच? महिलांची एकूण राजकीय जागृती आधी झाली की आरक्षण आल्यानंतर सुरुवात झाली?

नीलमताई : स्त्रियांमध्ये अनेक स्तर आहेत. मला असं वाटतं, भूगर्भात जसे अनेक स्तर असतात वेगवेगळे किंवा आपण आकाशात सुद्धा रंग बघतो तेव्हा आपल्याला अनेक आविष्कार दिसतात त्याच्यामध्ये, तसे स्त्रीजीवनाचे अनेक पैलू आहेत म्हणून आम्ही काहीजणी सातत्यानं हे मांडत आलोय म्हणजे मी, विद्युत भागवत किंवा आमच्या देशपातळीवरच्या ज्या मैत्रिणी आहेत त्यांच्यामध्ये, की तुम्ही सगळ्या स्त्रियांचा एक समूह असल्यासारखं पाहू शकत नाही. कोणत्या आयुष्याच्या टप्प्यावर ती आली त्यानुसार तिच्या प्रश्नाचं स्वरूप बदलतं आणि म्हणून कायम प्रश्न वेगळे आणि म्हणून त्याची उत्तरं वेगळी असतात. सगळ्याला सारखी उत्तरं असू शकत नाही हा एक भाग होता. परंतु ज्या वेळेला महिला धोरण करण्याचे प्रयत्न सुरू झाले त्यावेळेला असं वाटलं की या सगळ्याला काहीतरी उत्तर शोधायचं असेल तर आपण ते वैचारिक चौकटीमध्ये समजून घेऊन सुस्पष्ट शब्दात मांडायला हवं. जर का तशी मांडली नाहीत तर त्यातल्या धुसरतेचा फायदा नोकरशाही घेते. आपल्यामध्येच म्हणजे स्त्रियांच्या किंवा समाजाच्या घटकांमध्ये जर का काही विषयाला धरून सर्वसंमती आलेली नसेल तर त्याचा सुद्धा गैरफायदा घेऊन जे एस्टाब्लिश आहेत, प्रस्थापित आहेत त्या त्या विषयांमधले तज्ज्ञ आहेत त्यांना त्यांच्या सत्तेत काही गडबड होऊ नये असं वाटत असल्यानं ते अशा गोष्टींना बऱ्याचदा फक्त मुलामा देतात आणि तोही मूळची चौकट न बदलता. त्यामुळे आपल्याला नेमकं काय करायचंय हा एक प्रश्न होता. मला आठवतंय, महिला धोरणाची चर्चा जेव्हा सुरू झाली ९४ ला त्यावेळेला बऱ्याचशा संघटनांच्या मनात विषाद होता की त्यांना त्याच्यात घेतलेलं नाहीये. पण तसं नव्हतं. ज्यांनी कोणी त्याच्यात उदाहरणं मांडलेली होती, निवेदनं दिली होती त्या सगळ्याचा विचार करण्याचा प्रयत्न करत होतो आम्ही. पण मुळात सरकार असं धोरण करूच कसं शकतं, हा प्रश्न होता अनेकांचा. म्हणजे थोडक्यात जे सरकार बाकी विषयात भांडवलशाही आहे, जातिवादी आहे ते सरकार महिला धोरण कसं करणार असा त्यांचा प्रश्न होता.

पण आपण वास्तव विसरतो. आपल्याला हवं तसं १०० टक्के सरकार येणं हेच मुळी आपल्याला क्षितिजावर सुद्धा दिसत नसतं. अशा परिस्थितीत, आहे त्या चौकटीमध्ये तुम्ही बदल कसा घडवणार आहात, हा प्रश्न असतो. पण मला एका गोष्टीचं समाधान आहे की काळाची पुढची पावलं मला थोडीशी समजली आणि माझ्या असं लक्षात आलं की आपण जर का ते मांडायचा प्रयत्न केला नाही. आपण म्हणजे मी स्वत: एक व्यक्ती म्हणून नव्हे, चळवळीतून आलेल्या सामान्य महिलांची प्रतिनिधी म्हणून जीवनाचा जो विचार करतो त्या जीवनात नेमक्या कोणत्या प्रकारच्या बदलाची अपेक्षा करते आहोत. तो बदल नक्की कसा असणार? हे मी स्वत: समजून घेतलं आणि ते समजून शक्य तेवढं सरकारच्या सर्व योजनांमध्ये आलं पाहिजे हेही पाहिलं. केंद्रात पण ज्यांनी धोरणात्मक संशोधन केलं त्या बऱ्याचजणांनी असा प्रयत्न केला. पण त्याच्यामधून एक असं झालं, तो विषय समजून घेऊन परत पोचवण्याची प्रकिया जर का होत नसेल तर मग त्या धोरणासाठी निधी आणि मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. आणि ते नसल्यामुळे त्याबद्दलची पुढची आव्हानं तयार झालेली दिसतात. पण ही जी मूलभूत गोष्ट आहे, की सरकारमध्ये धोरण बदलण्यासाठी, आपल्याला जे काय संघर्षाचे अनुभव आले ते समजून घेऊन त्यानुसार आपण परिवर्तन करण्याचा प्रयत्न करायचा असतो हा अर्थच बऱ्याचजणांच्या अजूनही लक्षात आलेला नाही आणि त्याच्यामुळे झालंय काय, वरवरचे बदल खूप झालेत पण मुळातून समाजाची मानसिकता काही बदललेली दिसत नाही. आता पंचायतराजमध्ये निवडून आलेल्या महिलांना एकतृतीयांश आरक्षण मिळालं. नंतर ५० टक्के आरक्षण मिळालं. अर्थात त्यामधून एक गोष्ट घडली की प्राथमिक स्वरूपाचे बदल घडले. बायका बोलायला लागल्या, पंचायतराजमधली जी प्राथमिक कर्तव्यं असतात– पाणी आहे, स्वच्छता आहे – ह्या गोष्टी त्या सांभाळायला लागल्या. त्यांना गाड्या मिळाल्या. मला आठवतंय की पहिल्या शिबिरामध्ये स्त्रिया जेव्हा म्हणाल्या की त्यांच्या गाड्या घेऊन आल्या त्यावेळी मला खूप बरं वाटलं. पूर्वी काही बायका सांगायच्या की ''पुरुष गाडीत असताना आम्हाला बसायला सांगतात. बसायचं कसं? आम्हाला आमची जाण्या-येण्याची सोय हवी. पण आता मात्र कार्यकमाला जाताना गाडी लागणार आहे म्हणून त्यांना कोणापुढे हात पसरावा लागत नाही..'' पण हे झालं तरी यांच्या मूलभूत प्रश्नांकडे आपण कसं पाणार आहोत? सामान्य स्त्रीचे प्रश्न ह्यातून कसे सोडवणार? पंचायतराजला स्वत:ची एक चौकट आहे. काही प्रश्न विधानसभा सोडवते, काही प्रश्न लोकसभा सोडवते आणि त्यांना आपण फक्त सांगितलं की एवढं तुला रांगोळी काढून दिली. त्यात तू ही रांगोळी काढायचीस. म्हणून आरक्षणाची मागणी बाकी क्षेत्रातली महिलांची वाढत गेली.

अवधानी : पंचायतराजपुरतं किंवा स्थानिक राज्य संस्थापुरतं बोलायचं तर आता त्यात स्त्रियांना आरक्षण मिळून २० वर्षं झाली. आज तिथला म्हणजे दोन्हीकडच्या शहरांमध्ये मुख्यत: महापालिकांमध्ये आणि जिल्हा परिषदांच्या नेटवर्कमध्ये जो बायकांचा परफॉर्मन्स आहे तो कसा आहे?

नीलमताई : एकाच प्रकारचा आहे. पण तरी मला असं वाटतं, तीन भाग करावेत त्याचे. एक भाग असा आहे की अगदी खेडे पातळीवर ज्या बायका आहेत, ग्रामपंचायत स्तरावर त्या सगळ्या या प्रकियेतून गेल्या आहेत. ९४ सालापासून म्हणजे आता २० वर्षे झाली, त्या हिशेबानं दर पाच वर्षांच्या कार्यकालामध्ये पूर्वीच्या आकडेवारीनुसार १ लाख ३२ हजार बायका ग्रामपंचायत सदस्य होत होत्या. म्हणजे आतापर्यंत चार-साडेचार लाख बायकांचा या प्रक्रियेत आहेत.

त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर बायका आता घराबाहेर पडणार आणि ग्रामपंचायतीच्या राज्यामध्ये स्त्रियांचा सहभाग असणार ही गोष्ट आता बऱ्यापैकी सर्वमान्य झालेली आहे. पण तरीही महिला असं सांगतात की जेव्हा प्रश्न मांडायचे असतात तेव्हा आमच्याबरोबर काम करणारे गावातले लोक आम्हाला पुढे करतात. परंतु जेव्हा नियोजनाच्या मीटिंगा होतात किंवा जिथे पैशाचं ठरतं, तिथे मात्र आम्हाला नेत नाहीत. दुसरा भाग असा की ज्यांच्याकडे कौटुंबिक, राजकीय वारसा आहे त्या बायका जशा आल्या तसं त्यांना काम करायची संधी मिळाली. काहींनी काम पण चांगलं केलं, पण त्यांनी फक्त स्वत:च्या मतदारसंघाचा विचार केला. कारण त्यांचा मॅनडेटच आपल्या मतदारसंघात काम करणं हा आहे. त्यामुळे त्याच्यामध्ये कुठेही सुसूत्रता किंवा एखाद्या ठिकाणी झालेला पथदर्शी प्रकल्प सगळ्यांनी स्वीकारला असं झालं नाही. हे मोठ्या प्रमाणामध्ये झालं. तिसरा भाग विशेषतः बचतगटांचा. यात महिलांनी उत्पादन केलेल्या वस्तूंना बाजारपेठा मिळवून देणं किंवा आर्थिक दृष्ट्या त्या पायावर उभ्या राहतील अशा त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध योजना विशेषतः शेतीच्या संदर्भातील योजना त्यांच्यापर्यंत पोचवल्या गेल्या. रोजगार हमी योजनेचं नवीन स्वरूप आलं. या सगळ्या गोष्टींमुळे काही प्रमाणात का होईना पण त्यांचं जगणं सुसह्य झालं. पण जसा काळ जायला लागला ना तसं बायकांच्या मनात वैफल्य निर्माण व्हायला लागलं. म्हणजे मराठवाड्यातच आता बघाल तर बचतगटांची संख्या पन्नास हजारांवरून आता पंच्याहत्तर हजार झाली असेल. पंच्याहत्तर हजार बचतगट हे दारिद्र्यरेषेवरचे आहेत. म्हणजे दारिद्र्यरेषेच्या खाली असणाऱ्या महिला आता या विविध योजनांमुळे दारिद्र्यरेषेच्या वर आल्या. त्याचं कारण बऱ्याच ठिकाणी निकष बदलले. पण आता प्रश्न असा आहे की त्या त्या स्वत:च स्वत:ला किती कर्ज देतील? आणि त्यातून त्या काय साध्य करतील? त्याच्यानंतर त्यांची वयं पाहा. ज्या वेळेला त्यांनी बचतगट तयार केले तेव्हा त्या तिशीला होत्या. त्या महिला आता जवळजवळ पन्नाशीला आलेल्यात. त्यांनी गावामध्ये सगळे प्रयोग करून पाहिले. पण मुळातच गावामधली आर्थिक परिस्थिती जर का फार प्रमाणात बदलली नाही तर त्या काय करणार? एका बाजूला नापिकी होते, तर दुसऱ्या बाजूला अकाली पाऊस होतोय, एका बाजूला बँका बुडतायत, तर दुसऱ्या बाजूला आर्थिक घोटाळे होताहेत. अशा वेळेला महिला बचतगट एकट्या काय करतील? खेड्यातील व शहरातील गरीब स्त्रियांची कोंडी अशा वेळी ठळकपणे जाणवते.

सुरुवातीचा जो मुद्दा होता की बाहेरच्या सामाजिक-राजकीय परिस्थितीचं स्त्रियांच्या प्रश्नामध्ये प्रतिबिंब पडत होतं तसंच आजसुद्धा आरक्षणानंतर होतं आहे. स्त्रियांना ह्या ज्या गोष्टी आहेत त्या समजू लागल्या; परंतु त्याच्यापलिकडे जाऊन त्याची उत्तरं शोधण्यासाठी त्यांना जे नेतृत्व पाहिजे ते त्यांना फारस मिळालं



नाही. जे मिळालं त्याचा त्यांनी आविष्कार लोकल स्तरावर केला. पण तेही मर्यादित प्रश्नांवर काम करत होतं. म्हणजे कुठे पोलिसांच्या विरुद्ध आंदोलनं असतील, तर कधी दारुबंदी हा विषय असेल. या विषयात स्त्रियांच्या भावना विलक्षण तीव्र होत्या. पण त्यात राजकीय दृष्ट्या आमदार आणि खासदार म्हणून असलेल्या महिलांच्या नेतृत्वाचं प्रतिबिंब पडावं अशी उदाहरणं मला कमी दिसतात.

अवधानी : नाही, पण या २० वर्षांत सायमलटेनियसली घडलेली प्रोसेस म्हणजे केंद्रांच्या आणि राज्याच्या वेगवेगळ्या योजनांमधून ग्रामपंचायतीसाठी काहीएक पैसा आला आणि आता तो डायरेक्ट त्यांच्यापर्यंत थेट पोचवावा इथपर्यंत तरतुदी झाल्या आहेत. तर बायका मोठ्या प्रमाणात राजकारणात आल्यामुळे स्पेशली ग्रामपंचायत सदस्य किंवा, सरपंच झाल्यामुळे त्यांनी काय प्रकारचा रोल केला?

नीलमताई : बायकांचा दैनंदिन श्रमामध्ये इतका वेळ जातो की कुठल्याही गावामधल्या १० टक्के बायकांना सुद्धा पंचायतराजचा अर्थ कळून घेण्यायाठी वेळच नाही असं माझं अगदी स्पष्ट आहे. तुम्ही जर का एक संघटित मीटिंग सोडून इतर वेळी कोणत्याही गावामध्ये अचानक गेलात तर तुम्हाला अनुभव येतो. तुम्ही ठरवून गेलात आणि गावातल्या चार हुशार बायकांना बोलावलं तुमच्यासमोर तर त्या अमुक एक गोष्टी बोलतात किंवा शिक्षणाधिकाऱ्यानं बोलवलंय किंवा बँकांनी बोलावलं असं सांगितलं तर मग एखादा गट येतो आणि बोलतो. पण तुम्ही अचानक जर का एखाद्या गावामध्ये गेलात आणि महिलांशी बोलायला लागलात आणि विचारलंत की पंचायतराजबद्दल तुमच्यापर्यंत काय पोचलंय? कोणती योजना पोचलीय? तेव्हा लक्षात येतं की सौरऊर्जा वगैरेसारखी कुठली तरी एखादी तुरळक स्कीम सोडली तर काही त्यांच्यापर्यंत पोचलेलं नसतं. हो, अंगणवाडी ही आणखी एक गोष्ट आहे जी त्यांच्यापर्यंत पोचली आहे. कारण ती त्यांच्या मुलांशी निगडित

आहे. प्राथमिक आरोग्यकेंद्रांची तर अतिशय दुरावस्था आहे. तुम्हाला सांगते, की एखाद्या गावात समजा शंभर बायका असतील तर त्यातल्या पंधरा ते वीस बायकांपर्यंत हा विषय पोचलाय बाकीच्या उरलेल्या ज्या पन्नास ते साठ बायका आहेत त्यांना तर त्यांच्यासाठी कोणते कायदे आहेत, काय सुविधा आहेत हेही माहीत नाही. अगदी कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रश्नावर आपण काही प्रतिकार करू शकतो किंवा त्याच्यात काही पर्याय आहे याची सुद्धा त्यांना माहिती नाही. अपवादात्मक केसेस आहेत पण त्यातही, एखाद्या उदाहरणात भाऊ शहरात असतो, एखाद्या उदाहरणात भाऊ पोलिस असतो. एखाद्या उदाहरणामध्ये कोणाची तरी वहिनी शिक्षिका असते. मग मारहाण झाली, कुरकुर सुरू झाली की यांच्यामार्फत जाऊन त्याच्याविरुद्ध प्रतिकाराची मागणी करतात. आजसुद्धा ज्या कौटुंबिक हिंसाचाराच्या केसेस येताना दिसतात त्यासुद्धा ह्या माध्यमातून आलेल्या केसेस आहेत. आज साधारणपणे महाराष्ट्रातून हजार गावं काढली तर त्या हजार गावांपैकी एकदोनशे गावांमध्ये तरी महिलांनी अत्याचाराच्या प्रश्नावर विरोधात काहीतरी नेटवर्किंग उभारलंय असं एकाही जिल्ह्यामध्ये नाही. तीस-पस्तीस गावांत जे काही छोटे-मोठे प्रयोग आहेत त्यांचं सार्वत्रिकीकरण झालं. बायकांच्या मनात जागृती आली. पण तीही सर्व बायकांच्यात नाही, अजिबात नाही.

अवधानी : ठीक आहे, अत्याचाराच्या बाबतीत नसेल झाली जागृती पण आता पाण्याचा प्रश्न आहे जो मूलभूत बायकांच्या जगण्याशी निगडित आहे त्याचं काय? फार लांबून जाऊन पायपीट करून पाणी आणायला लागतं त्यांना. जोपर्यंत जास्त पुरुष प्रतिनिधी होते, त्यांना त्यांची सेन्सिटीव्हीटी नव्हती. बायका आल्यामुळे त्यांनी किमान प्रायोरिटीनं हे प्रश्न घेणं, म्हणजे मुलांच्या आरोग्याचे असेल किंवा पिण्याच्या पाण्याचा असेल, याच्यावर काही बोललं जात असेल तर ते कितपत होतंय?

नीलमताई : कसं आहे, पाण्याच्या प्रश्नामध्ये जिथे विहिरींचं खोलीकरण असेल तसेच पुनर्भरण असेल किंवा एखाद्या ठिकाणी असलेलं पाणी अडकलेले असेल ते उचलून टाकीत घालणं आहे, असे जे सरधोपट मार्ग आहेत ते महिलांनी केलेत. काही ठिकाणी जिथे शक्य आहे ते पुरुषांनीही केलंय. प्रत्येक पंचायतराजमधले जे काही चांगले लोक आहेत त्यांनी प्रत्येक गावात महिलांची सोय व्हावी म्हणून अगदी वाडीवस्तीवर पाणी आणून दिलंय. पण जिथे पाण्याच्या योजना कराव्या लागतात तिथे टेक्निकल नॉलेजचा प्रश्न येतो, तांत्रिक काम आलं की तिथे निधीचा प्रश्न येतो, मग तिथे गावातल्या लोकवर्गणीचा प्रश्न येतो, कुठल्या जागी तो प्लांट उभारणार हा प्रश्न येतो, त्याचबरोबर कुठल्या तलावातून पाणी घेणार, सिंचनाच्या योजना काय आहेत, असे सगळे प्रश्न आले की त्या पंचायतराजची कक्षा बदलते. मी बीडमधल्या शिरूर-कासार पंचायत समितीला दुष्काळाच्या वेळी भेट दिली होती तर तिथे त्यांनी मला सांगितलं की गावामध्ये पाण्याचा टँकर जातो तेव्हा बायका गावात नसतातच. त्यावेळी गावातल्या बायका शेतामध्ये किंवा गुरांमागे किंवा तांड्यावर कुठे बसलेल्या असतात मग तिथे कुठंतरी स्वत:च पाणी भरून परत हंडे आणतात. त्यामुळे गावात जरी टँकर आला तरी तिचा प्रश्न सुटतो अशातला भाग नाही. काही ठिकाणी पाणीपुरवठा योजनांचे स्पॉटच चुकलेले आहेत. कारण बहुतेक निर्णय आमदार कंत्राटदाराला धरून करतात आणि ते निर्णय जर चुकीचे झाले असतील तर त्याच्यात महिला प्रतिनिधी काहीच करू शकत नाहीत, ती पुरुष प्रतिनिधी एवढी वाकबगार नसते. एखाद-दोघी-तिघी असतात हुशार, ज्या दिल्लीला जाऊन कुठे माहिती घेऊन कोणातरी पुढाऱ्याच्या मदतीनं धडपड करतात. अशा काही महिला आहेत, नाही असं नाही, पण त्यांच्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटला किंवा आरोग्याच्या प्रश्नामध्ये कुपोषण थांबवण्यासाठी महिलांनी एक मोहीम हाती घेतली आहे, आणि त्या पाड्यापाड्यावर जाऊन कुठे जागृती करताहेत असं चित्र फारस दिसत नाही. स्वयंस्फूर्तीनं जे काही असेल ते करतात. परंतु खरा प्रश्न आहे की जो मला विधिमंडळात आमदार झाल्यावर लक्षात आला. नद्यांच्या खोरेनिहाय पाणीवाटपाचा प्रश्न. ही जलनिती राजकारणातील व समाजकारणातील तालुकास्तरावरील पुरुष कार्यकर्त्यांपर्यंतदेखील पोचलेली नाही. त्याचबरोबर सिंचनातील अनेक प्रकल्प रखडल्यामुळे पाणीटंचाईच्या प्रश्नावर स्थानिक पातळीवरील छोटी छोटी उत्तरे अपुरी आहेत. राज्यस्तरावरच याची उत्तरे शोधणे गरजेचे आहे. पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी फक्त महिला प्रतिनिधींना जबाबदार धरणे योग्य होणार नाही.

अवधानी : समजा, ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे आलो, एकतृतीयांश महिला आता सभापती झाल्या आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये आपल्याकडे शंभर गावं अव्हरेज आहेत तर सभापती झाल्यानंतर त्यांना आणखीन पॉवर मिळते का? त्या ज्या मीटिंगज् असतात तिथे बी.डी.ओ.बरोबर वन टू वन बसून तुम्हाला प्लॅन करायचं असतं आणि सभापती हा लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्याचं एक श्रेय आहेच. सगळ्या प्रोसेसमध्ये आणि प्रशासनावर पण एक अकुंश आहे. म्हणजे एखाद्या भागातला जर विस्तार अधिकारी असेल, जो पंचवीस गावांमध्ये विकास योजना पोचवण्यासाठी रिस्पॉनसिबल आहे, तर त्याला सभापतीचं ऐकावं लागतं, तालुकाच्या गावी समजा असे चार विस्तार अधिकारी असतील तर तिथे बायका कितपत प्रयोग करताहेत आणि कशा करताहेत?

नीलमताई : त्याबद्दल मला अतिशय चांगला अनुभव आहे. त्याच्यात मी असं म्हणेन की विस्तार अधिकाऱ्यांची आरक्षणानंतर जी नवीन टीम आली त्यात महिलांची संख्या वाढत चालली आहे. ९५ नंतर पहिल्या बॅचच्या ज्या महिला आल्या त्यांनी त्यावेळी अगदी

प्रतिकूल परिस्थितीत काम केलेलं होतं. त्यामुळे त्यांना त्यांच्या कामाची जाणीव आहे. आणि आज जे तरुण अधिकारी आले तेच मुळी आरक्षण आल्यावर त्यामुळे त्यांची भूमिका खूप चांगली आहे. मी गेल्या पाच वर्षांत बघतेय की पंचायत समितीच्या ज्या सभापती झालेल्या आहेत त्या या अधिकाऱ्यांकडून आता चांगल्या प्रकारे स्वत: माहिती घेतात आणि हे अधिकारी त्यांना गाईड करतात. आता २०१२ ला आमची एक नवीन सदस्य निवडून आली. आम्ही गेलो होतो बारामती भागात. तिथे मला कृषी वाचनालय अशी एक पाटी दिसली. मी विचारलं त्यांना की कृषी वाचनालय म्हणजे काय? पाहिलं तर शंभरेक पुस्तकं त्यांनी जमवून शेतकऱ्यांना वाचायला ठेवली होती. मी तिला म्हटलं की तू जिल्हापरिषद सदस्य आहेस तर महिला शेतकऱ्यांसाठी वाचनालय का सुरू करत नाही? असं जर का झालं तर ती केवढी मोठी मुव्हमेंट होईल आणि त्याचा खूप चांगला परिणाम होईल. तर ती म्हणाली, जिल्हापरिषदेची एक योजना आहे, ताबडतोब मी तसा प्रयत्न करते आणि माझ्या हवेली तालुक्यात दहा ठिकाणी आणि बारामतीत दहा ठिकाणी त्या योजनेमधून मी ते करून दाखवते. मला हेच म्हणायचं आहे की त्यांना आता समजतंय ना की आपल्याला काय करायचंय? आज या पंचायतसमितीबरोबरच, महानगरपालिकांमध्ये छोट्या छोट्या कमिट्यांच्या ज्या सभापती झाल्या त्या महिलांना देखील अधिकाऱ्यांकडून काम कसं करून घ्यायचं हे एक-दोन वर्षांत कळायला लागतं आणि त्यानंतर लोकांची सेवा करण्याची त्यांची भूमिका असते. मग त्यात पुरुष असो, महिला असो वर्ष-दीड वर्ष झालं की जिल्हापरिषदा, पंचायत समित्यांच्या मार्फत लोक प्रयत्न करतात.

काही वेळा भ्रष्टाचार होतो. काही वेळा अडचणी असतात. संघर्ष असतात. हे खरं असलं तरी काही योजना राबवायचा प्रयत्न त्या करतात. शिक्षणाच्या क्षेत्रात आपण पाहिलं तर अतिशय निराशाजनक स्थिती आहे. साधी पटसंख्याच भरली नाही जात जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये. मी पुण्याच्या डीपीडीसीचा अनुभव मी स्वत: पाहिला की ज्यामध्ये २०१३-१४ च्या इंदिरा गांधी आवास योजनेमध्ये ३.५-४ कोटी रुपये वापरलेच गेले नाहीत. कारण लाभार्थीच मिळाले नाहीत. अशा वेळी सगळ्यांनी मिळून काहीतरी मार्ग काढायला पाहिजे होता. पंचायतसमिती सदस्याला किंवा जिल्हापरिषदेच्या अध्यक्षाला सांगूनही कधीकधी मार्ग निघत नाहीत. पण मला अजून असं वाटतं की ह्या योजनांच्या बरोबरीनं आवश्यकता आहे ती एकूण सामाजिक सुरक्षिततेच्या पर्यावरणाचा विचार करायला हवा. आज महिलांना आरक्षण मिळतंय या जागांसाठी तरी ही कामं संघटनांनीच करावी अशी सगळ्यांची अपेक्षा असते. मला हे एक आश्चर्य वाटतं. आरक्षण मिळालेल्या महिला काय म्हणतात, महिला आघाडीने हे करायला पाहिजे. पण त्यांना हे कळत नाही की त्या महिला, महिला आघाडीच्या भाग आहेत. त्याच्याऐवजी त्या असं समजताहेत की दे आर ओन्ली फॉर द चेअर : निवडून आलं की त्यांना असं वाटतं की त्यांची जबाबदारी त्या पदापुरतीच आहे. महिलांमधील जागृती आणि संघटन वाढवण्याशी त्यांचा काही संबंध नाही. मला असं जाणवतं पुरेशा संघटनकौशल्याच्या अभावी या गोष्टी घडतात. तुम्ही खुर्च्यांसाठी आहात आणि महिला आघाडीचं काम दुसरं कोणीतरी करणार असं नाही होत.

अवधानी : जिल्हापरिषद अध्यक्षांची परिस्थिती अशीच आहे का?
नीलमताई : नाही नाही. मी नागपूरच्या जिल्हापरिषद अध्यक्ष पाहिल्या. त्या मुयाध्यापिका होत्या एका शाळेत आणि उत्कृष्ट वक्तृत्व, समजून घेण्याची तयारी. त्यांना मी कार्यक्रम सुचवला की तुम्ही सगळ्या नागपूर जिल्हापरिषदेत ग्रामसभा घ्या आणि त्या ग्रामसभेत निर्भयानंतर जे कायदेबदल झाले- म्हणजे पॉस्को कायदा - हे तुम्ही महिला-पुरुष सगळ्यांना समजावून सांगा. त्यांना आवडली ती कल्पना. दुसरं मी त्यांना सुचवलं की ग्रामपंचायत स्तरावर आणि जिल्हापरिषदेत तुम्ही जेन्डर रिस्पॉनसिव्ह बजेट करायचं झालं तर महिलांच्या गरजा काय आहेत याचा आधी गोषवारा जमा करायला लागा, तर तुम्हाला ते पुढच्या वर्षी बजेटमध्ये घालता येईल. ती कल्पना त्यांना अतिशय आवडली आणि ती त्यांनी स्वीकारली.

मला असं वाटतं की आपण काय म्हणतोय ते त्यांना पटतं, पण ते त्यांच्या चौकटीत कसं बसवायचं हा गाईडन्स बाकीच्यांनी द्यायला पाहिजे तो त्यांना जर का मिळाला- विशेषतः प्रशासनाकडून - मिळाला किंवा महिला खासदार-आमदारांकडून मिळाला, त्यांच्या पक्षाकडून मिळाला तर सगळं होऊ शकेल, पण दुर्दैवाने बऱ्याचशा अध्यक्षा बायका गटबाजीत अडकतात. आणि पक्षानं काय करायचं ते बहुतेक जिल्हापरिषदांत आणि महानगरपालिकांत गटनेते ठरवतात. त्यामुळे या गटनेत्यांना ह्या विषयांमध्ये जर माहिती झाली तर आपोआप त्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल. अशा पद्धतीनं महिला नगरसेविकांनी त्यांच्या वॉर्डात सक्षमीकरण करताना कोणते मुद्दे स्वीकारले तर त्याचा फायदा होऊ शकतो या गोष्टी शिकवण्याचं काम मुंबई महानगरपालिकेत आम्ही अक्षराबरोबर सुरू केलंय. स्त्री आधार केंद्रामार्फतदेखील काही संयुक्त राष्ट्रसंघाच्या महिला विभागाच्या मदतीने याबाबत औरंगाबाद, पुणे, सोलापूर तसेच मुंबई महानगरपालिकेसोबत काम केले. पण त्यासाठी सातत्यानं पाठपुरावा करत राहायला लागतो. चळवळीमध्ये काम करताना तुम्हाला महिलांचा एक गठ्ठा सापडतो म्हणजे दहा हजार आल्यात किंवा दोन हजार महिला आल्यात. पण इथे तुम्हाला प्रत्येकीबरोबर त्या रचनेत काम करत राहावं लागतं. ज्या बायका त्या रचनेत नाहीत त्यांच्यासाठी परत वेगळं काम करावं लागतं. महानगरपालिकांचे विषय वेगळे आहेत सगळे. जिल्हापरिषदांचे

वेगळे विषय आहेत.

अवधानी : खेड्यांमध्ये बकाली आहे, आर्थिक दृष्ट्या कमकुवत परिस्थिती आहे. बऱ्याच शहरांमध्ये मात्र वेगळी परिस्थिती आहे म्हणजे वेगवेगळ्या कारणांमुळे शहरांमध्ये पैसा खूप आला आणि येताना दिसतो. त्याच्यात ज्या नगरसेविका म्हणून काम करतात बायका, महापौर आपण सोडून देऊ कारण ते जरा हुद्याचं पद आहे, त्याला कार्यकारी अधिकार फार कमी आहेत. पण नगरसेविका म्हणून ज्या काम करतात. त्यांचा कामाची प्रगती कशी आहे?
नीलमताई : कशाच्या तुलनेत कामाची प्रगती बघायची म्हणजे पुरुषांच्या तुलनेत बघायची की पूर्वी पाच वर्षांपूर्वी त्यांचा कामाची प्रगती काय होती हे बघायचं? की बँक्स आणि शिक्षणक्षेत्रातल्या महिलांबरोबर त्यांची तुलना करायची? त्यांच्या कामाच्या प्रगतीचा निकष काय हा एक पहिला प्रश्न माझ्या मनात येतो.

अवधानी : मला वाटतं, त्यामध्ये पुरुषांच्या तुलनेत पाहू नये कारण त्यातून निष्पन्न काही होणार नाही. पण समजा एखादा वॉर्ड आहे ज्याचं तुम्ही प्रतिनिधित्व करता तर त्या वॉर्डाच्या ज्या गरजा आहेत आणि त्याच्यामधली प्राथमिक अत्यंत तीव्र आणि निकडीचे जे प्रश्न आहेत तर ते तुम्ही कसे हँडल करता आणि त्याच्यातल्या शॉर्ट टर्म गोष्टी आणि लाँग टर्म गोष्टी प्लॅनिंग करून लोकांचं जगणं सुकर करण्याची जी जबाबदारी तुमच्यावर आहे ती तुम्ही कशी अड्रेस करता, ह्याच्यावर परफॉर्मन्स बघावा.
नीलमताई : येत्या निवडणुकीमध्ये लोक असं म्हणतायत की महागाई, भ्रष्टाचार आणि असुरक्षितता हे प्रश्न अजेंड्यावर आहेत. तर हे तिन्ही प्रश्न म्हणजे वरचे दोन्ही प्रश्न तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वरचेच आहेत पण अजून असुरक्षितता टाळण्यासाठी ज्या काही गोष्टी करायला पाहिजेत त्या गोष्टी नगरसेवकच्या अजेंड्यावर नाहीत. तो सगळा लॉ अ‍ॅन्ड ऑर्डरचा प्रश्न हा व्यवस्थापन आणि पोलिस स्टेशनशी संबंधित आहे. पण त्या भागामधल्या नागरिकांच्या अपेक्षा म्हणजे शाळांच्या वेळेला वाहतुकीच्या समस्या सोडवणं हे बऱ्याचशा नगरसेविका करतात असा माझा अनुभव आहे, आरोग्यविषयक त्यांची जागृती भरपूर आहे. पण बहुतेक नगरसेविकांचं म्हणणं असंच की आम्हाला जेवढं पाहिजे तेवढं सहकार्य महानगरपालिकेतून आणि अधिकाऱ्यांकडून मिळत नाही. ह्याचं कारण असं की शहरांमधील महानगरपालिकांच्या अधिकाऱ्यांचं अधिक राजकारण झालंय असं मला वाटतं. विशेषत: वरच्या स्तरावरचे जे अधिकारी आहेत ते. त्यामुळे आता ज्याच्या हातात सत्ता एकवटलेली आहे त्या मोठ्या बॉसला जुमानायचं आणि बाकीच्या सगळ्यांकडे दुर्लक्ष करायचं अशी त्यांची साधारण मानसिकता वाटतेय. दुसरं पण एक आहे की शहरांमध्ये नगरसेविकांच्या कामाकडे जास्त लक्ष असतं. त्यांना त्यांच्या भागामध्ये नागरिक वगैरे जास्त बोलावतात कारण त्यांना जास्त स्वीकारताय. शिकायची तयारी बऱ्याच जणांची आहे त्यांच्यामध्ये. दुसरं, पूर्वी ज्या अनेक पुरुष नगरसेवकांच्या पत्नी नगरसेविका होत्या आणि आता आरक्षण बदल्यावर ते नगरसेवक झालेत त्यांना महिलांचे प्रश्न तोंडपाठ आहेत असाही एक मजेशीर फरक झालेला आपल्याला दिसून येतोय. पण काही लोक असेही आहेत जे देखावा जास्त करतात. अर्थात तो एकूणच राजकारणाच्या शैलीचा भाग झाला. त्यामुळे आता इव्हेंट फार झालेत. मग कुठले पुरस्कार देणं किंवा मुलांना पुस्तक वाटप करणं असे प्रकार चालतात. ते देणं देणं आहे तोही अपरिहार्य भाग आहेच राजकारणाचा, पण त्याच्यामुळे फार काही जागृती होते असं मला वाटत नाही.

अवधानी : आणखी एक गोष्ट जी ग्रामपंचायतीपासून महापालिकेपर्यंत सर्वांना लागू आहे ती म्हणजे ७४ व्या दुरुस्तीप्रमाणे ज्या वॉर्डाचे तुम्ही प्रतिनिधित्व करता तिथे वारंवार वॉर्डसभा होणं आणि त्याच्यातलं तुमचं म्हणणं तुम्ही महापालिकेमध्ये जाऊन किंवा पंचायत समितीमध्ये जाऊन मांडणं. मला वाटतं त्याचाही तुमच्या धोरणावर एक परिणाम होत असतो. हे काम महिला नगरसेविका किंवा महिला सदस्य किती प्रमाणात करतात?
नीलमताई : तुम्हाला एका गोष्टीची कल्पना नाही. ग्रामसभा जशा होतात तसं महानगरपालिकांच्या वॉर्डसभांचं जे विधेयक होतं ते पूर्ण मंजूर होऊ शकलं नाही. त्याचं कारण असं होतं की बऱ्याचशा लोकांना असं वाटलं, की त्या त्या पक्षांतर्गत जे जे लोक राजकीय विरोधक असतात ते त्या वॉर्डसभांचा ताबा घेऊन तिकडचं सगळं कामच खिळखिळं करून टाकतील. आणि हे असं करणं शहरांमध्ये शक्य आहे आणि म्हणून तो विषय प्रलंबित राहिला. पण खरं सांगायचं तर वॉर्डसभा अशा नियमित होतच नाहीत. म्हणजे मुळात कायद्यानुसार वॉर्डसभा झाल्या नाहीत तरी सर्वसाधारणपणे दर तीन महिन्यांनी वॉर्डसभा घेण्याचा प्रयत्न महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला तर त्याचा उपयोग होईल असं मला वाटतं. जेव्हा ९५-९८ दरम्यान आमचं सरकार होतं तेव्हा एक गावकचेरी म्हणून संकल्पना आणली होती. त्या गावकचेरीमध्ये एका वेळेला सत्तावीस डिपार्टमेंटचे लोक बोलावले जायचे. त्यात जे काही विषय असतील ते सगळे जिथल्या तिथे निपटून निघायचे. मला वाटतं जर का प्रत्येक वॉर्डामध्ये फिरती वॉर्डकचेरी सुरू केली आणि महानगरपालिकांनी नागरिकांच्या बरोबर मोहीम घेतली तर त्याचा सगळ्यांना खूप फायदा होईल पण हे सगळे गुड गव्हनर्सचे भाग आहेत, फक्त महिलांचा भाग नाही.

अवधानी : पण तो काही आपला आताचा फोकस नाही. मला विचारायचंय की ग्रामसभा आता बंधनकारक आहेत, तर त्या किती प्रमाणात होतायत?

नीलमताई : कागदोपत्री होतायत. पण मला वाटतं दहा टक्के ग्रामसभांतसुद्धा चर्चा होताना दिसत नाहीत. आपल्याकडे चर्चा सुरू झाली की त्या चर्चेला चार टार्गेट लोक वादविवादाचं किंवा हास्यविनोदाचं स्वरूप देऊन टाकतात किंवा तो एक समारंभ होतो. फार थोडी गावं असतील जिथे दारूबंदी किंवा साक्षरतेविषयी किंवा कुपोषण थांबवण्याबद्दलचा विचार होतो. जेव्हा एसईझेडला विरोध केला किंवा त्याविरोधात आंदोलनं झाली तेव्हा मात्र ग्रामसभा घेऊन लोक त्याविषयी बोलले. मावळला गोळीबार झाला तेव्हा आम्हालाही माहीत नव्हतं की लोकांनी तिथं ग्रामसभा घेतल्या होत्या. लोक ग्रामसभा घेतात पण त्या आंदोलनांसाठी किंवा संघर्षासाठी, पण इतर जगण्याच्या प्रश्नांसाठी मात्र सहसा घेतल्या जात नाही.

अवधानी : पण ह्या प्रोसेसमध्ये मला वाटतं या ग्रामपंचायतींमध्ये आणि महापालिकेत बायकांना काम करायाला जास्त संधी आहे. ज्यावेळी आपण कार्यक्षमतेबद्दल बोलतो तेव्हा लक्षात येतं की एकूण पुरुष नगरसेवक ग्रामपंचायत सदस्य, जिल्हापरिषदेचे सदस्य ह्यांना लोकांच्या प्रश्नांशी फार घेणं नसतं. तसे ते निवांत असतात. एकदा का ते निवडून आले की सगळं विसरतात असं सर्वसामान्य लोकांना वाटतं. पण आता बायका या क्षेत्रात आल्यावर या कार्यक्षमतेमध्ये काही फरक जाणवतो का? म्हणजे पुरुषांपेक्षा बायका जास्त कार्यक्षम आहेत असं वाटतं का?

नीलमताई : नाही, मला नाही वाटत तसं. मला वाटतं, लोकप्रतिनिधी हे स्वत: किती संवेदनशील असतात आणि महत्त्वाचं म्हणजे लोकांच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी त्यांच्याकडे काय प्रकारच्या कार्यकर्त्यांचा संच असतो त्याच्यावर खूप गोष्टी अवलंबून असतात. शेवटी कामाची शैली, त्या व्यक्तीला काय करायचं आहे त्यावरून ठरते. दुसरा एक मुद्दा आपल्याला त्यात अंतर्भूत करायला पाहिजे, तो म्हणजे या पंचायतराज आरक्षणाबरोबर २०००–२०१८ पर्यंतच्या काळामध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचारविषयक आणि महिलांच्या सुरक्षिततेविषयक गोष्टींचा आलेख नेमका काय होता.

अवधानी : तुम्ही सुरुवातीला १९९५च्या चौथ्या विश्वसंमेलनाबद्दल बोललात त्याविषयी थोडं सांगा.

नीलमताई : महिला सक्षमीकरण म्हणजे नक्की काय? समाजाच्या आणि देशाच्या विविध विभागांमध्ये राजकीय इच्छाशक्ती मजबूत करण्यासाठी नक्की कुठले कार्यकम राबवले गेले पाहिजेत ह्या संदर्भामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर फार मोठं विचारमंथन झालं आणि त्यामधून जागतिक कृतिरूपरेषा तयार करण्यात आली. ज्याला इंग्लिशमध्ये प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन म्हटलं होतं. आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या संकेत स्थळावर ते www.womenwatch.org या नावानंकमिशनलस्टेटस ऑफ वुमन यावरही याचे संदर्भ, आणि त्याविषयीची पुस्तकं उपलब्ध आहेत. ह्या जागतिक कृतिरूपरेषेचं वैशिष्ट्य असं की प्रत्येक ठिकाणी विकास साधण्यासाठी काय अडथळे येतात? तिथे प्रश्न कुठले जाणवतात? आपण व्यूहरचना काय केल्या पाहिजेत म्हणजे रणनीती काय आखली पाहिजे? कार्यक्रम काय आखले पाहिजेत आणि त्यात यश काय मिळवू शकतो याविषयी चार भागांमध्ये विचारमंथन होऊन ही कृतिरेषा तयार झाली. एवढंच नाही तर १९९५ नंतर–२०००–२००५–२०१० आणि आता २०१५ असा दर पाच वर्षांनी जगामध्ये स्त्रियांनी काय प्रगती केलेली आहे याविषयीचा आढावा घेतला जातो. हा आढावा सरकारी स्तरावर होतो. जर हे इतर संस्था, संघटना आणि समाजातल्या इतर घटकांना मान्य नसेल तर ते पर्यायी अहवाल तयार करतात आणि असे पर्यायी अहवाल सुद्धा दक्षिण आशियामध्ये, एशिया–पॅसिफिकमध्ये आणि सगळ्या देशांमध्ये, म्हणजे विशेषतः जिथं लोकशाहीवादी सरकार आहे त्या लोकशाहीवादी सरकारांमध्येच तयार केले जातात.

या सोबतच मिलिनियम डेव्हलपमेंट गोल्स म्हणजे सहस्त्रकाची काय ध्येयं, उद्दिष्टं आहेत आणि आपल्याला त्यातली किती साध्य करायचीत हे ठरवून त्याचा सुद्धा एका बाजूला पाठपुरावा चालू झाला होता. महिला–बालविकास विभागाचे लोक ह्या महिला प्रश्नांवर, महिला विकासावर काम करत होते, तर पंतप्रधान स्तरावरचे जे नेते आहेत ते सहस्रकाच्या दशकाबद्दल सगळा आढावा घेत होते. त्यात पिण्याच्या पाण्याचे प्रश्न, भुकेचा प्रश्न, दारिद्र्याला मिळालेला स्त्रीचा चेहरा म्हणजेच फेमिनाइझेशन ऑफ पॉवर्टी, **गव्हनर्स** आणि स्त्रिया, माध्यम आणि स्त्रिया, स्त्रिया आणि आर्थिक व्यवस्था, बालिकांचे प्रश्न, स्त्रिया आणि कायदा, स्त्रिया आणि शिक्षण असे बारा घटक होते. ह्या साऱ्याची अंमलबजावणी कशी होणार याचा विचार इन्स्टिटच्यूशन्स ऑफ मॅकॅनिझम ह्या अंमलबजावणीच्या यंत्रणा करत होत्या. पण एवढा सगळा अभ्यास होऊन सुद्धा सातत्यानं दक्षिणआशिया असो, महाराष्ट्र असो किंवा भारत असो सगळीकडच्या स्त्रियांचं म्हणणं हे आहे की अंमलबजावणीच्या यंत्रणा कुमकुवत आहेत आणि सरकारमध्येच राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे. हे तसं पाहिलं तर खोटं नाही. कारण आज अत्याचाराचे प्रश्न जास्तीत जास्त समोर येत असले तरी शिक्षा होण्याचं प्रमाण वाढलेलं नाही. पर्यटनामुळे, बँकांमुळे स्त्रियांची संख्या जरी वाढली असली तरी सुरक्षित कामाची ठिकाणं बनवण्यासाठी अजून आपल्याला स्वत:ची कार्यसंस्कृती बदलता आली नाही. संघटित क्षेत्रामधून असघंटित महिलांची संख्या वाढलेली आहे. पण असंघटित महिलांच्या जगण्याचा दर्जा काय असणार आहे? अजूनही अतिशय वाईट पद्धतीचा आहे. त्यात पुन्हा कामाच्या ठिकाणी होणारं स्त्रीचं शारीरिक शोषण म्हणजे लैंगिक शोषण हा तर वेगळा विषय आहे. पण शारीरिक शोषणासारखे

धोके सगळ्या ठिकाणी आहेत. कुठे रासायनिक स्फोट होतात त्याच्यात महिला मृत्युमुखी पडतात किंवा फार मोठ्या प्रमाणात स स्त्री देहाचं कमॉडिफिकेशन होतंय किंवा स्त्री देहच उपभोगाची वस्तू मानून फार मोठ्या प्रमाणात त्याचं व्यापारीकरण सुद्धा झालेलं दिसून येतंय. वूमेन ट्रॅफिकिंगचा प्रश्न आहेच. या पार्श्वभूमीवर प्रश्न असा येतो की राजकारणात स्त्रीचं प्रतिनिधित्व आल्यावर नक्की काय फरक पडेल? स्त्रिया आल्या तर अधिक संवेदनशील पद्धतीने काम करतील किंवा त्यांना या अशा काही प्रश्नांची जाणीव असेल हे जरी गृहीत धरलं तरी मला वाटतं मोटारीचा ड्रायव्हर बदलला तरी या गाडीचं इंजिन तेच, जुन्याच मानसिकतेचं असेल तर उपयोग काय? त्या इंजिनामध्ये जोपर्यंत बदल होत नाही तोपर्यंत ती रचना बदलत नाही आणि ती यंत्रणा आहे तशीच राहणार असेल तर मग प्रश्न तयार होतात. आपण मेनस्ट्रिमिंग ऑफ जेन्डर इश्यूज म्हणजे मध्यवर्ती प्रवाहात स्त्रीप्रश्नाला केंद्रीभूत मानलं पाहिजे असं म्हणतो. पण ते मानण्यासाठी आपण काय करू शकतो, याचाही विचार झाला पाहिजे. त्यासाठी स्त्रियांच्या नजरेतून ह्या सगळ्या व्यवस्थांकडे पाहिलं पाहिजे. स्त्रीच्या गरजा काय आहेत हे ओळखता आलं पाहिजे. ती केवळ माता आहे आणि मुलांचं संगोपन करणारी आहे याच्यापुरती तिची भूमिका मर्यादित न ठेवता अगदी आयुष्याच्या ज्या ज्या टप्प्यांमध्ये तिच्या वेगवेगळ्या गरजा असतील त्या ओळखल्या गेल्या पाहिजेत आणि ह्याचाच एक भाग म्हणून समाजातल्या विविध घटकांच्या सामाजिक न्यायाच्या ज्या गरजा आहेत त्या समजून घेऊन त्यानुसार नियोजन झालं पाहिजे. ह्यासाठी आधी सोशल ऑडिटची एक कल्पना आली. त्याच्यानंतर आउटकम बजेटची एक कल्पना आली जी मिनिमम डेव्हलपमेंट गोल्सच्या संदर्भात होती. त्यानंतर सामाजिक मानवी विकास निर्देशांक सारखा विषय आला. तो विषय आपण हाताळतोय. नैसर्गिक आपत्तीमध्ये तर ह्या विषयांसंदर्भात खूप मोठे हादरे आपल्याला बसलेले दिसून येतात. त्यातलाच एक प्रयोग होता झिरो टॉलरन्स ऑल टाइप्स ऑफ **मॉलेस्ट्र** अगेन्स्ट वुमन्स. हा कार्यक्रम स्त्री आधार केंद्रानं राबवला. यामध्ये पोलिसांचं संवेदनीकरण करणं हा विषय घेतला. एखाद्या व्यक्तीची कार्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीतून त्याची संवेदनशीलता वाढवणं हा कार्यक्रम हाती घेणं महत्त्वाचं आहे. त्यासाठी त्या यंत्रणेत आवश्यक वाटतील तसे बदल घडवणं हाही एक भाग होता.

ज्या केसेसमध्ये स्त्रीची, तिच्या सत्वाची अवहेलना होत असेल त्या केसेमध्ये फॅमिनेन पनिशमेंट रेट वाढवू शकतो का याचाही विचार केला गेला. ह्या खेरीज दुसरा जो विषय आला तो जेंडर रिस्पॉन्सिव्ह बजेट म्हणजे स्त्रीकेंद्री आर्थिक नियोजनाचा. नोकरी न करणाऱ्या महिलांचं कुटुंबातील योगदान यात महत्त्वाचं मानलं गेलं. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्या गरजा लक्षात घेऊन ज्यावेळी महानगरपालिकांचं किंवा जिल्हापरिषदांचं किंवा राज्यस्तरावरचं



किंवा राष्ट्रीय स्तरावरचं बजेट तयार होत होतं तेव्हा प्रथम बजेट करणाऱ्या विभागांचा, स्वत:चा दृष्टिकोन बदलणं गरजेचं होतं हे लक्षात आलं. हा दृष्टिकोन बदलत असताना पाणीपुरवठा विभाग, उद्यानविभाग, दिव्यांसारख्या पायभूत सुविधा पुरवणारे विभाग अशा अनेक विभागांबरोबर काम करणारी स्थायी समिती; जी ह्या महानगरपालिकांची सगळी बजेट ठरवते; त्या स्थायीसमितीने सुद्धा कशाप्रकारे सगळी आखणी केली पाहिजे या मुद्यांवर आम्ही स्त्री आधार केंद्रातर्फे पुणे महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका आणि आता काही प्रमाणात मुंबई महानगरपालिका या ठिकाणी काही प्रयोग केले. हे प्रयेग आम्ही स्त्री आधार केंद्राच्या वतीने केले तरी शिवसेनेची पदाधिकारी असल्यानं, शिवसेनेची आमदार असल्यानं मला हा हस्तक्षेप करणं शक्य झालं, सोपं झालं आणि त्याला इथं काम करणारे जे अधिकारी आहेत, विशेषत: आयएएस अधिकारी त्यांनी बऱ्यापैकी सहकार्य केलं.

अवधानी : हे बदल करताना महिला लोकप्रतिनिधींचा सहभाग कसा होतो?

नीलमताई : मुळामध्ये हे माझं एकटीचं काम नव्हतंच. आम्ही आखणी करत असतानाच त्याच्यात स्थानिक महिला लोकप्रतिनिधींना ही कल्पना समजावली आणि घटकच करताना

मुळी त्याचे तीन घटक पायाभूत धरले. महानगरपालिकेतला अधिकारीवर्ग, समाज किंवा स्त्री आधारकेंद्रासारखे घटक आणि नगरसेविका. अर्थात त्यात पुरुष नगरसेवकांचा पण सहभाग होता. पण महिला नगरसेविकांनी हा विषय पुढे न्यावा जेणेकरून त्यांना त्यांच्या वॉर्डामध्ये बजेट वापरण्याच्या संदर्भात, किंवा सामाजिक निर्देशांक बदलण्याच्या संदर्भात काही काम करता येईल हा हेतू होता. महिला नगरसेवकांनी यात खूप रस दाखवला. पण सरकारी यंत्रणेत खूप खोलवर रुतलेला साचेबद्धपणा आहे. एखाद्या महानगरपालिकेने पुढाकार घेतला तर मंत्रालयातून त्या बजेटला नगरविकास विभाग आणि महिला-बालविकास समितीचं बजेट म्हणजे जेंडर रिस्पॉन्सिव्ह बजेट असं दाखवलं गेलं. खरं तर, असं करून त्यांनी त्यांची संकुचित आणि मर्यादित बुद्धी स्पष्ट केली. इतकी कुंपणं घालून देणं चुकीचं आहे असं मला वाटतं. महिला बालविकास समित्यांना बजेट मिळालं पाहिजे. त्यांचे दृष्टिकोन व्यापक झाले पाहिजेत. पण त्याचबरोबर राज्यस्तरावर आणि देशामध्ये स्त्रीकेंद्री आर्थिक नियोजनाला काही प्रमाणात सुरुवात झाली पाहिजे आणि त्यानुसार योजना बदलल्या गेल्या पाहिजेत. म्हणजे उदाहरणार्थ, एखादी गृहिणी आहे तिला लिहावंसं वाटतंय. तिला व्यक्त करावंसं वाटतंय. तिला स्वत:चं अवकाश पाहिजे आहे आणि अशा वेळेला तिनं जरी का ठरवलं की एखाद्या वाचनालयात जाऊन मला बसायचंय आणि तिथे मला थोडा वेळ बॅडमिंटन खेळायचं आहे किंवा तिथे मला चार महिलांशी बोलायचं आहे. त्यांची सुखदु:खं जाणून घ्यायची आहेत, किंवा गाणं ऐकायचंय आणि नंतर घरी यायचंय. पण त्यांच्यासाठी अशी रिक्रिएशन सेंटर किंवा अशी सांस्कृतिक व्यवस्थाच आपल्या समाजात नाही. ज्याला जशी वाट मिळेल त्यानं तसं शोधत गेलं पाहिजे, पाय फुटतील तिथे पोचलं पाहिजे. पाण्याला जशी वाट मिळेल तसं ते जातं; तसं व्यक्त होता आलं पाहिजे. आम्ही एक कल्पना मांडली. सिनेमा तसंच नाटकांसाठी जशी मिनी थिएटर झालीत तशी मिनी थिएटर जर का प्रत्येक महानगरपालिकांच्या वॉर्डा-वॉर्डात झाली तर लोकांनासुद्धा त्याच्यात स्वत:च्या भावनांचा-विचारांचा आविष्कार करणं शक्य होईल आणि आपल्या सांस्कृतिक ऊर्जेला सर्जनशील वळण मिळेल. क्रिडा मंदिर, बंद ऑडिटोरियम, स्टेडियम अशा गोष्टी ही समाजाची गरज असते असं मला वाटतं. आम्ही एके काळी स्त्रियांसाठी जे काम केलं, त्याविषयी स्त्रियांच्या चळवळीचे विरोधक म्हणतात ही चळवळ अमुक एका गोष्टीतच अडकलीय. खरं तर स्त्रियांनी स्त्रियांच्या पुरतेच प्रश्न बघावेत हीच मुळी एक अतिशय मर्यादित विचारांची चौकट आहे. स्त्रियांनी समाजाचं नेतृत्व करण्यासाठी स्त्री-पुरुष दोघांचा दृष्टिकोन बदलणं गरजेचं आहे. जिथे संघर्ष होईल त्या ठिकाणी, त्यावेळी संघर्ष करणं आणि संघर्ष करून नवीन पर्याय देणं, हेही करायला हवं.

हे सगळं काम करताना विशेषत: हिंसाचाराचा जो प्रश्न आहे त्याच्याकडे पाहत असताना केवळ शिक्षा देणं ह्यापुरती ही गोष्ट मर्यादित ठेवता कामा नये, तर अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी आपण काय कार्यसंस्कृती आणली पाहिजे याचाही विचार करायला हवा..

अवधानी : ज्या महिला विधिमंडळामध्ये आहेत त्यांना हे भान किती आलंय?
नीलमताई : महिलांची संख्याच मुळी कमी आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये त्यांचं १० टक्केसुद्धा प्रमाण आज नाही. दुसरं, ज्या काम करणाऱ्या आहेत त्या खूप रिपिटिटिव्ह झाल्यात म्हणजे जे २००५ मध्ये बोलल्या असतील तेच बोलताहेत. अनेकजणी सांगतात तुझ्या पुस्तकावरून आम्ही उत्तरं लिहून घेतो आणि बोलतो.

अवधानी : नाही, पण असं होतंय का विधिमंडळात? महिला आमदारातील ज्या सामाजिक चळवळीतून आल्यात त्यांची मांडणी वेगळी होते आणि ज्या इतर कोणत्याही कारणामुळे थेट राजकारणात आल्यात त्यांची मांडणी वेगळी होते आहे?
नीलमताई : होतं ना, म्हणजे आम्ही बघतो, ज्या त्यांच्या मतदारसंघातील कामामुळे निवडून आल्यात त्यांचा भर जास्त त्यांच्या मतदारसंघातल्या प्रश्नांवर असतो.

अवधानी : व्यापक प्रश्नांवर येत नाही?
नीलमताई : येतात. पण जेव्हा त्यांची चळवळ होते तेव्हा येतात. स्त्रीभ्रूण हत्यासारख्या प्रश्नावर विधानसभेतसुद्धा फार मोठ्या प्रमाणात महिला आमदारांनी आवाज उठवलाय. पण जोपर्यंत तो प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत नाही तोपर्यंत ते पोचत नाही. आणि पक्षसुद्धा त्या त्या वेळेला महिलांना जबाबदाऱ्या देऊन पुढे करतात.

अवधानी : ह्याचा अर्थ असा, की एकेकाळी महिला चळवळीतून सक्षम कार्यकर्त्या उभ्या राहिल्या आणि त्या राजकारणात आल्यामुळे राजकारणाला एक आकार बायका देऊ शकल्या. आता पुढच्या पिढ्यांमध्ये त्या प्रमाणात महिला कार्यकर्त्या येत नाहीत. त्यामुळे त्या राजकारणात येण्याचाही प्रश्न नाही. एक प्रभाव म्हणतात म्हणून असं होतंय का?
नीलमताईः नाही. उलट आहे. ५०टक्के आरक्षण आल्यामुळे महिला सामाजिक चळवळीत न जाता डायरेक्टच राजकीय पक्षात जायला लागल्यात.

अवधानी : त्याचा परिणाम काय होतोय?
नीलमताई : याचा खूप परिणाम होतोय. आता आरक्षणामुळे असं झालंय की कामाच्या निकषापेक्षा मतदारसंघात काय प्रकारचं

आरक्षण आहे याचा विचार केला जातो. त्या त्या कॅटेगरीनुसार स्त्रियांना तयार व्हावं लागतं. त्यामुळे एखादी बाई ओबीसी आहे आणि मतदारसंघ एससीचा आहे, पण एससी असलेली बाई तेवढी तयार नसते.

अवधानी : आरक्षण आणि सक्षमीकरण जे हातात हात घालून व्हायला पाहिजे ते होत नाही.

नीलमताई : होत नाही आणि त्या जागेवरचं आरक्षण पाच वर्षांनी निघालं की त्या स्त्रीला तिचं स्थान परत उरतंच असं नाही. राजकारणामध्ये तिच्या एकूण राजकीय सहभागाची लोकांना खूप भीती वाटते. आपल्याकडे एक तर स्त्री जास्त बोललेली आवडत नाही समाजाला. जर बोलत असेल तर किती बोलते ही बाई असं तिच्या मागे लोक बोलतात. स्त्रीनं कमी बोलावं. जमलं तर फक्त स्मितहास्य करावं. जास्त विचार वगैरे मांडू नयेत असं लोकांना वाटतं. दुसरं, बाई असून बोलते याचंही त्यांना आश्चर्य वाटत रहातं. म्हणजे मला हे अजून कळलं नाही. बाई असून बोलते म्हणजे? बायकांनी काय बोलता कामा नये की काय?

अवधानी : टीव्हीवर प्रवक्त्यांमध्ये स्त्रिया कमी का दिसतात?

नीलमताई : मला असं वाटतं की त्यांना किमान सर्व प्रश्नांचा आवाका असायला पाहिजे. तेवढा वेळ देता आला पाहिजे. दुसरं म्हणजे, सहज भाषण करायला जाताना भाषणाची तयारी करून जाऊ शकता पण प्रवक्ता म्हणून आयत्या वेळी बोलायला लागतं त्यामुळे तुम्हाला फार मोठ्या प्रमाणात विचार करावा लागतो, चर्चेची तयारी लागते. पण आता मला असं वाटतं, स्त्रियांना छोट्या छोट्या गावापुरतं किंवा जिल्ह्यापुरतं प्रवक्तेपद दिलं तर त्याही बोलताना दिसतील. नाही असं नाही आणि महिला चांगलं बोलतात. अनेक वेळेला मुद्द्याला धरून बोलतात असं मी पाहिलेलं आहे. हे चित्र राष्ट्रीय पातळीवरही दिसतं. प्रत्येक पक्षाच्या काही महिला प्रवक्त्या आहेत. महिला प्रवक्त्यांची संख्या राष्ट्रीय स्तरावर, राज्यामध्ये फार कमी दिसली तरीसुद्धा बाहेर राष्ट्रीय पातळीवर स्त्रिया सक्रियपणे बोलतायत.

अवधानी : विधिमंडळातला परफॉर्मन्स कसा आहे?

नीलमताई : विधिमंडळातल्या परफॉर्मन्समध्ये पुरुष पदाधिकारी, पुरुष आमदार आणि त्यातले जे गटनेते आहेत त्यांचा सातत्याने प्रयत्न असतो की सगळे विषय आपण चर्चेला घ्यावेत. अगदी महिलांचेही विषय कुठलाही दुजाभाव मनात न ठेवता ते घेतात. त्यात महिला धोरण असेल, आंगणवाडी शिक्षिकांचा प्रश्न असेल हे प्रश्न ते घेतात. मी सभागृहात जेव्हा नव्हते त्यावेळी विधानसभेमध्ये अमरावती जिल्ह्यातील बर्डी म्हणून एका आदिवासी भागात एक मुलगी शिक्षकापासून गर्भवती राहिली होती त्याच्यावर खूप मोठा गहजब झाला होता. आणि त्यानंतर एक तदर्थ समिती म्हणून असते. म्हणजे एखाद्या महत्त्वाच्या विषयापुरती कमिटी होते. त्या कमिटीत त्यांनी निर्णय घेतला की दोन्ही सभागृहातल्या महिला सदस्य घ्या आणि परिस्थिती पाहा. मग आम्ही सगळ्यांनी मिळून खूप आश्रमशाळांना भेटी देऊन तिथली परिस्थिती मांडली आणि त्याच्यानुसार सूचना केल्या. खरं तर राज्य महिला आयोगापेक्षाही ह्या समित्यांना जास्त अधिकार आहेत. पण काही वेळेला विधानसभेच्या जबाबदाऱ्या, त्याच्यानंतर प्रत्यक्षात आपण काय काम करायचं ह्याच्याबद्दलची अस्पष्टता आणि पक्षीय जबाबदाऱ्या याच्यामुळे विधिमंडळामध्ये अनेक वेळेला बाहेर काय घडतंय ह्यानुसार आतमध्ये करावं लागतं. पण मला असं सांगायला पाहिजे की गेल्या १२ वर्षांच्या काळामध्ये उसतोड कामगारांचे प्रश्न असतील, कौटुंबिक न्यायालयं असतील किंवा कोठेवाडीची केस, परभणीची केस याच्यासाठी मी काम केलंय. खरं तर विधिमंडळात इतकी चिमुकली ताकद आहे आमची. विधानपरिषेदत आम्ही ६-७ आमदार आहोत. पण शिवसेनेच्या सगळ्या ७८ आमदारांमध्ये जेव्हा मी हे प्रश्न मांडते त्यावेळेला सभापती किंवा अनेक आमदार त्याला महत्त्व देतात. संपूर्ण सभागृह सन्मान करतं. त्या विषयामध्ये काही वेळेला राजकीय मतभेद असतील तर आरडाओरडा होतो. नाही असं नाही. परंतु आपण हे विषय गांभीर्यानं घेतले पाहिजेत हे आता हळुहळू मोठ्या प्रमाणात कळायला लागलं आहे. मला तर तिसऱ्यांदा ही संधी मिळाली आहे. विधानसभेमध्ये त्या मानानं राजकीय संघर्ष जास्त असतो आणि त्या संघर्षामध्ये थोडीशी असहिष्णूताही दिसते. पण विधानसभेमध्येसुद्धा निर्णायक अशा गोष्टी घडतात. कोणत्याही निर्णयाची घोषणा सरकारला विधानसभेत करणं आवडतं. कारण तिथे या लोकांपर्यंत पोचण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ह्या डायरेक्ट हस्तक्षेपाबरोबरच जिथे मोठे लढे झाले. गिरणीकामगारांचे किंवा इतर कामगारांचे किंवा शेतकरी आत्महत्येसारखे प्रश्न असतील याच्यामध्येही मी स्त्रियांचा दृष्टिकोन घालण्याचा प्रयत्न केला आणि माझ्या या कामाची सरकारकडून आणि विधिमंडळाकडून दखल घेतली गेली. अंमलबजावणी नाही झाली ही गोष्ट वेगळी, पण दखल घेतली गेली आणि या बोलतात त्यात काही तथ्य आहे हे सगळ्या सुजाण लोकांनी मान्य केलं. अधिकाऱ्यांनीही सांगितलं की हे असं काम केलं पाहिजे. पण माझी अशी अपेक्षा होती की सरकारनं ह्याच्याबद्दलचा खास एखादा जेंडर इश्यूचा पेपर घेऊन ते काम करायला पाहिजे. अंतर्गतरीत्या ते काम त्यांनी केलं नाही. खरं त्यांच्याकडे महिला अधिकारी आहेत, इतरांची मदत होऊ शकली असती. प्रत्येक ठिकाणी काय राजकीय श्रेयाचा प्रश्न नसतो, पण सरकार ते करताना थोडं हातचं राखूनच करत असावं असं मला वाटतं.

अवधानी : शेवटचे दोन प्रश्न. एक म्हणजे प्रत्यक्ष राजकारणात जाण्यासाठी, कोणत्याही पक्षात जाण्यासाठी महिला चळवळीनं या

पुढच्या काळामध्ये महिलांना प्रोत्साहित करायला पाहिजे का? एकूण राजकारणातला जो स्त्रियांचा सहभाग आहे तो अजून प्रभावशाली करण्यासाठी याची गरज आहे का?

नीलमताई : मला असं वाटतं, राजकारण म्हटलं ना तर राजकारणातल्या लोकांनीच राजकारणातल्या महिलांना प्रोत्साहित केलं पाहिजे. कारण राजकारणात जे नाहीत त्यांना, म्हणजे ज्यांना राजकारणाचं स्वरूपच माहीत नाही त्यांनी प्रोत्साहित करून सुद्धा त्यातले खाचखळगे त्यांना माहीत नसले किंवा ते नक्की मदत कसं करणार हे जर का स्पष्ट नसेल तर मग त्या माणसांनी राजकारणात येणाऱ्याला प्रोत्साहित करून काही उपयोग होत नाही. उलट ती व्यक्ती खूप वेगळ्या इच्छा-अपेक्षा घेऊन जाते आणि निराश होते. पण मला एक वाटतं, परदेशात राजकीय पक्षांच्या महिला आघाड्या, इतर व्यासपीठं, महिला संघटना, ट्रेड युनियन्स ह्या चारही गोष्टींचं, जसा पुरुषांचा पॉलिटिकल क्लब असतो तसं एकत्र व्यासपीठ असतं आणि या सगळ्यांचं एकमेकांशी बोलणं असतं, भेटणं असतं.. जसं पुरुष सीसीआयला भेटतील, ताजला भेटतील तसं महिलांचं एक अनौपचारिक गप्पा मारण्यायाठी कॉफी सेंटरसारखं काहीतरी आपल्याकडेही असावं. तिथे फॉर्मल बैठका न घेता सहजगत्या विचारांचं आदानप्रदान होईल, अनौपचारिकरीत्या बोललं जाईल अशी योजना असावी. अशी छोटी केंद्रं झाली तर त्यातून आपोआपच एकत्र काम करण्याची इच्छा मजबूत होईल. काही छोट्यामोठ्या संघटना ट्रॅडिशनल पक्ष आम्हाला नकोत असं म्हणतात. मला वाटतं ही स्वत:ची आत्मवंचनाच आहे. कारण पुढच्या काळात राजकीय पक्ष हे राहणारच आहेत. म्हणजे 'आप'सारख्या पक्षालासुद्धा राजकीय पक्षाचं स्वरूप द्यावं लागलंच. शेतकरी संघटना, दलित चळवळ, कामगार चळवळ यात सातत्यानं हे चित्र पाहिलेलं आहे. त्यामुळे राजकीय पक्षापासूनच आपलं बाजूला राहणं हे जरी वरकरणी खूप शुद्धतेची म्हणजे सफेद कपडे घातल्याची भावना देणारं असलं तरी सुद्धा त्यातून फार मोठ्या प्रमाणात प्रभावहीनता तयार होते. बरं वैचारिक वाङ्मय लिहून त्यातून लोक प्रभावीतसुद्धा होऊ शकतात. पण तसं वैचारिक वाङ्मय हातून घडण्यासाठी जी काही सर्जनशीलता आणि परिस्थिती पाहिजे ती जर का नसेल तर काय उपयोग? मग अशा वेळेला अगदी कोणी कलात्मक विचार करणारा म्हणू शकतो की मी माझी एनर्जी का दवडू अशा लोकांशी बोलून? मला वाटतं, साहित्यिक सोडले तर बाकी लोक त्यातल्या त्यात समाजाभिमुख आहेत. त्यांनी जर का चर्चा केल्या तर त्याचा निश्चित उपयोग होईल आणि म्हणून साहित्यविषयक व्यासपीठांवर या मुद्याची चर्चा व्हायला हवी. पण मला दुसरं असं वाटतं की राजकारणातल्या महिलांना अजेंडा द्यायचा प्रयत्न साहित्यिकांनी करू नये.

अवधानी : महिलांनी या पुढच्या काळात राजकारणाला अस्पृश्य मानू नये असं तुम्हाला वाटतं का?

नीलमताई : अर्थात. मला तर असं वाटतं की लोकांनी म्हणजे महिलांनीही प्रथम स्वत: मतदान करावं. दुसरं म्हणजे, सगळ्या गोष्टींबद्दल नकारात्मक भावना ठेवण्यापेक्षा प्रत्येक क्षेत्रामधले काही नियम असतात आणि प्रत्येक क्षेत्रात अमुक एका पद्धतीची शैली असते हे लक्षात घ्यावं. नाहीतर मग राजकारणातल्या पुरुषांवर आणि महिलांवर एकसारखं टीका करणं चालू राहतं. जे चुकीचं आहे त्यावर टीका केलीच पाहिजे. आम्ही व्यासपीठावर हेच सांगतो की तुमच्याकडे लोक काय नजरेतून बघताहेत हे तुम्ही चष्मा काढून बघा मग तुम्हाला केवळ समाजाचा राग येणार नाही. तुमच्या आसपास लोक काय बोलतात हे बघा. पण राजकारण म्हणजे काय ह्याची व्याख्या व्यापक ठेवली पाहिजे. राजकारण करणं म्हणजे तुम्ही बैठक घेऊन अभ्यासवर्ग घेणं गरजेचं नाही. त्यामधून सुद्धा तुम्ही लोकांचे प्रश्न मांडत असता. चळवळीतल्या लोकांनी लिहिलेली पुस्तकं ही साहित्यात नावाजली जातात आणि म्हणून साहित्य आणि राजकारण हे वेगळं आहे हेच मला मान्य नाही. अर्थात त्याचा अर्थ सगळ्यांनीच स्वत:चा आविर्भाव घेऊन येऊ नये. साहित्य संमेलनात उद्धवजी ठाकरे म्हणाले होते की साहित्य संमेलनाच्या ऐवजी अधिवेशनच घ्यायचे. सगळेच राजकीय पक्ष बोलवायचे. सगळेच आमदार बोलवायचे. असं करता येणार नाही. दोन्ही व्यासपीठांची एक वेगळी मर्यादा आहे. दोन्ही व्यासपीठांची एक गरिमा आहे. जे राजकीय पक्षांचं राजकारण आहे त्यात भ्रष्टाचार आहे. एकमेकांशी सत्तास्पर्धा आहे असं तुम्ही म्हणता तेव्हा दुर्दैवानं कधीतरी साहित्यक्षेत्रात सुद्धा ते दिसतंच ना. राजकारणात आम्ही ज्याला समान मुद्दे असं म्हणतो तसं साहित्यक्षेत्रात सुद्धा जाणत्या वाचकांनी आणि लेखकांनी किमान मुद्दे ठरवले असणारच. त्याच्याबद्दल जे लोक काही भूमिका मांडत असतील त्यांना प्रोत्साहित केलं तर जास्त अनुभवसंपन्न असं साहित्य तयार होईल आणि मग लोकांना सुद्धा त्याच्यामध्ये जास्त रस वाटेल असं मला वाटतं. याच्यात आता युनिक फिचर्सनं जे प्रयोग केलेत ते चांगले आहेत. मला असं वाटतं की एकमेकांशी कसं वागायचं हे ठरवून एकमेकांकडे संवेदनशीलतेनं आणि तरलतेनं पाहिलं आणि साहित्यात थोडासा प्रवाहीपणा आला तर साहित्याचा सुद्धा जास्त परिणाम झालेला आपल्याला दिसेल.

**– आनंद अवधानी**
anand.awadhani@uniquefeatures.in




# मराठी तरुणाचा वैश्विक चित्रपट

**।। दिनकर गांगल**

शेखर आणि मृणाल साठे यांचा मुलगा, श्रीहरी बारावीनंतर अमेरिकेत अर्थशास्त्र शिकण्यास गेला आणि चित्रपटनिर्मितीचे तंत्र शिकून आला हा आम्हा, शेखरच्या मित्रमंडळीत कुतूहलाचा विषय बनला. पण वास्तवात, श्रीहरी परत आलाच नव्हता. तो भारतभेटीस आला होता; तेवढ्यात त्याने अमेरिकेत निर्माण केलेले दोन-तीन लघुपट आम्हाला दाखवले. काही महिने येथे थांबून तो परत गेला.

आणखी वर्षभरातच, त्याने निर्माण केलेला 'परव्हर्टिगो' नावाचा इंग्रजी चित्रपट मुंबईच्या 'मामी' महोत्सवात पाहण्यास मिळाला. त्यातील आश्चर्याचा व रहस्याचा धक्का कोणत्याही पाश्चिमात्य चित्रपटाच्या तोडीस तोड होता; तसेच, त्याची तांत्रिक बाजूदेखील. तो चित्रपट आणखी दोन पाश्चिमात्य महोत्सवांत आधी दाखवला गेला होताच. ती श्रीहरीच्या निर्मितीमूल्यांवरील मोहोर होती.

नंतर ध्यानात असे येत गेले, की आमचा शेखरच त्याच्या मुलाच्या नादाला लागला आहे आणि त्याची स्वतःची, अर्थशास्त्र विषयातील तज्ज्ञता जरा बाजूला ठेवून तो चित्रपटांच्या क्षेत्रात लुडबूड करू लागला आहे. त्यातही शेखरच्या बुद्धीची अभिनवता होती. तो 'स्क्रिप्ट बँक' बनवण्याच्या गोष्टी बोलू लागला, चित्रपट व्यवसायातील अनिश्चिततेचा वेध घेऊ लागला आणि बघता बघता, श्रीहरीच्या नवनव्या चित्रपटांचा भाग बनून गेला. श्रीहरीचा तीन इंग्रजी चित्रपटांच्या आंतरराष्ट्रीय निर्मितीनंतर पहिला मराठी सिनेमा 'एक हजाराची नोट' मे महिन्यात प्रदर्शित होत आहे. त्यात शेखरने चक्क काही सेकंदांची भूमिकाही केली आहे! चित्रपट प्रदर्शनासंबंधात इतर अनेक जबाबदाऱ्या त्याच्याकडे आहेतच.

पण या काळात त्याच्या तोंडून व श्रीहरीच्या प्रत्यक्ष एकदोन भेटींतून श्रीहरीचे जे दर्शन झाले ते अपूर्व आहे. तरूण पिढी प्रगल्भ होत आहे असे ज्येष्ठतेच्या आविर्भावात म्हणणे आणि त्या प्रगल्भतेचा प्रत्यय घेणे... माझे श्रीहरीच्या बाबतीत तेच घडले. 'एक हजाराची नोट' कशी आहे? ती २००५च्या आधीची आहे की नंतरची ते मला अजून पाहायचे आहे. परंतु त्यानिमित्ताने श्रीहरीशी गप्पा मारताना, श्रीहरी ज्या पद्धतीने व थेटपणे विचार

करतो ते पाहून मी अचंबित झालो. आणि त्याला अजून वयाची तिशी ओलांडायची आहे!

तो भारतीय नाही, मराठी नाही, अमेरिकनदेखील नाही. तो खराखुरा आंतरराष्ट्रीय आहे. चित्रपटाची भाषा जागतिक असते असे म्हणतात, पण श्रीहरीची स्वतःची भाषाच जागतिक आहे. तसा पेहेराव तर आपण सारे करतो, परंतु श्रीहरी तसा वागतो, बोलतो, विचार करतो. त्याचा प्रत्यय 'हजाराच्या नोटे'च्या निर्मिती चमूला वारंवार येई. शूटिंग चालू होते. विदर्भात परंतु श्रीहरीचे संदर्भ होते वैश्विक. श्रीहरी म्हणतो, की मी कोणत्या भाषेत चित्रपट बनवत आहे हे बिनमहत्त्वाचे असते. ती बोलण्याची भाषा जेथे चित्रपट बनतो त्या प्रदेशाची असते हे खरे, पण माझ्या दृष्टीने माझ्या चित्रपटाची दृश्यभाषा जागतिक असते. मी जसा मराठी प्रदेशांत– वऱ्हाडात हा चित्रपट बनवला तसे आफ्रिकेत आणि अरब देशात आणखी दोन चित्रपट बनवण्याचा बेत आखला आहे.

त्याचा आधीचा चित्रपट युरोपातील बोस्नियातील होता आणि एक कॅनडात नियोजित आहे. त्याने त्याच्या निर्मिती चालू असलेल्या आणखी एका चित्रपटाची अशी 'जागतिक' गंमत सांगितली. तो म्हणाला, की तो चित्रपट आहे अरुणोदय. भाषा मराठी. मी सहनिर्माता आहे. दिग्दर्शक आहे पार्थो सेनगुप्ता – बंगाली. कलाकार आहेत आदिल हुसेन आणि तन्निष्ठा चटर्जी. पोस्ट प्रॉडक्शनचे काम चालू आहे फ्रान्समध्ये. आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञ घेऊन.

श्रीहरीने जगभरच्या चित्रपटनिर्मिती क्षेत्रातील आजच्या व्यवहाराचे मर्म सांगितले ते असे; तो म्हणाला, की इंडिपेंडंट फिल्म मेकर्सचा जमाना आहे हा. एक निर्मिती संस्था, ठरलेले दिग्दर्शक व तारेतारका अशा, निर्मितीची ऊर्जा जखडबंद करणाऱ्या पद्धती नष्ट होत आहेत. चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात खुले वारे वाहत आहेत. व्यक्ती तिला हवा तसा, हवा त्या दर्जाचा, पूर्ण लांबीचा, लघु लांबीचा चित्रपट घडवत असते. व्यक्तीला तशा संधी अक्षरशः जगभर खुल्या झाल्या आहेत. श्रीहरी या परिस्थितीचे वर्णन 'रेनेसान्स'असे करतो. त्याचे म्हणणेच असे आहे, की व्यक्तीचे सर्जन चित्रपट माध्यमातून वेगवेगळ्या पातळींवर अत्यंत सक्षमपणे जगभर प्रकट होत आहे. भूतान, अफगाणिस्तान असे छोटे देश, इराणसारखा जुलमी राजवटीखालील देश उत्तम निर्मिती करत आहेत. सर्व लहानमोठ्या देशांतील व्यक्तींना जागतिकीकरणामुळे, तंत्रज्ञानाच्या सुलभतेमुळे संधी उपलब्ध होत आहेत. श्रीहरीने त्याच परिस्थितीचा फायदा घेत गेल्या चार वर्षांत चित्रपटनिर्मिती क्षेत्रात उज्ज्वल यश संपादन केले आहे.

श्रीहरी त्याच्या बाबासारखाच तल्लख बुद्धीचा तरुण आहे. तो दहावीतील उत्तम यशानंतर सेंट झेवियर कॉलेजमध्ये 'सायन्स'कडे न जाता आर्ट्स शाखेकडे गेला, ते त्याच्या डोक्यात असे अनेक उद्योग होते, म्हणून. त्याने तेथे 'मल्हार' महोत्सवामध्ये कलाकुसरीच्या काही गोष्टी साधल्याच, परंतु तेथे त्याने फिल्म ॲप्रिसिएशनचा कोर्स केला. त्यामुळे त्याच्या चित्रपटांकडे पाहण्याच्या दृष्टीत बदल घडून आला. त्याने अर्थशास्त्र शिकता शिकता चित्रपटाचे तंत्र जाणून घ्यायचे अशा कल्पनेने अमेरिकेत मिशिगन विद्यापीठात प्रवेश घेतला. तो शेखरप्रमाणे अर्थक्षेत्रात काही भरीव कामगिरी करणार असा आमचा, रुढीला धरून कयास; पण वर्षभरात अचानक कळले, की श्रीहरीने अर्थशास्त्रातील शिक्षण सोडून चित्रपटनिर्मिती संबंधातील अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे! गमंत म्हणजे शेखर व मृणाल उत्साहाने, हसतखेळत आम्हाला ती हकिगत सांगत होते. आमचा समज असा, की चित्रपट ही श्रीहरीची हौस आहे






आणि अर्थक्षेत्रातील कामगिरी ही करिअर. पण श्रीहरीला अर्थशास्त्र शिकत असताना जाणवले, की त्याचे गणित चुकत आहे. ते त्याचे त्याला जाणवले व त्याने अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय केला. त्याने 'फिल्म अँड व्हिडिओ स्टडीज' आणि 'ग्लोबल व मिडिया कल्चर' दोन मुख्य विषय घेऊन चित्रपटनिर्मितीचा अभ्यास सुरू केला व त्यात प्रावीण्य मिळवले. त्याला अभ्यासासाठी हॉलिवूड फॉरेन प्रेस असोसिएशन, प्रोड्युसर्स गिल्ड ऑफ अमेरिका व अन्य संस्था यांच्या पाठ्यवृत्ती मिळाल्या. त्याच्या 'ब्रेकिंग द चेन' या लघुपटाला कोलंबिया विद्यापीठ चित्रपट महोत्सवात पुरस्कार मिळाला. त्याने जी पदवी प्राप्त केली तिचे नाव आहे एमएफए (मास्टर ऑफ फाइन आर्ट्स).

'इट फेल्ट लाइक लव्ह' या त्याने निर्माण केलेल्या चित्रपटाने त्याचा नावलौकिक वाढला. तो चित्रपट सनडान्स व रॉटरडॅम आंतरराष्ट्रीय महोत्सवांत प्रदर्शित झाला. समीक्षकांनी त्याबद्दल भरभरून लिहिले. तो या महिन्यातच अमेरिकेत प्रदर्शित होत आहे.

तो विद्यापीठात विद्यार्थीप्रिय होता. त्याने तेथे 'फिल्म अँड व्हिडिओ स्टुडंट्स असोसिएशन' स्थापन केली, त्याचे अल्पावधीत बाराशे सभासद झाले. ती बारा वर्षांपूर्वीची संस्था विद्यापीठात अजून चालू आहे असे सांगताना श्रीहरीच्या उच्चारात अभिमान जाणवतो व तो रास्तच आहे. त्याने विद्यार्थी म्हणून मिळवलेल्या पारितोषिकांची मालिका पुढे स्वतंत्र निर्मिती सुरू केल्यावर 'इट फेल्ट लाइक लव्ह' व 'परव्हर्टिगो' या चित्रपटांच्या निमित्ताने चालूच राहिली आहे. कान महोत्सवाला जाण्यासाठी जगभरचे पन्नास विद्यार्थी निवडले गेले, त्यात श्रीहरीचा समावेश होता.

स्वतंत्र चित्रपट निर्माता म्हणून श्रीहरी काही पक्क्या धारणांवर उभा आहे. भारतात चित्रपटनिर्माता म्हणजे चित्रपटनिर्मितीसाठी पैसा पुरवणारा माणूस वा संस्था असा समज असतो. वास्तवात श्रीहरी म्हणतो, की चित्रपटकृतीची सर्जनशील रीतीने केलेली घडण ही निर्मात्याची जबाबदारी असते. निर्माता कथेला चित्रपटाचे माध्यम उपलब्ध करून देतो. त्यामध्ये नुसती निर्मिती नाही तर निर्मितीचे नियोजन महत्त्वाचे असते व ते अगदी 'मार्केटिंग'पर्यंत सांभाळले जावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे निर्मात्याला चरितार्थ चालवायचा तर एक चित्रपट धरून लेवून चालत नाही. त्याला अनेक चित्रपटांच्या योजनांवर काम एकाच वेळी करत राहावे लागते. श्रीहरी म्हणाला, की त्याचा मराठी चित्रपट 'एक हजाराची नोट' महाराष्ट्रात प्रदर्शनाच्या टप्प्यावर आला असला आणि त्याच सुमारास त्याचा दुसरा चित्रपट अमेरिकेत प्रदर्शित होत असला तरी त्याच्यासमोर आणखी पाच कृती वेगवेगळ्या अवस्थांत आहेत. श्रीहरीचे चित्रपटनिर्मितीचे प्रमाण वर्षाला दीड असे पडते.

त्याखेरीज लघुपटांचे मोठे मार्केट सध्या जगभर खुले झाले आहे. तेथे स्पर्धाही जबरदस्त आहे, पण कलादृष्ट्या ते आव्हान मोठे असते असे श्रीहरी म्हणाला.

चित्रपटमाध्यम गेल्या शतकभरात विकसित झाले. स्वाभाविकच त्यातील ऐतिहासिक टप्पे फार महत्त्वाचे ठरतात. ते जवळून पाहिलेले लोक अजून हयात आहेत. चित्रपटांचे अभ्यासक डोळे विस्फारून चित्रपटतंत्राचा विकास घडवणाऱ्या दिग्दर्शक व्यक्तींची नावे उच्चारत असतात. अभ्यासक त्या चित्रपटकृतींना अभिजाततेचा दर्जा देतात. श्रीहरीसारख्या तरुण चित्रपटप्रेमीजवळ हा विषय काढला तर तो पटकन उद्गारला, कधी नव्हते एवढे

उत्तम सिनेमे सध्या बनत आहेत. त्यातून ती दिग्दर्शक मंडळी नवनवे फॉर्म शोधत आहेत. अगदी भारतातसुद्धा तशी नावे सांगता येतील. त्यांचे काम जुन्या नाणावलेल्या व चित्रपटइतिहासाच्या पुस्तकात जाऊन बसलेल्या दिग्दर्शक-निर्मात्यांएवढेच मोठे आहे.

'एक हजाराची नोट' हा त्याचा मराठी चित्रपट त्याने स्वतः दिग्दर्शित केला आहे. तो जरी अभ्यासक्रमाचा भाग म्हणून दिग्दर्शनकौशल्य शिकला असला तरी तो ते प्रथमच या चित्रपटासाठी चाचपून पाहत आहे. तो निर्मात्याचे कौशल्य वेगळे व दिग्दर्शकाची जबाबदारी वेगळी हा अनुभव घेत आहे. चित्रपटासाठी त्याने वऱ्हाडी ढंगाची कथा निवडली आहे. विदर्भाच्या फुलुम्ब्री नावाच्या एका खेड्यात एकाकी जीवन जगणाऱ्या गरीब विधवा स्त्रीची ती कथा आहे. तिच्या हाती एक हजार रुपयांची नोट लागते. तो हंगाम निवडणुकांचा आहे. त्यामुळे नोटेला अधिकच मोल प्राप्त होते. तो म्हणतो, की कथा प्रादेशिक असली तरी त्यातील भावभावना वैश्विक आहेत आणि मुळात 'एक हजाराची नोट' – ती तर सार्वत्रिक आहे. कथा-पटकथा-गाणी सारे काही श्रीकांत बोजेवारचे आहे. कथा सामाजिक स्वरूपाची आहे. त्यात हळुवारसा विनोद आहे. बोजेवारने कथा सांगताच ती श्रीहरीला भिडली, मग अर्थातच उभयतांच्या सल्लामसलतीने पटकथा उभी राहिली.

चित्रपटात उषा नाईक व संदीप पाठक यांच्या प्रमुख भूमिका आहेत. उषा नाईक ही एके काळची तमाशापटांची लोकप्रिय नायिका. 'हजाराच्या नोटे'तील प्रौढच्या भूमिकेसाठी ती योग्य वाटली व श्रीहरीने तिला गाठले. उषा नाईक बऱ्याच काळानंतर पडद्यावर दिसणार आहेत. श्रीहरी म्हणतो, त्याप्रमाणे




छायाचित्रणापासून काही तांत्रिक बाजू सांभाळणारे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातून आलेले आहेत. श्रीहरीने काही तांत्रिक प्रक्रियादेखील परदेशांतून करून आणल्या आहेत. श्रीहरीचा जन्म मुंबईतील, तो बोलतो मराठी, पण त्याची झेप जगाला गवसणी घालणारी आहे. आम्ही 'ग्रंथाली'तील लोक चाळीस वर्षांपूर्वी मुंबईतून निघून महाराष्ट्रातील खेडोपाडी पुस्तके नेण्याचे स्वप्न बघत होतो. ते माध्यम त्यावेळी प्रभावी होते. त्यात शेखरचा वाटा मोठा होता. त्याचा मुलगा श्रीहरी, देशोदेशी चित्रपट बनवून साऱ्या दुनियेत प्रदर्शित करण्याचे स्वप्न पाहत आहे....त्यास शुभेच्छा!

**– दिनकर गांगल**
ए/३, अजिंक्यतारा सोसायटी, स्वस्तिक पार्क,
चेंबूर, मुंबई-४०००७१
**dinkargangal39@gmail.com**



दिवस ढकलत जगण्यापेक्षा

# दिवस समजून जगा...




सर्व धार्मिक व पुस्तक दुकानात उपलब्ध

## मराठी महिन्यांनुसार असलेली एकमेव दिनदर्शिका

**कोणत्याही पुस्तकासाठी संपर्क 'साधा'**

प्रमुख विक्रेते : रसिक साहित्य प्रा.लि. अप्पा बळवंत चौक, पुणे २. ☎ : ०२०२४४५११२९

*ONLINE PURCHASE :* www.erasik.com

# राजकारणातली ‘आँधी’

। हेमंत देसाई

झिंबाब्वेमधील मुगाबे सरकारच्या राजकीय दडपशाहीविरुद्ध तेथील सरकारी चॅनेलमधील वृत्तनिवेदिका जेस्टिना मुकाब्वो हिने समविचारी गटांना एकत्र आणून आवाज उठवला, तेव्हा म्हणजे सहा वर्षांपूर्वी तिचे अपहरण करून त्यानंतर तिला तुरुंगात डांबण्यात आले व निर्दयीपणे मारझोड करण्यात आली. तरीही ती खचली नाही व जागतिक दडपण आल्यानंतरच तिची मुक्तता झाली. ग्वाटेमालातील नॉर्मा क्रूजच्या मुलीवर अत्याचार झाला, तेव्हा तिने न्यायालयात धाव घेतलीच; परंतु पीडित स्त्रियांना कायदेशीर मदत करण्यासाठी १८८६ साली सर्व्हायवल फाउंडेशनची स्थापना करून मोलाचे कार्य सुरू केले. सौदी अरेबियातील सकर बदावी या स्त्रीने आपली पिळवणूक करणाऱ्या पित्याविरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला. मुस्लीम परंपरेत हे बसत नाही, या टीकेकडे दुर्लक्ष केले. तीन वर्षांपूर्वी त्यांनी देशातील स्त्रियांना स्थानिक निवडणुकीत मतदानाचा अधिकार दिला जावा याकरता आवाज उठवला व तो शेवटी सत्ताधाऱ्यांना मान्य करावा लागला. ही झाली आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्त्री शक्तीची तीन उदाहरणे. जागतिकीकरण-उदारीकरणाच्या पर्वातच भारतात स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढत गेला. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर काही वर्षे सोनिया गांधी राजकारणापासून दूर होत्या. अर्थात त्यावेळी काँग्रेसमधील नेहरू-गांधी घराण्याशी एकनिष्ठ असलेला वर्ग त्यांच्या संपर्कात होता आणि तिवारी-अर्जुनसिंग प्रभृती पंतप्रधान नरसिंह राव यांना विरोध करत होते. काँग्रेसच्या दारुण पराभवानंतर काही काळाने त्यांना राजकारणात येऊन पक्षाची धुरा खांद्यावर घेण्याचे आवाहन करण्यात आले. त्यांनी जर दादच दिली नसती तर पक्षाचे काही खरे नाही, असे या सर्वांना वाटत होते व त्यात शरद पवारांचाही समावेश होता. मात्र त्यानंतर त्यांनीच सोनियाजींचे विदेशी मूळ काढले. तर सोनियाजी पंतप्रधान झाल्यास मुंडन करून घेण्याची धमकी सुषमा स्वराज यांनी दिली. सोनियाजींवर वाह्यात टीका करणाऱ्यांत उमा भारतीही होत्या. पक्ष अलग असला म्हणून काय झाले आमच्यात बहीणभाव असेल असे इथे मानले जात नाही. एक राजकीय स्त्री दुसऱ्या राजकीय स्त्रीला समजावून घेते, असेही अनेकदा दिसत नाही.

सत्तेच्या राजकारणाचा एक भाग म्हणून लालू प्रसाद यादव यांनी आपल्या पत्नी राबडीदेवींना बिहारच्या मुख्यमंत्रीपदी बसवले. एरवी ही घरात वावरणारी बाई कसला कारभार करणार, अशी प्रतिक्रिया होती. पण ही बाई थक्क करणाऱ्या आत्मविश्वासाने लोकांना, विरोधकांना, पत्रकारांना सामोरे गेली. आताही लालूजी तुरुंगात गेल्यावर रस्त्यावर उतरून या बाईने कार्यकर्त्यांचे मनोधैर्य उंचावण्याचे काम केले. परंतु पंधरा वर्षांनंतरही बिहारच्या परंपरागत चौकटीत त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आकाराला येऊ शकलेले नाही. जे लालूंचे मत तेच त्यांचेही मत, त्यांच्या म्हणून काही राजकीय-सामाजिक धारणा नाहीत. वास्तविक लालू समाजवादी, परंतु बिहारमधील सरंजामशाही वातावरणाच्या परिणामी की काय माहीत नाही, पुरुषी वर्चस्वाची त्यांची चौकट होतीच. पण राबडीदेवींनी ती ओलांडण्याचाही प्रयत्न केला नाही.

त्याच वातावरणाचा भाग असलेल्या मायावती मात्र दलित की बेटी, बहुजन समाज पक्षाच्या कार्यकर्त्या ते मुख्यमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास करू शकल्या. परंतु कारकिर्दीच्या पहिल्या टप्प्यात त्यांनीही संकुचित जातवादी राजकारण केले. त्यानंतर जनाधार वाढवण्यासाठी सर्वजनवाद स्वीकारला. मात्र शाहूमहाराजांच्या नावाचा वापर करून भावनाप्रक्षोभ निर्माण करणे, लाचखाऊ अधिकाऱ्यांच्या बदल्या एकाच फटक्यात करणे, समर्थकांकडून ‘दक्षिणा’ संकलन करणे, वाढदिवसानिमित्त संपत्तीचे प्रदर्शन करणे, कमालीचा उद्धटपणा करणे ही त्यांची आद्य वैशिष्ट्ये होत. भडकपणा, दडपेगिरी, बेदरकारपणा ही पुरुषी तऱ्हा त्यांच्याही अंगात भिनली आहे. बसपामध्ये मायावतींखेरीज इतर कोणत्याही स्त्रीला वाव नाही आणि पुरुष मंत्र्यांना त्या गुलामासारखे वागवतात.

तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता या विधिनिषेध शून्य राजकारणात माहीर आहेत. त्यांनी तुडुंब भ्रष्टाचार केला आणि त्यासाठी जेलयात्रादेखील केली. द्रमुकचा पराभव करून त्या पुन्हा सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या पोलिसांनी द्रमुकचे वयोवृद्ध अध्यक्ष एम. करुणानिधी यांना मध्यरात्री घरातून उचलून कोठडीत टाकले. करुणानिधींना आत टाकल्यावर त्यांना समाधान वाटले. न्यायालयाने फटकारुन करुणानिधींची सुरक्षा करण्याचा आदेश दिल्यावरदेखील आपले चुकले व म्हणून माफी मागावी, असे काही त्यांना वाटले नाही. मंत्रीगण आपले व्यक्तिमहात्म्य वाढवत आहेत, पायावर लोटांगण घालत आहेत हे बघून त्यांना आध्यात्मिक संतोष होत असावा. राजीव गांधींच्या मारेकऱ्यांच्या सुटकेचा आदेश देऊन जयललिता यांनी विधिनिषेध शून्य राजकारण चालूच ठेवले आहे. त्यावेळी त्यांनी सोनिया गांधींना काय वाटेल असा विचार का नाही केला

असा भाबडा सानेगुरुजी छाप सवाल काही जणांच्या मनात येईल. परंतु जयललितांबाबत तसली अपेक्षा बाळगणे हास्यास्पद आहे.

याउलट नवी दिल्लीच्या मुख्यमंत्री शीला दीक्षित यांनी सलग तीन टर्म राज्य केले. कॉमनवेल्थ घोटाळ्यात त्यांच्यावर आरोप झाले असले तरी दिल्लीतील वाहतूक व्यवस्था त्यांनी आमूलाग्र सुधारली. केवळ स्वतःच्या हिमतीवर त्यांनी पक्षाला विजय मिळवून दिला. विरोधकांनी हल्ले चढवूनही त्या डगमगल्या नाहीत आणि त्यांचा कारभार लोकशाहीपूर्ण व व्यवहार, सुसंस्कृतपणाचा राहिला. आपले बाईपण न मिरवता त्यांनी बाईची ताकद दाखवून दिली. परंतु दिल्लीतील निर्भयाकांडानंतर जी संवेदनशीलता दाखवायला हवी होती, ती दाखवली नाही. एक स्त्री मुख्यमंत्रीपदी असल्यामुळे याबाबत निदान जास्त अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही, हे स्पष्ट झाले.

माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील जेव्हा प्रथम आमदार झाल्या, तेव्हा त्यांनी वडिलांकडे एकच हट्ट धरला, आपल्या राजकीय कारकिर्दीला आक्षेप घेणाऱ्या व हुंडा मागणाऱ्या मुलाला मी होकार देणार नाही. तशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. प्रतिभाताईंना काँग्रेसने राष्ट्रपतीपदासाठी उमेदवार म्हणून उभे केल्यावर विरोधकांनी त्यांच्यावर चिखलफेक केली. त्याला त्यांनी समर्थपणे तोंड दिले. परंतु राष्ट्रपती म्हणून त्यांची कारकीर्द कोणत्याही अर्थाने चमकदार नव्हती. उलट त्यांनी नको तितके विदेश दौरे केले आणि दौऱ्यात आप्तेष्टांची वर्णी लावली. निवृत्तीनंतर पुण्याला लष्कराच्या जमिनीवर सरकारी खर्चाने बंगला बांधून राहण्याचा त्यांचा बेत होता. निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनी ओरड केल्यानंतर त्यांनी तो बेत रहित केला. देशाची पहिली महिला राष्ट्रपती म्हणून आनंद आहे. मराठी राष्ट्रपती म्हणून शिवसेनेने त्यांना पाठिंबा दिला. परंतु त्यामुळे लोकांच्या दृष्टीने फरक काय पडला? उलट फाशीच्या शिक्षेबाबत दयायाचना करण्यासाठी त्यांच्याकडे आलेले अर्ज निर्णयाअभावी तसेच पडून राहिले.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तेथील तीन दशकांपेक्षा जास्त काळ सत्तेवर असलेली डाव्या आघाडीची सत्ता उलथवली. काँग्रेस पक्ष डाव्यांशी सामना करण्यात कमी पडला, तेव्हा त्यांनी तृणमूल काँग्रेस हा स्वतःचा पक्ष स्थापन केला. परंतु तृणमूलच्या कार्यकर्त्यांचा बुद्धदेव भट्टाचार्यजी सरकारकडून छळ सुरू होता व म्हणून त्यांना वाजपेयी सरकारमध्ये जावे लागले ही त्यांची बाजू कोणी लक्षात घेतली नाही. उलट त्या भगव्यांच्या कळपात गेल्या, असाच प्रचार सुरू होता. मात्र प. बंगालमध्ये तृणमूलची सत्ता आल्यानंतर सरकार तसेच ममतादीदींवर टीका करणाऱ्या व्यंगचित्रकार व पत्रकारांवर हल्ले करण्यात आले, तर कुणाला अटक करण्यात आली. आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या मुस्लीम तरुणाची हत्या झाली. बलात्काराचे एक प्रकरण झाले, तेव्हा दडपादडपी व दडवादडवीचा पोलिसी व्यवहार झाला. दादींसारख्या मुख्यमंत्र्याकडून ही अपेक्षा नव्हती. खोटारडेपणा, आक्रस्ताळेपणा, असहिष्णुता ही पुरुषी शैली त्यांनी आपल्यातही बाणवून घेतलेली आहे.

संसदेतील महिला आरक्षणाचे विधेयक अद्याप संमत होऊ शकलेले नाही. महिलांसाठीचे स्थानिक स्वराज्य संस्थांनातील आरक्षण ५०% पर्यंत वाढवण्यात आले असून त्यात ओबीसींकरता वेगळे आरक्षण आहे. तेव्हा महिलांसाठीच्या या कोट्यात ओबीसींकरता स्वतंत्र आरक्षण ठेवण्यास हरकत नाही. परंतु यावरून वाद झाला. लालू, मुलायमसिंग, शरद यादव प्रभृतींनी या मुद्यावरून विधेयकास विरोध केला. परंतु आरक्षणाचा कायदा असो-नसो, या नेत्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन रुढीवादी आहे. त्यामुळे त्यांच्या पक्षात स्त्रियांना फारसे स्थान नाही. म्हणूनच ओबीसी महिलांना आरक्षण ठेवण्याच्या मुद्यावरून ते करत असलेला विरोध मतलबी आहे. महिलांसाठी त्यांना आरक्षणच नको आहे. संसदेत दीडशे-दोनशे ओबीसी खासदार असतात. पण त्यात महिलांची संख्या पाच-दहा सुद्धा नसते.

संसदेत महिलांची संख्या वाढणे एक समतोल प्रस्थापित होण्यासाठी अत्यावश्यक आहे. स्त्रिया आल्या की राजकारणात मूलभूत परिवर्तन येईल असे मानणे भाबडेपणाचे होईल. मुंबई महानगरपालिकेत महिलांची संख्या मोठी आहे. पण तेथील अनागोंदी व गैरव्यवहार प्रचंड आहेत. सभागृहातील आरडाओरडा, ढकलाढकली यात स्त्रियाही भाग घेतात. परंतु तुलनेने महिला संवेदनशील असतात. हिंसा किंवा गैरमार्गाचे त्यांना वावडे असते. स्त्रियाही पाताळयंत्री असतात असे आपण म्हणतो, परंतु त्याचा अर्थ राजकारण हे फक्त पुरुषांसाठीच असलेले राखीव कुरण होय, असा पूर्वग्रह असतो. खरे तर राजकारण फक्त एकमेकांचे पाय खेचणे, कागाळ्या व लावालाव्या करणे, कटकारस्थाने करणे एवढेच आहे, असा एक समज असतो. शिवाय काही पुरुष राजकारण्यांमध्ये धोरणीपणा, मुत्सद्देगिरी, चातुर्य, व्यवहारकौशल्य, द्रष्टेपणा हे गुण असतात. ते स्त्रियांमध्येही असू शकतात. नव्हे असतातच. एकेकाळी इंदिरा गांधींनी राजकारणाच्या क्षेत्रावरची आपली पकड दाखवून दिली आणि गुंगी गुडिया बनणे नाकारले.

आमदार नीलम गोऱ्हे यांचे उदाहरण घेऊ. त्या युक्रांदमधून भारतीय रिपब्लिकन पक्षात गेल्या, तेथे त्या महाराष्ट्र सरचिटणीस होत्या. तेव्हा हडपसरच्या महिला कार्यकर्त्यांचे त्यांच्याबद्दलचे मत कलुषित करण्याचा प्रयत्न झाला. दलित वस्त्यांत नीलमताईंबद्दल दिशाभूल केली जाऊन त्यांना मनःस्ताप दिला गेला. नंतर त्या काँग्रेसमध्ये गेल्या. तेव्हा महिला काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची कोंडी केली होती. प्रत्येक कार्यक्रमातील गटबाजीने त्यांना नैराश्यही आले होते. कोणतेही विधान कोणत्याही प्रकारे केले, तरी त्यातील वाक्ये संदर्भाशिवाय वापरून अपप्रचार केला जात असे. गंमत म्हणजे युती सरकार प्रतिगामी आहे, असे चित्र होते. परंतु १९९८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी महिला धोरणाच्या अंमलबजावणीबाबत एक बैठक बोलावली होती. त्या बैठकीस उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडेही हजर होते. नीलमताईंनी महिला धोरणाच्या

संदर्भात मुंड्यांवर टीकास्त्र सोडले. पण त्यांनीही बैठकीसाठी पूर्वतयारी केली होती. दारुच्या प्रश्नावर सुमारे शंभरेक गावांत स्त्रियांनी आंदोलने केली होती. तेव्हा त्यांच्यावर पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते. याकडे लक्ष वेधताच मुंडेनी तात्काळ हे खटले मागे घेतले जातील अशी घोषणा केली.

राजकारणात पक्षांतर करण्याचा निर्णय धाडसाचा असतो. पण एखादी महिला कार्यकर्ती जेव्हा तो निर्णय घेते तेव्हा त्याला एक भावनिकतेचा पदर असतो. नीलमताईंनी काँग्रेसमधून शिवसेनेत उडी मारली. त्यांच्या मित्रमैत्रिणी, कार्यकर्ते, यांच्या वर्तुळातील शंभर टक्के लोक सेनाविरोधी होते. त्यांच्या स्नेहाचे धागे इतके घट्ट व मोहक होते की त्यांच्या वैचारिक मतभेदांना आपण टाळू शकणार नाही, त्यांच्याशी वादही घालू शकणार नाही व त्यांना सांगून मला ऐकणेही जमणार नाही, हे नीलमताईंना ठाऊक होते. त्यामुळे त्यांनी स्वतःच निर्णय घेऊन टाकला.

काँग्रेस पक्षातील वातावरणही वेगळे होते. तुमच्या संस्थेत कोणी सुंदर मुली नाहीयेत का, असा सवालही एका पदाधिकाऱ्याच्या चमच्याने केला होता!

काँग्रेससारख्या सत्ताधारी पक्षात गिरिजा व्यास, शीला कौल, मागरिट अल्वा, अंबिका सोनी, रिटा बहुगुणा-जोशी प्रभृती हायफाय संस्कृतीतील स्त्रियांनाच अधिक वाव असतो. मीरा कुमार आहेत, पण त्या देखील जगजीवनराम यांच्या कन्या असल्यामुळे. दलित-ओबीसी आदिवासी स्त्रियांना फार संधी नसते.

महाराष्ट्रात महिला बचतगटांची चळवळ चैतन्यशील आहे. त्यातून समाजबदल होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने हे बरेच गट आपल्याकडे खेचून घेतले आहेत. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत बचतगट सहभागी असतात. पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांत बचत गटांना सतरंज्या, स्वयंपाकाची भांडी, स्पीकर्स वगैरे वस्तूंचे वाटप केले जाते. बचतगटांचे नेतृत्व करणाऱ्यांना पक्षात पदे मिळतात. या गटांमधून स्त्रियांवर सामूहिक नेतृत्व व व्यवस्थापनाचे संस्कार होतात. ग्रामसभेतला सहभाग वाढवणे शक्य होते. परंतु बचतगटातून सावकारी (जादा व्याज घेऊन कर्जे देणे) होत असल्याच्या तक्रारी असल्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांनीच जाहीर केले आहे.

बचतगटांप्रमाणेच भटक्या व विमुक्त समाजाच्या वेदनांना वाचा फोडण्याचे काम महत्त्वाचे आहे. लक्ष्मण माने यांनी या क्षेत्रात भरीव काम केले आहे. त्यांच्यावर बलात्काराचे गंभीर आरोप झाल्यावर ते कित्येक दिवस फरार होते. पोलीस कस्टडी रिमांडचा आदेश झाल्यावर त्यांना 'वैद्यकीय कारणास्तव' सरकारी इस्पितळात दाखल होण्याची मुभा मिळाली. माने एका संस्थेचे अध्यक्ष असून राष्ट्रवादी काँग्रेसशी निगडीत आहेत. काही महिला संघटनांच्या प्रतिनिधींनी साताऱ्याला जाऊन, संबंधितांच्या भेटी घेऊन, फिर्यादी महिलांशी बोलून सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तर हितशत्रूंनी मानेंविरुद्ध डाव रचला, असे आरोप माने समर्थकांनी केले. त्या स्त्रिया इतके दिवस मूक का राहिल्या, असा सवाल केला गेला. पण गरीब वंचित स्त्रिया एखाद्या बड्या धेंडाविरुद्ध खोटे आरोप करण्याचे धैर्य कुठून आणणार, हा प्रश्न कोणाच्या मनात आला नाही. दोन्ही बाजूंनी फिर्यादी स्त्रियांचेच शोषण होत असते.

अलीकडे शिवसेनेच्या नगरसेवक शीतल म्हात्रे यांनी आमदार विनोद घोसाळकरांविरुद्ध गंभीर तक्रार केली. परंतु याची वेळीच दखल घेतली गेली नाही. सुदैवाने शीतल यांना माजी महापौर शुभा राऊळ प्रभृतींची साथ लाभली. मात्र सेनेतील प्रस्थापित महिला नेत्यांनी मौन बाळगणे पसंत केले. याचे कारण शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी घोसाळकरांबाबत ठाम भूमिका घेतली नव्हती. याचा अर्थ असा, की महिलांच्या प्रश्नावरदेखील प्रस्थापित नेतृत्वाशी पंगा घेण्याची महिला नेत्यांची तयारी असते असे नाही. शीतलताईंच्या मागे ज्या स्त्रिया उभ्या राहिल्या, त्यामागे गटातटाचे राजकारणही होते. म्हणजे पक्षांतर्गत राजकारणातही याबाबत केवळ तात्त्विक भूमिका घेऊन लढण्याचे धोरण नसते.

बरे, या सगळ्यात बड्या नेत्यांचा दृष्टिकोन तरी कसा आहे? गोपीनाथ मुंडे यांच्या व्यक्तिगत जीवनातील काही गोष्टींवरून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 'प्यार किया तो डरना' क्या असे उद्‌गार काढले. विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात काँग्रेस आमदारांनी 'बरखा बहार आयी' असा ठेका धरला होता. त्याचवेळी मुंडेच्या व्यक्तिगत जीवनात काय घडते यात आम्हाला स्वारस्य नसल्याचे शरद पवार यांनी स्पष्ट केले होते. पण मग काँगेस आमदारांना ताल धरण्यास कुणी प्रवृत्त केले होते, असा प्रश्न पडतो!

पुण्यातील हिंगणे खुर्द परिसरातील एका फ्लॅटची कागदपत्रे पत्रकारांकडे धाडण्यात आली तेव्हा खळबळ माजली. त्यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे म्हणाले, की राजकारण्यांचा भ्रष्टाचार म्हणजे फक्त लाचबाजी नाही. त्यांनी समाजासमोर नैतिक आदर्श न ठेवल्यास तो देखील भ्रष्टाचाराचा नंतर दोन-चार दिवसांनी ते अधिक खुलासा करत म्हणाले की मुंडेंवर कोणताही वैयक्तिक आरोप मी केला नाही. एका स्त्रीला फ्लॅट मिळवून देण्यात त्यांचा कितपत हात होता, याच्या चौकशीची मागणी मी केली होती. वास्तविक मुंडेंची भानगड असून ही अनैतिकता आहे, असे अण्णांना सुचवायचे होते. पण हे स्पष्टपणे सांगण्याचे धैर्य त्यांच्याकडे नव्हते. मुंडेच्या खासगी गोष्टींची चर्चा करण्याचे कारण नव्हते. फोकस करायला हवा होता तो त्यांच्या कथित बेनामी व्यवहारांवर. त्यांच्याकडे त्यासाठीचे पैसे कुठून आले या प्रश्नावर काँग्रेसमध्ये मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि प्रदेशाध्यक्ष गोविंदराव आदिक यांच्यात घनघोर राजकीय संघर्ष सुरू झाला. तेव्हादेखील काही स्त्रियांवरून आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. दुर्दैवाने स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे, प्रतिस्पर्ध्यांच्या चारित्र्याचा पंचनामा करण्यासाठी हा विषय उपयोगी पडतो, असे अजूनही मानले जाते. पुन्हा हीच नेते मंडळी परिवर्तनाच्या बाता मारणार! मुळात

यांच्यातच परिवर्तन झाले पाहिजे...

१९०० च्या दशकात मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, प्रमिला दंडवते, सुशीला पटेल, प्रेमा पुरव, कमल देसाई, मंजू गांधी प्रभृतींनी महागाई प्रतिकार समितीच्या माध्यमातून मोठे आंदोलन उभे केले. अन्न व नागरी पुरवठा खात्याविरुद्ध सातत्याने थेट कृती करून त्यांनी सामान्यांच्या समस्येला वाचा फोडली. विविध विचारसरणीच्या स्त्रिया आर्थिक प्रश्नावर लढण्यासाठी एकत्र आल्या होत्या. गेल्या २५ वर्षांत मात्र महागाईविरुद्धची आंदोलने थंडावत गेली. पक्षांच्या महिला आघाड्याही तितक्याशा सक्रिय नाहीत.

वास्तविक १९८३ साली राज्यात महिला धारेण राबवले गेले. स्थानिक स्वराज्य संस्थांत स्त्रियांसाठी ३३% जागा राखीव ठेवण्यात आल्या. सुरुवातीला समाजाला ते सुचले नाही. बायकांनी धुणी भांडी करावीत, स्वयंपाक करावा, राजकारण कशाशी खातात ते त्यांना कुठे कळतेय अशी शेरेबाजी झाली. पण राज्यातील विविध पालिकांतील २ लाख ३० हजार नगरसेवकांपैकी आता ७६ हजार महिला आहेत. सुरुवातीला स्त्रियांच्या वतीने त्यांचे पती वा पक्षाचे धुरीण कारभार करायचे. अजूनही करतात. निर्णयप्रक्रियेत त्यांना स्थान नसते. परंतु राजकारणात स्त्रिया दिसू लागल्या. काहींमध्ये आत्मविश्वास आला. अनेकदा बाईची सोबत करायला नवरा असतो. शिबिरात, प्रशिक्षणात बायको इतर पुरुषांबरोबर गेली की त्यांचे नवरे कावरेबावरे होतात...

स्त्रिया स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नाहीत असे म्हणायचे, स्वतःची बुद्धी चालवायला लागल्या तर त्यांना बदनाम करायचे, तिच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणायचा, अशा चाली खेळल्या जातात. महिला आरक्षणामुळे त्यांच्या संधी वाढल्या. परंतु ज्या पुरुषांचे मतदारसंघ स्त्रियांसाठी राखीव झाले, ते आपल्या घरातल्या स्त्रीला तिकिट मिळवून देण्यासाठी धडपडू लागले. ते इतर स्त्रियांना मदत करतातच, असे नाही. उमेदवारीसाठी स्त्रियांत स्पर्धा लागल्यावर त्यातूनही खोटेनाटे आरोप होऊ लागले. अशावेळी निदान एकमेकींचे व्यक्तिगत जीवन चिवडू नये, असे बंधन महिलांनी घालून घेतले पाहिजे.

श्रमाची विभागणी, स्त्रियांचा आत्मसन्मान, समान वागणूक, मालमत्तेचे वाटप, अपत्य संगोपनाची सामायिक जिम्मेदारी या प्रश्नांना इथल्या स्त्रीमुक्ती चळवळीने हात घातला. इथल्या आदिवासी समाजाच्या त्या समस्याच नाहीत. कारण समानतेवर आधारित समाज, हाच त्याचा पाया आहे. मात्र मुख्य धारेतील स्त्रियांच्या मुक्तीची चळवळ समाजाच्या सर्व स्तरांत पोहोचली पाहिजे. प्रत्येक स्त्री ज्या वर्गातून येते, त्या वर्गाच्या पार्श्वभूमीवर तिच्या समस्या बदलतात. शेषणाला बळी पडणाऱ्या बायका स्वतःला संधी मिळताच स्वतःच शोषक बनतात. तेव्हा स्त्री राजकारणाऱ्यांनी याचे भान ठेवले पाहिजे. शिवाय त्या त्या वर्गातून आलेल्या स्त्रियांचे नेतृत्व त्या त्या वर्गात बदल घडवू शकते. प्रत्येक ठिकाणी पुण्यामुंबईच्या वलयांकित महिलांनी नेतृत्व केले पाहिजे, असे नव्हे. स्त्री चळवळीचे मध्यमवर्गीकरण टाळण्यासाठी हे पथ्य पाळले पाहिजे. उदाहरणार्थ, शेतकरी संघटनेतील स्त्रियांची कामगिरी महत्त्वाची राहिली आहे. शेतकरी कुटुंबातील स्त्रियांचा सहभाग असल्याने लक्ष्मी-मुक्तीसारखे त्यांचे कार्यक्रम यशस्वी झाले. कामगार व दलित चळवळीत स्त्रियांचे नेतृत्व तसे उभे राहिलेले नाही. शहरी महिला ग्रामीण प्रथापरंपरा समाजवून न घेता मते मांडत असल्याने शहरे व ग्रामीण महिलांमध्ये आजही दरी आहे.

आजही आरक्षणाविना वा राजकीय पूर्वपीठिका (उदाहरणार्थ, पंकजा मुंडे, सुप्रिया सुळे) असल्याशिवाय स्त्रियांना राजकारणात येणे सोपे राहिलेले नाही. बऱ्याचदा अंगात गुण असूनही त्यांना पद दिले जात नाही. वस्तुतः आरक्षणामुळे त्यांना संधी मिळाली आहे. पण आरक्षण ठेवले नाही तरीही निवडून येण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होत आहे. या सकारात्मक बदलाचे आपण स्वागत केले पाहिजे.

पण कम्युनिस्टांसह सर्व राजकीय पक्षांमधील पदे, आमदार-खासदारपदाची तिकिटे यामध्ये स्त्रियांना अजूनही अत्यल्प वाटा मिळतो. म्हणूनच मध्यंतरी स्त्रियांचा वेगळा पक्ष काढला गेला. त्यांना महत्त्वाची खाती मिळत नाहीत. राजकीय पक्ष बलात्कारासारख्या प्रकरणानंतर एकदम जागे होतात. पण पोलीस ठाण्यात महिला पोलीस नसणे, त्यांच्यासाठी पुरेशी स्वच्छतागृहे नसणे, पाळणाघरांचा अभाव यासारख्या प्रश्नांमध्ये ते लक्ष घालताना दिसत नाहीत. आम्ही स्त्रियांचा सन्मान करतो, अशी बोलघेवडेगिरी करून फक्त दिखावा करायचा, असे सर्व चालू आहे. भाजपने पंतप्रधानपदाची उमेदवारी देताना सुषमा स्वराज यांना डावलले, तेव्हा कुणी काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

राजकारणातली गुंडागिरी वाढली आहे. संतोषबेन जडेजासारख्या गुंड स्त्रिया अपवादात्मकच. पण अशा वातावरणात बायकांचा निभाव लागत नाही. मग त्या मागे पडतात. पुन्हा स्त्रियांना घरच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यात त्यांना नवरा, मुलेमुली सहकार्य करतातच, असे नाही.

सुदैवाने आज काँग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी राजकारणातील स्त्रियांचा सहभाग वाढवणे, त्यांना सक्षम करणे यास अग्रक्रम देत आहेत. 'आप'सारख्या पक्षातही स्त्रियांसाठी पोषक वातावरण असावे, असा योगेंद्र यादव, प्रशांत भूषण वगैरेंचा आग्रह आहे.

गुजरात दंगलीत याचा माया कोदनानी या मंत्रीणबाईचा हात होता. राजकारणात बाईचे असेही होऊ शकते. तसे ते होणार नाही, यासाठी आपण सर्वांनी राजकारणाचा भवताल बदलला पाहिजे.

**- हेमंत देसाई**

सी-३, गुलमोहर, महापालिका वसाहत,
फातिमा चर्चजवळ, दा.ग. महाजनी पथ,
शिवडी, मुंबई ४०००१५
दूरध्वनी : २४१३५८६४
भ्रमणध्वनी : ९८२०४७९६८८
hemant.desai001@gmail.com



# साहित्यातील स्त्रियांची कामगिरी आणि मर्यादा

| डॉ. नीलिमा गुंडी

गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील साहित्यसृष्टीकडे धावता दृष्टिक्षेप टाकला तरी स्त्रियांचा त्या क्षेत्रातील आत्मविश्वासपूर्ण वावर लक्ष वेधून घेतो. या क्षेत्रातील स्त्रियांच्या सहभागाचे वाढते प्रमाणदेखील नोंद घेण्याजोगे आहे. प्रस्तुत लेखात या कालावधीतील संपूर्ण स्त्रीसाहित्याचा आढावा घेण्याचा इरादा नाही. स्त्रियांच्या सहभागाचे सम्यक चित्र लक्षात येण्यासाठी काही प्रातिनिधिक उदाहरणे देऊन त्यांच्या कामगिरीचा आलेख समोर ठेवण्याचा हा मर्यादित प्रयत्न आहे.

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष म्हणून गणले जाणे, ही घटना आपल्याकडे स्त्रीविषयक प्रश्नांची जागरुकता निर्माण करणारी, तसेच स्त्रीवादी आणि स्त्रीकेंद्री लेखनाला चालना देणारी ठरली. त्यानिमित्ताने सामाजिक क्षेत्रात चालू झालेल्या स्त्रीचळवळींनी सुरुवातीला पिंजून काढलेले वैचारिक क्षेत्र, स्त्रीसाहित्याच्या निर्मितीसाठी भूमी अनुकूल करणारे ठरले. काव्य आणि आत्मचरित्र या दोन वाङ्मयप्रकारांपुरतेच स्त्रियांचे लेखनक्षेत्र मर्यादित राहिलेले आज दिसत नाही. त्यांच्या या कामगिरीचा आढावा घेताना अर्थातच त्यांच्या या वाटचालीतील विविध वाटांचा जसा परामर्श घेतला आहे, तसाच योग्य मुक्कामाला न पोहोचू देणाऱ्या त्यांच्या मर्यादांचाही विचार केला आहे. स्त्रीसाहित्याचे व्यापक क्षेत्र आज निव्वळ प्रोत्साहनाची अपेक्षा करणारे राहिलेले नाही, ही आजची वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच त्याची चिकित्सक अंगाने नोंद घ्यायला हवी.

### स्त्रियांचे काव्यलेखन

स्त्रीच्या अभिव्यक्तीचा पहिला उद्‌गार कवितांमधून येतो. त्यामुळे स्त्रियांच्या काव्यसंग्रहांची संख्या सतत वाढत आहे. अभिव्यक्त होण्याची निकड समाजगटातील विभिन्न सामाजिक-आर्थिक स्तरांमधील स्त्रियांना जाणवत आहे. हे आजचे बदलते चित्र आहे. त्यामुळे एकेकाळी 'अंतर्गृहातील कविता' हे स्त्रीकाव्याचे असलेले रूप आज उरलेले नाही. बीजिंग येथील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत सादर झालेली कविता आज आपल्यासमोर आहे. (शैला लोहिया : कविता गजाआडच्या) हा केवळ अनुभवक्षेत्राचा भौगोलिक विस्तार नाही. पांढरपेशा वर्गापलिकडील दलित, ग्रामीण, आदिवासी स्त्रियांचे आवाज आज कवितेतून अभिव्यक्त होत आहेत. स्त्रीवादी तसेच स्त्रीकेंद्री कविता मोठ्या प्रमाणावर लिहिल्या जात आहेत. मल्लिका अमरशेख यांचा 'वाळूचा प्रियकर' (१९७९), हिरा बनसोडे यांचा 'फिर्याद', रजनी परूळेकरांचा 'स्वीकार', अश्विनी धोंगडे यांचा 'स्त्रीसूक्त', नीरजा यांचा 'वेणा' हे कवितासंग्रह स्त्रीवादी आशयसूत्रे काव्यात्म परिभाषेतून समोर ठेवतात. त्याचवेळी ज्योती लांजेवार 'दिशा', प्रज्ञा दया पवार 'उत्कट जीवघेण्या धगीवर', संध्या रंगारी 'संध्यारंग', छाया कोरेगावकर 'एक अवकाश माझंही' या कवयित्री दलित वास्तव आणि स्त्रीपुरुषवास्तव या दोन्ही पटांवरचे अनुभव विविध कंगोऱ्यांसकट धारदारपणे मांडतात. आसावरी काकडे, अंजली कुलकर्णी, उर्मिला चाकूरकर, वंदना महाजन, वृषाली किन्हाळकर, सिसिलिया कार्व्हालो, कविता महाजन आदी अनेक कवयित्री स्त्रीपुरुषसमता या मूल्याच्या ओढीने व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातील अनुभवांचे चिकित्सक, तर कधी उपरोधिक शैलीत दर्शन घडवीत आहे. उषाकिरण आत्राम आणि कुसुम अलाम या आदिवासी कवयित्रीही सामाजिक समस्यांचे भान काव्यात्मरूपात व्यक्त करीत आहेत.

याचवेळी स्त्रीकेंद्री अनुभवविश्वाचे परंपरेशी असलेले नाते एकीकडे कायम ठेवूनही मिथकांचे पुनर्वाचन करण्याचा प्रयत्न अरुणा ढेरे, (जावे जन्माकडे), अनुपमा उजगरे (सांगी) अनुराधा पाटील (वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ), संगीता बर्वे (मृगतृष्णा), मीरा (ऐक द्रौपदी), हेमा लेले (क्षण अस्तित्वाचे) आदी अनेकजणी करीत आहेत. आजची स्त्रीकविता आत्मशोधाची दिशा गवसल्यानंतर अधिकाधिक खोल जाऊ पाहणारी आहे. तिच्या संवेदनशीलतेचा पैसही वाढत आहे.

१९९० नंतर बदललेले सामाजिक-सांस्कृतिक वास्तव, जागतिकीकरणाचा लहान समूहांना बसणारा फटका, ग्रामीण स्त्रीचे हलाखीचे जगणे, तंत्रज्ञानाचा वाढता वापर या समकालीन प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून कविता लिहिण्याचे प्रयत्न थोड्याफार प्रमाणात दिसत आहेत. 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' (प्रज्ञा दया पवार), 'उद्धवस्तायन' (नीलम माणगावे), 'निरर्थकाचे पक्षी' (नीरजा), 'सीझर कर म्हणतेय माती' (कल्पना दुधाळ) आदी संग्रहांचा येथे

उल्लेख करणे गरजेचे आहे. आजची स्त्रीलिखित कविता स्त्रीप्रतिमेचा शोध घेताना अस्तित्वशोध आणि समकालीन वास्तवाचा शोध या दोन अक्षांच्या दरम्यानचे अनेक अनुभव व्यक्त करू पाहत आहे. स्त्रीसाहित्यक्षेत्रात स्त्रीची सर्वात भरीव कामगिरी 'काव्य' या प्रांतातली आहे आणि त्याचवेळी तिची सर्वात जास्त प्रमाणातली अर्धीकच्ची कामगिरीही याच प्रांतातली आहे!

## स्त्रीलिखित कथा-कादंबरी

मुख्यतः स्त्रीजीवन केंद्रस्थानी ठेवून लेखन करणाऱ्या विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे आदी आधीच्या पिढीतील कथा-कादंबरीकारांचे लेखन १९८० नंतरही चालू राहिलेले दिसते. सानिया, आशा बगे, रोहिणी कुलकर्णी, सुनीती आफळे, अंबिका सरकार यांचेही कथात्म साहित्य वाचकांचे लक्ष वेधून घेताना दिसते. प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, नीरजा, प्रज्ञा पवार, प्रतिमा जोशी, उर्मिला पवार या स्त्रीवादी कथाकारांनी सर्वसामान्य वाचकांना सांकेतिक अभिरुचीच्या पलीकडे नेण्यासाठी आवश्यक तो धक्का देण्याचे ऐतिहासिक काम केले आहे. समाजप्रिय स्त्रीप्रतिमेचे विश्लेषण, पुरुषी दांभिकतेवर भेदक प्रहार आणि मानवी नातेसंबंधांतील सत्तावर्चस्वाच्या राजकारणाचे भान या कथाकारांकडे आहे. त्याचबरोबर समकालीन सामाजिक समस्यांचे त्यांचे आकलन आणि भाषिक सजगताही महत्त्वाची आहे. मेघना पेठे यांचा 'आंधळ्याच्या गायी' हा संग्रह स्त्रीवादी आशयसूत्रे समोर ठेवतानाच स्त्रीपुरुष नातेसंबंधाची चौकट ओलांडणाऱ्या कथाही समोर ठेवतो. तसेच प्रज्ञा पवार यांचा 'अफवा खरी ठरावी म्हणून' हा कथासंग्रह दलित स्त्रीमानसाचे भान व्यक्त करतानाच दलितत्वाच्या चौकटींचीही जाणीव व्यक्त करतो. त्यांची 'नो मॅन्स लँड' ही कथा स्त्रीप्रश्नाच्या बदलत्या वास्तवाचे अर्करूप प्रतीक ठरते. स्त्रीची पुरुषाला आकलन होण्यापलीकडची अशी नवी 'मिथ' त्यातून सूचित होते. तर सानियाच्या 'ओमियागे'मधून स्वातंत्र्यसंकल्पनेचा शोध घेतला जातो.

पुरुषसत्तेप्रमाणेच धर्मसत्तेलाही प्रश्न विचारण्याची गरज आज स्त्रीलेखिकांना प्रकर्षाने जाणवते. मोनिका गजेंद्र गडकर यांचा 'शिल्प', नीलम माणगावे यांचा 'रथवादळ', अरुणा ढेरे यांचा 'भगव्या वाटा', प्रतिभा कणेकर यांचा 'परिघावर जगताना', मुग्धा देशपांडे यांचा 'सनातन सापेक्ष सत्य' हे कथासंग्रह उल्लेखनीय आहेत. ग्रामीण राजकारणाला भिडणाऱ्या मथू सावंत यांच्या कथा, काव्यात्म शैलीतील सुकन्या आगाशे यांच्या कथा, मार्मिक निवेदनामुळे लक्षात राहणाऱ्या अनुराधा चिन्मुळगुंद यांच्या कथा, तसेच व्यसनाधीन व्यक्तींचे भावजीवन सखोलपणे चितारणाऱ्या सुजाता महाजन यांच्या कथा, यांचीही नोंद करणे गरजेचे आहे. ही नोंद केवळ वानगीदाखल आहे. स्त्रीकादंबरीकारांची कामगिरी पाहता मुख्यतः स्त्रीकेंद्री अनुभवविश्व कुटुंबकेंद्री जगणे हे त्यात अधिक प्रमाणात दिसते. आशा बगे, रोहिणी कुलकर्णी, सानिया, गौरी देशपांडे यांनी स्त्रीजीवनातील आधुनिकतेच्या वळणावरचे काही ताण चित्रित केले. स्त्रीप्रतिमेला परंपराबद्ध मानसिकतेपासून सोडवून नवा आशय देण्याचा प्रयत्न केला. गौरी देशपांडे यांची 'तेरुओ' ते 'मुक्काम'मधील नायिका स्वतःला स्वतःतून मुक्त करण्याचा प्रवास करीत अर्थपूर्ण अस्तित्वाच्या मुक्कामाला जायची धडपड करताना दिसते. आशा बगे यांच्या कादंबऱ्या 'सेतु', 'भूमी' परंपरेशी नाते राखत नवा कालसापेक्ष बदल आत्मसात करण्याची धडपड करतात. (त्यांच्या 'भूमी' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.) मेघना पेठे यांची धर्मसंस्था आणि स्त्रीपुरुषसत्ता या दोहोंना प्रश्न विचारणारी 'नातिचरामि', शांता गोखले यांची 'रिटा वेलिणकर', प्रतिभा रानडे यांची 'रेघोट्या', अरुणा सबाने यांची 'विमुक्त', तारा वनारसे यांची 'श्यामिनी' आणि कविता महाजन यांच्या 'ब्र', 'भिन्न' या आणि अशा काही कादंबऱ्या स्त्रीप्रश्नाचा नेमका आवाका जाणून लिहिल्या गेल्या आहेत.

स्त्रीप्रश्नापलीकडचे अनुभवविश्व कादंबरीत समर्थपणे हाताळणाऱ्या काही वेगळ्या वाटेवरच्या कादंबऱ्याही उल्लेखनीय आहेत. रेखा बैजल यांची 'अग्निपुष्प' (विज्ञानविषयक काल्पनिका), छाया महाजन यांची 'कॉलेज', माधुरी तळवलकर यांची 'कॉलसेंटर', कविता महाजन यांची 'कुहू' (रूपकात्मक कादंबरी) इत्यादी.

(येथे सर्वसामान्य वाचकांची अभिरुची हेरून सातत्याने लिहिल्या जाणाऱ्या वाचकप्रिय कथा-कादंबऱ्यांचा उल्लेख केलेला नाही. अशा लेखिका अनेक आहेत. त्यांना वाङ्मयाच्या इतिहासात स्थान मिळेल. या छोटेखानी लेखात नावीन्यपूर्ण प्रवृत्तींवर भर दिला आहे.)

## स्त्रीलिखित आत्मचरित्रे-चरित्रे

स्त्रियांच्या आत्मचरित्राचे मराठीतील दालन समृद्ध असून त्यात जातवास्तव, धार्मिकतेचा परीघ, वर्गीय वास्तव, भौगोलिक सीमा याबाबतचे ठरावीक चाकोरी ओलांडणारे व्यक्तिगत अनुभवविश्व प्रतिबिंबित होत आहे. १९८० नंतर स्त्रियांनी 'पर्सनल इज पॉलिटिकल' या स्त्रीवादातील संकल्पनेला प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर आत्मकथन केले आहे. ही आत्मकथने 'आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकाराच्या निकषांवर उतरणारी असतीलच असे नाही. किंबहुना बहुतेक स्त्रिया 'हे आत्मचरित्र नाही' असेच सुरुवातीला म्हणतात. त्यामागे त्या वाङ्मयप्रकाराचा असलेला दबदबा, हेही कारण असू शकते. मोठ्यांनी आत्मचरित्र लिहावे, ही एकेकाळची समाजमानसातील अपेक्षा आता बदलली असून सर्वसाधारण स्त्रीही स्वतःला अभिव्यक्त करू धजत आहे, हा या बदलाचा अर्थ आहे. तळागाळातील स्त्रीचे जागे होणारे आत्मभान यातून लक्षात येते.

या आत्मकथनांमधून समाजातील स्थित्यंतरे, त्यांना व्यक्तिमनाने दिलेला प्रतिसाद, झेललेले संघर्षातील घाव या साऱ्यांच्या उठावाचा नकाशा साकारत जातो. भटक्या समाजातील मुलीने शिक्षणासाठी केलेला संघर्ष– 'मरणकळा'– (जनाबाई गिऱ्हे), मुस्लीम समाजातील स्त्रीला येत गेलेला आत्मविश्वास –'भोगिले जे दुःख त्याला' (आशा अपराद), जातपातळीवरचे चित्रण करणारे 'जिणं आमुचं' (बेबी कांबळे), दलित स्त्रीचा विकासाच्या वाटेवरील प्रवास 'आयदान' (उर्मिला पवार) ही त्यांची काही ठळक उदाहरणे आहेत. लेखनापासून लांब असणाऱ्या स्त्रियांचे अनुभव शब्दांकित केले जात आहेत. उदाहरणार्थ, मेहरून्निसा दलवाई 'मी भरून पावले आहे', कृष्णा सुर्वे– 'मास्तरांची सावली'.

प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नींची आत्मकथने स्त्रीवादी रीतीने वाचण्याजोगी आहेत. माधवी देसाई यांचे 'नाच ग घुमा', सुनीता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी', कमल पाध्ये यांचे 'बंधअनुबंध', यशोदा पाडगावकरांचे 'कुणास्तव कुणीतरी' ही आत्मकथने म्हणजे 'पांढरपेशा समाजातील पुरुषवर्गापुढे धरलेला आरसा' आहेत. यात एकप्रकारे स्त्रीमनाचे 'विरेचन' आहे, ते उकळत्या लाव्हारसाइतके प्रखर आहे. स्त्रीमनातील तळघराचे दार उघडले जात असल्याची प्रचिती यातून येते. त्याचवेळी 'चाकाची खुर्ची' (नसीमा हुजरूक), 'हसरी किडनी' (पद्मजा फाटक) आदी संघर्षगाथा स्त्रीच्या कणखरपणाची साक्षही देतात. आजारपणाशी झुंज, साहसी मोहिमा, विशेष मुलाच्या पालकत्वाचा अवघड प्रवस अशा संघर्षकथाही पुष्कळ आहेत. त्याचबरोबर अनेक क्षेत्रांतील यशोगाथाही आहेत. विजया मेहता यांचे 'झिम्मा', मीरा बडवे यांचे 'टीम निवांत', नजुबाई गावित यांची (आत्मचरित्रात्मक कादंबरी) 'आदोर', तसेच यशोधरा गायकवाड यांचे 'माझी मी' अशी अनेक पुस्तके लक्षणीय आहेत. 'जॅकपॉट' (सरिता वाकलकर) आणि 'बारबाला' (वैशाली हळदणकर) ही आत्मकथने म्हणजे ठरावीक लक्ष्मणरेषेत जगणाऱ्या स्त्रियांचे अनुभवकथन प्रकाशित होण्याच्या प्रक्रियेची चाकोरी ओलांडणे आहे.

स्त्रीलिखित चरित्रांची संख्याही मोठी असून त्यात विविध क्षेत्रांतील व्यक्तींची चरित्रे लिहिलेली आढळतात. सरोजिनी वैद्य यांनी एकोणिसाव्या शतकातील सामाजिक स्थित्यंतराशी आतून नाते असलेल्या प्रा. वा. ब. पटवर्धन, काशीताई कानिटकर यांची चरित्रे आत्मीयतेने आणि संशोधनपूर्वक सिद्ध केली आहेत. सुमती देवस्थळी यांनी लिओ–टॉलस्टॉयचे लिहिलेले चरित्रही मान्यताप्राप्त आहे. त्यांनी इतरही चरित्रे लिहिली आहेत. वीणा गवाणकर, माधुरी पुरंदरे, माधुरी शानभाग, वीणा देव, पुष्पा लिमये आदी अनेक नावे या क्षेत्रात पुढे आली आहेत. स्त्री प्रश्नाला पूरक अशी काही चरित्रेही लिहिली गेली आहेत. वसुमती धुरू यांचे 'विज्ञान विशरदा', वीणा गवाणकर यांचे 'लीझा माइटनर' यांतून विज्ञानक्षेत्रात एकेकाळी आपल्याकडे तसेच जगात इतरत्रही स्त्रीला मिळालेली दुय्यम दर्जाची वागणूक समोर आली आहे. त्याचवेळी स्त्रीकर्तृत्वाचे आश्वासक चित्रण समोर ठेवणारी चरित्रेही लिहिली गेली आहेत. उदाहरणार्थ, अंजली किर्तने लिखित डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र.

स्त्रीकेंद्री संशोधनातून तयार झालेल्या चरित्रपर लेखनाचे काही नमुने उल्लेखनीय आहेत. अरुणा ढेरे यांचे 'विस्मृतिचित्रे', शारदा साठे यांचे 'क्षितिजावरील शलाका', मंगला आठलेकर यांचे 'गार्गी अजून जिवंत आहे' इत्यादी. चरित्रलेखन या प्रकाराला कधी रिपोर्ताज तर कधी इतिहाससंशोधन मुलाखती अशी इतर लेखनप्रकारांची जोडही मिळताना दिसते. 'आम्हीही इतिहास घडवला' (संपा. उर्मिला पवार, मीनाक्षी मून) हे पुस्तक 'हिस्टोरोग्राफी'चे उदाहरण आहे. यातून आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्त्या स्त्रियांची माहिती समोर येते.

आत्मकथन या प्रकारातही एका सूत्रात गुंफलेल्या अनेक आत्मकथनांचे संपादन हा अनेकींना बोलते करणारा पर्याय वापरलेला दिसतो. उदा. 'तवा चुल्यावर' (संपा. सुमित्रा भावे–दलित स्त्रियांची आत्मकथने), 'अपराजितांचे निःश्वास' (संपा. विद्या बाळ– (एकट्या राहणाऱ्या स्त्रियांची आत्मकथने) या पद्धतीने स्त्रीच्या अनुभवकथनाचा क्षेत्रविस्तार होण्यास मदत झाली आहे. अशा संपादनांमागे सामाजिक दृष्टिकोन प्रभावी आहे.

## ललित लेखन, प्रवासवर्णन

मराठी साहित्यात इरावती कर्वे आणि दुर्गाबाई भागवत यांच्या ललित लेखनाने जे मानदंड निर्माण केले आहेत त्या तोडीचे ललित लेखन करणे हे आजच्या स्त्रियांना मोठे आव्हानात्मक काम आहे. तरीही शांता शेळके, विजया राजाध्यक्ष, शिरीष पै, गौरी देशपांडे, वासंती मुझुमदार, सुनीता देशपांडे, मंगला गोडबोले, पद्मजा फाटक, दीपा गोवारीकर, शोभा चित्रे, आदींनी चांगले ललित लेखन केले आहे. त्यात व्यक्तिगत अनुभवांबरोबर स्थलवर्णन, व्यक्तिचित्रण, निसर्गवर्णन, विनोदी प्रसंग यांनाही स्थान मिळाले आहे. इंदिरा संत, शरदिनी डहाणूकर, सुलभा ब्रह्मनाळकर, अरुणा ढेरे, यशोधरा भोसले, राणी दुर्वे, अमृता सुभाष यांच्याकडे ललित लेखनासाठी आवश्यक ती सहज शैली व अनुभवसमृद्धी, व्यासंग यांची उपस्थिती जाणवते. 'सदर'लेखन करण्याचे आव्हान हे नेहमीच अधिक अवघड असते. त्यासाठी सूक्ष्म निरीक्षण चिंतनशील दृष्टिकोन आणि भाषेवर पकड असणे गरजेचे असते. नीरजा, अंजली कीर्तने, वीणा देव, मंदा खांडगे, छाया महाजन आदी अनेकजणी सातत्याने आणि तरीही वाचनीय स्वरूपाचे, प्रसंगी अंतर्मुख करणारे लेखन करीत आहेत. अलीकडे नियतकालिके संख्येने वाढली असून त्यांच्या पुरवण्या, तसे खास महिलांसाठीच्या पुरवण्या निघत असल्यामुळे ललित; खरे तर स्फुट–लेखन करणाऱ्या स्त्रियांची संख्याही मोठी आहे.

स्त्रीलखित प्रवासवर्णनांची संख्यात्मक वाढ लक्षात घेतानाच स्त्रीने पादाक्रांत केलेल्या प्रदेशाची भौगोलिक व्याप्तीही नोंदवायला हवी. धाडसी मोहिमा, एकटीने केलेला प्रवास, जगातील अनोख्या ठिकाणी जाण्याची ओढ अशी अनेक कारणे या लेखनामागे आहेत. मीना प्रभू यांची 'दक्षिणरंग', 'ग्रीकांजली' आणि परदेशप्रवासाची इतर पुस्तके, सानियाचे 'प्रवास', सुलभा ब्रह्मनाळकरांचे 'बंद खिडकीबाहेर', भारती ठाकूर यांचे 'नर्मदा एक अंतयात्रा', प्रतिभा रानडे यांची 'अफगाणडायरी', डॉ. उज्ज्वला दळवी यांचे 'सोन्याच्या धुराचे ठसके' आदी अनेक पुस्तके येथे आठवतात. स्त्रीच्या आत्मविश्वासाच्या जोडीला प्रवासाच्या खुल्या झालेल्या सोयी, आर्थिक सुबत्ता आणि वाढते कुतूहल याबाबीही स्त्रियांना विशाल जीवनदर्शनासाठी उद्युक्त करीत आहेत. जागतिकीकरणाची ही जमेची बाजू ठरते.

## नाटक

स्त्रीलिखित नाटके आजही मोजकीच आहेत. सई परांजपे, शिरीष पै आदी आधीच्या पिढीतल्या स्त्री नाटककारांप्रमाणे अलीकडेही या क्षेत्रात स्त्रियांची उपस्थिती फारच कमी प्रमाणात आहे. त्याची कारणे या प्रकाराच्या 'दृश्यश्राव्य प्रयोग' म्हणून सादरीकरण करतानाच्या मर्यादांशी निगडित असू शकतात. (कारण अभिवाचन या सादरीकरणाच्या प्रकारात स्त्रियांची उपस्थिती वाढत आहे असे दिसते) तरीही ज्योती म्हापसेकर यांच्या 'मुलगी झाली हो!' या नाटकाने स्त्रियांसाठी लवचीक असा पथनाट्याचा मार्ग यशस्वीरित्या खुला करून दिला आहे. सुषमा देशपांडे यांचे 'व्हय, मी सावित्री बोलतेय' हे एकपात्री नाटचही स्त्रीवादी विचारप्रसारणासाठीचे समर्थ माध्यम आहे.

मनस्विनी लता रविंद्र यांचे 'सिगारेट्स', 'अलविदा' हे दीर्घांक नव्या पिढीचे प्रश्न समोर आणणारे आहेत. खैरलांजी हत्याकांड या दलितवास्तवाशी निगडित ज्वलंत प्रश्नावरील प्रज्ञा दया पवार यांचे 'धादान्त खैरलांजी' हे नाटक तसेच शिल्पा मुंब्रसकरांचे 'झाडाझडती' हे नाटक स्त्रीचे समकालीन भान दर्शवते. इरावती कर्णिक यांचे 'व्हाईट लिली आणि नाइट रायडर', तसेच 'छापाकाटा' ही नाटकेही एकविसाव्या शतकातील प्रश्नांना भिडणारी आहेत. या क्षेत्रात स्त्रीकर्तृत्वाला अजून बराच वाव आहे.

## वैचारिक लेखन

या कालखंडात स्त्रीप्रश्नाच्या निमित्ताने चर्चा, परंपरेचे विश्लेषण, इतर ज्ञानक्षेत्रांच्या मदतीने स्त्रीप्रश्नाचे आकलन करून घेणे, या प्रकारचे वैचारिक जागरण मोठ्या प्रमाणावर घडले आहे. यात नियतकालिकांचाही वाटा मोठा आहे. समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र, लोकतत्त्व, समुपदेशन, राजकारण आदी विषयांवरील स्त्रीलिखित वैचारिक वाङ्मय प्रामुख्याने आढळते. काही उदाहरणे घेऊ. ती अशी : छाया दातार- 'स्त्रीविमुक्ती', मंगला सामंत- 'स्त्रीपर्व', प्रतिभा रानडे- 'स्त्री प्रश्नांची चर्चा : १९ वे शतक', विनया खडपेकर- 'स्त्री स्वातंत्र्यवादिनी', विद्युत भागवत-'स्त्री प्रश्नाची वाटचाल', प्रतिमा परदेशी- 'डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती' इत्यादी. त्याचबरोबर लता भिसे, रझिया पटेल, सुरेखा भगत, मीना देवल, नीरजा, मेधा थत्ते, कुमुद पावडे, नीरा आडारकर, श्यामला वनारसे, नीलम गोऱ्हे यांचे 'बायजा', 'मिळून साऱ्याजणी' 'लोकसत्ता' आदी नियतकालिकांतील लेखन विचारांना चालना देणारे आहे. स्त्रीवादी तत्त्वज्ञानाची मांडणी करण्यासाठी भारतीय संतस्त्री परंपरेचा अन्वयार्थ शोधणारा तारा भवाळकरांचा 'स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर' हा एक वेगळा प्रयत्न आहे. लीला दीक्षित यांनीही या विषयावर लिहिले आहे. स्वतःच्या अनुभवाचे विश्लेषण करत सर्वसामान्य विचारांपर्यंत पोहोचणारी पुस्तकेही मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली आहेत. विद्या बाळ यांचे 'स्वतःला शोधताना', मंगला गोडबोले यांचे 'कुंपण आणि आकाश', प्रतिभा रानडे यांचे 'बुरख्याआडच्या स्त्रिया', नंदिनी आत्मसिद्ध यांचे 'नारी जातक', लीला पाटील यांचे 'ओलांडताना', आशा मुंडले यांचे 'घर' इत्यादी पुस्तकांचा उदाहरणादाखल उल्लेख करता येईल.

एका विषयाचा सर्वांगीण अभ्यास करून लिहिलेली पुस्तके पुढीलप्रमाणे आहेत. 'एका शापाचा जन्म'- अरुणा देशपांडे (मासिक पाळीविषयीच्या कथांचे संशोधन व विश्लेषण) 'डाकीण' -संध्या नरे-पवार, 'नग्न सत्य' (बलात्काराविषयी) मुक्ता मनोहर मेहेंदळे, 'प्लॅटफॉर्म नंबर झिरो'-अनिता नायडू, 'बाराला दहा कमी' (संहारक अस्त्राविषयीच्या वैज्ञानिक वाटचालीचा शोध घेणारे पुस्तक) पद्मा फाटक, 'बालकहक्क -मुलंच जेव्हा बोलू लागतात' - लीला पाटील, 'संस्कृती रंग' - वैशाली करमरकर 'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता' प्रतिमा इंगोले इत्यादी.

चाकोरीबाहेरील विषयावरील अभ्यासपूर्ण लेखनासाठी मंगला आठलेकर यांचा उल्लेख करावयास हवा. त्यांनी 'महापुरुषांच्या नजरेतून स्त्री' या पुस्तकातून विविध धर्मग्रंथांचे स्त्रीवादी दृष्टीने वाचन केले आणि स्त्री-पुरुष विषमतेला विविध धर्मांमधून मिळणारी पाठिंबादर्शक वचने चर्चास्थानी आणली. तसेच त्यांनी समलिंगी संबंधाविषयी 'हे दुःख कुण्या जन्माचे', इच्छामरणाविषयी 'जगायची पण सक्ती आहे' आदी पुस्तकेही लिहिली आहेत.

तरीही आजही अनेक अभ्यासविषय आणि ज्ञानशाखा यांचे आवाहन स्त्रीपर्यंत पोहोचण्याची निकड या संदर्भात लक्षात येते.

वैचारिक लेखनासाठी नियतकालिकांचे माध्यम उपयुक्त ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये 'स्त्री', 'माहेर', 'मिळून साऱ्याजणी', 'बायजा', 'प्रेरक ललकारी', 'भाषा आणि जीवन', 'स्त्रीउवाच', 'पंचधारा', 'केल्याने भाषांतर', 'पालकनीती', 'आकांक्षा', 'मायमावशी' 'अक्षरयात्रा' आदी नियतकालिकांच्या संपादकवर्गातील स्त्रियांचे कर्तृत्व लक्षात घेण्याजोगे आहे. दैनिकांच्या अनेक पुरवण्यांचे

संपादनही स्त्रिया कौशल्याने करीत आहेत, याची येथे नोंद घ्ययला पाहिजे.

## समीक्षा

स्त्रीवादाशी निगडित समीक्षा करण्यासाठी स्त्रियांनाच पुढाकार घ्यावा लागत आहे. अश्विनी धोंगडे, शोभा नाईक, मंगला वरखेडे, शोभा पाटील, वंदना महाजन आदींनी स्वतंत्रपणे तसेच विविध वाङ्मयप्रकाराशी निगडित उपयोजित समीक्षा करताना स्त्रीवाद या संकल्पनेला तात्त्विक पाया देण्याचा प्रयत्न केला आहे. विविध वाङ्मयप्रकारांवर समीक्षा ग्रंथ लिहिणाऱ्यांमध्ये रेखा इनामदार-साने, उषा हस्तक (कादंबरी), पुष्पा भावे, शोभा देशमुख (नाटक), सुधा जोशी (कथा), विजया राजाध्यक्ष (कविता) यांचा विशेष उल्लेख करणे गरजेचे आहे. (विजया राजाध्यक्ष यांच्या 'मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ' (खं १ व २) ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.)

काही समीक्षाप्रणालींचा तात्त्विक विचार व उपयोजना करण्याचा प्रयत्नही झालेला दिसतो. उदाहरणार्थ, १. स्त्रीवादी व शैलीवैज्ञानिक समीक्षा- अश्विनी धोंगडे, २. चरित्रात्मक समीक्षा व वाचक प्रतिसाद सिद्धांत- विजया राजाध्यक्ष, ३. आदिबंधात्मक समीक्षा -अरुणा ढेरे, ४. सांस्कृतिक प्रवाहाची स्त्रीवादी समीक्षा- ज्योती लांजेवार, ५. काव्याची सांस्कृतिक अंगाने समीक्षा - नीलिमा गुंडी, ६. भारतीय साहित्यशास्त्र - सरोज देशपांडे, लीला गोविलकर इत्यादी.

वाङ्मयातील काही अलक्षित प्रांतांचा अभ्यास करण्यासाठी स्त्रिया पुढे येताना दिसतात. उदाहरणार्थ, 'मुस्लीम मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा-डॉ. नसीम देशमुख, 'दलित लेखिकांचे योगदान'- डॉ. माधवी खरात, 'समग्र मराठी आदिवासी साहित्य'- माहेश्वरी गावित. स्त्रीशिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे स्त्रियांचे एम.फिल, पीएच.डी.चे संशोधनपर लेखन समीक्षाग्रंथरूपाने प्रकाशित होत आहे. त्या सर्व लेखनाची मोजदाद करणे येथे शक्य नाही.

## संशोधन प्रकल्प

गेल्या काही वर्षांमध्ये स्त्रियांनी पूर्ण केलेले या क्षेत्रातील काम दखलयोग्य आहे. त्यामागे स्त्रीकेंद्री दृष्टिकोन दिसतो. त्यामुळे स्त्रीप्रश्नाच्या मुळाशी जाण्यासाठीचे उत्खनन करणे, त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी नवी प्रतिमाने घडवणे असेही होताना दिसते. अशा काही प्रकल्पांचा येथे निर्देश करते.

'बापलेकी' (संपा. पद्मजा फाटक, दीपा गोवारीकर) यामध्ये 'बापाविषयीची लेकींची मनोगते व लेकींविषयी बापांची मनोगते एकत्र केली असून त्यांचे समाजशास्त्रीय अंगाने विश्लेषण प्रस्तावनेत केले आहे. स्त्रीपुरुष या नात्यात लहानपणीच पाचर घातली जाते, ती दूर करण्यासाठीचे प्रबोधन यात अपेक्षित आहे. 'निःशब्दता ओलांडताना' आणि 'सृजनाचे साक्षात्कार' हे अंजली मुळे यांनी संपादित केलेले ग्रंथही अशाच आगळ्यावेगळ्या प्रकल्पांवर आधारित आहेत. स्वाती कर्वे यांचे 'स्त्रियांची शतपत्रे', गीतांजली जोशी आदींचे 'शततारका' (तेराव्या शतकापासूनच्या कवयित्रींच्या कविता) 'मनीषा पाटील यांचे 'रणरागिणी संयुक्त महाराष्ट्राच्या', डॉ. लीला दिक्षित यांचे 'शतकातील बालकविता', माधुरी पुरंदरे यांचे 'वाचू आनंदे' (भाग १ ते ४) 'सक्षम मी' शुभदा चौकट इत्यादी.

नुकताच सिद्ध झालेला 'संदर्भासहित स्त्रीवाद' (संपा. वंदना भागवत, अनिल सकपाळ आणि गीताली वि. मं.) हा ग्रंथ स्त्रीवादाची संदर्भचौकट व्यापक रूपात समोर ठेवतो. त्याची वंदना भागवतांची प्रस्तावना या प्रश्नाची अनेक परिमाणे लक्षात आणून देते.

या कालखंडात काही बृहद्संशोधन प्रकल्पही सिद्ध झाले आहेत. त्या साहित्यप्रेमी भगिनीमंडळ (पुणे), या संस्थेने तयार केलेले दोन प्रकल्प उल्लेखनीय आहेत. १) 'स्त्रीसाहित्याचा मागोवा' (१८५० ते २०००) खंड १ ते ३, २)'भारतीय भाषांतील स्त्रीसाहित्याचा मागोवा' (१८५० ते २०००) खंड १ व २, डॉ. मंदा खांडगे आणि इतर अनेकांच्या सहकार्याने हे खंड सिद्ध झाले असून २००१ ते २०१० मधील 'स्त्रीसाहित्याचा मागोवा' हा प्रकल्प चालू आहे. तसेच 'शाश्वती' तर्फे अरुणा ढेरे यांच्या मार्गदर्शनाखलीही अभ्यासप्रकल्प सुरू आहेत.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या 'स्त्री अभ्यास केंद्राने' 'स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा हा बृहद्प्रकल्प डॉ. सुमा चिटणीस यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. अशाप्रकारचे प्रकल्प ही साहित्यासाठी आधारभूमी आहे. अनुवादक्षेत्रातही एक बृहद्प्रकल्प सुरू झाला आहे. कविता महाजन संपादन करीत असलेल्या 'भारतीय लेखिका' या पुस्तकमालेच्या अंतर्गत ४० निवडक पुस्तकांचा अनुवाद केला जाणार आहे. त्यातील काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

## इतर लेखनक्षेत्रे

स्त्रीच्या लेखणीसाठी संपादन, बालसाहित्य, अनुवाद, लोकसाहित्याचे संकलन, कोश, सूची, भाषाविषयक लेखन इत्यादी अनेक क्षेत्रे आज मोठ्या प्रमाणात खुली झाली आहेत. (वीणा आलासे, मृणालिनी गडकरी, आसावरी काकडे आणि कविता महाजन यांना अनुवादासाठी साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांची नोंद घेणे गरजेचे आहे.) त्या सर्वांचा आढावा घेणे शक्य नाही.

कोशवाङ्मयासाठी आवश्यक ती चिकाटी आणि दीर्घोद्योग या बळावर स्त्रिया तेथेही कर्तृत्वाचा ठसा उमटवताना दिसतात. विश्वकोश (विजया वाड), मराठी वाङ्मयकोश खंड ४ (विजया राजाध्यक्ष), शब्दानंद (सत्त्वशीला सामंत) मराठी शब्द लेखनकोश (यास्मिन शेख), मराठी-रशियन-जर्मन शब्दकोश (सहभाग : अनघा

भट, सुनंदा महाजन) संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश (प्रभा गणोरकर, उषा टाकळकर) अनुवाद ग्रंथसूची (वीणा मुळे), पश्चिम खानदेशातील आदिवासी बोलींचा शब्दकोश (डॉ. पुष्पा गावीत) महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची सूची (मीरा घांडगे) ही त्याची काही ठळक उदाहरणे आहेत. तसेच संहिता संपादन आणि देवनागरी लिपीचे रोमन लिपीत लिप्यंतर या कामी सत्त्वशीला सामंत आणि मृदुला जोशी यांनी तज्ज्ञता मिळवली आहे. ही सर्व कामे म्हणजे साहित्यसाठीची उपयुक्त साधनसामग्री आहे.

**मर्यादा**

स्त्रीलिखित साहित्यसृष्टीचे अलीकडच्या काळातील हे चित्र स्त्रियांचा वाढता सहभाग आणि पुस्तकांची संख्या या संदर्भात नक्कीच आश्वासक आहे. मात्र हे चित्र पूर्णपणे समाधानकारक आहे, असे म्हणता येत नाही. किंबहुना या क्षेत्राच्या परिपूर्ण विकासासाठी त्याच्या मर्यादांची वेळीच जाणीव करून देणे अगत्याचे वाटते. याबाबतची माझी निरीक्षणे सूत्ररूपाने येथे नोंदवत आहे.

काव्य या वाङ्मयप्रकारात अनेक कवयित्री केवळ ‘अभिव्यक्ती’ या टप्प्याशी थांबताना दिसतात. अभिव्यक्ती ही निर्मितीच्या वाटेवरची खरे तर पहिली पायरी आहे. काव्याची संरचना, लय, प्रतिमा यांची जुजबी माहिती नसताना त्यांचे काव्यलेखन चालू राहते. त्यात हौसच अधिक असते. तसेच कथा-कादंबरी या वाङ्मयप्रकारांमध्ये ‘दीर्घकथा’, ‘लघुकादंबरी’ या संज्ञांविषयी काटेकोरपणा आढळत नाही. स्त्रीवादी कथात्म साहित्याचे वाङ्मयीन अंगाने चिकित्सक समीक्षण केले जात नाही. स्त्रीवादी काव्य आणि कथा यांचे सर्वसामान्यतः मोठ्या प्रमाणावर अनुकरण होत असून त्यात स्त्रीसंबद्ध अनुभवांचे एक प्रकारचे आवर्त निर्माण झाले आहे. चांगल्या स्त्रीवादी लेखिकांनी केवळ त्याच चौकटीत लिहीत न राहता व्यापक जीवनानुभवाला भिडण्याची गरज आहे. तसेच जागतिकीकरणानंतर अनुवादांना मोठ्या प्रमाणावर मागणी दिसत आहे. मात्र यातही बाजाराची गरज आणि सांस्कृतिक गरज यातले अंतर ओळखता यायला हवे. अनुवादांचे परीक्षणही व्हायला हवे.

स्त्रियांचे स्फूट लेखन मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होत आहे. अनेकदा ते लेखन तात्कालिक स्वरूपाचे, मर्यादित आवाहन असणारे उतरलेले दिसत. कोणत्याही प्रकारच्या स्फूटलेखनाला ललित लेखनाचा दर्जा (ही तक्रार फक्त स्त्रियांच्या लेखनापुरतीच नाही!) मिळणे धोक्याचे आहे. ललितलेखन हा ‘फॉर्मलेस फॉर्म’ आहे. त्यातील अपेक्षित लालित्य हे रंजक शैलीपुरते मर्यादित नाही, याची जाण लेखकांनी ठेवायला हवी. स्त्रिया संकीर्ण स्वरूपाचे लेखन आज खूपच मोठ्या प्रमाणात करीत आहेत. त्यामागे वाचकांची-नियतकालिकांची विविध विषयांवरील लेखनाची वाढती मागणीही कारणीभूत आहे.

अलीकडे स्वतः पुस्तक प्रकाशित करून घेण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. पण त्यामुळे संहितासंपादन ही प्रकाशनपूर्व संस्काराची प्रक्रियाच होत नसावी. भाषा, व्याकरण, मांडणी, मजकूर या सर्वच बाबतीत त्यामुळे दुर्लक्ष होत आहे. त्यात प्रयोगशीलतेचाही अभाव आहे. अनेकदा स्त्रियांच्या लेखनाचा भर माहिती देणे, वर्णन करणे यावर दिसतो. किंवा थेट निवेदन, विचारप्रक्षेपण या अंगांवर असतो. त्यामुळे लेखनातील कलात्मक सूक्ष्मता आणि सुसंघटित रूपाचा प्रभाव उणावतो. स्त्रियांनी संपादित केलेले कामही प्रचंड प्रमाणात आहे. मात्र बऱ्याचदा माहितीचे संकलन केल्यानंतर चिकित्सक निवड, सुसूत्रीकरण, वर्गीकरण, विश्लेषण या प्रक्रियेची गरज त्यांनी लक्षात घेतलेली नसते. त्यामुळे माहितीचे वा अनुभवांचे सार काढून ज्ञानात्मक पातळीवरील विधान सिद्ध करण्याकडे बऱ्याच जणींचा कल दिसत नाही. (अर्थात अपवाद आहेतच!)

समीक्षालेखनातही स्त्रिया बहुधा एकरेषीय पद्धतीने विचारांची मांडणी करण्यात गुंततात. विविध ज्ञानशाखांकडून मिळालेल्या मर्मदृष्टींच्या आधारे नवी सैद्धांतिक मांडणी करणे, नवे विचारव्यूह घडवणे या बौद्धिक क्षेत्रातील निर्मितीत स्त्री अजूनही मागे दिसते. वास्तविक आज विविध भारतीय भाषांमधील स्त्रीवादी तसेच स्त्रीकेंद्री अशा अनेक कलाकृती मराठीत अनुवादित झालेल्या आहेत. पण तौलनिक साहित्याभ्यासासाठी स्त्रिया पुरेशा प्रमाणात पुढे आलेल्या दिसत नाहीत. किंबहुना आज साधनग्रंथांची संख्या पुष्कळ असून स्त्री अभ्यासकांचीच उणीव जाणवत आहे.

स्त्रीसाहित्याचा संचय आणि सातत्याने अभ्यास करणे एक मध्यवर्ती केंद्र नसल्यामुळे सर्वच स्त्रियांचे लेखन विचारात घेतले जातेच, असे नाही. तसेच मराठीमध्ये इतर भारतीय वा परकीय भाषांमधून ज्या प्रमाणात साहित्य येत आहे, त्या प्रमाणात आपले स्त्रीसाहित्य अनुवादित होऊन जाताना दिसत नाही. या त्रुटींमुळेही मराठीतील स्त्रीसाहित्याच्या चैतन्यपूर्ण रूपाचा राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटताना दिसत नाही. यावर मार्ग शोधण्यासाठी आपण प्रयत्नशील असायला हवे!

**– डॉ. नीलिमा गुंडी**
३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ,
सुभाषनगर, गल्ली क्र.५,
पुणे – ४११००२
दूरध्वनी : ०२०-२४४८६०१५
nmgundi@gmail.com



# उद्योजिकेची मानसिकता

**। अचला जोशी**

आज चाळीसाहून अधिक वर्षं उद्योगात घालवल्यावर शांतपणे मी माझ्या पूर्वायुष्याकडे वस्तुनिष्ठ पद्धतीनं पाहत आहे. मला माझी मानसिकता अनुभवानं, परिस्थितीनं किंवा केलेल्या दृढनिश्चयानं अनेक स्तरांवरून बदलत गेलेली आढळते.

चाळीस वर्षांपूर्वी नोकरीच्या निमित्तानं झालेल्या परदेशच्या दौऱ्यात बऱ्याचदा सभा-संमेलनांना जावं लागायचं. त्या निमित्तानं होणाऱ्या मेजवान्यांत हमखास जेवणाबरोबर वाईन दिली जायची. तिथे माझा वाईनशी खरा परिचय झाला आणि मला तिची महती कळली. वाईनचा एखादा ग्लास जेवणाची लज्जत वाढवतो, वृत्ती फुलवतो आणि मनाला शांतवतो ते आवडलं. वाईनमधला मद्यार्क स्वयंनिर्मित असतो; तीव्र स्वरूपाचा, बाहेरून घातलेला नसतो. त्यामुळे वाईन प्रकृतीला हानिकारक नसते. उलट, वाईन ही फळांचा सर्वोत्तम आविष्कार मानली जाते. मर्यादित सेवन केलं तर ती तब्येतीला फलदायी ठरते. मुख्य म्हणजे वाईन ही व्हिस्की, जिन, व्होडका वगैरे प्रकारांत मोडणारी 'दारू' नसते.

मला स्वयंपाक करायची खूप आवड आहे. परदेशातून परतल्यावर घरी त्या त्या देशाच्या खासियती मी जेवणात करून पाहत असे. त्याकाळात मुंबईत वाईन सहसा मिळत नसे. तेव्हा आपण वाईनही करून पाहावी असं मनात येई. एव्हाना मी वाईनसंदर्भात बरीच पुस्तकं विकत घेऊन बारकाईनं वाचली होती, त्यातल्या माहितीच्या आधारे मी पहिल्यांदा पाच लिटर वाईन केली आणि ती चांगलीही झाली. आजूबाजूच्या सर्व मित्रमंडळींनाही माझी वाईन खूपच आवडली. सर्वांनीच मला वाईन करत राहण्याचा सल्ला दिला. त्या प्रोत्साहनानं मलाही उत्साह आला.

एकदा आपल्याला वाईन करणं जमतंय हे लक्षात आल्यावर मी पस्तीस लिटर वाईन केली. ती सर्वांना देऊन झाल्यावर काही परिचितांनी ती विकत घ्यायची तयारी दाखवली. मग मी ऐंशी लिटर वाईन केली. हे सर्व घरच्या घरी होत होतं. पण कुठेतरी प्रशस्त वाटत नव्हतं. वाईन करायला एक्साइजचा परवाना लागतो हे कळलं होतं. तेव्हा घरी अशा प्रकारे वाईन करणं हे कायद्याविरुद्ध असणारं होतं. म्हणून एक्साइज कमिशनरनाच जाऊन भेटले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यानंतर पुढची दोन वर्षं वाईननिर्मितीला आवश्यक असणारी जागा घेणं, निरनिराळ्या सरकारी खात्यांची 'ना हरकत' प्रमाणपत्रं मिळवणं, एकीकडे वाईनबाबत निरनिराळे प्रयोग करणं आणि दुसरीकडे नोकरी, घर सांभाळणं, यात धावपळ होत होती. पण करायचंच म्हटल्यावर करायचं या दृष्टीनं प्रयत्न करत राहिले. केवळ चिकाटीमुळे मला परवानाही मिळाला पण त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रं सरळ मार्गानं मिळवताना जवळजवळ दोन वर्षं गेली होती. आलेल्या अनेक अनुभवांवरून मला वाटतं, की स्त्री-पुरुष, कोणालाही स्वतंत्रपणे उद्योग उभा करता येणं शक्य आहे.

मी वाईनचा उद्योग करायला लागले याचं अनेकांना आश्चर्य आणि बऱ्याच लोकांना कौतुक वाटलं. मला आणि आमच्या कुटुंबाला त्यात काहीही अक्षेपार्ह वाटत नसल्यानं मी आत्मविश्वासानं काम पुढे रेटत नेत होते. फक्त आईला आणि सासूबाईंना वेगळीच काळजी वाटत होती. आमच्या दोन्ही घरांत व्यावसायिकच होते. मग माझ्या उद्योगात मला काही समस्या आल्या तर मला मार्गदर्शन कोण देईल अशी चिंता त्या दोघींना होती.

काहीही करण्याची इच्छा असली की मार्ग सापडत असतात. खरं तर मार्ग असतात, ते दिसायला लागतात.

आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला कायमच दुय्यम स्थान मिळालं होतं आणि अगदी आता-आतापर्यंत स्त्रीनं ते स्वतःच मान्य केलं होतं. पूर्वी काही सुशिक्षित महिला नोकरी करून संसाराला हातभार लावत होत्या, पैसे मिळवत होत्या. एका अर्थी घरात पुरुषांची आणि बाहेर नोकरीची वेगळी गुलामगिरीच करत होत्या! त्यांना त्याचीही सवय होत होती. आजही माझ्या माहितीतल्या कित्येक स्त्रिया आपल्या नोकरीचा सर्वच्या सर्व पगार घरात देतात. त्यांना स्वतःसाठी काही घ्यायचं असलं तर नवऱ्याकडून पैसे आणि मुख्य म्हणजे त्याची परवानगी घेतात. यात त्यांना कधी गैर वाटलेलं दिसत नाही. वाटत असलं तर ते आविष्कृत होत नाही.

कधीतरी आपली सहज कोणाशीतरी ओळख करून दिली जाते. ''बाई, काय करता तुम्ही?'' या प्रश्नाला ''काही नाही, घरातच असते'' हे उत्तर मिळतं. या उत्तरावरनं घरातलं काम

अहोरात्र करणाऱ्या या उद्योगिनीची मानसिकता कळते. वास्तविक घर सांभाळणं हे पूर्ण वेळाचं काम आहे. 'घरातच असते' म्हणणारी बाई घरासाठी खस्ता खात असते. एकावेळी अनेक कामं करताना वेळेचं नियोजन करते, मुलांना संस्कार देऊन वाढवते, नवऱ्याच्या वेळा सांभाळते, घरातली अन्नपूर्णा होऊन आल्या-गेलेल्याचं अगत्य करते. हे अंगवळणी पडलेलं काम करताना तिलाही आपल्या श्रमांबद्दल काही विशेष वाटत नाही, त्यामुळे त्याचा उच्चार नाही, मग घरच्या माणसांना आणि समाजालाही काय वाटणार?

''पस्तीस वर्षांपूर्वी एक स्त्री देशाची पंतप्रधान होते, शरयू दोशीसारखी स्त्री मोटार बांधणीच्या क्षेत्रात काम करते, अनिला भाजेकर वैमानिक होते, प्रफुल्ला डहाणूकर यशस्वी चित्रकार होते, त्या देशात स्त्रीची बूज राखली जात नाही हे कसं म्हणता येईल?'' हा प्रश्न विचारला जातो, पण ते सर्व अपवाद होते.

सर्वसाधारण वर्गातल्या स्त्रीला काही करावंसं वाटण्याची जागृती येत होती, पण स्वतःला फारसं महत्त्व न देण्याची एक न्यूनगंडात्मक भावना तिला चिकटलेलीच होती. उद्योग करू इच्छिणाऱ्या स्त्रियांनी आपली ही न्यूनगंडाची मानसिकता बदलायला हवी. खर्च होणारा वेळ म्हणजे खर्च होणारं आपलं आयुष्य असतं या भावनेनं त्याचं मूल्य समजायला शिकलं पाहिजे.

गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मध्यमवर्गातल्या काही स्त्रिया स्वतंत्रपणे काही उद्योग करायला लागल्या. त्यांचं उत्पादन सहसा घरगुती गोष्टींचं असे. लोणची, पापड, लाडू, चिवडा, बाळंतविडे, कापडी पिशव्या, पेटीकोट अशासारख्या वस्तूंचं असे. काहीजणी नकली पण आकर्षक दिसणारे दागिने करण्याची कला शिकून दागिने बनवून विकायला लागल्या. काचेवरचं पेंटिंग, निरनिराळ्या प्रकारच्या मेणबत्त्या, पणत्या, तोरणं यांचीही त्यात हजेरी असे. सहसा हे सर्व घरीच बनवलं जात असल्यानं त्यात फारसं भांडवल गुंतवण्याची गरज नसल्यामुळे स्त्रियांना ते अधिक सोपं वाटे.

ज्या स्त्रिया हे गृहउद्योग चालवतात, त्यांच्या मानसिकतेकडे पाहायचं तर ती उद्योजिकेची नसून गृहिणीची असते. आपल्या उत्पादनाची किंमत ठरवणं हा उत्पादनाच्या व्यवहारातला सर्वात महत्त्वाचा भाग असतो. उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल, त्यासाठी लागणारं इतर सामान यांची किंमत ठरवताना त्या हिशोब ठेवतात, पण स्वतःच्या कामाचे, त्यासाठी गेलेल्या वेळाचे काहीही पैसे लावत नाहीत. बाकी घराचा, घरातल्या वस्तूंचा, गॅस, भांडी यांचा घसारा लावणं तर पुढचीच गोष्ट, पण स्वतःची मेहनत, वस्तू प्रमाणित करत असताना केलेले आधीचे श्रम, कधी त्यासाठीच्या संशोधनासाठी घेतलेली पुस्तकं, कच्चा माल आणण्यासाठी जाता-येता खर्च झालेला वेळ हे काहीही आकारलं जात नाही. यात दोन गोष्टी होतात. 'घरी केलेलं स्वस्त पडतं' या खोट्या समजुतीला बळकटी येते. यात आपण स्वतःच स्वतःचं अवमूल्यन करून घेतो हे त्यांच्या लक्षातही येत नाही. त्यांची तशी मानसिकताच नसते. त्यांना स्वतःलाच स्वतःच्या वेळेची किंमत लावायचं लक्षातही येत नाही, कारण हे आवश्यक खर्चाचे हिशेब यात घातलेलेच नसतात. म्हणून आपण आपल्या उत्पादनाचा दर ठरवताना आपला मेहनताना आणि खर्च झालेला वेळ लक्षात घ्यायलाच हवा. उत्तम उत्पादनाचा आनंद हा व्यवहाराचा एक निकष ठरू शकत नाही, त्याची आवश्यकताही वाटत नाही, तिथे कुंटुंबातले आणि समाजातले लोक त्यांना काय विचारणार?

याचा परिणाम म्हणजे, बाजारातल्यापेक्षा मस्त आणि नीट दर लावण्यामागच्या या भोंगळपणामुळे होणारा स्वस्त माल खूप खपायला लागतो. त्याचा पुरवठा करताना या उद्योजिकांना अक्षरशः रात्रीचा दिवस करावा लागतो. परिणामी अतिश्रमानं बऱ्याचदा तब्येतीवर परिणाम होतो आणि काम होईनासं होतं.

गंभीरपणे ज्यांना उद्योग करायचा असेल त्यांना उद्योगात यशस्वी होण्यासाठी काही गोष्टींची आवश्यकता असते. यात पहिली अत्यंत आवश्यक गोष्ट असते, ती म्हणजे आपण कसलं उत्पादन करायचं हे ठरवणं. ते एकदा निश्चित झालं की त्या संदर्भात शक्य तेवढी आणि शक्य तिथून माहिती गोळा करायची. त्या माहितीच्या आधारे आणि आपणही तो जिन्नस आधी करत असलो तर त्या अनुभवानं हळूहळू प्रमाण वाढवत न्यायचं आणि सतत केलेलं उत्पादन एकीकडे विकायचा प्रयत्न करायचा. यामुळे आत्मविश्वास वाढतो. जर उद्योजिका गृहिणी असेल तर तिला घरातल्या सर्वांचा मानसिक सहभाग लागतो. यातला एक मंत्र म्हणजे 'मी नव्हे, आपण'. नवऱ्याशी, मुलांशी बोलताना- आज आपलं इतकं उत्पादन झालं. आज आपली इतकी विक्री झाली अशी भाषा वापरली तर विरोध होत नाही.

एकदा काय करायचं ते ठरलं आणि ते साधायला लागलं की त्यासाठी लागणारे परवाने, निर्मितीसंदर्भातल्या अटी यांची पूर्तता करायला लागते. आपल्या उत्पादनासंबंधात काही अटी, नियम, परवाने, टॅक्स लागू असतात. आपल्या उत्पादनाबाबत आपल्याला नीटपणे माहिती असायलाच हवी. त्यांची बरोबर माहिती घेऊन वेळोवेळी त्यांचं पालन आणि पूर्तता होते आहे ना याची खबरदारी घ्यायलाच हवी. कोणी एखादा दुय्यम अधिकारीही येऊन तुम्हाला दमात घेऊ शकणार नाही, या बायका अशाच- असा ताशेरा मारणार नाही. कारण एक लक्षात ठेवा, आपण आता पुरुषांच्या बरोबरीला आलो आहोत. अशावेळी उद्योजिकेची मानसिकता घडायला लागते, आकार घ्यायला लागते.

बऱ्याचदा प्रमाणपत्र घेण्यासाठी आपण कुठल्यातरी कार्यालयात जातो. बऱ्याचदा समोरच्या अधिकाऱ्यापेक्षा आपल्याला आपल्या विषयाची माहिती जास्त असते. आपण आपलं काम करायला जातो, अशावेळी समोरचा माणूस महिला आहे की पुरुष आहे हेही लक्षात येत नाही. आपलं महिलापण असतं ते आपल्या दारात! समाजात वावरताना कित्येकदा इतर पुरुषांनाही न जमणाऱ्या गोष्टी



आपण करतो, हे आपलं आपल्याला कळत असतं. त्या आत्मविश्वासाने आपली मानसिकता घडते. ती एका उद्योजिकेची असते.

आपण आपल्या पायांवर उभं राहण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करणार आहोत आणि जे करू इच्छितो त्याची आपल्याला पूर्ण माहिती आहे हे दोन विचार मनात ठामपणे ठसले की आपण एक उद्योजक व्यक्ती होतो. बाई-पुरुष याच्या संदर्भापलीकडे जातो. आपल्या मनात कोणताही गंड राहूच शकणार नाही अशी मानसिकता तयार होते ती आपल्या उत्पादनाच्या दर्जावरून, त्या संदर्भातल्या चोख व्यवहारातून आणि आपल्या व्यक्तिगत प्रामाणिकपणातून. हे सर्व एकत्र आल्यावर आपल्याला कुठेही कमीपणा घ्यायची गरजच राहत नाही.

प्रामाणिकपणे, उत्पादनावरल्या श्रद्धेनं आणि सर्व पूर्तता केल्यावर स्त्री आणि पुरुष हे भेदच मनात राहत नाहीत. ही मानसिकता स्वतःच्या अनुभवानं आणि कमावलेल्या अनुभवानं आल्यावर पुरुषाच्या मानसिकतेपेक्षा स्त्रीची मानसिकता वेगळी असूच शकत नाही.

स्त्रियांना एक अडचण प्रामुख्यानं वाटते ती म्हणजे भांडवलाची. ज्या महिला गृहउद्योग करत असतात आणि ज्यांची मानसिकता सकारात्मक असते अशा महिला उद्योजकांना आजकाल उद्योजक आणि व्यापारी मित्रमंडळांकडून किंवा बँकांतूनही सुलभ परतफेडीच्या बोलीवर कर्ज मिळतं. या मानानं व्यक्तिगत कर्ज जरी सुलभतेनं आणि लवकर मिळत असलं तरी ते कधीही घेऊ नये. अनेकदा त्यातून व्यक्तिगत संबंध बिघडतात.

उद्योजिकेनं सतत आत्मपरीक्षण करत राहावं. त्यानं तिची मानसिकता अधिक सुदृढ होते. वर्षानुवर्षं पितृप्रधान समाजाच्या दडपणाखाली असल्यानं मनात काही शंका, भीती-आपण स्वतंत्रपणे पाऊल उचललं आहे, आपल्याला जमेल ना? निभावता येईल ना? ही भीती साहजिक असली तरी आपणही माणूस आहोत, 'जे एकाला जमतं ते मला का जमू नये?' हा प्रश्न सतत मनात ठेवावा. त्यामुळे आपलीच मानसिकता प्रसन्न होत असल्याचं जाणवतं.

उद्योजक पुरुष आणि उद्योजिका स्त्री यांच्या मानसिकतेमध्ये फरक काय असतो हा प्रश्न मला बऱ्याचदा पडतो. कोणता उद्योग आपल्याला करायचा आहे हे एकदा ठरलं की त्या संदर्भात संपूर्ण माहिती करून घेणं, आपल्या उत्पादनाचे सतत प्रयोग करत राहणं, त्याच्या नोंदी करून ठेवणं आणि अनुभवातून मिळालेलं ज्ञान वापरून

उत्पादन सुरू करायचं. यात एका स्त्रीचे आणि पुरुषाचे विचार वेगळे कसे असू शकतील?

जसा उद्योग सुरू होतो, वाढतो, तशी काही कर्मचाऱ्यांची गरज लागते. भारतातल्या किंवा कुठल्याही पुरुषांना बाईंकडून काम उरकणं आवडत नाही. हा एक प्रश्न येतो. याला माझं एकच उत्तर आहे : आपल्या उत्पादनाची संपूर्ण माहिती आपल्याला तर हवीच, शिवाय ती सतत प्रगतशील असायला हवी. जेव्हा कर्मचाऱ्यांना आपल्या बाईंना उत्पादनाची संपूर्ण माहिती आहे, तिच्यात नवी नवी भर पडत आहे हे लक्षात येतं तेव्हा त्यांच्याशी स्नेहाचं नातं जुळतं आणि त्यांचं पूर्ण सहकार्य आपल्याला मिळतं.

जशी व्यक्तिगत, तशीच उद्योगाबाबतही मूल्यं असतात. त्या मूल्यांशी तडजोड, मग ती काम लवकर करून घेण्यासाठी असो की काही फायदा मिळवण्यासाठी असो, ती कधीही करू नये कारण एकदा ती मानसिकता तयार झाली की पुढे उत्पादनाच्या दर्जाशीही तडजोड व्हायला लागते. उद्योग वाढला की लोकांचा किंवा बँकेचा पैसा कर्जाऊ घेतला जातो. त्या पैशांशी उद्योजक खेळायला लागतो. ही सवय मुलेकुठार: पद्धतीनं घालवून टाकावी.

उद्योगात सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे दर्जेदार उत्पादन हे तर खरंच, पण ते एकदा बाजारात यायला लागलं की त्यातनं मिळणारा पैसा हाच महत्त्वाचा असतो हे लक्षात ठेवायला लागतं. कारण उद्योग हा पैसे मिळवण्यासाठी करायचा हे मनावर पूर्ण बिंबवा. मिळालेल्या पैशांतूनच उद्योग वाढवता येतो, शिवाय आपल्याला काही पैसे आपल्या कामगारांना द्यायला लागतात. मला समाजकार्याची ओढ आहे. साहजिकच सुरुवातीला केवळ काही महिलांना, त्यांची क्षमता लक्षात न घेता कामावर घेतलं आणि त्यांच्याकडनं झालेलं नुकसान मला धडा देऊन गेलं. त्यामुळे समाजकार्य आणि उद्योग ही दोन वेगळी क्षेत्रं आहेत याची प्रचिती आली. समाजकार्यात उद्योग नाही आणि उद्योगात समाजकार्य नाही. उद्योगात पैसा मिळवून तो समाजकार्याला द्यावा. जे पुरुष करू शकतात ते बायकांना का जमत नाही? मला तर वाटतं वेळाचं नियोजन हे महिला सहजपणे दिवसभर करत असते. तेवढं पुरुषांना जमणं कठीण आहे.

काहीही झालं तरी पहिल्या दिवसापासून एकही दिवस तोटा घ्यायचा नाही ही दृष्टी ठेवायची. दोन रुपये का होईना, पण फायदा झालाच पाहिजे हे विसरायचं नाही. जशी आपली मानसिकता आपल्याला आत्मविश्वास मिळवून देते. कोणी एखादा साधा अधिकारी मानसिकता बदलायला हवी. ती बदलायला दोन गोष्टींची गरज आहे. पहिली म्हणजे आपण उद्योजकच आहोत हे पक्कं ध्यानात घ्यावं– बाई आणि पुरुष यात फरक मानायची गरज नाही. दुसरं, आपण स्त्री असून प्रामाणिकपणे, निष्ठेनं उद्योग करतो आहोत, प्रामाणिकपणे तो पुढे नेत आहोत या आत्मविश्वासानं मार्ग निवडलेल्या मार्गानं पुढे जायचं. काही दिवसांत स्त्री उद्योजिकांचा आकडा वाढत जाणार आहे. उद्योजक आणि उद्योजिका हा भेद आपण मानातनं घालवायचा.

आता उच्च आणि तांत्रिक शिक्षणाच्या जगात आपल्या तरुण मुली खूप पुढे येत आहेत, आत्मविश्वासानं अनेक क्षेत्रांत प्रगती करताहेत हे खूप आशादायी चित्र आहे. आजही उद्योग करणाऱ्या बाईचं विशेष कौतुक होतं कारण महिला स्वतंत्रपणे यशस्वी उद्योजिका होऊ शकते हे स्वीकारायची पुरुषांची किंवा खरं तर समाजाची मानसिकता नाही.

उद्योग सुरू करताना आणि तो वर्धिष्णू होताना उद्योजिकेची मानसिकता वारंवार बदलत जाते. यातला आनंद म्हणजे ती बदलती मानसिकता तिची तिला जाणवते आणि तिच्या मनाला सार्थक आनंदही देते.

**– अचला जोशी**
सी–११, आसावरी,
२१४, वीर सावरकर मार्ग,
हिंदुजा हॉस्पिटलजवळ,
माहीम, मुंबई–४०००१६
दूरध्वनी : २४४६७९२६
joshi.achala@gmail.com

**ग्रंथाली**

**तसा मी.. असा मी...** बाळ खरे



शंकराचार्यांचा नातू असलेल्या बाळासाहेबांच्या पोतडीत असलेले वेगवेगळे आणि अविश्वसनीय अनुभव प्रांजळपणे मांडलेले आत्मकथन...

**मूल्य २५० रु. सवलतीत १६० रु.**

**तांबट** प्रल्हाद जाधव




सुखाच्या शोधात भटकत राहणं हा माणसाचा स्वभाव आहे. पण बऱ्याचदा ते सुख आपल्या जवळच कुठंतरी असतं, बघण्याची दृष्टी असली म्हणजे झालं.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**



# जेंडर बजेटिंग आणि महिला कल्याण

**। डॉ. आशुतोष रारावीकर**

स्त्री ही अनंतकाळची माता असते. ती जीवनदायिनी असते. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे ती असते. अनेक महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये ती असते. यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः – अर्थात जिथे स्त्रियांची पूजा-सन्मान केला जातो तेथे देवदेवताही रममाण होतात. देवतांप्रमाणे स्त्रीचीही अनेक रूपे आहेत. पत्नी, बहीण, आई, मुलगी, सखी, कार्यकर्ती, अधिकारिणी इत्यादी. आपण सर्व स्वरूपांतल्या देवतांची पूजा करतो, त्याप्रमाणे अशी अनेक रूपे धारण केलेल्या या स्त्री-देवतांना संतुष्ट स्वरूपात ठेवणे आवश्यक आहे. पण देशातली स्त्रियांची अनेक क्षेत्रांतील दारुण स्थिती पाहता मन अस्वस्थ होते. ही परिस्थितीती बदलली पाहिजे. यासाठीच जेंडर-बजेटिंग हा एक कल्याणकारी आर्थिक प्रकल्प शासकीय पातळीवर गेल्या काही वर्षांपासून राबवला जात आहे. या प्रकल्पात क्रांतिकारी परिवर्तनक्षमता आहे. याचे स्वरूप, विविध पैलू आणि त्यांच्या अधिक परिणामकारक अंमलबजावणीसाठी आवश्यक सुधारणा याबाबत प्रबोधन व्हावे, जागरूकता वाढावी व पुढील मार्गाने यशस्वी वाटचाल व्हावी या हेतूने केलेला हा लेखप्रपंच.

**जेंडर बजेटिंग : संकल्पना व अर्थ**

भारतीय घटनेने कोणताही लिंगभेद न करता सर्व स्त्री-पुरुषांना समान हक्क व स्वातंत्र्य दिले आहे. परंतु अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळे आणि विकृती यामुळे हे हक्क, संधी आणि स्वातंत्र्य अनेक स्त्रियांना मिळत नाही. लैंगिक समतेच्या पायावर हे साध्य करण्यासाठी योग्य ती धोरणे, योजना व कार्यक्रम आखणे व ते राबवण्यासाठी स्वतंत्रपणे पुरेशा निधीची तरतूद अर्थसंकल्पात करणे याला जेंडर रिस्पाँसिव्ह बजेटिंग अर्थात जेंडर बजेटिंग म्हणतात. स्त्रियांच्या बाबतीतली सामाजिक आणि आर्थिक विषमता ही प्रकृतिस्वास्थ्य, पोषण, साक्षरता, शिक्षण, व्यावसायिक कौशल्य अशा अनेक निर्देशांकांवरून दिसून येते. बालमृत्यू, गरोदरपणातील सुविधांचा अभाव, बालविवाह, कुपोषण, बालमजुरी, हिंसा, लैंगिक अत्याचार, अल्प मजुरी, असुरक्षितता, हुंडा अशा अनेक समस्यांमधून आयुष्याच्या विविध अवस्थांमध्ये स्त्रियांना जावे लागते. या सर्व गोष्टींचे निराकरण करण्यासाठी जेंडर बजेटिंग हा प्रभावी मार्ग आहे. यात अर्थसंकल्पाच्या सर्व टप्प्यांमध्ये स्त्रियांचा स्वतंत्र विचार केला जातो. नियोजन, धोरणनिर्मिती, कार्यक्रमांची आखणी, बाधित स्त्रियांच्या गरजांची ओळख, निधीची प्राधान्याने तरतूद, उपायांची अंमलबजावणी व मूल्यांकन. हे जेंडर बजेट प्रक्रियेत पाच टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात, सर्व क्षेत्रांतील स्त्रियांच्या व बालकांच्या परिस्थितीचे विश्लेषण केले जाते. दुसऱ्या टप्प्यात, सद्यस्थित

धोरणांची पाहणी करून अशी आवश्यक ती धोरणे आखणे, ज्यामुळे समस्यांचे निराकरण होईल. तिसऱ्या टप्प्यात, या धोरणांच्या अंमलबजावणीसाठी पुरेशा निधीची तरतूद करणे. चौथ्या टप्प्यात, नियोजन केल्याप्रमाणेच निधी त्यासाठी खर्च होतो आहे ना याची तपासणी व खात्री केली जाते. पाचव्या टप्प्यात, धोरणाचे व खर्चाचे मूल्यांकन करणे म्हणजेच लैंगिक समता व न्याय प्रस्थापित होत आहे ना हे तपासले जाते. अशा प्रकारे लैंगिक समस्या व समतेच्या अभावाची कारणे शोधून त्यांचे निराकरण करण्यासाठी योग्य धोरणे व उपाययोजना आखल्या जातात. त्यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी निश्चित केली जाते व त्यासाठी आवश्यक व पुरेशा निधीची तरतूद केली जाते.

## जागतिक प्रसार व विस्तार

अर्थसंकल्प व धोरणे ही लैंगिक समता प्रस्थापित करण्यासाठी अनुकूल व प्रतिसादात्मक करण्यासाठीचे एक महत्त्वाचे साधन म्हणून जागतिक स्तरावर जेंडर बजेटिंगचा उदय आणि विस्तार झाला. १९८० च्या मध्यावर जेंडर बजेटिंगची सुरुवात करणारा ऑस्ट्रेलिया हा पहिला देश होता. नंतर याचा वेगाने प्रसार झाला व सध्या नव्वदहून अधिक देशांमध्ये हे अस्तित्वात व प्रचलित आहे. निरनिराळ्या देशांतील परिस्थितीनुसार त्याचे स्वरूप, आवाका आणि प्रभाव वेगवेगळा आहे.

जेंडर बजेटिंगद्वारा आफ्रिकेने शिक्षण, आरोग्य व कृषी क्षेत्रातील गरीब महिलांसाठीच्या खर्चावर लक्ष केंद्रित केले आहे. लॅटिन अमेरिका व दक्षिण आफ्रिकेत लैंगिक हिंसाचाराचे उच्चाटन करण्याला प्राधान्य आहे. इंग्लंडमध्ये विविध कर व लाभ यांचे स्त्रियांच्या संदर्भात विश्लेषण केले जाते. स्त्रियांच्या बाबतीत करातून सूट, दारिद्र्यनिवारण, पेन्शन, गरोदरपणातील सुविधा व रोजगार यावर लक्ष केंद्रित केले जाते. स्त्री-पुरुषांच्या उत्पन्नात समानता आणण्यावर भर दिला जातो. महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी अग्रक्रमाने निधी पुरवला जातो. युगांडामध्ये २००१ मध्ये कायद्याने जेंडर बजेटिंग आणले गेले. खासदारांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या. अशाप्रकारे जगात व्यापक प्रमाणावर जेंडर बजेटिंगद्वारा महिला-कल्याणाचे प्रयत्न चालू आहेत.

## भारतातील लैंगिक विषमता व भेद

युनोच्या 'युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम'ने (UNDP) प्रसिद्ध केलेल्या २०११च्या मानव विकास अहवालानुसार (Human Development Report) लैंगिक विषमता निर्देशांकाच्या (Gender Inequality Index) बाबतीत भारताचा जगात १२९ इतका मागचा क्रमांक लागतो. आपले शेजारी पाकिस्तान (क्र. ११५), बांगलादेश (क्र. ११२) व श्रीलंका (क्र. ७४) हेही याबाबतीत आपल्या पुढे आहेत. नॉर्वे (क्र. ६), ऑस्ट्रेलिया (क्र. १८) व चीन (क्र. ३५) हे देश तर बरेच पुढे आहेत. शून्य (पूर्ण लैंगिक समानता) ते एक (पूर्ण लैंगिक विषमता) यामध्ये मोजला जाणारा हा निर्देशांक भारताच्या बाबतीत ०.६१७ असून जागतिक सरासरीपेक्षाही (०.४९२) आपण मागे आहोत.

भारतात स्त्रियांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४८ टक्के आहे. परंतु आरोग्य, शिक्षण, आर्थिक संधी अशा अनेक सामाजिक निर्देशांकांच्या बाबतीत स्त्रिया पुरुषांच्या मागे आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील लैंगिक गुणोत्तर (Sex Ratio) ९४० असून ते जागतिक सरासरीपेक्षा (९८४) कमी आहे. भारतातील महिलासाक्षरतेचे प्रमाण ६५.४ टक्के असून राजस्थान व बिहार या राज्यांत तर ते ५२ ते ५३ टक्के इतके कमी आहे. ११व्या पंचवार्षिक योजनेत नमूद केल्यानुसार कुटुंबनियोजनामुळे लैंगिक विषमता वाढता कामा नये, ही जागृती घडवून आणली पाहिजे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अ‍ॅण्ड पॉलिसी (NIPFP) या दिल्लीच्या संस्थेच्या अभ्यासातून असा निष्कर्ष निघाला आहे की भारतात सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत; विशेषतः आरोग्य, शिक्षण व आर्थिक कामात सहभाग यामध्ये स्त्रिया पुरुषांच्या मागे आहेत. या सर्व गोष्टी बोलक्या असून महिलाकल्याण व सक्षमीकरणासाठी जेंडर बजेटिंग हे अत्यंत आवश्यक आहे व ते यशस्वी केले पाहिजे हे लक्षात येते.

## भारतातील जेंडर बजेटिंग

भारतीय घटनेने महिलांना समान अधिकार दिले आहेत. महिलांना मताचा अधिकार देणारे भारत हे जगातल्या पहिल्या राष्ट्रांमधील एक आहे. महिलांना त्यांचे हक्क आणि संधी संपूर्ण जीवनभर (womb to tomb) मिळावे म्हणून सरकारने जेंडर बजेटिंग आणले. जेंडर बजेटिंगला अर्थ मंत्रालयात संस्थात्मक स्वरूप देणारा भारत हा जगातला पहिला देश आहे. महिला-कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताने १९८० ते १९९०च्या दशकात पुढाकार घेतला. भारताने १९८० मध्ये 'कन्व्हेन्शन ऑन एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट वुमेन'वर सह्या केल्या. १९९३च्या व्हिएन्नातील जागतिक परिषदेत भारताने महिलाहक्क हे मानवीहक्क आहेत हे ठासून सांगितले. १९९५च्या बिजिंगच्या चौथ्या जागतिक महिला परिषदेत भारताने महिलांच्या समता, विकास व शांतता या ध्येयांसाठी लढण्याचा आपला निर्धार जाहीर केला. तसेच १९९५ च्या 'कॉमनवेल्थ प्लॅन ऑफ अ‍ॅक्शन ऑन जेंडर अँड डेव्हलपमेंट'मध्ये सरकारने स्त्री-पुरुषांच्या जीवनभरासाठीचा समान हक्क व संधी प्रस्थापित करणे हे आपले ध्येय जाहीर केले.

नवव्या पंचवार्षिक योजनेत (१९९७-२००२) असा दंडक घातला की कमीत कमी ३० टक्के निधी आणि लाभ हे विकासक्षेत्रांकडून स्त्रियांपर्यंत पोहोचले पाहिजेत. २००३ मध्ये

अर्थमंत्रालयाच्या तज्ज्ञ गटाने शिफारस केली की सर्व मंत्रालयांनी अर्थसंकल्पातील किती पैसा स्त्रियांसाठी वापरला जातो ह्याची आकडेवारी नियमितपणे सादर करावी. या गटाने सर्वांना जेंडर बजेटिंगचे निकष ठरवून दिले. त्यानुसार महिला मंत्रालयाने २००४–०५ मध्ये 'लैंगिक समतेसाठी बजेटिंग' हे मिशन जाहीर केले. त्याच्या अंमलबजावणीसाठीच्या कृतींची धोरणात्मक चौकट तयार केली व सर्व विभागांना व मंत्रालयांना पाठवली. अर्थमंत्रालयाने सर्व विभागांमध्ये 'जेंडर बजेटिंग सेल' निर्माण करणे बंधनकारक केले. आज असे ५६ सेल कार्यरत आहेत. २००५–०६ च्या केंद्रित अर्थसंकल्पात 'जेंडर बजेट स्टेटमेंट' सादर झाले. ज्यात महिलांच्या लाभासाठीच्या योजनांवरील अर्थसंकल्पीय तरतूद स्वतंत्रपणे दाखवण्यात आली. हे स्टेटमेंट एकूण खर्चाच्या किती टक्के निधी महिलांसाठी वापरण्यात आला याची तपासणी करते. यावरून महिलांसाठीच्या शासकीय खर्चाचे प्रमाण स्वतंत्रपणे आपल्याला कळते. यापूर्वी हे कळणे शक्य नव्हते. त्यामुळे हे क्रांतिकारी पाऊल ठरले. त्यामुळे प्रत्येक मंत्रालय विभागाने एकूण खर्चाच्या किती टक्के रक्कम महिला कल्याणासाठी खर्च केली हे दरवर्षी कळते व त्यावरून त्यांचे महिलाप्राधान्याचे प्रमाण कळते. ते कमी असल्यास वाढवण्यासाठी पावले उचलली जातात. यामुळे सर्व संबंधित यंत्रणांमध्ये एक महिलाकार्यप्रवण अशी जागरूकता निर्माण झाली.

आधी सांगितल्याप्रमाणे अशोक लाहिरी समितीच्या शिफारशींनुसार सर्व विभागात 'जेंडर बजेट सेल' स्थापन झाले. त्या लैंगिक समतोल व न्याय प्रस्थापित करणे आणि महिला विकास यासाठी योग्य व प्रभावी धोरणे आखण्यासाठी कार्य करतात. त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न करतात. ते सेल आपापल्या विभागातील ३ ते ६ मोठ्या महिला–योजनांचे विश्लेषण करून त्यांच्या उद्दिष्टपूर्तीची तपासणी करतात. त्यासाठी लागणारी सामग्री, क्षमता व अडथळे यांचा अभ्यास करून योग्य ती कार्यवाही करतात. संबंधित कार्यकर्ते, सामाजिक संस्था इत्यादींशी चर्चा करून, सरकारी धोरणांच्या अंमलबजावणीतील उणिवा शोधून त्या दूर करण्याचा प्रयत्न करतात. महिला व बालकल्याण मंत्रालयाने जेंडर बजेटिंग संचालनालय निर्माण केले असून ते जेंडर बजेटिंगअंतर्गत कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करते व अंमलबजावणीसाठी आधारभूत व पोषक अशा गोष्टींचा अवलंब करते.

## जेंडर बजेटिंग– अलीकडील योजना

२०१३–१४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात जेंडर बजेट ९७,१३४ कोटी रुपये एवढे ठेवण्यात आले. तसेच, एकट्या स्त्रिया व विधवा यांच्यासाठी २०० कोटी रुपये खर्चून एक योजना कार्यान्वित होत आहे. महिला व बालकल्यण मंत्रालयाच्या विद्यमाने हे होईल. महिलांच्या सुरक्षिततेसाठी व सक्षमीकरणासाठी सरकारी खर्चाने १००० कोटी रुपयांचा 'निर्भया निधी' स्थापन करण्यात आला आहे. महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी 'शुभ' नावाची योजना सुरू झाली असून त्याला 'निर्भया निधी'तून ४८६ कोटी रुपये दिले जातील. गृहमंत्रालयही ३२२ कोटी रुपये खर्चाची दुसरी एक योजना कार्यान्वित करत आहे. जून २०११ मध्ये सुरू झालेल्या 'जननी–शिशू सुरक्षा कार्यक्रमा'च्या अंतर्गत सर्व गरोदर स्त्रियांना शासकीय आरोग्यसंस्थांमध्ये विनाशुल्क प्रसुती सुविधा पुरवल्या जातात. सर्व ३५ राज्ये व केंद्रशासित प्रदेश हा कार्यक्रम राबवत आहेत. तसेच 'जननी सुरक्षा योजना'द्वारा गरोदर स्त्रियांना आवश्यक त्या सर्व सुविधा सरकारतर्फे पुरवून गर्भारपणातील मृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. या योजनेत अशा स्त्रियांना रोख रक्कम देऊन सहाय्य केले जाते. या योजनेचा लाभ आतापर्यंत ६.४५ कोटी महिलांना मिळाला आहे.

## मूल्यमापन व सुधारणा

सध्याच्या जेंडर बजेटिंगमध्ये काही सुधारणा केल्या तर ते अधिक प्रभावी होईल. सर्वप्रथम, जेंडर बजेट स्टेटमेंटमध्ये आश्वासन दिल्या गेलेल्या सर्व गोष्टींची पूर्तता होत आहे याची खात्री करणारी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. खर्च केलेल्या निधीमुळे लैंगिक असमतोल दूर होतो आहे, याचीही खात्री करणे गरजेचे आहे. केवळ स्त्रियांसाठी खर्च केला आहे याची आकडेवारी न देता, खर्चाच्या उद्दिष्टाप्रमाणे आकडेवारीचे वर्गीकरण केल्यास अधिक सखोल अभ्यास होऊ शकेल. यासंदर्भात नेपाळच्या अर्थसंकल्पात दिला जाणारा फॉरमॅट अधिक उपयुक्त आहे. त्याचे अनुकरण करावे. काही मंत्रालयांच्या बाबतीत स्त्रियांवरील खर्च स्वतंत्रपणे उपलब्ध होत नाही. तो कसा काढता येईल यावर संशोधन केले पाहिजे.

खर्चाच्या आकडेवारीच्या पलीकडे जाऊन अर्थसंकल्पातील धोरणे आणि तरतूद यामुळे प्रत्यक्ष महिलाकल्याण कितपत साधते आहे व त्यांचे प्रश्न सोडवण्यास कितपत हातभार लागतो आहे याचेही मूल्यमापन करणारी पद्धत विकसित व्हावी. यावरून धोरणांची यशस्वीता कळेल व धोरणात काय बदल करायचा तेही सरकारला व संबंधित नियंत्रकांना कळू शकेल. त्याचप्रमाणे ही धोरणे राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना उत्तेजन मिळण्यासाठी उपाय योजले पाहिजेत.

'जेंडर बजेट स्टेटमेंट'मध्ये १) प्रत्येक क्षेत्रातील महिलांचे प्रश्न, २) ते सोडवण्यासाठीची सध्याची धोरणे, ३) त्यातील उणिवा भरून काढण्यासाठीची नवीन आवश्यक धोरणे व योजना व ४) त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद असे वर्गीकरण जास्त उपयुक्त ठरेल. तसेच, केवळ स्त्रियांवरील खर्च दाखवण्यापेक्षा अधिक सविस्तर आकडेवारी – जसे स्त्रियांसाठी शौचालये, वसतिगृहे, शिक्षणव्यवस्था इत्यादी दिल्यास त्यावर अधिक प्रकाश पडेल. इंडोनेशियामध्ये असे सविस्तर वर्गीकरण केले जाते. ते

अनुसरता येईल. कंबोडियात २६ मंत्रालयांनी स्वतंत्र कार्यगट स्थापन केले आहेत. त्यांच्याकडे महिलांसदर्भातील शोधलेल्या उणिवांवर प्राधान्याने धडक कृती योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असते. भारतातही हे करता येईल.

काही कल्पक व नाविन्यपूर्ण साधनांचाही वापर करता येईल. उदाहरणार्थ, निरनिराळ्या प्रकारच्या महसुलातून स्त्रियांना किती लाभ होतो याचे विश्लेषण करणे व त्यानुसार महसूल मिळवणे. पाकिस्तान व बांगलादेशात शिक्षण, आरोग्य इत्यादी क्षेत्रनिहाय स्त्रियांना शासकीय धोरणातून होणाऱ्या लाभांची आकडेवारी तयार केली जाते व त्याचे विश्लेषण केले जाते. या पद्धतीचा आपणही अभ्यास केला पाहिजे. शिवाय 'जेंडर बजेट सेल'च्या कार्याविषयी मूल्यमापन केले पाहिजे. प्रत्येक मंत्रालयाच्या महिलाप्रवण कामगिरीचे विश्लेषण करून जे यात कमी पडतात त्यांना संवेदनक्षम बनवले पाहिजे.

महिलाविषयक योजनांचे अनुपालन करणाऱ्या माणसांची बदली झाली की परत नव्याने सर्व सुरू करावे लागते. त्यामुळे याबाबत संस्थात्मक पायाउभारणी झाली पाहिजे. प्रशिक्षणावर भर द्यायला हवा. तसेच, सर्व मंत्रालये व विभाग यांच्या महिलाविषयक कार्याचे सूत्रसंचालन एका ठिकाणी व्हायला हवे. यासंदर्भात लहिरी समितीने शिफारस केली आहे की एक आंतरविभागीय सुकाणू समिती स्थापन करण्यात यावी. एकूण विचार करता आधी महिलाविषयक आवश्यक योजनांची निर्मिती व त्यानुसार जेंडर बजेट अशी आखणी हवी. केवळ बजेट तरतुदी करणे पुरेसे ठरणार नाही.


**उपसंहार**

जेंडर बजेटिंग हा एक उपयुक्त उपक्रम आहे. भारताने तो अंगिकारला हे निश्चितच स्वागतार्ह आहे. गेल्या काही वर्षांत त्यामुळे महिलाविषयक प्रश्नांमध्ये अधिक जागृती व कार्य घडून आले आहे. काही महत्त्वाच्या सुधारणा यात केल्यास ध्येयनिश्चिती अधिक चांगल्या प्रमाणात साधेल. तसेच, आर्थिक आधार हा योजनांना हवाच, पण त्याही पुढे जाऊन आपल्या समाजाची स्त्रियांकडे पाहण्याची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. संवेदनशीलताही विकसित होणे गरजेचे आहे. तसे झाल्यास अर्थसंकल्प अधिक 'अर्थ'पूर्ण बनेल. मला विश्वास आहे की या क्रांतिकारी प्रवासात आपण अनेक महत्त्वाचे टप्पे वेगाने गाठू आणि देवतेच्या या स्त्रीरूपावर, देशातल्या प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर चिरंतन हास्य फुलेल.

**– डॉ. आशुतोष रारावीकर**
(रिझर्व्ह बँकेचे वरिष्ठ अधिकारी)
ए-११, रिझर्व्ह बँक क्वॉटर्स
मराठा मंदिर सिनेमासमोर,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८
दूरध्वनी : २३००१९८० (घर)
२३०११९९१ (ऑफिस)
भ्रमणध्वनी : ९९६९५०७४६१
raravikar@yahoo.co.in

ग्रंथाली


**चॅनल 4 Live**
समीरण वाळवेकर




टीव्ही, न्यूज चॅनेल्सचं वेगवान, धावणारं जग या माध्यमांच्या पार्श्वभूमीवर घडणारी, अस्वस्थ करणारी बेधडक कादंबरी...

**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**


**सोल्जर इन मी**
शिल्पा जितेंद्र खेर




ही कादंबरी आजच्या तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम जागवणारी, जीवनसंघर्षात सफल होण्यासाठी लिहिलेली आधुनिक 'भगवत्‌गीता' आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

**जेनेटिक्स कशाशी खातात?**
डॉ. उज्ज्वला दळवी




एकविसाव्या शतकात जनुकशास्त्र अफाट विस्तारलं आहे. या शास्त्राची सोपी तत्त्वं उमजून घेऊन शास्त्रीय जाणीव वाढवणारं सुबोध कथन

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

महाराष्ट्र शासनाचा प्रथम राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त

महिलांनी सर्वांसाठी चालविलेली अग्रेसर बँक

**भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे ३०**

३८७/३८८, नारायण पेठ, राष्ट्रभाषा भवन, पुणे ३०
फोन नं. २४४५४६३५, २४४५३५४२, २४४८०७७३

त्वरित उपलब्ध ✻ ✻ सुरक्षित व आकर्षक व्याजदराच्या ठेव योजना
✻ किफायतशीर व्याजदरात कर्ज

– सर्वांगीण प्रगतीची यशस्वी वाटचाल –


| सातत्याने अनेक वर्षे | ग्राहकसेवा | अद्ययावत बँकिंग सेवा |
|---|---|---|
| ✻ 0% नेट एन.पी.ए. ✻(निव्वळ अनुत्पादित कर्ज) | ✻ सुरक्षित ✻ | ✻ ATM ✻ |
| ✻''अ'' ऑडिट वर्ग ✻ | ✻ पारदर्शी ✻ सचोटीची ✻ | ✻ ANY BRANCH BANKING ✻ |
| ✻ १५% लाभांश ✻ | ✻ सौजन्यपूर्ण ✻ कार्यक्षम ✻ | ✻ RTGS ✻ NEFT ✻ |
| | | ✻ SMS ALERTS ✻ |

ठेवी रु. ५७० कोटींपेक्षा जास्त    कर्ज रु. ३६० कोटींपेक्षा जास्त

**E mail : bhaginibank@vsnl.net**
**Web : www.bhagininiveditabank.com**

✻✻✻ शाखा ✻✻✻

✻ नारायण पेठ ✻ सहकारनगर ✻ तळेगांव दाभाडे ✻ मंगळवार पेठ ✻ भांडारकर रोड ✻ निगडी आकुर्डी ✻
✻ सांगवी ✻ कर्वेनगर ✻ हिंगणे वारजे ✻ नगर रोड ✻ भोसरी ✻ पिरंगुट ✻ धायरी सुखसागरनगर ✻



# १९८० नंतरचे स्त्री-निर्मित लेखन

## कर्तृत्व आणि मर्यादा

**। संजय भास्कर जोशी**

लक्ष्मीबाई टिळक (आत्मचरित्र), बहिणाबाई (कविता), मालती बेडेकर (कथात्म साहित्य) आणि कुसुमावती देशपांडे (समीक्षा) या चार श्रेष्ठ लेखिकांनी मागच्या शतकाच्या पूर्वार्धात अतिशय कसदार लेखन केले; आणि बहुसंख्य रसिक आणि समीक्षकांनी त्यांचे कर्तृत्व निर्विवादपणे मान्य केले आहे. त्यामुळे स्त्रियांना त्यांच्या स्त्रीत्वामुळे आणि समाजातील दुय्यम स्थानामुळे मर्यादा येतात आणि कसदार साहित्यनिर्मितीत स्त्रियांचे समाजातले दुय्यम स्थान हाच एक प्रमुख अडथळा आहे वगैरे कल्पनांना आपण 'जरुरीपेक्षा जास्त' थारा देता कामा नये. त्यानंतर लिहिणाऱ्या गौरी देशपांडे, सानिया, अंबिका सरकार, प्रिया तेंडुलकर, विजया राजाध्यक्ष, मेघना पेठे, आशा बगे या सारख्या अनेक लेखिकांना नक्कीच त्या चौघींपेक्षा खूप जास्त उदार, प्रोत्साहक आणि स्वीकारशील पर्यावरण लाभले आहे. त्यामुळे बहिणाबाई, लक्ष्मीबाई, कुसुमावती आणि मालतीबाई यांच्यापुढे मोठा पल्ला गाठून स्त्रीलेखकांचे साहित्य पोचले आहे का, हा प्रश्न अगदीच गैरवाजवी ठरू नये. मालतीबाईंनी तर 'कळ्यांचे निश्वास' या कथासंग्रहाच्या निमित्ताने लिहूनच ठेवले आहे,'या कथा लिहून मी एक हातबाँबच तयार केलाय त्याची मला कल्पना नव्हती.' तेव्हा त्या काळात खरेच स्त्रियांच्या लेखनाकडे पाहायचा समाजाचा दृष्टिकोन इतका 'होस्टाइल' होता हे वास्तव आहे. पण तरीही या लेखिकांनी जबरदस्त क्षमतेने उत्कृष्ट साहित्य निर्माण केले आहे. गेल्या तीन दशकांतल्या लेखिकांच्या कर्तृत्वाचा विचार करायचा, तर तो या पार्श्वभूमीवर करायला हवा. कारण अनुभव आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत गेल्या काही दशकांत स्त्रियांना 'तुलनात्मक दृष्ट्या' खूपच मोकळीक मिळाली आहे हे नाकारता येणार नाही. त्या प्रमाणात श्रेष्ठ साहित्यनिर्मिती झाली का, याचा शोध या लेखात घ्यायचा विचार आहे.

आज बहुतेक चॅनल्सवर अँकर आणि पत्रकार म्हणून बरखा दत्त, निधी राजधान, सागरिका घोष  वगैरे अनेक स्त्रिया अत्यंत आत्मविश्वासाने आणि पराकोटीच्या बौद्धिक कौशल्याने काम करताना दिसताहेत. अनेक बँकांच्या, कंपन्यांच्या प्रमुखपदावर स्त्रिया कार्यक्षमतेने जबाबदाऱ्या पार पाडताहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाबतीत माझे एक निरीक्षण असे आहे, की तसे पाहिले तर लैंगिकतेच्या बाबतीत स्त्री दिग्दर्शकांनीच अधिक धाडसी चित्रपट बनवले आहेत. (उदा: कल्पना लाज्मी, दीपा मेहता, मीरा नायर यांच्यासारख्या दिग्दर्शकांनीच फायर, कामसूत्र वगैरे सिनेमे बनवले.) सांगायचा मुद्दा एक स्त्री म्हणून एके काळी असलेल्या मर्यादा आणि बंधने प्रतिभावंत स्त्रीला आता बऱ्याच अंशी कमी झालेली आहेत. प्रश्न असा आहे, की याचा परिणाम म्हणून मराठी लेखिकांनी मोठी भरारी मारली आहे काय? विशेषत: दोन शतकांचा पूल साधणाऱ्या गेल्या दोन-तीन दशकांत.

१९८० ते २०१४ या काळातल्या ठळक लेखिकांची यादी करायची तर कोणती नावे चटकन डोळ्यासमोर येतात? २००८ साली मुंबई विद्यापीठात घेतलेल्या एका राष्ट्रीय चर्चासत्राच्या आधारे पुष्पलता राजापुरे-तापस यांनी '१९८० नंतरचे स्त्री-निर्मित कथनपर साहित्य' हा ग्रंथ संपादित केला आहे. त्यात ज्या मराठी लेखिकांच्या साहित्याचा आढावा घेतला आहे त्या अशा : गौरी देशपांडे, सानिया, अंबिका सरकार, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, कविता महाजन, आशा बगे, शांता गोखले, नीरजा, प्रतिमा इंगोले, मोनिका गजेंद्रगडकर, विजया राजाध्यक्ष, उर्मिला पवार, उर्मिला सिरूर, सिसिलिया कार्व्हालो, जाई निंबकर, प्रतिभा कणेकर, दीपा गोवारीकर, सुकन्या आगाशे, रोहिणी कुलकर्णी, आशा कर्दळे, सुनीती आफळे आणि अरुणा ढेरे.

या २३ लेखिकांच्या साहित्याचा या ग्रंथात धांडोळा घेतला आहे. यात कदाचित एक-दोन महत्वाच्या लेखिका समाविष्ट नसतील ही शक्यता असली तरी स्थूलमानाने या २०-२५ लेखिकांचे लेखन या काळातल्या लेखिकांचे प्रतिनिधित्व करते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

पुरुष लेखकांचे साहित्य य.गो.जोशी, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर आणि ग.त्र्यं. माडखोलकर यांच्यापासून उन्नत होत गंगाधर गाडगीळ, पु.भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, अरविंद गोखले या नवकथाकारांच्या टप्प्यावर आले; आणि त्यानंतर नेमाडे, भाऊ पाध्ये, जी.ए. कुलकर्णी, खानोलकर, श्याम मनोहर, भारत सासणे, अशा अनेक मार्गांनी खूप पुढे गेलेले दिसते, तसे लेखिकांच्या बाबतीत लक्ष्मीबाई, बहिणाबाई, कुसुमावती आणि मालतीबाई यांच्यापुढे स्त्री-निर्मित साहित्य मोठा पल्ला मारून पुढे गेले आहे काय, हा खरा कळीचा प्रश्न आहे. फडके-खांडेकरांच्या यशस्वी कालखंडानंतर नेमाडे- जी.ए. - भाऊ पाध्ये - कोलटकर - श्याम मनोहर अशी दणकट नावे आणि त्यानंतरच्या काळातही राजन गवस, रंगनाथ पठारे, भारत सासणे, सदानंद देशमुख ते पार मकरंद साठे, प्रवीण बांदेकरांपर्यंत अशी दर्जेदार साहित्यिकांची नावे डोळ्यासमोर येतात. कोसला, काजळमाया, धग, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, भिजकी वही, नक्षत्रांचे देणे, तणकट, बारोमास, कळ ते पार आजकालच्या चाळेगत आणि निशाणी डावा अंगठापर्यंत काही श्रेष्ठ पुस्तकांची नावे नजरेसमोर येतात. तसे स्त्री-निर्मित साहित्याबाबत म्हणता येते काय, हा मुख्य प्रश्न आहे. त्याचाच आढावा घ्यायचा इथे प्रयत्न आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार हा एक (सर्वानुमते अंतिम नसला तरी अनेकांपैकी एक -) निकष मानला तर १९८० ते २०१४ या पस्तीस वर्षांत फक्त तीन पुरस्कार लेखिकांना मिळाले आहेत. (इंदिरा संत - 'गर्भरेशीम', विजया राजाध्यक्ष : 'मर्ढेकर...' आणि आशा बगे : 'भूमी') त्यामुळे राजमान्यतेबाबत देखील लेखिकांच्या नावावर मोठी जमा दिसत नाही हे मान्य करावे लागेल. आणखी एक उदाहरण घेऊ. गेल्या शतकातल्या सर्वोत्कृष्ट कथांचे एक संपादन के.ज. पुरोहित आणि सुधा जोशी या ज्येष्ठ अभ्यासकांनी 'मराठी कथा : विसावे शतक' या नावाने केले आहे. हे दोघेही कथेचे उत्तम अभ्यासक आहेत आणि संपादनात स्त्री-पुरुष असे दोघेही आहेत. तरी त्यांनी निवडलेल्या ३८ कथांमध्ये फक्त विभावरी शिरूरकर, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, मेघना पेठे, आशा बगे आणि गौरी देशपांडे या सहाच स्त्री-कथाकार आहेत. हे प्रमाण जेमतेम १५% आहे. पूर्वग्रह वगळून एखाद्याने आजवरच्या श्रेष्ठ अशा १०० पुस्तकांची यादी केली तरी त्यात हे प्रमाण असेच राहण्याची शक्यता आहे. हे असे का होते याचा विचार करायला हवा. याच कालखंडात महाराष्ट्रात अनेक क्षेत्रात (चित्रपट, उद्योग, कॉर्पोरेट, क्रीडा, पत्रकारिता इत्यादी) स्त्रियांनी जोरदार प्रगती केल्याचे चित्र बघायला मिळते. या कालखंडाला त्याआधी पाचच वर्षे साजऱ्या झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षाची पार्श्वभूमी होती. स्त्री-मुक्तीचे ध्येय गाठले गेले असे मुळीच नाही, परंतु स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा परिस्थिती सुधारलेली दिसते. मुक्त अभिव्यक्तीच्या बाबतीत प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, कविता महाजन यांसारख्या लेखिकांनी स्त्रियांच्या अभिव्यक्तीवरची बंधने केव्हाच झुगारून टाकली आणि धाडसी लेखनाबाबत स्त्री-पुरुष हा भेद मिटवून टाकला आहे. आजच्या इरावती कर्णिक, मनस्विनी लता रवींद्र सारख्या ताज्या दमाच्या लेखिका अतिशय मोकळेपणाने उत्कृष्ट लेखन करू शकत आहेत. वंदना खरे यांच्या अनुवादित नाटकाने (योनीच्या मनीच्या गुजगोष्टी) तर अभिव्यक्तीस्वातंत्र्याबाबत स्त्रिया मुळीच मागे वगैरे नाहीत हे अतिशय समर्थपणे आणि कौतुकास्पदरीत्या सिद्ध केले आहे. या घटनांचे स्वागत करायला हवे. अतिशय संयत शैलीतल्या कथा लिहूनही त्या लेखनाबद्दल 'मी हातबाँब तयार केला' असे म्हणणाऱ्या मालतीबाईंच्या काळापासून आता साहित्यकृतीत आवश्यक असतील तर 'भ' आणि 'झ' पासून सुरू होणारे कोणतेही अपशब्द मोकळेपणाने वापरणाऱ्या मेघना पेठे आणि कविता महाजन यांच्यापर्यंत आपण प्रवास केला आहे हे उल्लेखनीय आहे. पण त्याचाच अर्थ असा होतो, की लेखिकांच्या लिखाणावर येणाऱ्या बाह्य मर्यादा आणि बंधने आता कमी आहेत. म्हणजे लेखिकांच्या लेखनावर मर्यादा असतील तर त्या त्यांच्याच मर्यादा असतील, त्यांच्या आकलनाच्या, जीवनदृष्टीच्या आणि प्रतिभेच्याच मर्यादा असतील. 'स्मृतिचित्रे'च्या तोडीची आणि उत्कृष्ट जीवनदर्शन घडवणारी स्त्रीने लिहिलेली आत्मचरित्रे कोणती? बहिणाबाईंच्या कवितेची उंची गाठणाऱ्या कवयित्री कोण? कुसुमावती देशपांडे यांच्या समीक्षेची उंची गाठणाऱ्या स्त्री-समीक्षक कोण? ...याचा विचार करायला हवा.

'धग'सारख्या श्रेष्ठ कादंबरीत तर कौतिक या स्त्रीचेच अप्रतिम चित्रण आहे. 'कोसला'मध्ये व्यक्त झालेला परात्मभाव एखाद्या स्त्रीच्या जगण्यात देखील येऊ शकतोच. राजन गवस यांनी 'भंडारभोग'सारख्या कादंबरीत केलेले देवदासींचे चित्रण एखाद्या स्त्रीला देखील करता आले असतेच. 'नातिचरामि' सारख्या गाजलेल्या कादंबरीत मात्र व्यावसायिक पर्यावरण, मानवी नात्यांवर परिणाम करणारे समाजातले विविध घटक यांचे चित्रण येत नाही. गौरी देशपांडे यांचे समर्थ लेखन देखील स्वप्नसदृश स्त्री-पुरुष नात्यापलिकडे फारसे जात नाहीच. गेला बाजार अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या स्वामी, मृत्युंजय, पानिपत यांसारख्या ऐतिहासिक-पौराणिक विषयांकडे फारशा लेखिका वळत नाहीत. (तारा वनारसे, अरुणा ढेरे असे काही सन्माननीय अपवाद आहेत; पण त्या अशा प्रकारच्या लेखनाला मिळणाऱ्या प्रचंड लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार झालेल्या दिसत नाही.) समर्थ नाटककार स्त्रिया तर हाताच्या बोटावर मोजाव्या लागतील. सई परांजपे, श्यामला वनारसे आणि अलिकडच्या मनस्विनी, इरावती वगैरे नाटककार वगळता स्त्रियांनी अगदी क्वचितच नाट्यलेखन केले आहे. चाळेगतसारखी कादंबरी जागतिकीकरणाचा परिणाम कवेत घ्यायचा

प्रयत्न करते, बारोमास, तणकट यांसारख्या कादंबऱ्या बदलत्या गावगाड्याचे चित्रण करतात. वसंत लिमयांसारखा लेखक 'लॉक ग्रिफिन'सारख्या कादंबरीत आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विषय हाताळतो. असे कोणतेच विषय स्त्रियांच्या लेखनात मोठ्या प्रमाणावर आलेले दिसत नाहीत. गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया या तीन ठळक लेखिकांचे बहुतांश लेखन स्त्री-पुरुष संबंधाच्या परिघातच आहे. त्यात विशाल पटावर केलेल्या जीवनविषयक चिंतनशीलतेपेक्षा स्त्रीवर झालेल्या अन्यायाचे चित्रणच अधिक आहे. बौद्धिक क्षेत्रात स्त्रियांची क्षमता आणि प्रगती पुरुषांपेक्षा मुळीच कमी नसताना स्त्रियांच्या लेखनात मात्र बुद्धीला आव्हान देणारे विषय इतके कमी का असावेत याचा विचार करायला हवा. एकूणच विशाल पटाचे आव्हान आजच्या वाचकांना देखील पेलत नाही हा पेच आहेच, पण तो पेच स्त्री-पुरुष अशा दोन्ही लेखकांना आहे.

मात्र याच कालखंडात स्त्रियांच्या शैलीत आणि अभिव्यक्तीत मात्र विलक्षण वैविध्य आणि सौंदर्य आढळते. गौरी देशपांडे यांची स्मार्ट, बहुश्रुत आणि मिस्किल निवेदिका-नायिका काय किंवा प्रिया तेंडुलकर-मेघना पेठे यांची तीक्ष्ण शेरे मारणारी धाडसी आणि बोल्ड निवेदिका काय, या सर्वच लेखनात समकालीन जाणिवा आणि वाचनीय अशी उपहासगर्भ निवेदनशैली आढळते. सानियाच्या कथा-कादंबऱ्यांत 'इंटलेक्च्युअल' आणि जीवनाकडे सम्यक दृष्टीने बघणारी समंजस पात्रे आढळतात. कविता महाजन, मल्लिका अमरशेख, प्रज्ञा पवार यांसारख्या अनेक कवयित्री समकालाला यथार्थ प्रतिक्रिया देणारी आत्मविश्वासपूर्ण कविता लिहितात. सुनीता देशपांडे, मल्लिका अमरशेख, माधवी देसाई, कमल पाध्ये यांसारख्या लेखिकांनी उत्तम आत्मचरित्रे लिहिली. समीक्षेच्या क्षेत्रात मात्र विजया राजाध्यक्ष यांची 'चरित्रात्मक समीक्षा' आणि रेखा इनामदार साने यांचे 'अस्तित्ववादा'-वरचे पुस्तक आणि असे इतर काही अपवाद वगळता लेखिकांनी फारशी उल्लेखनीय किंवा मूलभूत कामगिरी केलेली दिसत नाही.

मग एकूणात गेल्या तीस वर्षांत स्त्रियांच्या अनेक क्षेत्रातील कामगिरीचा आलेख उंचावत असताना साहित्यक्षेत्रात लेखिकांनी नेमके काय कर्तृत्व दाखवले? (उदाहरणार्थ संगीतात किशोरी अमोणकरांपासून पार अश्विनी भिडे, देवकी पंडित यांच्यापर्यंत अत्यंत समर्थ प्रवाह दिसतो. नाटकात असाच प्रवाह रीमा लागू, सुहास जोशी, रसिका जोशी यांच्यापासून सोनाली कुलकर्णी, मुक्ता बर्वे यांच्यापर्यंत समृद्ध होताना दिसतो.) तर साहित्याच्या क्षेत्रातले लेखिकांचे महत्त्वाचे कॉंट्रिब्युशन म्हणजे स्त्रीच्या एकूण समाजव्यवस्थेतल्या दुय्यम स्थानाची कलात्म आणि प्रभावी मांडणी करण्याचे काम मराठी लेखिकांनी प्रभावीपणे केलेले आढळते. व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्त्रीचे निर्णयस्वातंत्र्य केंद्रस्थानी ठेवून सर्वप्रथम गौरी देशपांडे यांनी जोमदार साहित्यनिर्मिती केली. त्यांच्या नायिकांनी पुरुषप्रधान व्यवस्थेचे अन्याय्य स्वरूप अतिशय प्रभावीपणे मांडले आणि त्यातून मार्ग शोधायचा प्रयत्न केला. त्यांच्या पुढे पाऊल टाकत मेघना पेठे यांच्या नायिकांनी गौरी देशपांडे यांच्या नायिकांचा सर्वसामान्यांप्रती असणारा तुच्छतावाद टाळून आणि गौरी देशपांडे यांच्या लेखनातील रचीव रंजकतेला नकार देऊन तेच काम अधिक प्रभावीपणे केले. दुसरीकडे सानिया, आशा बगे यांच्या लेखनात समंजस, इंटलेक्च्युअल आणि संयत अशा नायिकांनी स्त्रीचे आत्मभान व्यक्त केलेले दिसते. त्यांनी परंपरेला भूकंपसदृष धक्के न देता नव्या विचारांचे संयमित दर्शन घडवले. कविता महाजन, प्रतिमा इंगोले, उर्मिला पवार वगैरे लेखिकांनी या स्त्रीभानाला सामाजिक आयाम दिले. प्रतिमा जोशी, प्रज्ञा पवार, मल्लिका अमरशेख वगैरे लेखिका-कवयित्रींनी शोषितांच्या व्यथेचा पदर या भानाला जोडून स्त्री-निर्मित साहित्य अधिकच बहुआयामी केले. आणि अलिकडच्या काही लेखिकांनी नवे विषय हाताळायचा प्रयास केला आहे. त्यात योगिनी वेन्गुलेकर (कॉर्पोरेट कथा ), नीरजा ('सुशांतचा सोळावा वाढदिवस'सारखी कथा) किंवा मोनिका गजेंद्रगडकर ('श्रद्धा'सारखी कथा), प्रज्ञा पवार ('तिघाडा'सारखी कथा) अशा लेखिका टोकाची स्त्रीवादी भूमिका टाळून व्यापक आणि मोकळ्या जीवनानुभवाला सामोऱ्या जाताना दिसतात. (अशी इतरही काही उदाहरणे आहेत.) पण असे अपवाद वगळले तर एकूण स्त्री-निर्मित साहित्यावर स्त्रीवादी लेखनाचेच वर्चस्व दिसते. अर्थात या कालखंडात काही पथदर्शक साहित्यकृती या लेखिकांनी निर्माण केल्या हे खरेच आहे. त्यात 'आहे हे असं आहे', 'मारवा', 'स्थलांतर', 'हंस अकेला', 'ब्र' ही आणि यासारखी आणखी काही नावे आहेत. ही नावे केवळ उदाहरणादाखल घेतली आहेत हे ध्यानात घ्या.

तरीही या कालखंडातले एकूण स्त्री-निर्मित लेखन पाहता असे आढळेल की या कालखंडात स्त्रियांनी बहुतांश लेखनात प्रभावीपणे हाताळलेला विषय हा स्त्रियांचे दुय्यम स्थान मानणाऱ्या समाजव्यवस्थेचा दंभस्फोट आणि व्यक्तिवादी स्त्रीचे आत्मभान हाच आहे. बहुतेक लेखिकांच्या बहुतेक साहित्याचे वर्णन 'स्त्रीकेंद्री' असेच करावे लागेल. ते 'माणूसकेंद्री' अथवा 'जीवनकेंद्री' झाले नाही ही त्याची मर्यादा आहे. साहित्यव्यवस्था आणि व्यवहार एकूण संस्कृतीचा एक भाग आणि एकंदर संस्कृती हा समाजव्यवस्थेचा एक भाग असते हे मान्य केले तरी साहित्याचे आपले असे एक स्वायत्त स्थान असतेच. साहित्यामागे मुळातच सर्जन असल्याने एकूण संस्कृती आणि समाजव्यवस्थेचा मर्यादित परिणाम साहित्याने स्वीकारून त्यापलिकडे जाऊन सर्जनशील नवनिर्मिती करणे अभिप्रेत असते. एका अर्थाने पाहिले तर साहित्य ही प्रतिभेच्या आधारे केलेली कृतीहीन कृती असते. त्यामुळे समाजव्यवस्थेचे बंधन आणि रेटा झुगारून प्रतिभेचे पंख उभारून विशाल आभाळात झेप घेणे हे प्रतिभावंत साहित्यिकाचे काम असते. तात्पर्य, समाजव्यवस्थेत असलेले स्त्रीचे दुय्यम स्थान हा केवळ अनेकांपैकी एक विषय असायला हवा होता, एकमेव महत्त्वाचे आशयकेंद्र नव्हे. पण बहुतांश स्त्री-निर्मित साहित्यात मात्र ते एकच आशयकेंद्र हाताळलेले दिसते. या आधीच्या कालखंडात कमल देसाई यांनी हे एकमेव आशयकेंद्र झुगारून मूलभूत मानवी जगण्याला हात घातल्याचे दिसले होते. तो प्रवाह क्षीण का झाला असावा? त्याला राखीव क्षेत्र नसल्यामुळे? आणि 'ओपन कॅटेगरीमध्ये' येऊन देखील

आपले स्थान बळकट करण्याचा कमल देसाई यांना असलेला सार्थ आत्मविश्वास इतरांच्यात नसल्यामुळे?

या काळात सर्वाधिक मान्यता पावलेल्या गौरी देशपांडे यांनी प्रभावी साहित्यनिर्मिती केली हे खरे, पण त्यांची रचीव रंजकता आणि तुच्छतावादी मनोवृत्ती त्यांचे लेखन एका विशिष्ट उंचीच्या पलिकडे नेऊ शकत नाही. फारसे सामाजिक संदर्भ नसलेले स्वप्नसृष्टी-सदृश आणि योगायोगांनी भरलेले त्यांचे कथाविश्व महत्त्वाकांक्षी तरुणींचे किरकोळ स्वप्नरंजन करण्यापलिकडे मौलिक जीवनदर्शन घडवत नाही. ना.सी.फडके यांनी जे मर्यादित क्षमतेने केले तेच गौरी देशपांडे यांनी पोस्ट-ग्रॅज्युएट क्षमतेने केले असे म्हणावे लागते. सानिया यांचे अतिशय संयत, समंजस आणि इंटलेक्च्युअल कथाविश्व कुटुंब आणि स्त्री-पुरुष नात्याचे वेगवेगळे पदर याच परिघात वावरते. मेघना पेठे यांच्या कथाविश्वात या मर्यादा ओलांडून पुढे जाण्याचे सामर्थ्य दिसले, पण कादंबरीत मात्र तो अवाका दिसला नाही. दोन कथासंग्रहांच्या नंतर त्यांचे कथालेखन थांबल्यासारखे वाटणे ही चिंतेची बाब आहे. त्यांच्याकडून खूप अपेक्षा करता येण्यासारख्या आहेत. कविता महाजन यांच्या कविता-कादंबऱ्यांत उत्कृष्ट समाजभान असूनही अनावश्यक तपशील आणि पुरुषद्वेषी स्त्रीपात्रांमुळे येणारा एकारलेपणा त्यांची वाङ्मयीन मौलिकता  मर्यादित करतात.

या सर्व कारणांमुळे १९८० नंतर लेखिकांकडून बरीचशी प्रभावी साहित्यनिर्मिती झाली हे खरे असले तरी मौलिक जीवनदर्शन घडवणाऱ्या पथदर्शक किंवा चिरंतन साहित्यकृती मोजके अपवाद वगळता फारशा मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या नाहीत असेच म्हणावे लागते. पण असे कालातीत श्रेष्ठ साहित्य निर्माण झाले नाही याचे कारण समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान हे नसून, त्याउलट 'समाजातले स्त्रियांचे दुय्यम स्थान' हेच एकमेव आशयकेंद्र बहुसंख्य लेखनात आल्याने असे झाले असावे असे वाटते. मानवी जीवनात अनेक अनुभव येत असतात. खरे तर या २०-२५ ठळक लेखिकांच्या आयुष्यात देखील 'स्त्रीच्या दुय्यम स्थाना'व्यतिरिक्त असे असंख्य मूलभूत मानवी अनुभव येत असणारच. पण बहुतांश लेखिकांचे बहुसंख्य लेखन मात्र याच एका आशयकेंद्राभोवती फिरत राहिल्याने विश्ववात्सल्य, करुणा, मानवी जगण्यातली अनाकलनीयता, व्यस्तता, परात्मभाव, नव्वदीनंतरचे ग्लोबलाइझ्ड जग, यंत्रयुगानंतर आलेला ग्राहकवाद, राजकारण, धर्मकारण वगैरे साहित्याला मौलिक करणारी अनेक आशयकेंद्रे या बहुसंख्य स्त्री-निर्मित साहित्याबाहेरच राहिली. खरे तर यातल्या बऱ्याच लेखिकांच्या लेखनात अत्यंत उच्च अपेक्षा बाळगाव्यात अशी निर्मितीक्षमता आणि लेखनगुण दिसून येतात. पण या साहित्याने स्त्रीमुक्तीच्या सामाजिक अजेंड्याला बव्हंशी वाहून घेतल्याने साहित्यिक मौलिकता दुय्यम ठरल्याचे चित्र दिसते. विज्ञान असो, सामाजिक सुधारणा असोत किंवा मार्क्सवाद, स्त्रीवाद असो, यापैकी कशाचाही प्रचार हा अजेंडा स्वीकारला की साहित्यक्षेत्राचे असेच नुकसान होत असते. असमान किंवा अन्याय्य समाजव्यवस्था साहित्याद्वारे झुगारायचे दोन मार्ग असतात. एक म्हणजे त्याविरुद्धचे बंड थेट साहित्याद्वारे करायचे किंवा दुसरा मार्ग म्हणजे जणू ती असमान व्यवस्था अस्तित्वातच नाही असे गृहीत धरून स्वतंत्र कालातीत श्रेष्ठ साहित्यनिर्मिती करायची. पहिला मार्ग स्वीकारल्याने समाजात सुधारणा व्हायची शक्यता वाढते, पण त्यात साहित्याचा बळी जातो. दुसऱ्या मार्गात समाजव्यवस्था सुधारण्याची शक्यता नसते, पण चिरंतन साहित्यनिर्मितीची शक्यता बळावते. मराठी लेखिकांनी साहित्याद्वारे समाजसुधारणा करण्याचा  पहिला मार्ग स्वीकारल्याचे दिसते. गौरी देशपांडे यांच्यासारख्या लेखिकेची भलामण साहित्याच्या गंभीर समीक्षकांनी करण्यापेक्षा विद्या बाळ वगैरे थोर स्त्रीवादी समाजसेवकांनीच जास्त करणे हे त्याचे प्रातिनिधिक स्वरूप आहे. भ्रष्ट राजकारणी नेता असो किंवा थोर आणि सत्शील समाजसुधारक असो, यापैकी कोणीही साहित्यिकाला आपल्या अजेंड्याचे वाहन करतो तेव्हा त्या साहित्यिकाच्या वारसदारांनी सावध व्हायचे असते. ती सावधगिरी बऱ्याच मराठी लेखिकांनी बाळगली नसल्याचे दिसते. याउलट मंगला आठलेकर यांच्यासारख्या लेखिकांनी निदान हा स्त्रीवादी अजेंडा उघडपणे आपल्या वैचारिक लेखनात राबवला. पण त्यात सर्जनशीलतेचा कृतक अभिनिवेश नक्कीच नव्हता. असो.

कोणत्याही मार्गात काहीतरी गमवावे लागतेच. एकदा अपॉर्च्युनिटी कॉस्टचे अस्तित्व मान्य केले की खंत करणे निरर्थक असते हेच खरे.

तात्पर्य : मराठी लेखिकांनी एक मार्ग स्वीकारला आहे आणि त्यात मात्र त्या कमालीच्या यशस्वी ठरल्या आहेत याचे निखळ समाधान मानण्यात काहीच गैर नाही. पण त्याचवेळी या कालखंडात काहीतरी अधिक मौलिक गमावले आहे, याची जाण नव्या लेखिकांना झाली तर चिरंतन आणि कालातीत साहित्यनिर्मिती या लेखिकांकडून घडणे अशक्य नाही. तशी क्षमता आणि पदचिन्हे स्त्री-निर्मित साहित्यात दिसलेली आहेत. मात्र त्यासाठी त्यांनी स्त्री-निर्मित साहित्य या 'राखीव' क्षेत्रातून बाहेर येऊन खुल्या अवकाशाचे आव्हान स्वीकारणे गरजेचे आहे. स्त्री-निर्मित साहित्यावर फक्त स्त्री लेखकांचीच चर्चासत्रे घेणे वगैरे 'सेफ' आणि बाळबोध प्रकार थांबवून त्यांच्या क्षमतेला 'वेल डिझर्वड' खुले क्षेत्र उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे हे त्यांना समजेल तो सुदिन. खरे तर विज्ञान साहित्य वगैरे अनेक 'राखीव क्षेत्रांना' हाच संदेश जाणे अगत्याचे आहे. अन्यथा गटातटात विभागलेले मराठी साहित्य कमजोर होत राहील हे सांगायला कुणा वाङ्मयीन ज्योतिषाची गरज नाही.

**- संजय भास्कर जोशी**
स्नेहसिंधू, इ ३ गजानन सोसायटी,
कृष्णा कॉलनी, वनाजजवळ,
पौड रोड, पुणे-४११०३८
भ्रमणध्वनी ९८२२००३४११
sanjaybhaskarj@gmail.com



# स्यू ची आणि मलाला

**अपर्णा पाटील**


आँग सान स्यू ची आणि मलाला युसूफझाई यांच्या आयुष्यात साम्य शोधून काढायचं म्हटलं तर कठीणच आहे. एक कणखर तर दुसरी धाडसी. एकीचा लढा प्रेरणादायी तर दुसरीचं जगणंच आव्हानात्मक. दोघींमधलं एक साम्य म्हणजे तर स्यू ची आणि मलाला या दोघींच्या आयुष्यात त्यांचे वडील हे त्यांच्या ध्येयवादी आयुष्याचं प्रेरणास्थान बनले. वडिलांनी पाहिलेलं स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेनंच त्यांची वाटचाल सुरू आहे.

..

**स्यू ची**

ब्रह्मदेश म्हणजेच आजचा म्यानमार. नाव बदललं पण देशाचं भवितव्य नाही. देशाला स्वातंत्र्य मिळालं ते १९४८मध्ये तरी लोकशाहीची पहाट उगवण्यास २०११पर्यंत वाट पाहावी लागली. हा कालावधी जितका मोठा आहे, त्याहीपेक्षा मोठी आहे ती आँग सान स्यू ची यांची कणखरता. म्यानमारमध्ये लोकशाही व्यवस्था यावी, असं स्वप्न त्यांनी नुसतं पाहिलं नाही तर त्यासाठी टणक लष्करशाहीला सुमारे पंचवीस वर्षं टक्कर दिली, तीही अहिंसेच्या मार्गानं. हा लढा त्यांनी अर्धा जिंकलाय. लढाई जिंकणं अद्याप बाकी आहे. पण या लढ्याचं नेतृत्व आँग सान स्यू ची करत आहेत, मात्र त्यामागे प्रेरणा आहे ती त्यांचे पिता आँग सान यांची.

जनरल आँग सान हे ब्रह्मदेशाला स्वतंत्र करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या नेत्यांपैकी एक होते. जपानची मदत घेत ब्रिटिशांविरुद्ध लढा सुरू करण्यात त्यांच्या वडिलांनी पुढाकार घेतला. दुसऱ्या महायुद्धानंतर ते ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळवण्याच्या वाटाघाटी करत होते. त्याच दरम्यान त्यांची हत्या करण्यात आली. त्यावेळी आँग सान फक्त ३२ वर्षांचे होते. त्यांनी पाहिलेलं देशाच्या स्वातंत्र्याचं स्वप्न अगदी दृष्टिपथात होतं. स्वातंत्र्य पाहायला ते जिवंत राहिले नव्हते. तर देश स्वतंत्र होऊनही देशाला स्वांतत्र्य मिळणार नव्हतं, हे १९ जुलै १९४७ या दिवशीच, म्हणजे आँग सान यांच्या हत्येच्या दिवशी, देशवासीयांच्या लक्षात आलं होतं. आँग सान एका बैठकीत बसले असताना काही विरोधकांनी त्यांना गोळ्या घालून ठार केलं होतं. अनेक वर्षं ही हत्या त्यांच्याच देशातील विरोधकांनी केल्याचं म्हटलं गेलं. पण ही हत्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी घडवून आणल्याचं काही काळानं उघड झालं. त्यात तथ्य आहे की नाही, याचा काथ्याकूट झाला. आजही होतोय. पण सान यांच्या मृत्यूमुळे देश थेट लष्करशहांच्या अराजकाच्या दरीत ढकलला गेला. स्वातंत्र्य तर आहे, पण मोकळेपणानं श्वास घेण्याचा हक्कही नाकारला गेला. आँग सान हे देशवासीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी झुंजले तर त्यांची कन्या स्यू ची ही त्याच देशवासीयांना हक्कानं जगू देण्यासाठी लढतेय.



**स्यू ची आणि मलाला**

सान यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या पत्नी जितक्या एकाकी झाल्या तितकीच त्यांची मुलंही. त्यावेळी स्यू ची तर फक्त दोन वर्षांच्या होत्या. स्यू ची यांच्या आईला बर्माच्या प्रशासनात स्थान देण्यात आलं होतं. त्या भारत आणि नेपाळच्या राजदूतही होत्या. त्यामुळेच आईबरोबर स्यू चीही भारतात आल्या. नवी दिल्लीतच त्यांनी पॉलिटिक्स विषयात पदवी मिळवली. कदाचित लोकशाहीचं राजकारण कसं असायला हवं, तेही तिथेच त्यांनी समजून घेतलं असावं. त्यानंतर त्या उच्च शिक्षणासाठी ऑक्स्फर्डला गेल्या. त्यानंतर अमेरिकेत काही काळ राहिल्या. न्यू यॉर्कमधल्या संयुक्त राष्ट्रासाठी काम करू लागल्या. तिथेच त्यांची गाठ डॉ. मायकल एरिस यांच्याशी झाली. १९७१मध्ये त्यांनी त्यांच्याशी विवाह केला. त्यांना अलेक्झांडर आणि किम अशी मुलं झाली. दरम्यानच्या काळात त्यांचा एमफिलचा अभ्यास सुरू होता.

मायकल एरिस यांच्याशी लग्न ही त्यांच्या आयुष्यातली मोठी गोष्ट होती. कारण आपला देश आपल्या व्यक्तिगत आयुष्यापेक्षा अधिक प्रिय आहे, हे त्यांनी त्यांच्या पतीला आधीच सांगितलं होतं. अर्थात मायकल यांनीही गोष्ट मोठ्या मनानं समजून घेतलं आणि स्यू ची यांच्या प्रत्येक निर्णयाला पाठिंबा दिला. त्यामुळेच आपल्या आईला भेटायला म्हणून गेलेल्या स्यू यापुढे कधी पत्नी किंवा आई ही भूमिका निभावू शकणार नाही, हे समजून घेत त्यांनी मुलांना वाढवण्याची जबाबदारी घेतली.

१९८८मध्ये स्यू ची यांच्या आईला हृदयविकाराचा झटका आला होता. ते त्यांच्या नातेवाईकांनी स्यू ची यांना कळवलं. आईला भेटण्यासाठी त्या बर्माला आल्या. त्यांनी पाहिलं की, तीस वर्षांच्या लष्करी हुकूमशाहीनं देशाची वाताहत झाली होती. देशातील अर्थव्यवस्थेचा कणा मोडून पडला होता. त्याच दरम्यान हुकूमशाहीच्या विरोधात पहिल्यांदाच निदर्शनं करण्याची तयारी सुरू झाली. विद्यार्थी, तरुण यात सहभागी होताहेत हे पाहून कलाकार, विचारवंत यात भाग घेण्याची तयारी करू लागले. स्यू ची यात केवळ पाठिंबा द्यायचा म्हणून आल्या नाहीत तर आपल्या पित्याच्या बलिदानाला व्यर्थ जाऊ द्यायचं नाही, अशा विचारानं त्यात सहभागी झाल्या.

निदर्शकांवर गोळीबार करण्याचे आदेश देण्यात आले. त्यावेळी जवळच्या हॉस्पिटलमध्ये आपल्या आईची शुश्रूषा करण्यासाठी आलेल्या स्यू ची यांनी निदर्शकांच्या सभेत सहभागी व्हायचं ठरवलं. त्यावेळी त्यांचे पती, दोन्ही मुलं सुटी असल्याने रंगूनमध्येच (आताचं यांगून) होते. तेही तिथे आले. आपल्या पत्नीच्या राजकारणात जाण्यास त्यांनी मान्यता दिली होती. तिथे स्यू ची यांनी केलेलं भाषण देशाला एक नवी आशा देणारं होतं. ''माझा तुमच्याबरोबर राहण्याचा हेतू प्रामाणिक आहे. हे खरं आहे की, मी गेल्या काही वर्षांपासून या देशात राहत नाही. मी एका परदेशी व्यक्तीशी लग्न केलं आहे. याचा अर्थ असा नाही की, माझं माझ्या देशावर प्रेम नाही. ही तर संघर्षाची सुरुवात आहे. मी माझ्या वडिलांची मुलगी आहे, त्यामुळे ही वेळ आपला व्यक्तिगत विचार करण्याची नाही'', अशा शब्दांत त्यांनी सभेला जिंकलं होतं.

त्या घटनेनंतर तीन आठवड्यांत मार्शल लॉ लागू झाला. सैनिकांनी रस्ते साफ केले. तीन हजार लोकांचे नाहक बळी गेले. पण त्याच वेळी निवडणूक घेण्याचं आश्वासन लष्करशहा ने विन यानं दिलं. त्याचवेळी स्यू ची यांना त्यांच्याच घरात स्थानबद्ध करण्याचा निर्णय झाला. त्या आणि एक मदतनीस त्या घरात होते. घरात रेडिओ होता, पुस्तकंही, पण माणसांशी संपर्क नव्हता.

२७ मे, १९९० रोजी निवडणूक घेण्यात आली. त्यात स्यू ची यांच्या नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी या पक्षाच्या ४८ उमेदवारांचा विजय झाला. मात्र विजयी होऊनही सगळ्याच उमेदवारांना तुरुंगात ठेवण्यात आलं होतं. लष्करशहानं लोकांचा कौल साफ धुडकावला होता. स्यू ची यांनाही घराबाहेर पडण्याची संधी मिळाली नाही.

तब्बल वीस वर्षांत त्यांना कधी घराबाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. आपल्या मुलांना वाढताना पाहता न येण्यासारखं दुःख त्यांच्यातल्या आईला होतं, पण देशातल्या साठ लाख जनतेची आई होण्याचं भाग्य त्यांना लाभलं. ''मातृभूमीप्रती कर्तव्याची भावना मला वडिलांमुळे मिळाली आणि माफ करण्याची प्रेरणा आईकडून, तर अहिंसावादी महात्मा गांधी यांच्याकडूनही लढण्याचं बळ मिळालंय,'' असं आँग सान स्यू ची सांगतात. त्यांच्या या भावनांमध्ये किंचितही बदल न झाल्याचं गेल्या पंचवीस वर्षांत जगानं पाहिलं आहे.

वीस वर्षांपूर्वी त्यांच्यामुळे घ्याव्या लागलेल्या निवडणुकीमुळे

स्यू ची यांना स्थानबद्ध करण्यात आलं होतं. पण २०१२मध्ये पोटनिवडणुकीच्या निमत्तानं त्या लोकांसमोर आल्या. यावेळीही लष्कराला आपलाच विजय होणार यात शंका नव्हतीच. देशभरातील जनतेशी संवाद साधण्याची संधी त्यांना मिळाली. पण त्यांनी बदला घेण्याची भाषा केली नाही तर जनतेला आपल्या हक्काची जाण करून घेण्याची हीच वेळ असल्याचं सांगत होत्या. यावेळी पहिल्यांदाच परदेशी पत्रकारांना वार्तांकनाची संधी मिळाली. स्यू ची यांच्या पक्षानं दोन वेळा विजय मिळवला तरी लोकशाही राज्य नाकारलं गेलं. २०१० साली त्यांना स्पष्ट बहुमतही मिळालं होतं. परंतु लष्करशाहीने त्यांना सत्तेपासून दूर ठेवले इतकंच नाही तर तांत्रिक बाबी पुढे करत लोकशाही नाकारली.

म्यानमारची अर्थव्यवस्था इतकी बिकट आहे, की लोकशाही नांदल्याशिवाय देश वाचणार नाही. कारण लष्करशाहीमुळे प्रगत राष्ट्रांनी अनेक निर्बंध लादलेत. त्याचा काडीमात्र परिणाम लष्करशहांवर झालेला नाही. जनता मात्र गरिबीमुळे पिचली जात आहे. स्यू ची यांच्या नेतृत्वामुळे लोकशाही अस्तित्वात येईल, असा विश्वास जसा म्यानमारच्या जनतेला वाटतोय, तसा प्रगत राष्ट्रांनाही. त्यामुळे स्यू ची यांच्या प्रयत्नांना यश मिळेल, अशी परिस्थिती आहे. त्यांच्या नेतृत्त्वात करिश्मा आहे, मागील वर्षी झालेल्या निवडणुकीनं पुन्हा ते स्पष्ट झालंच आहे.

मूल्यांशी तडजोड न करता लोकशाहीसाठी स्यू ची यांनी दिलेला लढा हा स्त्री म्हणून त्यांच्या अदम्य साहसाचं प्रतीक बनला आहे. त्याचवेळी नात्यांमधले अनेक आनंद त्यांनी त्यागलेत, अगणित त्याग केलेत. अनेक कठीण प्रसंगांना तोंड दिलंय. पतीचं निधन झालं, मुलं त्यांच्याशिवाय मोठी झाली, याहीपेक्षा अजूनही आपण देशाला खरी लोकशाही देऊ शकलो नाही, याची खंत त्यांना अधिक बोचते, त्यावरूनच स्यू ची यांच्या महनीयतेची प्रचिती येते.

**मलाला युसूफझाई...**

खैबर पख्तूनवाला हा पाकिस्तानमधला आदिवासीबहुल प्रांत. जगण्याच्या मुलभूत सोयी जिथे अजून पोहोचल्या नाहीत तिथे शिक्षण ही गोष्ट कशी असणार. या भागातील लाखो मुलं प्राथमिक शिक्षणही घेऊ शकलेली नाहीत. तर मुलींच्याबाबतीत तर सगळंच कठीण आहे. याच भागातल्या सहा लाख मुलींपैकी मलाला मात्र वेगळी ठरली. कारण तिच्या वडिलांनी तिला शिकण्याची संधी दिली. झियाउद्दीन युसूफझाई त्यांचं नाव. त्यांच्यामुळेच मलाला या त्यांच्या मुलीत शिक्षणाची आवड निर्माण झाली.

परिस्थितीशी झगडा देणं काय असतं, ते या खैबर पख्तूनवाला भागातली मंडळीच सांगतील. त्यांच्या कष्टाला सीमाच नाही. पाकिस्तानच्या स्वात खोऱ्यात मिंगोरा हे मलालाचं गाव. स्वात खोऱ्यात कडव्या तालिबानींचा हुकूम चालतो. त्यामुळेच त्यांनी २००८-०९ नंतर काही फर्मानं काढली. मुलींच्या शिक्षणावर बंदीचं पालन व्हावं म्हणून शाळांवर हल्ले करण्याचं सत्र सुरू झालं. मुलींना टीव्ही पाहायला, पुस्तकं वाचायला; इतकचं नाही तर कम्प्युटर, इंटरनेट वापरायलाही परवानगी नाही. कारण काय, तर त्यामुळे मुली बिघडतात!

झियाउद्दीन युसूफझाई मात्र हार मानणारे नव्हते. त्यांनी शाळा सुरू करण्याचं आणि मुलींना शिकवण्याचं काम करण्याच्या मार्गातून मागे हटायचं नाही असं ठरवूनच टाकलं. मुस्लिम समाजातील प्रगतीशील शिक्षक म्हणून त्यांचं नाव घेतलं जातं. कट्टर धर्मवाद्यांच्या विरोधाला न जुमानता आपली शाळा चालवण्याची जोखीम त्यांनी उचलली होती. मुलींना शिक्षण मिळालं पाहिजे, याचा ध्यास त्यांना होता. त्याची सुरुवात त्यांनी आपल्याच घरापासून केली. मलाला या त्यांच्या मुलीला त्यांनी शाळेत शिकवायला सुरुवात केली. अनेक पालकांप्रमाणे त्यांनाही या निर्णयाची किंमत चुकवावी लागणार होती. पण ती मलालाच्या जीवावर बेतेल, असा अंदाज कोणी केला नव्हता.

सुधारलेल्या विचाराच्या वडिलांनी हाताला धरून मलालाला शाळेची वाट दाखवली. मुलींना स्वातंत्र्य देण्यात कसा काय विरोध होऊ शकतो, हा प्रश्न तिला पडला. त्याचं उत्तर तिनं शोधून काढलं. तालिबान्यांच्या अत्याचारांच्या कथा, शिक्षणापासून वंचित झालेल्या मुलींच्या कहाण्या तिनं गुल मकाई या टोपणनावानं ब्लॉगवर लिहिल्या आणि थेट बीबीसीच्या ब्लॉगवर पाठवल्या. त्या झळकल्या आणि जगभर करोडो तरुणींनी, स्त्री-पुरुषांनी वाचल्या. तेव्हाच मलाला पाकिस्तानातल्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलींची प्रतिनिधी बनली होती.

पंधरावं वर्ष हे कोणाच्याही आयुष्यातलं सगळ्यात सुंदर वर्ष असू शकतं. तारुण्यात पर्दापण करण्याची, नव्या स्वप्नांना कवेत



घेण्याची ती वेळ असते. पण मलालासारख्या असंख्य मुलींना कट्टरवाद्यांच्या जुलमी बंधनांना सामोरं जावं लागतं. पण मलालानं जे केलं ते तालिबान्यांना सहन होण्यासारखं नव्हतंच. त्यामुळेच एक दिवशी शाळेत जाताना तिला बसमध्ये चढत असताना गोळ्या घालण्याचा हूकूम देण्यात आला. ९ ऑक्टोबर २०१२ रोजी तिच्यावर हल्ला झाला. हल्ल्यात अगदी जवळून झाडलेली गोळी तिच्या डाव्या डोळ्यावरून गेली व मेंदूला घासत जबड्यातून खाली उतरली. त्या हल्ल्यात तिच्या वाचण्याची शक्यता कमीच होती. त्या हल्ल्यात मलाला वाचली. नुसती वाचली नाही तर तिचा नव्यानं जन्म झाला.

अनेक महिन्यांच्या उपचारानंतर मलाला जेव्हा बरी झाली तेव्हा तिच्याविषयी जगभरात तिच्या चिवटपणाचं, झुंजारपणे लढण्याचं आणि अमर्याद धाडसाचं कौतुक करण्यात आलं. काही दिवसांनी जेव्हा न्यू यॉर्कमधल्या संयुक्त राष्ट्र कार्यालयात तिचा सत्कार करण्यात आला, तेव्हा तिनं केलेलं भाषण तिच्या परिपक्व व्यक्तिमत्त्वाचं प्रतीक ठरलं. मलालाचा वाढदिवस मुलींच्या शिक्षण हक्कासाठी म्हणून मलाला दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. ''एक मूल-एक शिक्षक, एक वही-एक पेन सगळं जग बदलू शकतं हे ध्यानात ठेवा'', असं सांगून ती म्हणाली, ''मी तीच मलाला आहे, माझ्या महत्त्वाकांक्षा त्याच आहेत, आशा त्याच आहेत, स्वप्नं तीच आहेत पण बंधू-भगिनींनो, मी तालिबानचा सूड घेण्यासाठी येथे बोलायला आले नाही, प्रत्येक मुलाच्या शिक्षणाच्या हक्काची दाद-फिर्याद मांडण्यासाठी आले आहे. तालिबान्यांच्या मुलं व मुलींनाही शिक्षण मिळालं पाहिजे. ही सहवेदना मी महंमद पैगंबर, येशू ख्रिस्त, बुद्ध, मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला व महंमद अली जीना यांच्याकडून शिकले आहे.'' महात्मा गांधी, मदर तेरेसा यांनीही हेच शिकवलं असल्याचं तिनं सांगितलं. हे सगळं मलाला त्या अनुभवातून शिकली.


२०१५पर्यंत जगातील सर्व मुलींना शिक्षण मिळालं पाहिजे, असा युनोचा आग्रह आहे. त्यासाठी 'मलाला प्लान' नावाची योजना राबवली जात आहे. या मोहिमेचा फायदा जगातील साडेतीन कोटी मुलींना होणार आहे. हे सगळं मलालामुळे घडून आलं आहे. शिक्षणाच्या अधिकाराचा पुरस्कार करणाऱ्या मलालाची हाक जगभर पोचताच गरीब कुटुंबातील मुलींना दरमहिना दोन डॉलर शिक्षणभत्ता देण्याची घोषणा पाकिस्तान सरकारनं केली आहे. पाकिस्तानचे अध्यक्ष असिफ अली झरदारी यांनी मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळालाच पाहिजे या मागणीवर स्वाक्षरी करत या निर्णयाची घोषणा केली. जागतिक बँकेच्या सहकार्यानं पाकिस्तानात हा उपक्रम राबवला जाणार आहे. हे सगळं स्वातमधल्या मुलींच्या मनात आशेचा किरण निर्माण करणारं आहे.

मलाला आज जगभरातल्या मुलींच्या आशाअपेक्षांचं प्रतीक ठरलीय. पुरस्कार, सत्कार या गोष्टी तिच्या आयुष्यात येताहेत. पण तालिबान्यांची भीतीही कमी झालेली नाही. तरी मलालाचे मुलींना शिकण्यासाठी लढा देण्याचे मनसुबे काही ढळलेले नाहीत. मलालानं दाखवलेलं धाडस इतरांचं आयुष्य नक्कीच सुखकर करणारं आहे.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१
aparna.patil1@gmail.com


ग्रंथाली

## डॉ. नरेंद्र जाधव अनुवादित आणि संपादित पुस्तके





**बोल महामानवाचे** (एक ते तीन खंड)
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची**
**५०० मर्मभेदी भाषणे**
१. आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन;
२. सामाजिक, आर्थिक, धार्मिक,
कायदा-संविधान; ३. राजकीय

जनाआवृत्ती संच मूल्य १२०० रु.
सवलतीत ८०० रु. टपालखर्च ५० रु.




**प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर**
समग्र वैचारिक चरित्र

मूल्य ७५० रु.
सवलतीत ६०० रु. टपालखर्च ५० रु.




**प्रज्ञा महामानवाची** (भाग १ ते ४)
**सारांश, संपादन आणि अनुवाद डॉ. नरेंद्र जाधव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखनकार्य
१. राजकीय, २. अर्थशास्त्रीय व
समाजशास्त्रीय लेखन, ३. मानववंशशास्त्रीय
लेखन, ४. बुद्ध आणि त्याचा धम्म

जनाआवृत्ती संच मूल्य ८०० रु.
सवलतीत ५०० रु. टपालखर्च ५०

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

'आयदान' प्रथम वाचलं ते साल असावं २००४. पटकन लक्षात यावं असं काही ते नाव नव्हतं. या शब्दाशी तसा परिचयही नव्हता. मुखपृष्ठ पाहूनही त्याचा उलगडा झाला नव्हता. उलट विणलेल्या टोपल्याच्या विणीनं कुतूहलाचा गोफ अधिक घट्ट केला होता. मात्र पुस्तक वाचलं आणि सारीच वीण लक्षात आली. एकेक काडी वेगळी केल्यासारखी. दोन अर्थांची गुंफण या नावाभोवती आहे. आय म्हणजे आई आणि तिने दिलेलं संस्काराचं अमृतदान, तर दुसरा आहे वारसा, आईकडून आलेला, करंडी-टोपली विणण्याचा प्रयत्न म्हणजे आयदान. एक वेगळ्या प्रकारचं चरित्र, चरित्र प्रवास, एका लेखिकेचं जीवन. लेखिकेच्या भाषेत सांगायचं तर आत्मकथन! एकटीच हे निमित्त. ते आहे आपल्यासोबतच्या सगळ्या माणसांचं, विशेषतः स्त्रियाचं! गावाचं, परिसराचं, नात्याचं, नात्यापलीकडची असूनही नात्याइतकीच जवळीक वाटावी अशांचं.

**आयदान**

**उर्मिला पवार**




आत्मकथन हा वाङ्मयप्रकार तसा कुतूहलाचा आणि उत्कंठेचा. त्यावेळी अशा आत्मकथनांची जणू मालिकाच सुरू झाली होती. दया पवारांचं 'बलुतं' आलं. पाठोपाठ 'उपरा' आलं. 'उचल्या', 'कोल्हाट्याचं पोर', 'अक्करमाशी' अशी यादी वाढतच गेली. एक नवा प्रवाह सुरू झाला. वाचकांच्या हाती नवा अनुभव, नवं विश्व शिदोरीच्या रूपानं आलं. त्यावर भलंबुरं कराय ते समीक्षकांनी ठरवायचं होतं. वाचक म्हणून मात्र हे काहीतरी नवीन रसायन हाती आलं होतं. यातली बहुतेक पुस्तकं धुंडाळून ती प्रकाशात आणायची खटपट केली ती 'ग्रंथाली'नं. त्यामुळे प्रत्येक वेळी आपल्याला नवीन काहीतरी वाचायला मिळणार अशी अपेक्षा ग्रंथालीकडून मनात आपोआप रुजली. तर ही आत्कथनं जणू एक वादळच ठरली. पण ती बहुतेक होती ती पुरुषांच्या अंगानं जाणारी. त्यात स्त्रीचरित्राचा भाग नव्हता असं नव्हे, पण ती पूर्णार्थानं स्त्री चरित्रं नव्हती. बेबी कांबळे यांचं 'माझ्या जल्माची चितरकथा' त्या प्रवाहात आलं आणि स्त्री म्हणून आलेले भोग काय असतात याची वर्गवारी स्पष्ट झाली ती दोन दोन स्तरावर. एक स्त्री म्हणून आणि दुसरी जातीच्या कातीची. त्यानंतर आलं ते 'आयदान'. उर्मिला पवार नावाच्या स्त्रीचं आत्मकथन. साहित्याचा प्रवाह रुंद करणारं आत्मकथन!

आयदान या आत्मकथनात आलेली वर्णनं, व्यक्तिचित्रं, माणूसपण, भावभावना यांचा स्तर वाचकाच्या मनाला उजवा वाटला. यात केवळ स्वतःवरील अन्याय, अत्याचार, दुःख, वेदना वा भावभावनांची कोंडी यांचा आक्रोश नसून प्रत्येक प्रसंगाला सामोरं जाणं आहे ते समजूतदारपणाचं, स्वतःला तपासून पाहण्याचं. त्यामुळे आत्मकथनाला स्वतःची मर्यादा असूनही त्याचा आवाका कक्षेबाहेर झेपावणारा दिसतो. कथन एका स्त्री लेखिकेचं आहे तरी ते एकांगी नाही. आपल्यासोबत ते समाजमनावर चढलेली पारंपरिक कात ओरबाडून काढताना दिसते, आपल्यात झालेल्या परिवर्तनाचा शोध घेताना दिसतं. म्हणूनच असं साहित्य मोठं ठरतं. त्याच्या आवृत्त्या पुन्हा पुन्हा वाचकांच्या भेटीला येतात. लाटांनी किनाऱ्याकडे धाव घेत यावे तशा. माझ्या हातात आलेली आवृत्ती सहाव्या पुनर्मुद्रणाची असून तिचा दिनांक आहे २५ डिसेंबर २००८.

कोकण म्हटला की निसर्गाची कृपादृष्टी लाभलेला इंद्रवनाचा भूभाग. त्यातल्या रत्नागिरी-फणसावळेच्या झोपडीवजा घरातून सुरू झालेला हा 'इमल'चा प्रवास आहे. मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण वडिलांच्या आग्रहानं पार पडल्यानंतर आपल्या प्रिय व्यक्तीशी संसार थाटते. मुंबईत स्थायिक झाल्यानंतर एमएपर्यंत शिक्षण घेणं, पतीची साथ त्यासाठी मोलाची ठरते. नोकरी करते. सामाजिक चळवळीत सहभागी होते. खेळ-नाटकाच्या मैदानाला फेरी मारून येते. म्हटलं तर सुखी आयुष्य. वरवर सहज कुणाच्याही वाट्याला यावं असं आयुष्य म्हणता येईल. पाणी पाटातून वाहतं, निसर्गातून वाहतं, नदीच्या पात्रातून वाहतं प्रत्येकाचा वेग, आवेग आणि आवाका वेगळा असतो. 'हे पाणी वेगळं आहे' असं म्हणतात ते का? खरोखर काहीतरी वेगळेपण असल्याशिवाय त्याची दखल कोण घेणार? वाचकांनी ती नोंद घेतली आहे. निघालेल्या आवृत्त्यांवरून आपल्यासमोर आहेच. वाचक उगाच कुणावर प्रेम करत नाही. साहित्य त्याला प्रेमात पडायला भाग पाडतं. 'आयदान'ने ते प्रेम मिळवलं आहे.

या आत्मकथनाचं प्रयोजन काय, आपलं जगणं वाचकांच्या समोर उघड करण्याचं कारण काय, असा साधा प्रश्न मनात डोकावला. खोडसाळपणा म्हणतात तो असा. लेखिका परिस्थितीच्या भट्टीत चांगल्या भाजलेल्या. स्वतःच्या भूमिकेशी ठाम असलेल्या. मध्यंतरी नागनाथ कोत्तापल्ले यांनी म्हटलं होतं, 'लेखकानं लेखन करताना निश्चित भूमिका घ्यावी.' त्याचा प्रत्यय आला. लेखिका म्हणतात, 'अहो, आपण जगतो, मोठे होतो म्हणजे काही एकटेच नसतो. आपल्यासोबत आपला समाज, आपली माणसं, आपल्या आजूबाजूची माणसं, परिसर हे सारे असतात. ते आपल्याला मोठं करतात, अनुभवानं समृद्ध करतात. आपली जडणघडण करतात. त्यांचं ऋण आपण मान्य करायला नको का? बरं, मी एक स्त्री आहे, गरिबीच्या भट्टीत भाजून आले. पण माझ्याभोवती अशा अनेक स्त्रिया होत्या; त्यांचं जगणं, जगण्यासाठी चाललेली त्यांची धडपड,

म्हणजे ऊन अंगावर घ्यावं तसं सारं आयुष्यच अंगावर आलेलं. लाकडाची एक मोळी जंगलातून गोळा करण्यासाठी तिला दोन दिवस अपुरे पडतात आणि त्या मोळीचं मिळालेलं मूल्य तिचा एक दिवसाचा भार सहन करण्याइतकंही नसतं हे मी पाहिलं आहे. त्यांचं दुःख, त्यांची वेदना मी अनुभवली आहे. ते त्यांचं दुःख नसून माझं दुःख आहे. माझी आई इतर स्त्रियांपेक्षा वेगळी नाही. ती टोपल्या, करंड्या विणते, नव्हे समस्त स्त्रीजातीच्या वेणा विणत असते. त्या वेणांची वीण मी माझ्या लेखणीतून विणण्याचा प्रयत्न केला. स्वतःचं मोठेपण सांगणं हा हेतू नाही. त्यांचं उत्तरदायित्व म्हणजे आयदान!'

उर्मिला पवारांचं लेखन अनेक व्यक्तींच्या मनाचा वेध घेतं. आईबाप, भाऊ, बहिणी, नवरा, सासू-सासरा, जावा, दीर, नणंद, मुलगा, मुली आणि त्यासोबत सहधर्मी हिरा बनसोडे, वामन होवाळ, दत्ताराम बारस्कर, भालचंद्र मुणगेकर यांसारखी अनेक मंडळी यात आली आहेत. त्यांची भावनिक, मानसिक जवळीक आहे. मार्गदर्शन आहे आणि चळवळ पुढे नेण्याची धडपड आहे. तरीही लेखिका हा वेध घेताना भावना आणि तटस्थपणा यांची सरमिसळ होऊ देत नाही. दलित साहित्य, स्त्री चळवळ, स्त्री साहित्य, आंबेडकरी चळवळ, धर्मपरिवर्तन यात काम करताना आलेले अनुभव आणि मिळालेले संस्कार यांच्या वर्णनात स्पष्टपणा आहे तसा निर्भीडपणाही आहे. जिथे चुकलं ते चुकलं, जिथे चुकीचं होत आहे त्याला विरोध बिनदिक्कतपणे सगळ्यांसमोर उघड केला आहे. माताबरोबर लेकीच्या विवाहाचे अपमानाचे घाव आहेत, भाऊ, मुलगा यांच्या अकस्मात निधनाचं दुःख आहे. धर्मातरानंतरही मृत पतीच्या डाव्या पायाच्या अंगठ्यानं पत्नीच्या कपाळाचं कुंकू पुसणं याला नकार आहे... अशा कितीतरी घटना लेखिकेचा कस पाहताना दिसतात, तरीही ती आपल्या मताशी ठाम दिसते. ठामपणे उभी राहते. लेखनात कोकणच्या भाषेचा गोडवाही छानपणे पेरला आहे. आई होणं म्हंजे सती जानं बाय, सती!! लगीन इला लागॉक नि व्हायलेक झाला हगॉक! अशा म्हणीवजा उद्गारांनी संवाद सजलेले आहेत. रंडकीसूज म्हणजे पती निधनानंतर बाईचं धष्टपुष्ट होणं, शरीर सुटणं, याचा संदर्भ इथे मिळतो. सरळ, कधी स्पष्ट, तरीही आपल्या लयीत आलेली भाषा मनाचा पटकन ताबा घेते.

उर्मिला पवार या लेखिका आहेत, पण त्याचवेळी त्या कथाकथनकार आहेत, सामाजिक-साहित्यिक कार्यकर्त्याही आहेत. त्यांच्या 'आयदान' पुस्तकाला आतापर्यंत अनेक पुरस्कार लाभलेले आहेत. त्यातले काही प्रतिष्ठित पुरस्कार - प्रियदर्शनी ॲकेडमी, महाराष्ट्र फाउंडेशन, पद्मश्री विखे पाटील, वुमेन्स रायटर असोसिएशन, मातोश्री भीमाबाई आंबेडकर फाउंडेशन. शिवाय लेखिकेची इतर नऊ पुस्तकं प्रकाशित झालेली आहेत. त्यातली काही विद्यापीठातून अभ्यासक्रमात नेमली गेली आहेत. उर्मिला पवार यांचा हा प्रवास म्हणजे इमल, धकट्या, आगा, राजेसाहेब आणि उर्मिला. म्हणजेच आयदान!

**• मूल्य २२० रु. सवलतीत १३० रु.**


**ग्रंथाली**

## संकल्पनाकोशला मिळालेले पुरस्कार

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  ना.गो. कालेलकर पुरस्कार २०११
  *संकल्पनाकोश खंड १*
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  नरहर कुरुंदकर पुरस्कार २०१३
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*
- मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
  केशव भिकाजी ढवळे २०१३
  *संकल्पनाकोश खंड १ ते ५*
- सार्वजनिक वाचनालय, नाशिक
  डॉ. वि.म. गोगटे पुरस्कार २०१३-१४
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर प्रथमच...**




सुरेश वाघे
लिखित
**संकल्पनाकोश**
खंड १ ते ५










मूळ किंमत ३२०० रुपये सवलतीत २४०० रु.
टपालखर्च २०० रु.

# ग्रंथपान

## हुमान
### संगीता उत्तम धायगुडे




हुमान म्हणजे कोडं. जगण्याचं, जिद्दीचं, कर्तृत्वाचं आणि स्वतःला सिद्ध करण्याचं. ते सोडवताना होणारी दमछाक व्यक्तिगणिक वेगवेगळी असू शकेल इतकाच काय तो फरक. यात स्त्रीच्या पदरात पडलेलं दान पुरुषांना मागं टाकणारे असतं हे मात्र नक्की. माहेर ते सासर, शिक्षण ते संसार, आईबाप ते सासूसासरे, पती–मुलंबाळं या सगळ्यांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या जगण्यातून काही उरलं तर स्वतःचं करिअर, व्यक्तिमत्त्व. त्यात ताणतणाव, मानापमान, टक्केटोणपे यांचे घाव वेगळेच. होणारा कोंडमारा, असहायता आणि तरीही आपल्या माणसांसाठी जगण्याची धडपड. हे सारं वाट्याला आलं नाही अशी स्त्री अपवादात्क भाग्यवान! अशा भाग्यवानांच्या पंक्तीला बसणाचं भाग्य लेखिकेच्या पदरात पडलेलं नव्हतं, तरीही हार न मानता अपवादात्मक ठरेल असं स्वतःला सिद्ध करणारं कर्तृत्व दाखवण्याची जिद्द पदरात पडलेली होती असं या आत्मकथनातून प्रत्ययाला येतं.


आई–बापाच्या आग्रहापुढे मान झुकवून दहावीला रामराम केलेली लेखिका संसाराच्या गाड्याला जुंपली जाते, तिच्या मनाचा, इच्छा–आकांक्षाचा विचार हिशोबात न घेता. खाकी वर्दीशी इमान राखलेल्या माणसाशी संसार करताना त्याची चकाकणारी, पॉलिश कुठे मलीन होणार नाही यासाठी तारेवरची कसरत करत राहते. माहेरच्या संस्काराच्या कवचकुंडलाच्या जोरावर सासरच्या झळांची झळ संसाराला न लागू देता माणुसकी आणि आपलेपणात भिजवून घेते. स्वतःचं वेगळेपण न दाखवता स्वतः काहीतरी करू पाहते. राजा राणीचा संसार सुखाचा राहील या स्वप्नाला साकार करण्याचा ध्यास ठेवून राहिलेलं शिक्षण, शिवणकाम यावर लक्ष केंद्रीत करते. स्वतः डिझाईन करून शिवलेले कपडे एक्पोर्ट करण्यापर्यंत मजल मारते. परंतु संसारसुखाच्या वेलीवरचा गंध अंगात पाझरत असतानाच आधाराचा वृक्षच कोसळतो. आप्तांचे काटे, वास्तवाचा खडक आणि असहायतेचं तप्त ऊन पदरात बांधलं जातं. तरी ती परिस्थितीसमोर गुडघे टेकण्याचं नाकारते. आपल्या जिद्दीला कसोटीच्या मशालीवर धरते, कस लावण्यासाठी. पोटी उमललेल्या फुलांना सावली देण्यासाठी आकांतानं उन्हातान्हाला सामोरी जाते. आणि एक दिवस एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या कोसळलेल्या परिस्थितीलाच नापास करते. असा हा लेखिकेचा अथक जीवनसंग्राम आहे. एका हुमानची सोडवणूक आहे. आपणच आपल्याला सिद्ध करण्याच्या ध्यासाचा प्रवास आहे. ज्याचा शेवट हा समाधानाला सलाम करणारा आहे. कोडं सोडवल्यानंतर वाटतं, ते समाधान काय असतं हे सोडविल्याशिवाय कसं कळणार?

आत्मकथनात कोंडमारा आणि दुःखाची भडकस्वरूपाची मांडणी करून स्वतःला सहानुभूती मिळवण्याची शक्यता अधिक असते. परंतु लेखिकेनं दाखवलेला संयतपणा परिपक्वतेची ग्वाही देतो. काय काय करावं लागलं याचं रडगाणं न गाता काय काय करता येतं याची वाट शोधण्यावर भर दिला. माणुसकी, आपुलकी, परकेपणा, निष्ठूरपणा, बेफिकिरी, स्वार्थ आणि अज्ञान अशा भावनांचे अनेक कंगोरे ओरखडे न ओढता उलगडून दाखविलेले आहेत. पोलीसखात्याचे साह्य करण्याचे मोठेपण, मंत्रालय, शिक्षणखाते, आप्त यांचे आलेले कटू अनुभव, तर आपलेपणाने जवळ आलेले मित्र–मैत्रिणी यांची वर्णनं माणसांच्या वागण्याची तऱ्हा दाखवितात. सहन करण्याची परिसीमा आहे पण त्यात कुणाविषयी द्वेष नाही. जळते निखारे पायी तुडवत जाताना कुणावर त्याचे खापर फोडले नाही. मुलगी, सून, पत्नी, आई या भूमिकांवर आपला ठसा कसा उमटेल हेच ध्येय ठेवलं. मुलांच्या भवितव्याला प्राधान्य देताना, आपले अस्तित्व टिकवू पाहताना आपल्यातल्या आईपणाला कुठे उणेपण येऊ दिलं नाही. हाती आलेल्या अधिकाराचा उपयोग सत्कारणी लावला तो भल्यासाठी, न्यायासाठी. निर्भीडपणे, सचोटीनं आणि निःस्वार्थीपणानं. आपण आपल्याशी ठाम असू, ध्येय गाठण्याचा निर्धार मनाशी पक्का असेल, तर आपल्याला झुकवू पाहणारेच आपल्यासमोर कसे झुकतात याचं उदाहरण म्हणजे 'हुमान' हे आत्मकथन.

लेखनात आलेला प्रगल्भपणा लेखिकेच्या प्रवासाला आणि प्रयत्नाला साजेसा आहे. निवेदन फ्लॅशबॅक पद्धतीनं केलेलं असल्यानं एकाच वेळी ते भूतकाळ व वर्तमानकाळ अशा दोन पातळ्यांवर चालते. भाषाही सहज आहे. ओघवती आहे. त्यामुळे लेखन एकसुरी न होता ते वाचनाचा तरल आनंद देतं. वाचत असताना लेखिकेच्या यशाचं, प्रयत्नाचं आणि मोठी स्वप्नं सत्यात उतरवण्याचं कुतूहल कायम मनात रेंगाळत राहतं. आणि लग्नाच्या वेळी दहावीपर्यंत शिक्षण असलेली, तीही दुसऱ्यांची पुस्तकं वापरून अभ्यास करणारी, अशी मुलगी पतीनिधनानंतर एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण तर होतेच, त्याची मार्गदर्शिका होण्यापर्यंत झेप घेते. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर जर्मनीला जाते. या आत्मकथनाचं प्रयोजन हे स्वतःचं थोरपण सांगण्यासाठी नव्हे तर, इतरांना प्रेरणा मिळावी यासाठी लेखिकेनं मनातल्या भावनेचं सोडलेलं मौन आहे, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

**• मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**

## लवकरच प्रकाशित....




### लेणी महाराष्ट्राची - डॉ. दाऊद दळवी

भारतात बाराशे लेणी आहेत.
त्यांपैकी आठशे महाराष्ट्रात आहेत!
इसवी सनाच्या आरंभकाळाच्या
आगेमागे बौद्ध महाराष्ट्रात आले,
त्यांना सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या व
त्यातील कातळ, लेणी खोदण्यास
योग्य वाटले. त्यामधून एक नवा
कलाविष्कार या भूमीत प्रकटला.
नंतर हजार-बाराशे वर्षांपर्यंत
बौद्धांबरोबरच हिंदू व जैन पंथीयांनी
महाराष्ट्रात सर्वत्र उत्तमोत्तम, विविध
गुणदर्शी लेणी कोरली.

**मूल्य १२०० रुपये   सवलतीत ७५० रुपये**

### मंदिर-शिल्पे
### डॉ. माया पाटील




प्राचीन भारतीय स्थापत्याचा, शिल्पांचा आणि चित्रांचा उपयोग आधिभौतिक संस्कृती समजण्यासाठी होत असला तरी त्यामुळे संस्कृतीची सांगोपांग तसेच अंतर्बाह्य माहिती होत नसते. कारण त्यातून आध्यात्मिक बाजू प्रकट होतेच असे नाही. मात्र मंदिर-स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे याला अपवाद ठरतात. सामान्य स्थापत्य वा शिल्पे यांच्या तुलनेत मंदिर आणि मूर्ती या दोहोंचे विशेष स्थान आहे.

डॉ. माया पाटील यांच्या प्रस्तुत ग्रंथातून मंदिर-स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे यांच्या आधारे हेच सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यासाठी त्यांनी मराठवाड्यातील लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यातील विविध मंदिरांचा आणि मूर्तिशिल्पांचा सांगोपांग विचार केलेला आहे, विश्लेषण केलेले आहे.

डॉ. माया पाटील यांनी मोठ्या समर्थपणे हे वैभव आपल्यासमोर मांडले आहे. त्यांची लेखणी संयत आहे, नेटक्या शब्दात विचारांना आकार देणारी आहे. दृष्टी कलावंताची आहे, जे आहे ते सुंदर करून सांगणारी आहे.

**- डॉ. गो.बं. देगलूरकर   मूल्य ३०० रुपये   सवलतीत १८० रु.**

ग्रंथाली
द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग,
माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५०
● granthali01@gmail.com, granthali02@gmail.com ● वेळ : सकाळी ११ ते ६

# दोन ग्रंथसंच योजना
## सूची

**सोबतच्या यादीतील सुटी पुस्तके हवी असल्यास ४०% सवलतीत मिळतील.**
**चेक/डी.डी./म.ऑ. 'ग्रंथाली' नावे पाठवावा.**

**२१० पुसतके संच क्रमांक १ मूळ किंमत २९९८५ सवलतीत संचाची किंमत १३००० रु.**

१. **खेळ साडेतीन टक्क्यांचा**
लक्ष्मण माने ● १६० रु.
२. **राजकीय पक्षनिष्ठा मानसिक-बौद्धिक गुलामी**
दि. म. संत ● ८० रु.
३. **अंधश्रद्धा निर्मूलन-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
संदीप जावळे ● १२० रु.
४. **प्रर्वतन**
संदीप जावळे ● १२० रु.
५. **विचारवेध**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १८० रु.
६. **विचारवेध : भाग ३**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● २५० रु.
७. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-अनुभववाद**
दि.य. देशपांडे ● २०० रु.
८. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान प्रज्ञावाद**
दि.य. देशपांडे ● १८० रु.
९. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-कांट**
दि.य. देशपांडे ● १२० रु.
१०. **विवेकवाद**
दि.य. देशपांडे ● १०० रु.
११. **रिल्केची दहा पत्रे**
अनिल कुसुरकर ● १०० रु.
१२. **मी हिंदू झालो!**
डॉ. रविन थत्ते ● १०० रु.
१३. **विज्ञानाचे तत्त्वज्ञान**
संपादक : शरद देशपांडे, प्रदीप गोखले, सदानंद मोरे ● ३०० रु.
१४. **नेगल - (भाग १)**
विलास मनोहर ● १२० रु.
१५. **नेगल -(भाग २) हेलकशाचे सांगाती**
विलास मनोहर ● १२० रु.
१६. **एक पूर्ण-अपूर्ण**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१७. **सत्तरीचे बोल...**
डॉ. पी. एस. रामाणी ● १०० रु.
१८. **पथदर्शी**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१९. **जे देखिले...**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
२०. **एक दिवस (जी)वनातला**
नीला सत्यनाराण ● २०० रु.
२१. **ध्यास आणि प्रवास**
सुलभा वर्दे ● २०० रु.
२२. **माझ्या वकिलीची पन्नासी**
एस.आर. चिटणीस ● १६० रु.
२३. **आमचा बान आन् आम्ही - स्वरूप आणि समीक्षा**
संपा. शैलेश त्रिभुवन ● ४०० रु.
२४. **झपाटलेली झाडे**
सरोज जोशी ● २५० रु.
२५. **चिं.त्र्यं. खानोलकर**
(ललित चरित्र)
दीपक घारे ● १८० रु.
२६. **व्हिन्सेंट व्हॅन गॉच्या आठवणी**
अनिल कुसुरकर ● १२५ रु.
२७. **गुन्हेगारांच्या मागावर**
यशवंत व्हटकर ● १५० रु.
२८. **सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
यशवंत व्हटकर ● २५० रु.
२९. **नृत्यसौदामिनी दमयंती जोशी**
प्रा. सुहासिनी पटवर्धन ● १०० रु.
३०. **पालावरचं जग**
लक्ष्मण माने ● १४० रु.
३१. **बंद दरवाजा**
लक्ष्मण माने ● १८० रु.
३२. **उद्ध्वस्त**
लक्ष्मण माने ● १०० रु.
३३. **भटक्याचं भारूड**
लक्ष्मण माने ● १५० रु.
३४. **नियतीशी करार**
संदीप जावळे ● ३०० रु.
३५. **घटना नारायणपूरची**
शशी देशपांडे, अनु. मोहिनी दातार ● १०० रु.
३६. **हॅरिसबाई**
कृ.ना. कुडाळकर ● १२० रु.
३७. **स्वदेश**
भूषण केळकर ● १६० रु.
३८. **टकिला टकाटक**
भूषण केळकर ● ३०० रु.
३९. **संघर्ष नागरी निवाऱ्याचा**
संपा. जयंत धर्माधिकारी, अमरेंद्र धनेशर ● १२५ रु.
४०. **गुडबाय कॅन्सर**
विद्या मुडगेरीकर ● १०० रु.
४१. **अधुरी एक कहाणी**
अंजली ठाकूर, दिनकर आजगावकर ● २५० रु.
४२. **विकासाची रूपरेषा - परिसंवादांच्या अनुभवातून**
सु.गो.तपस्वी ● ३०० रु.
४३. **क्षितिजावरील शलाका**
शारदा साठे ● २०० रु.
४४. **मुलगी झाली हो...**
ज्योति म्हापसेकर ● ६० रु.
४५. **ही आपलीच माणसं**
मंगला खाडिलकर, गजानन सबनीस ● २५० रु.
४६. **कोहम् धाबा**
अनुवाद-संजीव दहिवदकर ● १०० रु.
४७. **पैलूंविना हिरकणी**
सुधा सोनाळकर ● ८० रु.

४८. **जग जनुकांचे**
डॉ. हेमा पुरंदरे ● १०० रु.
४९. **वृद्धत्वाची शान**
पद्माकर नागपूरकर ● १२५ रु.
५०. **मनातलं काहीसं**
सुधा सोमण ● १२० रु.
५१. **पानीकम**
संजय पवार ● १०० रु.
५२. **वारस होऊ अभिमन्यूचे**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
५३. **न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**
(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या
सहकार्याने) ● ४०० रु.
५४. **सोन्याच्या धुराचे ठसके**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २७५ रु.
५५. **सौदीच्या अंतरंगात**
पद्मा कऱ्हाडे ● २०० रु.
५६. **मौन होई बोलके**
रोहिणी लिमये ● २०० रु.
५७. **गांगल ७० ग्रंथाली ३५**
संपादन सुदेश हिंगलासपूरकर ● ३०० रु.
५८. **संकल्प**
संपादन संजीव खांडेकर ● ३०० रु.
५९. **भिडू**
भगवान इंगळे ● २५० रु.
६०. **पंखाविना भरारी**
प्रसादची आई (शरयू घाडी) ● २०० रु.
६१. **स्वास्थ्यवृत्त**
डॉ. शरदिनी डहाणूकर ● १०० रु.
६२. **कानोसा**
डॉ. राणी बंग ● २५० रु.
६३. **आयुर्वेदातील स्त्रीविज्ञान**
शुभदा वेलणकर ● ४०० रु.
६४. **अंगणातले आभाळ**
यशवंत पाठक ● ३०० रु.
६५. **आभाळ माझं**
विमल कुलकर्णी ● १०० रु.
६६. **गोष्ट झऱ्याची**
सुधा वर्दे ● १५० रु.
६७. **कोल्हाट्याचं पोर**
किशोर शांताबाई काळे ● १०० रु.
६८. **आमचा बाप आन् आम्ही**
(१६१ आवृत्ती)
नरेंद्र जाधव ● १२० रु.
६९. **बलुतं**
दया पवार ● १०० रु.
७०. **उपरा**
लक्ष्मण माने ● १०० रु.
७१. **आयदान**
उर्मिला पवार ● २२० रु.
७२. **हृदयस्थ**
डॉ. अलका मांडके ● २५० रु.
७३. **ताठ कणा**
डॉ. पी.एस. रामाणी ● २५० रु.
७४. **मैत्र जीवाचे**
विदुर महाजन ● २०० रु.
७५. **पाचट**
योगीराज बागूल ● २५० रु.
७६. **जगायचंय प्रत्येक सेकंद**
मंगला केवळे ● ८० रु.
७७. **वन फॉर सॉरो**
अनुराधा कुलकर्णी ● १२५ रु.
७८. **उदई**
प्रकाश चव्हाण ● १६० रु.
७९. **जय हो**
कमल देसाई ● ३०० रु.
८०. **क्लोरोफॉर्म**
डॉ. अरुण लिमये ● २०० रु.
८१. **असुरेंद्र**
ना.बा. रणसिंग ● ४०० रु.
८२. **फोडणी**
रामदास फुटाणे ● १०० रु.
८३. **एका शहराच्या खुंटीवर**
चंद्रशेखर सानेकर ● ७५ रु.
८४. **पाऊस**
अरुण शेवते ● ६० रु.
८५. **शोधवर्तन**
नरेंद्र बोडके ● ८० रु.
८६. **बावनकशी**
हॅमेलिआ ● ६० रु.
८७. **सफिया बेगम**
अरुण शेवते ● १०० रु.
८८. **सत्ता**
चंद्रशेखर भुयार ● ७५ रु.
८९. **एका ऊन्हाची कैफियत**
चंद्रशेखर सानेकर ● ६० रु.
९०. **कॉमन मॅन**
हेरंब कुलकर्णी ● ८० रु.
९१. **स्वत:तील अवकाश**
ज्ञानेशर मुळे ● १२५ रु.
९२. **मितवा**
उषा मेहता ● ५० रु.
९३. **निरंतर**
उषा मेहता ● २०० रु.
९४. **संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
संजीव खांडेकर ● ६० रु.
९५. **चॅनेल : डी-स्ट्रॉयरी**
श्रीधर तिळवे ● १२५ रु.
९६. **काही अनुभव काही आठवणी...**
रणजीत शहा ● ५० रु.
९७. **शांती अवेदना...**
पुष्पाग्रज ● ८० रु.
९८. **बदलत गेलेली सही...**
अंजली कुलकर्णी ● १२० रु.
९९. **उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर ● ७५ रु.
१००. **या दशकाचा सातबारा कोराच राहील**
शंकरराव दिघे ● ८० रु.
१०१. **आईच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०२. **...माझ्या काळाचा अनुवाद**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
१०३. **कवितेच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०४. **सनद**
नारायण सुर्वे ● १०० रु.
१०५. **वाटेवरच्या कविता**
अशोक नायगावकर ● ५० रु.
१०६. **सैतानाची खुशी**
राकेश भडंग ● ८० रु.
१०७. **बाईच्या कविता**
किरण येले ● ८० रु.
१०८. **प्रत्ययपर्व**
मनोहर जाधव ● ७० रु.
१०९. **सुगंध उरले, सुगंध उरले**
अरुणा ढेरे ● १६० रु.
११०. **गारुड गझलचे**
सदानंद डबीर ● १२० रु.
१११. **अन्वय**
उषा मेहता ● १०० रु.
११२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२००५**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११३. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२००८**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११४. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२००९**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११५. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०१०**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११६. **उर्मिला**
डॉ. वसंत वऱ्हाडपांडे ● १०० रु.
११७. **धमधोकार**
प्रकाश पेठे ● १२० रु.
११८. **विदेशी खिचडी**
सुधीर शं. कुलकर्णी ● १०० रु.

११९. **हाक/प्रतिसाद**
निदा फाजली,
अनुवाद-इब्राहीम अफगाण ● २०० रु.
१२०. **काचेपाठचा समुद्र**
स्मिता भागवत ● १६० रु.
१२१. **निशाणी - डावा अंगठा**
रमेश इंगळे-उत्रादकर ● ३०० रु.
१२२. **रानभूल**
प्रल्हाद जाधव ● १२५ रु.
१२३. **संभव**
माधव चव्हाण ● १५० रु.
१२४. **विवेकीजनीं ह्या मज जागविलें**
प्र.ब. कुळकर्णी ● २०० रु.
१२५. **सिंहासन**
अरुण साधू ● २५० रु.
१२६. **मोरपिस**
अनुराधा गानू ● १६० रु.
१२७. **प्रकाशवाट**
वंदना करंबेळकर ● १२५ रु.
१२८. **संचिताची कोजागिरी**
यशवंत पाठक ● ३०० रु.
१२९. **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**
प्रा. द.ता. भोसले ● ३०० रु.
१३०. **विज्ञान विशारदा**
वसुमती धुरू ● १२५ रु.
१३१. **भारतातील स्टेनलेस स्टील संस्कृतीचे जनक**
संकलन-संपादन
शरयू ठाकूर, दिनकर गांगल ● २५० रु.
१३२. **महारूद्र** (आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)
जी.बी. देशमुख ● १२० रु.
१३३. **गांधी**
नलिनी पंडित ● २०० रु.
१३४. **लालबाग**
आदिनाथ हरवंदे ● ४०० रु.
१३५. **विज्ञानशिक्षण - नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान ● १६० रु.
१३६. **का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने ● ५० रु.
१३७. **शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे ● २०० रु.
१३८. **शिक्षणातील लावण्य**
लीला पाटील ● १०० रु.
१३९. **बालकहक्क**
लीला पाटील ● २२५ रु.
१४०. **शाळा आहे शिक्षण नाही**
हेरंब कुलकर्णी ● १०० रु.
१४१. **सुरवंटाचे फुलपाखरू**
डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले ● १२० रु.
१४२. **कळी उमलताना**
अनुराधा गोरे ● २०० रु.
१४३. **आजीच्या गोष्टी (भाग १)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१४४. **आजीच्या गोष्टी (भाग २)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१४५. **टेलिफोन ते मोबाईल**
चिन्मय थत्ते ● ६० रु.
१४६. **गोईण**
राणी बंग ● १६० रु.
१४७. **शीळ**
सरोज जोशी ● १५० रु.
१४८. **वाहतूक ठप्प**
अशोक दातार ● १२० रु.
१४९. **हत्या**
राकेश भडंग ● ३५० रु.
१५०. **संत तुकोबाची रोजनिशी**
रवींद्र पाटील ● ४०० रु.
१५१. **आभरान**
पार्थ पोळके ● २०० रु.
१५२. **असाही एक महाराष्ट्र**
संदेश भांडारे ● ३५० रु.
१५३. **माणूस नावाचे जगणे**
डॉ. रवीन थत्ते ● ८० रु.
१५४. **आरोग्याचा अर्थ**
डॉ. आनंद नाडकर्णी ● २०० रु.
१५५. **धुंद-स्वच्छंद**
वसंत वसंत लिमये ● ६० रु.
१५६. **ध्येयनिष्ठ कर्मयोगी**
अरविंद पोतनीस ● २५० रु.
१५७. **जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या**
सुधीर शं. कुलकर्णी ● १५० रु.
१५८. **मनोहारी**
विठ्ठल देशपांडे ● १२५ रु.
१५९. **आठवणीतले बाबासाहेब**
योगीराज बागूल ● ३०० रु.
१६०. **चंदनाची पाखर**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६१. **आभाळाचे अनुष्ठान**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६२. **येणे बोधे आम्हा**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६३. **खेळ मांडला**
विभावरी दांडेकर ● १५० रु.
१६४. **देवांसि जीवे मारिले**
लक्ष्मण लोंढे
चिंतामणी देशमुख ● २०० रु.
१६५. **शोध मराठीपणाचा**
संपादन : अरुणा ढेरे
भूषण केळकर
दिनकर गांगल ● २०० रु.

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ पुस्तके

१६६. **पहिला भारतीय वैमानिक**
रत्नाकर वाशीकर,
आ.रा. मराठे ● ४५ रु.
१६७. **गुणवान मुलांचे संगोपन**
अरुणा भिडे ● ५० रु.
१६८. **सदानंद!**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१६९. **आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी**
भवरलाल जैन ● ४५ रु.
१७०. **परराष्ट्रधोरण : भारत व जागतिक संबंध**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१७१. **परराष्ट्रधोरण : आपले शेजारी**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१७२. **सागर-महासागर**
शैलजा सांगळे ● ४५ रु.
१७३. **लहरी हवामान**
डॉ. कुमार कुलकर्णी ● ४५ रु.
१७४. **वेळंब**
डॉ. कमलाकर देवधर ● ४५ रु.
१७५. **पिंपरी-चिंचवड : जुनं-नवं**
मीरा जोशी ● ४५ रु.
१७६. **संख्यादर्शन**
स. पां. देशपांडे ● ४५ रु.
१७७. **कांगारूंचे मराठी आप्त**
कमलिनी काटदरे
निरंजन उजगरे ● ४५ रु.
१७८. **फळांचा राजा**
स्मिता देवधर ● ५० रु.
१७९. **एक आटपाट लोकमान्य नगर**
दिलीप काटदरे ● ५० रु.
१८०. **सहनैसर्गिक जीवनशैली**
डॉ. श्याम जोशी ● ५० रु.
१८१. **क्षुधाशांती ते मॅकडोनाल्ड**
सु.गो. तपस्वी ● ५० रु.
१८२. **प्रगती पुलांची**
सुधीर शं. कुलकर्णी ● ५० रु.
१८३. **प्रार्थनाविचार**
माधवी कवी/घनश्याम कवी ● ५० रु.

१८४. **सुशेगाद् गोवा**
नंदिनी महाडेश्वर ● ५० रु.
१८५. **पुस मॉथ ते डॅश-४००**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८६. **एड्स-कथा आणि व्यथा**
डॉ. दीप्ती डोणगावकर ● ५० रु.
१८७. **इस्रायलची मराठी लेकरे**
संध्या जोशी ● ५० रु.
१८८. **आकाशगामी**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८९. **देव जाणिला कुणी?**
प्रेमला काळे ● ५० रु.
१९०. **आधुनिक एकलव्य**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१९१. **स्वीय शेती**
गो. ह. दंडवते ● ५० रु.
१९२. **नेवासे**
संजय बोरुडे ● ५० रु.
१९३. **नाटळ**
मनोहर सावंते ● ५० रु.
१९४. **आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव ● १०० रु.
१९५. **बालकल्याण ते बालहक्क**
माधुरी भिडे ● ५० रु.
१९६. **इराण**
पद्मा कऱ्हाडे/
पुरुषोत्तम कऱ्हाडे ● ५० रु.
१९७. **चांगलं मरण**
डॉ. कमलाकर देवधरे ● ५० रु.
१९८. **वृद्धत्वः देशोदेशी**
पी. के. मुत्तगी/
पद्माकर नागपूरकर ● ५० रु.
१९९. **चित्रसंवाद**
संदीप देवल ● ८० रु.
२००. **कऱ्हाड**
विजय माळी ● १०० रु.
२०१. **रँग्लरचं ग्लॅमर**
स.पां. देशपांडे ● ४५ रु.
२०२. **मनाचे मनोगत**
साधना कामत ● ५० रु.
२०३. **हरित वसईचा लढा**
मार्कुस डाबरे ● १५० रु.
२०४. **स्मृतीच्या हिंदोळ्यावर**
साधना कामत ● १५० रु.
२०५. **ना खंत कशाची!**
भगवंत पंत ● १०० रु.
२०६. **स्वप्नांची बाग**
डॉ. उषा हरदास ● ८० रु.
२०७. **तांबडं रक्त**
अरुण मोकाशी ● ४०० रु.

**मातृभूमी सेवा ट्रस्ट पुस्तके**

२०८. **ओऽ कॅनडा!**
स्मिता भागवत ● १२० रु.
२०९. **स्थानभ्रष्ट**
डॉ. शांतिलाल धनिक,
शब्दांकन : स्मिता भागवत ● ३०० रु.
२१०. **पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे**
स्मिता भागवत ● ६० रु.

**१६६ पुस्तके संच क्रमांक २ मूळ किंमत ३३,११० रु.**
**सवलतीत संचाची किंमत १६००० रु.**

१. **शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस ● २५० रु.
२. **दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर ● २२५ रु.
३. **नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर ● २०० रु.
४. **टिळक ते गांधी मार्गेखाडिलकर**
मुकुंद वझे ● १२० रु.
५. **मराठी भाषेतीलअसभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे ● २५० रु.
६. **अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे ● १५० रु.
७. **आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● १८० रु.
८. **माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू ● २७५ रु.
९. **संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे ● १५० रु.
१०. **परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत ● १५० रु.
११. **तेजस्विनी**
स्मिता भागवत ● १५० रु.
१२. **मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे ● १०० रु.
१३. **आकार**
सदाशिव साठे ● २५० रु.
१४. **तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल ● २५० रु.
१५. **आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे ● १६० रु.
१६. **गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
१७. **बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल ● ६० रु.
१८. **भारतीय सृष्टी**
अनुराधा गांगल ● १२० रु.
१९. **संस्कार**
अनुराधा गांगल ● ६० रु.
२०. **रांगोळी**
अनुराधा गांगल ● १८० रु.
२१. **महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे ● १८० रु.
२२. **मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई ● १२० रु.
२३. **शांबरिका खरोलिक**
श्रीकांत पेटकर ● ६० रु.
२४. **प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील ● १८० रु.
२५. **आनंदाकार**
प्रकाश पेठे ● १०० रु.
२६. **हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर ● ७५ रु.
२७. **एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर ● १५० रु.
२८. **भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन
डॉ. नरेंद्र जाधव ● ५०० रु.
२९. **आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर ● ३०० रु.
३०. **ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर ● १८० रु.
३१. **ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर ● २०० रु.
३२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.

३३. **अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे ● १८० रु.
३४. **अजब सहवास**
गो.आ. भट ● १०० रु.
३५. **सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे ● १२० रु.
३६. **यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक**
डॉ. प्रकाश दुकळे ● २५० रु.
३७. **वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित ● ७५ रु.
३८. **कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी ● ३५० रु.
३९. **विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर ● १०० रु.
४०. **उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे ● ५०० रु.
४१. **आठवा चिरंजीव**
डॉ. प्रतिभा मुडगेरीकर ● १५० रु.
४२. **वडोदरा**
प्रकाश पेठे ● ८० रु.
४३. **दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी ● ३५० रु.
४४. **आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १०० रु.
४५. **साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
४६. **मनस्वी**
बाबूराव चंदावार ● ५०० रु.
४७. **झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी) ● १०० रु.
४८. **एका कवीचे जीवनगाणे वामन कर्डक यांची चरित्रकथा**
बबन लोंढे ● १६० रु.
४९. **आठवणीतील पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे ● ३०० रु.
५०. **अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर ● ३५० रु.
५१. **नाझी नरसंहार**
कुमार नवाथे ● १५० रु.
५२. **डायरी**
प्रवीण बर्दापूरकर ● १८० रु.
५३. **लॉक ग्रिफिन**
वसंत वसंत लिमये ● ५०० रु.
५४. **दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स**
कर्नल सुधीर नाफडे ● २२५ रु.
५५. **पश्चिम घाट बचाओ मोहीम**
जगदीश गोडबोले ● २०० रु.
५६. **जीवन आणि स्वास्थ्य**
डॉ. प्रेमानंद रामाणी ● ८० रु.
५७. **जेनेटिक्स कशाशी खातात?**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २५० रु.
५८. **नाही चिरा नाही पणती**
स्मिता भागवत ● २०० रु.
५९. **वानुळा**
साहेबराव चवरे ● १०० रु.
६०. **आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, तर मग अध्यात्म ते काय?**
शरद बेडेकर ● १२० रु.
६१. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१२**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
६२. **पहाटसरी**
यशवंत पाठक ● ३५० रु.
६३. **अंतरीचे धावे**
यशवंत पाठक ● १५० रु.
६४. **वेगळा विदर्भ**
श्रीपाद जोशी ● २०० रु.
६५. **तिचं अवकाश**
नीलिमा कानेटकर ● ३०० रु.
६६. **हुंदके टाळण्यासाठी**
नीलिमा कानेटकर ● २०० रु.
६७. **शोध**
डॉ. बी.जी. शेखर ● १५० रु.
६८. **कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य**
मयूर देवल ● १०० रु.
६९. **देश, परदेश आणि मी**
गजानन सबनीस ● २०० रु.
७०. **समाजरंग**
ज्ञान मयूर/अनिता कुलकर्णी ● २५० रु.
७१. **माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
नारायण आठवले ● २२५ रु.
७२. **रंग दे बसंती चोला**
स्मिता भागवत ● २०० रु.
७३. **कथा इन्सुलिनच्या शोधाची**
विजय आजगांवकर ● १५० रु.
७४. **ॲबसर्ड थिएटर**
माणिक कानेड ● १६० रु.
७५. **नगरमंथन**
प्रकाश पेठे ● २०० रु.
७६. **घडत गेलेली गोष्ट**
विजया राजाध्यक्ष ● २२५ रु.
७७. **माझं साहित्यिक खटलं**
ॲड. यशवंत हडप ● २२५ रु.
७८. **दत्तकवेणा**
प्रगती कोळगे ● १५० रु.
७९. **क्षितिज पश्चिमेचे**
विनता कुलकर्णी ● २५० रु.
८०. **यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका**
लक्ष्मण माने ● २५० रु.
८१. **तांडव हरवताना**
रवी परांजपे ● २५० रु.
८२. **लसावि**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
८३. **सारांश शून्य**
संजय कळमकर ● ३०० रु.
८४. **मनाचे कवडसे**
विश्वास काकडे ● १०० रु.
८५. **१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे ● ३५० रु.
८६. **अंतरंग**
विजया राजाध्यक्ष ● १२५ रु.
८७. **ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर ● १२५ रु.
८८. **प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे ● ८० रु.
८९. **कवडसे**
महेश केळुस्कर ● ७० रु.
९०. **वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले ● ८० रु.
९१. **ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण ● १५० रु.
९२. **दु:ख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ ● ६० रु.
९३. **मनोमनी**
जयश्री भिसे ● ७५ रु.
९४. **अरूपाचे रूप**
माणिक गुट्टे ● १२५ रु.
९५. **एक अजब कोलाहल**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
९६. **काळिजगुंफा**
सदानंद डबीर ● ७५ रु.
९७. **कवितेची वही**
सलोनी धुरी ● ८० रु.
९८. **फुलवेडी**
अरुण शेवते ● ६० रु.
९९. **शब्द तर कुली आहेत**
राजेंद्र काटदरे ● १०० रु.
१००. **तृष्णाकाठ**
वैभव देशमुख ● १०० रु.
१०१. **रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
१०२. **रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३०० रु.

१०३. **बोल महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● २५० रु.
१०४. **बोल महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● ६०० रु.
१०५. **बोल महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.
१०६. **प्रज्ञा महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.
१०७. **प्रज्ञा महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● २०० रु.
१०८. **प्रज्ञा महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● २२५ रु.
१०९. **प्रज्ञा महामानवाचे भाग ४**
डॉ. नरेंद्र जाधव ● ७५ रु.
११०. **आंबेडकरी विचारधारा**
बबन लोंढे ● ६०० रु.
सुधाकर गायकवाड
१११. **काळोखगर्भ**
बबन लोंढे ● २५० रु.
सुधाकर गायकवाड
११२. **निर्णायक युद्धानंतर**
बबन लोंढे ● १२५ रु.
सुधाकर गायकवाड
११३. **संकल्पना कोश भाग १**
सुरेश वाघे ● ६०० रु.
११४. **संकल्पना कोश भाग २**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११५. **संकल्पना कोश भाग ३**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११६. **संकल्पना कोश भाग ४**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११७. **संकल्पना कोश भाग ५**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११८. **जीवनदान**
राजीव जोशी ● १०० रु.
११९. **मी मवाली तुझ्या हवाली**
सुभाषचंद्र मयेकर ● १२० रु.
१२०. **निरन्वय**
नीरजा ● १०० रु.
१२१. **स्त्रीगणेशा**
नीरजा ● १०० रु.
१२२. **बुद्ध परंपरा आणि बोधीवृक्ष**
हेमा साने ● १५० रु.
१२३. **जॅक ऑफ ऑल**
अनुराधा गोरे ● १३० रु.
१२४. **परिक्षेची भीती कशाला?**
अनुराधा गोरे ● २५० रु.
१२५. **ताबंट**
प्रल्हाद जाधव ● १५० रु.

१२६. **जिद्द**
सरोज जोशी ● ८० रु.
१२७. **फिदा स्वत:वर**
सरोज जोशी ● ८० रु.
१२८. **भारतीय बौद्धिक संपदेचा उद्‍गाता डॉ. रघुनाथ माशेलकर**
अ.पां. देशपांडे ● २२५ रु.
१२९. **जैतापूरचे अणुमंथन**
राजा पटवर्धन ● ३०० रु.
१३०. **हुमान**
संगीता धायगुडे ● ३५० रु.
१३१. **शापित भूमी**
उमेश कदम ● २५० रु.
१३२. **मला समजलेले पाच हिंदू धर्म**
शरद बेडेकर ● १६० रु.
१३३. **सव्वाशे बोधकथा भाग २**
दिलीप पांढरपट्टे ● १५० रु.
१३४. **नोबेलनगरी नवलस्वप्ने २०१३**
सुधीर/नंदिनी थत्ते ● ८० रु.
१३५. **गुलजारांच्या कविता**
रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
अनुराधा मोहनी ● १२५ रु.
१३६. **स्पर्श हरवलेले**
डॉ. सुलभा कोरे ● १०० रु.
१३७. **पंजाबराव देशमुख जीवनकालपट**
डॉ. रमेश पानसे ● १२० रु.
१३८. **झोके अमेरिकेतले**
डॉ. अनंत लाभसेटवार ● २५० रु.
१३९. **आवाज कुणाचा**
दीपक वेलणकर ● ५० रु.
१४०. **विकासाचे निष्कर्ष**
सु.गो. तपस्वी ● ३०० रु.
१४१. **संस्कारहीन**
निर्मला डांगे ● १०० रु.
१४२. **ॲबगेल ॲडम्स**
माणिक कानेड ● ८० रु.
१४३. **स्वरोत्सव**
डॉ. लीना आगाशे ● १५० रु.
१४४. **महाराष्ट्राचा लेखाजोखा**
संकलन : दिलीप चावरे ● १६० रु.

**दोन्ही संच एकत्रित घेतल्यास २७००० रुपयांत मिळेल**

१४५. **एक अवकाश माझंही**
छाया कोरेगावकर ● ६० रु.
१४६. **संवाद**
डॉ. नीना सावंत ● १०० रु.
१४७. **साकुरा**
पूजा मलुष्टे ● २०० रु.
१४८ **बोलावे ते आम्ही**
श्रीकांत देशमुख ● १८० रु.
१४९. **मे आय कम इन**
कु. तन्वी दिनेश डोके ● १२५ रु.
१५०. **शून्याचं मोल अमोल**
स्मिता भागवत ● १५० रु.
१५१. **बी.एन.**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१५२. **ग्रामीण बोलीचा शब्दकोश**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
१५३. **हाँगकाँग सफारी**
पद्मा कऱ्हाडे ● १२० रु.
१५४. **वैश्विक उपचार**
विपिन मेहता
अनुवाद–विजया बापट
संपादन : अपर्णा वेलणकर ● १८० रु.
१५५. **चॅनेल 4 लाईव्ह**
समीरण वाळवेकर ● ४०० रु.
१५६. **स्पर्श दिव्यत्वाचा**
सुलभा वर्दे
उषा धर्माधिकारी ● १०० रु.
१५७. **आस्तिकता नास्तिकता दोन्ही अंधश्रद्धा**
दि.म. संत ● १२५ रु.
१५८. **आनंदभैरवी**
सदानंद डबीर ● ८० रु.
१५९. **साकिया**
सदानंद डबीर ● ८० रु.
१६०. **दुरावा**
गणेश बरगे ● १०० रु.
१६१. **पडघम**
अरुण साधू ● १२५ रु.
१६२. **सोल्जर इन मी**
शिल्पा जितेंद्र खेर ● २५० रु.
१६३. **सत्यकथा**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१६४. **तसा मी.. असा मी**
डॉ. बाळ खरे ● २५० रु.
१६५. **ढोर**
भगवान इंगळे ● ३०० रु.
१६६. **काही तरी सांगायचंय म्हणून**
प्रकाश हरी कार्लेकर ● १२५ रु.

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.



'अॅबसर्ड थिएटर' या ग्रंथास
म.म. डॉ. वा.वि. मिराशी
स्मृती वैचारिक वाङ्मय लेखन पुरस्कार
घोषित झाला. तो स्वीकारताना
लेखक माणिक कानेड




शिल्पा खेर लिखित 'सोल्जर इन मी'
या पुस्तक प्रकाशनसमयी
लतिका भानुशाली, अनुराधा गोरे,
विश्वास नांगरे-पाटील
(अतिरिक्त पोलिस आयुक्त, गुन्हे अन्वेषण विभाग)
लेखिका शिल्पा खेर,
मेजर सुभाष गावंड (निवृत्त)




डॉ. बाळ खरे लिखित 'तसा मी.. असा मी..'
या पुस्तक प्रकाशनसमयी
दिलीप प्रभावळकर
पद्‌भूषण डॉ. नंदकिशोर लाड
डॉ. विजया वाड
डॉ. स्नेहलता देशमुख
आणि
लेखक डॉ. बाळ खरे

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.